हिंदुसमाजोद्धारक वाङ्मयमाला-पुस्तक २ रें.

ब्राह्मणांतील पोटजातींचें एकीकरण

उत्तरार्ध खंड १ ला.



उद्धरेदात्मनात्मानम् ।

—गीता.

लेखकः- महादेवशास्त्री दिवेकर.

किंमत १२ आणे.) हिंदु समाज समर्थ कसा होईल ? (ट. ख. २ आ

हें मालेचें पहिलें ... असून तें हिंदुसंघटनेला अत्यंत उपयुक्त आहे. केसरी, श्रद्धानंद, नवाकाळ, ज्ञानप्रकाश, रणगर्जना व महाराष्ट्र इत्यादि पत्रांचे या पुस्तकाविषयीं उत्तम अभिप्राय प्रसिद्ध झाले आहेत. त्या सर्वांची कल्पना यावी म्हणून नागपूरचा ३१-७-२७ चा " महाराष्ट्र " काय म्हणतो तें पहा.

हल्लींच्या हिंदुसंघटनेच्या काळीं हें पुस्तक प्रसिद्ध करून श्री. दिवेकरशास्त्रीबुवांनीं संघटणेच्या कार्यास उत्कृष्ट मदत केली आहे. प्रचंड हिंदुसमाज समर्थ झाल्याशिवाय हिंदुस्थानास स्वराज्य मिळणें अशक्य आहे. हिंदु समाजाला आपलें वैशिष्ट्य कायम टिकवूनच स्वराज्य संपादावयाचें आहे. त्यासाठीं समाजांतील दुबळेपणाची कारणें हुडकून काढून तीं नष्ट करून समाजाचा उत्साह, हुरूप व सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करणें हेंच समाज सुधारकांचें काम आहे. श्री. दिवेकरशास्त्रीबुवांनीं हें काम उत्कृष्टपणें केलें आहे यांत संशय नाहीं. सर्व हिंदु स्त्री-पुरुषांनीं हें पुस्तक वाचून त्यांतील विवेचनाचा विचार करावा व त्याप्रमा... ...नीं निदान एक वेळ तरी हें पुस्तक वाचल्याशिव... ...र्व वाचनालयांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. पु... ...गंग व छपाई हीं अंतरंगाप्रमाणें उत्तम असून किंमतहि बेत...

हिंदुसमाजोद्धारक वाङ्मयमाला पुस्तक दुसरें.

उद्धरेदात्मनात्मानम् ।—गीता

ब्राह्मणांतील

पोटजातींचें एकीकरण

उत्तरार्ध खंड १ ला

लेखक व प्रकाशक—**महादेवशास्त्री दिवेकर**

मुद्रक—**वा. वा. अतीतकर**, बी. ए., समर्थभारत छापखाना,
घ. नं. ३२५ सदाशिव पेठ, पुणें शहर.

मूल्य १ रुपाया

शके १८४९] [त्रिपुरी पूर्णिमा

अनुक्रमणिका

प्रस्तावना

गेल्या आषाढी पूर्णिमेस या ग्रंथाचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाला. त्यानंतर आज अकोला परिषदेपूर्वी हा उत्तरार्ध प्रसिद्ध होत आहे याबद्दल एक प्रकारचें समाधान वाटतें. या ग्रंथांत दिलेली माहिती अपुरी असली तथापि जेवढी दिली आहे तेवढी सत्य व विश्वसनीय आहे यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांतील जातीजातींचे प्रश्न आधींच गुंतागुंतीचे, कोणत्याहि जातीबद्दल कांहीं विधान करूं गेल्यास त्यांत इतरांना कांहींतरी लागण्याचा संभव, माहितीच्या बाबतींत प्रत्येक जातीचें विलक्षण औदासिन्य, अशा स्थितींत माहिती मिळविणें, ती साधकबाधक चर्चेकरितां व्याख्यानांत व वृत्तपत्रांत प्रसिद्ध करणें व शेवटीं तिला ग्रंथाचें स्वरूप देणें एवढें बिकट कार्य ईश्वरकृपेनेंच समाधानकारकपणें पार पडलें असें म्हटलें पाहिजे. कारण यापूर्वी निरनिराळ्या जातींची माहिती संकलित करून ती लोकांपुढें ठेवण्याचें काम सरकारद्वारां डॉ० विल्सन्, इबट्सन्, एन्थॉवेन् अशा सारख्यांनीं भरपूर पैसा व सर्व प्रकारचें सरकारी सहाय्य घेऊन केलेलें आहे. परंतु अशा थोर ग्रंथकारांच्या हांतून अनास्था, पूर्वदूषितग्रह व आत्मीयत्वाचा अभाव यामुळें हें कार्य चांगल्या तऱ्हेनें झालेलें नाहीं. अर्थात त्यापेक्षां हें कार्य अल्पच पण चांगलें झालें आहे हें पूर्वार्धावरील कांहीं अभिप्रायावरून लक्षांत येईल.

पूर्वार्धावरील कांहीं अप्रसिद्ध अभिप्राय

१. मुरलीधर विठ्ठल दास्ताने, वकील (भुसावळ)–आपण फारच समतोल न्यायाधिशाप्रमाणें मतें मांडता ही फार चांगली गोष्ट आहे.

२. गो. प्र. भावे (रामतीर्थचरित्रकार)–हिंदु समाजांतील निरनिराळ्या जातींनीं राष्ट्रीय दृष्ट्या कोणत्या दिशेनें एकीकरण करावें हें सांगणारें आपलें हेंच पहिलें पुस्तक आहे. हिंदु समाजशास्त्राच्या दृष्टीनें आपल्या पुस्त-

कार्चे महत्त्व फार आहे. विख्यात समाजशास्त्राचे सिद्धान्त प्रस्थापित होण्याला आगामी पध्दतीनें जमविलेल्या या सामाजिक माहितीचा विशेष उपयोग होणार आहे.

३. रामकृष्ण केशव खटी (वरोरा)–आपल्या पुस्तकांतील माहिती फार परिश्रमपूर्वक मिळविलेली असून ती सर्वांना पटण्यासारखी आहे. आपल्या पुस्तकाचा विशेष म्हणजे हिंदु समाजाच्या मानसिक प्रकृतीची यथार्थ कल्पना करून सुधारणेची व्यवहार्य अशी दिशा त्यांत दाखविली आहे. यज्ञकन्या-संबंध व गोत्रप्रवरविचार याविषयीं माझे विचार विभिन्न असले तरी सामाजिक सुधारणेचा योग्य दिशेनें आपण पुरस्कार करीत आहांत व तो कळकळीनें व निःस्वार्थबुध्दीनें करीत आहांत याबद्दल कृतज्ञता वाटते.

४. पांडुरंग जगन्नाथ रामदासी, मांडकुलकर–या पुस्तकांत व्यक्त न झालेलें गौड आणि द्रविड ब्राह्मणांचें सहानुष्ठान संघटणाच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. भिन्न शाखीय विवाह हा विषय सप्रमाण आणि विरोधाचें साधार खंडण करून सिध्द करण्यांत आला आहे.

५. चिटणीस, यजुर्वेदी मित्रमंडळ, मुंबई (चिंचणी)–आपल्या पूर्वार्धांतील मजकूर विद्वताप्रचुर असून निरपेक्ष बुद्धीनें छापलेला आहे. सर्व ब्राह्मण समाजाविषयीं योग्य माहितीनें भरलेलें हें पहिलेंच पुस्तक आहे.

वृत्तपत्रें व मासिकें यांतील अभिप्राय लोकांच्या वाचनांत येतातच म्हणून वाचनांत न येणारे म्हणजे खाजगी पत्रव्यवहारांत आलेले कांहीं अभिप्राय वर दिले आहेत त्यावरून या कार्याचें महत्त्व समजेल.

शके १८०६ सालीं कै. वा. गुंजीकर यांनीं ‘सरस्वती मंडल’ या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या ग्रंथांत त्यांनीं मुंबईमध्यें मराठी भाषा बोलणाऱ्या ज्या सात ब्राह्मण जाती आढळतात त्याचीच माहिती दिली असून इतर जातींचें वर्णन लिहिण्याचा मनोदय आहे असे प्रस्तावनेंत म्हटलें आहे. त्यानंतर त्रेचाळीस वर्षांनीं आमचा प्रयत्न संघटनेच्या व एकीकरणाच्या योग्य काळांत होत आहे. तथापि कै. वा. गुंजीकराप्रमाणें आमचाहि मनोदय सिध्दीस गेला नाहीं याबद्दल वाईट वाटतें. त्रेचाळिस वर्षांपूर्वी नुसती

माहिती देणें हा उद्देश होता तर आज संघटना व एकीकरण यांना उपकारक अशी माहिती देण्याचा उद्देश आहे. परंतु या ग्रंथांत महाराष्ट्रांतील सर्व पंचद्राविक आणि पंचगौड जातींची माहिती देतां आली नाहींच! सतत २१-२२ महिने परिश्रम, सात आठ महिने प्रवास, माहितीकरितां वृत्तपत्रांतून विनंत्या, प्रत्येक जाति-संस्थेची व पुढाऱ्यांची चार दोन वेळां भेट, दोन अडीच हजार उलट सुलट पत्रें व वृत्तपत्रांतून लेखमाला, इतका खटाटोप करून पंचद्राविडांतील २८—३० जातींची व गौडांतील एक दोन जातींची माहिती मोठ्या जिकीरीनें देतां आली. समाधानाची गोष्ट एवढीच कीं, प्रयत्नांत कसूर केली नाहीं, व दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे पुण्याच्या सारस्वत सोशल युनियन या संस्थेनें पंचगौडांतील सर्व जातींची माहिती प्रसिद्ध करण्याचें काम संतोषानें पत्करलें ही होय. तेव्हां आम्हीं अवशिष्ट पंचद्राविड जातींची माहिती प्रसिद्ध केली कीं विषय संपला. उत्तरार्धाच्या या खंडांत पंचद्राविडांतील तीस व पंचगौडांतील फक्त दोन जातींची माहिती आली आहे. उत्तरार्धांत यच्चयावत पंचद्राविड गौडांची माहिती द्यावी असा आमचा मनोदय होता, परंतु तो सिद्धिस गेला नाहीं याबद्दल वाईट वाटतें. समाधानाची गोष्ट इतकींच कीं, गेल्या एकविस महिन्यांच्या सतत परिश्रमानें जेवढी माहिती संकलित करतां आली तेवढी महाराष्ट्र वाचकांपुढें ठेविली आहे. वृत्तपत्रांतून माहितीबद्दल विनंति-पत्रकें, माहितीकरितां २।३ वेळां निरानिराळ्या जातींच्या संस्थांना व पुढाऱ्यांना भेट व त्यानंतर पुनश्च पत्रव्यवहार, अशा क्रमानें मधुकर-वृत्तीनें माहिती जमा केली आहे. प्रत्येक जातींच्या माहितीकरितां निदान २५-३० पत्रें, ५-४ रजिष्टरें या हिशेबानें हजार अकराशें पत्रें [छापील नव्हेत] उलट सुलट गेलीं आहेत.

या ग्रंथांत प्रसिद्ध केलेल्या एवढ्याच ब्राह्मण जाति महाराष्ट्रांत अस्तित्वांत आहेत असें नाहीं. याशिवाय पंच द्राविड व गौड ब्राह्मणामध्यें आणखीहि जाती आहेत. त्यांपैकीं अवशिष्ट पंच द्राविडांची माहिती अशीच प्रसिद्ध करण्याचा उद्देश असल्यामुळें ‘ उत्तरार्ध खंड १ ला ’ असें नांव मुद्दाम दिलें आहे. आमची भूमिका संघटनाची आहे. जेवढा म्हणून ब्राह्मण वर्ग आहे तो

संघटित व्हावा; या वर्गाचे अनीश्वर व कृत्रिम कारणांनीं जे फुटिर फूटिर अवयव पडलेले आहेत ते सांधावे या उद्देशानें ही माहिती प्रसिद्ध केली आहे. अनेक कृत्रिम कारणांनीं ब्राह्मण वर्गामध्यें ज्या पोटजाती पडल्या आहेत, त्यांच्या एकीकरणाची आवश्यकता आज उत्पन्न झाली आहे म्हणून तें तत्त्व बिंबवण्याकरितां हा प्रयत्न आहे. अर्थात् एवढा उपयोग झाला म्हणजे पुस्तकाचें कार्य संपलें.

प्रांतभेद, आचारभेद आणि अशाच तऱ्हेच्या कारणांना नसतें महत्त्व दिलें गेल्यामुळें पल्लेवाळ ब्राम्हणांवर जो प्रसंग आला आहे तोच गोमांतकामध्यें भट्टप्रभूवरही आहे. अन्नलग्नद्वारां पोटजातीचें एकीकरण न झाल्यास कात्यायन, किस्ती, मैत्रायणी, जंबुकण्व, सहवासी वैष्णव इत्यादि अल्पसंख्य ब्राम्हण जातींची अत्यंत शोचनीय स्थिती होईल, इतकेंच नव्हे तर विविध प्रांतांत विविध जातींतील जीं तुरळक तुरळक कुटुंबें आज विद्यमान आहेत तीं समूळ नष्ट तरी होतील किंवा स्वाभिमानशून्यतेनें कशीबशीं जगतील! रामतीर्थचरित्रकार श्री. भावे हे एका पत्रांत लिहितात कीं, नेपाळांत पशुपतेश्वराचे पुजारी व उपाध्ये साठे या नांवाचे दक्षिणी ब्राह्मण आहेत. हें घराणें पेशवाईत तिकडे गेलें व त्याच्या कांहीं पिढ्याहि तिकडे झाल्या. या घराण्यांतील मुलाबाळांचीं नांवें बदललीं, भाषा बदलली, पेहराव बदलला असून त्यांचा इकडचा संबंध तुटल्यामुळें हल्लीं लग्नादि विधि व इतर व्यवहार जुळण्याची पंचाईत पडते. सामाजिक दृष्ट्या त्यांचें क्षेत्र संकुचित होत असून ना धड दक्षिणी ना हिंदुस्थानी ब्राह्मण अशी या साठे घराण्याची स्थिति झालेली आहे. एका घराण्यांचें हें उदाहरण अल्पसंख्य जातींच्या बाबतींतहि बरोबर लागू पडतें. महाराष्ट्रांत विद्यमान असलेल्या बहुतेक ब्राह्मण जाति या समूहासमूहानें अनेक कारणामुळें महाराष्ट्रांत राहावयास आलेल्या आहेत. बाहेरून आलेल्या अल्पसंख्य जाति संकुचित क्षेत्रामुळें कुचंबत आहेत आणि क्षीण होत आहेत हें हा उत्तरार्ध काळजीपूर्वक वाचल्यानें सहज समजणार आहे. प्रत्येक जातीची माहिती ज्या निरनिराळ्या मथळ्याखालीं दिलेली आहे, त्यांचेंहि बारकाईनें निरीक्षण केल्यास सामाजिक अनुमानांस व विधानांस बरेंच सहाय्य होणार आहे. या दृष्टीनें समाजाच्या अभ्यासकांना या ग्रंथाचा

बराच उपयोग होईल अशी आशा आहे. ब्राह्मणांतील विविध पोटजातींनीं ही माहिती वाचून यापुढें इतर जातीबद्दल अनुदार उद्गार व बेजबाबदार भाषा वापरण्याचें कृपा करून सोडून द्यावें. तसेंच उच्चनीचपणाच्या भावना, मत्सरमूलक ह्मणी, व वाक्‌प्रचार या सर्वांना फाटा देऊन ऐक्य बुद्धीनें वागलें पाहिजे. संघटनाला प्रतिकूल अशी जी वृत्ति ब्राह्मण समाजांत दिसते तिचा नायनाट केला तरच खरें संघटन होईल.

पंचद्राविड व गौड जातींतील अनेक संस्थांनीं व पुढाऱ्यांनीं सर्व प्रकारचें साह्य केलें म्हणून हा ग्रंथ योग्य वेळीं बाहेर पडला आहे हें सांगण्यास अभिमान वाटतो. या शेंपाउणशें सद्‌गृहस्थांचीं नांवें आदरपूर्वक आभार मानून दिलीं पाहिजेत, परंतु तीं विस्तारभयास्तव देतां येत नाहींत याबद्दल ते आम्हास क्षमा करितील असा भरंवसा आहे. मालेच्या वाङ्मयाचा स्वयंस्फूर्तीनें प्रसार करण्याचें कार्य ठिकठिकाणच्या अनेक सद्‌गृहस्थांनीं केलें आहे. त्यांच्या या निरपेक्ष साह्यामुळेंच आमचा कार्योत्साह दुणावत आहे हें कृतज्ञतापूर्वक कळविलें पाहिजे. त्यांचा सुद्धां नामनिर्देश त्या सद्‌गृहस्थांच्या इच्छेविरुध्द करण्याचें साहस आम्ही करीत नाहीं. ब्राह्मण सभेचे उत्साही प्रचारक श्री. नरहर शास्त्री खर्शीकर यांनीं मनापासून साह्य केलें. समर्थ भारत छापखान्याचे व्यवस्थापक श्री. अतीतकर यांनीं ठरल्याप्रमाणें पुस्तक वेळेवर छापून दिलें. श्री. शंकरराव जोशी वांईकर यांनीं उपयुक्त अशी सूची करून दिली ह्मणून या त्रिवर्गांचे आभार मानिले पाहिजेत. शेवटीं, ज्या जगनियंत्याच्या स्फूर्तीनें हें अल्प वाङ्मयकार्य सिद्धीस गेलें त्याच्या चरणीं सहस्त्र साष्टांग प्रणिपात करून तो या जड जीवांकडून असेंच कार्य करवून घेवो अशी प्रार्थना करून हें प्रास्ताविक निवेदन पूर्ण करितों.

त्रिपुरी पूर्णिमा,
१८४९, मिरज.

हिंदुधर्मप्रचारक,
महादेवशास्त्री दिवेकर.

ब्राह्मणांतील पोटजातींचें एकीकरण.

(उत्तरार्ध)

प्रकरण १ लें

बृहन्महाराष्ट्रांतील शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण.

१. माध्यंदिन ब्राह्मण.

"सध्यां महाराष्ट्रांत नागपूर, वऱ्हाड, खानदेश, नाशिक, औरंगाबाद, सातारा इत्यादि प्रांतांत यजुर्वेदी ब्राह्मणांची संख्या बहुतम आहे. त्यांच्या खालोखाल ऋग्वेद्यांचा भरणा आहे. सामवेदी व अथर्ववेदी ब्राह्मण महाराष्ट्रांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके असतील नसतील. तात्पर्य, शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मणांची संख्या महाराष्ट्रांत सर्वांहून अधिक आहे. ऋग्वेदी, कण्व, आपस्तंब यांच्या अल्पसंख्येची तुलना माध्यंदिनांच्या प्रचंड संख्येशीं केली, म्हणजे महाराष्ट्र हा देश भूरित्वानें माध्यंदिनांचा आहे असें म्हणणें भाग पडतें. माध्यंदिनांत कण्वांची भर टाकली म्हणजे ही यजुर्वेद्यांची संख्या त्याहूनही मोठी होते. शुक्ल यजुर्वेद्यांच्या संहितेचा मूळ उत्पादक याज्ञवल्क्य असल्यामुळें तत्प्रणीत धर्मादिसूत्रें त्यांनीं महाराष्ट्रांत वसाहतकाळीं आणिलीं. दक्षिणेंत याज्ञवल्क्य स्मृति प्रमाण धरतात त्याचें मुख्य कारण महाराष्ट्रांतील शुक्ल यजु-

वेंदी ब्राह्मणांची बहुतम संख्या व ह्या ब्राह्मणांचे अनुयायी जे महाराष्ट्रिकादि क्षत्रिय त्यांची संख्या वाजसनेय शाखेची अनुयायी आहे हें आहे."(रा. मा. वि. चंपू, पृ. १०७.)

वेदव्यासांनीं वेदाचे चार भाग करून ते आपल्या शिष्यांना पढविले. त्यापैकीं वैशंपायनांना यजुर्वेद शिकविला. तो त्यांनीं आपला भाचा याज्ञवल्क्य यांस शिकविला. परंतु पुढें या मामाभाच्यांचा तंटा होऊन याज्ञवल्क्यानें वैशंपायनाजवळ शिकलेला वेद ओकून टाकिला व नवीन वेद मिळविण्याकरितां सूर्याची उपासना केली. तेव्हां सूर्यानें वाजी म्हणजे घोड्याचे रूपानें प्रगट होऊन याज्ञवल्क्यास वेद सांगितला तो शुक्ल यजुर्वेद किंवा वाजसनेयी संहिता या नांवानें प्रसिद्ध आहे. ओकून टाकलेला वेद तित्तीर पक्ष्यानें ग्रहण केल्यामुळें त्यास तैत्तिरीय संहिता किंवा कृष्णयजुर्वेद म्हणतात.

याज्ञवल्क्य हे पारिक्षित जनमेजयाचे समकालीन होते असें त्यांनीं लिहिलेल्या शतपथ ब्राह्मणांतील जनमेजय पारिक्षितीच्या उल्लेखावरून दिसतें. मिथिलाधीश जनकाचे दरबारीं याज्ञवल्क्यांनीं मिळविलेला विजय बृहदारण्यकांत प्रसिद्ध आहे. जनकाचे ते गुरु होते. त्यांच्या तत्त्वज्ञानामुळें व ब्रह्मनिष्ठेमुळें त्यांच्या वेदाला पुष्कळ अनुयायी मिळाले. जनमेजयाच्या वेळीं वाजसनेयी हेच प्रमुख यज्ञकर्ते होते. प्रथमतः वाजसनेयी ब्राह्मण कुरु, पांचाल आणि मिथिला या देशांत होते. पुढें बौद्धधर्माच्या लाटेनें त्यांना मध्यदेश सोडून क्षत्रिय राजांबरोबर दण्डकारण्यांत वैदिक धर्माच्या रक्षणाकरितां यावें लागलें.

राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रिक क्षत्रियांबरोबर यजुर्वेदी ब्राह्मण राजपुरोहित या नात्यानें दक्षिणेंत आले. सामान्यतः काशी, मथुरा, वृंदावन, गया, ग्वाल्हेर, इंदोर, धार, देवास इत्यादि भागांतील ब्राह्मण बुद्धपूर्व व बुद्धोत्तर क्रांतिनंतरच दक्षिणेंत आले. ते देवगिरी, उत्तर कोंकण, पैठण, नगर, पुणतांबें, कोल्हापूर, तंजावरापर्यंत पसरले. कांहीं काल या सर्व यजुर्वेद्यांचें मुख्य वास्तव्यस्थान गोदातीरच होतें. पुढें यवनी जुलमामुळें स्थलांतर करणें भाग पडलें. महाराष्ट्रांत या स्थलांतरामुळें शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिनांचे मुख्यतः चार विभाग झालेले

दिसतात. पैकीं एक विभाग नाशिक, बागलाण, नगर, मध्यप्रांत, वऱ्हाड असा सर्वत्र पसरलेला आहे. दुसरा विभाग प्रामुख्यानें उत्तर कोंकणांत मुंबईच्या आसपास आहे. तिसऱ्या व चौथ्या विभागांतील ब्राह्मण खानदेश, वऱ्हाड, मध्यप्रांतांत पसरले असून त्यांना वाजमाध्यंदिन आणि किर्स्ती वा रणावट अशीं नांवें आहेत. हे चारी विभाग श्रीयोगी याज्ञवल्क्य यांचे अनुयायी आहेत. वंश, वेद, शाखा, सूत्र इत्यादींनीं सर्वांशीं मूलतः एक असलेल्या या विभागांची माहिती पोटजातींच्या एकीकरणाला पोषक व्हावी म्हणून ती प्रस्तुत प्रकरणांत देत आहें. चरणव्यूहांत यजुर्वेदाच्या ८६ शाखा सांगितल्या आहेत. परंतु सांप्रत माध्यंदिन (वाजसनेय), कण्व, कात्यायन व जाबाल एवढ्याच शाखांचे ब्राह्मण विद्यमान आहेत. या प्रकरणांत माध्यंदिनांची माहिती देऊन दुसऱ्या प्रकरणांत कण्व, कात्यायन व जाबाल शाखांची माहिती देऊं.

वास्तव्यस्थानें व लोकसंख्या—बृहन्महाराष्ट्रभर या शाखेचे ब्राह्मण पसरलेले आहेत. शुक्ल यजुःशाखीय ब्राह्मण नाहीं असा एकही प्रांत नाहीं. विशेषतः नासिक, सातारा, नगर, वऱ्हाड, मध्यप्रांत या भागांत यांची वस्ती जास्त आहे. यांची लोकसंख्या सुमारें दोन लक्ष पसतीस हजार आहे.

गोत्रें:—अत्रि (मैत्रायण), कृष्णात्री, चंद्रात्री, उपमन्य, औरस, काश्यप, कुत्स, कौशिक, कौंडिण्य, गार्ग्य, चांद्रायण, गौतम, बाल्हेय, भारद्वाज, भार्गव, भागलेय, मुद्गल, वत्स, वाशिष्ट, शांडिल्य, लोहित, कात्यायन, सावर्ण, शौनक, अगस्ति, वात्स्यायन, मैत्रेय, पौनस, जामदग्न्य, शारंग, अरिष्टक, सांकृत्य, लोकाक्ष, पराशर, मौनस, कपिल, हारित, आंगिरस इत्यादि शेंकडों गोत्रें आहेत.

उपनांवें:—कर्वे, तबीब, कलघटगी, पाठक, कोलांगडे, मेंदगी, पांचनग (पाचालग), नगरकर, याळगी, शहाडे, विशाळगडकर, महाराज, गरवारे, देशपांडे, किरपेकर, सुतालीक, घाटे, झिंप्रे, महाजन, शेटे, शिवदे, पंडित-पंतप्रतिनिधि, इनामदार, जोशी, धांदरफळे, रणभोर, देवकुळे, वाकडे, वेडे, श्रोत्री, डाके, चावरे, दीक्षित, तरडे, माडीवाले, गरुड, काळे, धिंदे, खटावकर, चरेगांवकर, नाईक, तिळवणकर, चोभे, उपासनी, डावरे, देशमुख, फुलंब्रीकर,

लोहोकरे, लिखिते, शेजवलकर, धारणे, गुंड, वडवे, मोतीवाले, आदमणे, गोडशे, मवाळ, जवडे, सुरटकर, ओतुरकर, मोडक, मांडवगणे, पाटील, सप्तर्षि, कुकडे, तांबोळी, सोहोनी, श्रोत्रीय, शिरवळकर, धनेश्वर, टाकरे, मुळे, गटने, कोटस्थाने, चिकटे, रत्नपारखी, पारनाईक, तिवाडे, अंजनेकर, अंजीकर, जामठे, हलवे, पीतीकर, सुल्याखे, आंबेजवळगीकर, खताळ, गंडाळे, धारूरकर, शौचे, वाशिंगकर, ठुमणे, कमळापूरकर, टोणपे, घरवुडे, शेंडे, चिंचोडकर, वारे, घारे, गर्गे, गायधनी, उपाध्ये, वैद्य, घोलप, शिंदेकर, देवकर, बहाळकर, डांगे, सिन्नरकर, लोखंडे, कडूसकर, टाकळकर, कोकंठाणकर, पैठणकर, सारणे, सातभाई, औटे, कचोळे, चांदवडकर, गोसावी, मासोरकर, शुक्ल, चंद्रात्रेय, राजहंस, वाडेकर, म्हाळस, डोळस, भालेराव, उपासनी, रणसिंग, पाताळे, दलाल, कुलकर्णी, पोफळे, वावीकर, कापशे, टिपरे, गिलाणकर, खोडके, देसाई, पानट, दास्ताने, जहागिरदार, गोरवाडकर, सायखेडकर, सुतवणे, चिंधणे, धर्माधिकारी, रेखे, संत, टेणी, वडजांकर, पुराणिक, मोतिवाले, पंडित, किनखेडे, पदे, शिवभक्त, पुराणिक, बंबवाले, मुंजे, मोटे, जानेफळकर, हरदास, पंडितजी, खापर्डे, केवले, हंबरडे, सराफ, ठेंगडी, डुबे, मांडवीकर, पार्थीकर, कापटे, व्यास, मुंडे, कपाळे, विहिते, वडवाले, भुते, देवळे, धामने, दाणी, गौरिहर, वावशे, पालूरकर, भोकरे, रांजनकर, लाखे, लंके, माचवे, शिंगणे, पुरंदरे, पाध्ये, दांडेकर, जावळे, आचार्य, बेलसरे, राहतेकर, ढोले, काशीकर, मुंडे, गाजरे, मोगरे, राजगुरु, डोके, लोमटे, पिंगळे, इत्यादि अनेक उपनांवें आहेत.

पंथ—हे बहुतेक ब्राम्हण शांकरमतानुयायी स्मार्त आहेत.

देव देवतें—मातापूरची रेणुका, तुळजापूरची देवी, सप्तशृंगी व कोल्हापुरची महालक्ष्मी, मल्हारी मार्तंड, भैरव, नृसिंह, व्यंकटेश हीं आहेत. राम, कृष्ण, दत्त, शंकर, गणपती, सूर्य इत्यादि देवतांच्या उपासना हे ब्राह्मण करीत असतात.

सूत्रें:—कात्यायन हें श्रौतसूत्र व पारस्कर हें गृह्यसूत्र आहे.

संस्कार:—गर्भाधान संस्कारापासून विवाहसंस्कारापर्यंतचे षोडशसंस्कार या जातींत रूढ आहेत.

व्रतें व सण:—बारा महिन्यांतील बहुतेक, सण, व्रतें, वैकल्यें, उपवास, जयंत्यादि करण्याचा प्रघात आहे. उत्सवादि मंगलकृत्यें समाजांत सर्व शाखांपेक्षां जास्त होत असतात. शिवाय यज्ञकर्मांत अध्वर्यूत्व यांचेकडे असतें.

शिक्षण:—ही शाखा अविभक्त कुटुंबप्रधान, शेती, व्यापार व सावकारी हे धंदे करणारी असल्यामुळें पूर्वीं शिक्षणांत मागें पडली होती. या जातींत जुन्या परंपरेसच धरून चालण्याची प्रवृत्ति फार आहे. बहुतेक लोकांची वृत्ति जोसपण व तीर्थांचे ठिकाणीं उपाध्येगिरी करण्याची आहे. क्षेत्रस्थ बहुतेक उपाध्ये यजुर्वेदीच दिसतात. थोड्या श्रमांत लवकर पैसा मिळत असल्यानें, आळस, संकुचित वृत्ति, शिक्षणाचा अभाव वगैरे सर्व अवगुण दिसतात. शेतीवाले सर्वच आहेत. नोकरीवर असणारे फारच थोडे लोक आढळतात. सराफी व सावकारीचा धंदा प्रामुख्यानें दिसून येतो. त्यामुळें त्या समाजांत अद्यापिही श्रीमान् लोक आहेत. परंतु हल्लीं या शाखेंतील माणसें शिक्षणाची सर्वांगीण उन्नति करीत आहेत व नवशिक्षणांत हा समाज झपाट्यानें पुढें जात आहे. उत्तम दशग्रंथी, वैदिक, याज्ञिक, धर्मशास्त्र, वैद्यक इत्यादिकांत पारंगत अशीं माणसें पूर्वीं पुष्कळच होतीं व हल्लींही बरींच आहेत.

कर्ती माणसें:—वर दिलेल्या आडनांवाच्या यादींत असलेलीं मंडळी हल्लीं व्यापारी, कॉंट्रॅक्टर, गिरणीवाले, कारखानदार, सरकारी अधिकारी, लेखक, कवि, वैदिक, शास्त्रीपंडित, वकील, बॅरिस्टर, डॉक्टर, इंजिनिअर, प्रोफेसर, सार्वजनिक कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्ते इत्यादि सर्व क्षेत्रांत पुढारलेले आहेत. विस्तारभयास्तव कांहींचींच नांवें देतों. श्रीमंत पंतप्रातिनिधि संस्थान औंध, श्री. विशाळगडकर सं. गगनबावडा, श्री. जगन्नाथ महाराज, नामदार उपासनी, कै. डॉ. लोहोकरे (पुणें), ना. खापर्डे, सरदार मुतालीक, डॉ मुंजे, कर्नल कुकडे, श्री. सप्तर्षी (नगर), श्री. भगवंतराव सुलाखे, (बार्शी), श्री. गंडाळे (पंढरपूर), मुंबई—श्रीयुत पाठक (बुकसेलर) व श्रीयुत लंके (कापूस, आडत वगैरे). पुणें—सराफी व सावकारी—श्री. आदमणे, तिळवणकर, फुलंब्रीकर, मवाळ, सप्तर्षी, मोटे, जबडे. वऱ्हाडांतील ब्राह्मणांतील बहुतेक मोठे व्यापारी शुक्ल यजुर्वेदी आहेत. कॉंट्रॅ-

क्टरः--श्री. गोपाळराव वाडेकर (पुणें), वैद्य (पुणें), तांबोळी व आदमणे(नगर). गिरणी – श्री. भगवंतराव सुलाखे (कापूस व गिरणी वगैरे). सरकारी अधिकारी– कर्नल कुकडे, श्री. नाईक, घोलप, आय्. सी. एस्. पानट (मामलेदार), बांबवाले, वगैरे अनेक आहेत. लेखक व कवीः– श्री. रा. वि. ओतूरकर, प्रो. बेरी, प्रो. चंद्रात्रेय. कवि–शुक्र व शाहीर–मुळे...वगैरे. विद्वान् वैदिकशास्त्री–वे. शा. स. आण्णाशास्त्री घोरे, हरी शास्त्री गर्गे, तेलंग शास्त्री (नागपूर), उपासनी शास्त्री व श्री. शा. पाठक (पुणें), श्रीधरशास्त्री, सदाशिवशास्त्री महादेव जोशी ज्योतिषी, वाग्भट वाशींकर, शौचेशास्त्री (नाशीक), नारायण विष्णु मुळे शास्त्री (कडूस), भगवान शास्त्री धारूरकर, बाळशास्त्री (सं. खेड). याशिवाय नाशिक, काशी, जुन्नर, नारायणगांव (पुणें), कडूस (पुणें) येथें वैदिक शिक्षण घेतलेले असे पुष्कळ शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण आहेत. वकील–(मुंबई) श्री. कोटस्थाने व प्र. स. जोशी, बी. ए. एल्. एल्. बी. पुणें–के. एम. महाजन, सॉलिसिटर दास्ताने, एम्. सी. महाजन, ढुमणे, नगरकर, कमळापुरकर, सफई, तरडे, माडीवाले इत्यादि. नाशिक– श्री. कचोले, मो.ग. पाठक, चौधरी, उपाध्ये, वैद्य, आबासाहेब म्हाळस, जोशी (येवलें) इत्यादि. श्री. सप्तर्षी व धनेश्वर (नगर), श्री. भगवंतराव सुलाखे (बार्शी), दादासाहेब खापर्डे, बाबासाहेब खापर्डे उमरावती, पंडीत (बरिस्टर), नागपूर, कुलकर्णी, वाडेकर वगैरे मंडळी वऱ्हाड व खानदेशाकडे वकिली करतात. डॉक्टरः–डॉ. एस्. आर. माचवे (मुंबई), डॉ. शिरोळकर, बेलसरे, कै. लोहोकरे, वाकडे, सिव्हिलसर्जन कुकडे, राहातेकर (पुणें), पाठक (नाशिक) इंजिनिअरः–कोटस्थाने, मनोहरपंत लोखंडे व काळे (मुंबई). प्रोफेसरः– प्रो. व्ही. बी. नाईक M. A. प्रो. श्री. गो. बेरी M. A. (धारवाड), प्रो. मो. ल. चंद्रात्रेय M. A., प्रो. रा. वि ओतूरकर M. A. (पुणें). सार्वजनिक कार्यकर्ते –डॉ. मुंजे, श्री. सुलाखे, दादासाहेब व बाबासाहेब खापर्डे, सरदार मुतालीक, विश्वासराव डावरे, दास्तानेबंधु भुसावळ, प्रो. नाईक, प्रो. ओतूरकर इत्यादि. साधुसंतः–हल्लीं उपासनी महाराज आहेत. नट व गवईः– श्री. ना. (बालगंधर्व) राजहंस व कृष्णराव फुलंब्रीकर (कृष्णामास्तर.) हरिदासः–श्री. गंगाधरबुवा काशीकर व धोंडोपंत पाठक कडूसकर, ढोले बुवा इत्यादि.

परदेशीं इंग्लंडमध्यें बर्मिंगहॅम येथें डॉ. पारधी व यांचेच दुसरे बंधू डॉ. पारधी ब्रह्मदेशांत आहेत. फ्रान्समधें प्रो. लिखते नोकरीवर आहेत.

परलोकविद्याविशारद इंदूरचे ऋषि व तंतुवाद्य (नवीन आठदह वाद्यांचा मिलाफ शोधून काढणारे) प्रो. टुमणे यांचीं नांवें कोणीं विसरणार नाहींत.

पुण्यांतच चित्रशाळेचे मालक वासुकाका जोशी व वाडेकर कॉंट्रॅक्टर सर्वांच्या परिचयाचे आहेत.

सरस्वतिभक्तांपैकीं भारत-गौरव-ग्रंथमालेचे चालक कै. प्रभाकरपंत भसे यांनीं फार उत्कृष्ट पुष्पें गुंफून महाराष्ट्र-साहित्यास गौरविलें आहे.

या समाजांतील ठळक आंतरज्ञातिविवाह—१. जमखिंडी व बावडा या संस्थानिकांमध्यें आंतरज्ञातिविवाह झाला आहे. २. नागपूरचे मंगळमूर्ती I. C. S. यांनीं कोंकणस्थाची मुलगी केली आहे. ३. बंबवाले D. S. P. यांनीं कोंकणस्थाची मुलगी केली आहे. ४. कर्नल कुकडे यांचे मुलांनेंही कोंकणस्थ वधू केली आहे. ५. भुसावळचे दास्ताने वकील यांनीं आपली कन्या ऋग्वेदी देशस्थास दिली आहे.

राहणी—पूर्वीं स्वच्छता कमी व टापटीपही कमीच होती. खेड्यांतील लोकांची राहणी फार अस्ताव्यस्त असे. परंतु हल्लीं सर्वत्र राहणी सुधारली असून राहणींत आतां फारसें वैगुण्य दिसत नाहीं. सोंवळें-ओंवळें कांहीं लोक उत्तम पाळतात.

विवाह—मातुलकन्यापरिणय बिलकुल नाहीं. लग्नाचे वेळीं स्वतःचें, वधूचें व मातुलाचें गोत्र भिन्न असल्यास लग्न होतें. ही पद्धति फारच उत्तम आहे. वांशिकदृष्ट्या व रक्ताच्या मिश्रणाच्या दृष्टीनें ही चाल चांगली आहे. तथापि हल्लीं अनेक माता असल्यास तितकीं गोत्रें धरतात. ती चाल शास्त्रसंमत नाहीं. (त्यामुळें किती अडचण होत आहे हें आम्ही पूर्वार्धांत पृ. २२ यांत स्पष्ट केलें आहे.) मुलींचा विवाह बहुतेक चौदा; कोठें कोठें हा काल वाढलेला दिसत आहे. मुलाचा विवाह १८ वर्षांनंतर होतो. विधवाविवाह या शाखेंत क्वचित् झाले आहेत, पण ते बहुजनसंमत नाहींत.

आरोग्य—दुसऱ्या ब्राह्मण जातींप्रमाणेंच दिवसेंदिवस आरोग्य कमी होत आहे. खेड्यांत आरोग्य चांगलें असतें. शहरांत स्त्रियांत बाळंतरोग व क्षयरोग जास्त दिसूं लागले आहेत.

स्वभाव—मनमिळाऊ, परोपकारार्थ झीज सोसणारा, औदार्ययुक्त, धर्माभिमानी, जुन्या रूढीकडे जास्त झुकणारा व परमार्थ संपादन करण्यांत विशेष लक्ष देणारा असा आहे.

सांपत्तिक स्थितिः—या वर्गाची सांपत्तिक स्थिति बऱ्यापैकीं आहे. लक्षाधीशांमध्यें नागपूरचे घटाटे, काशीचे काळे, उमरावतीचे मोटे, मुंबईचे लंके, मालेगांवकर, पोफळे वगैरे मंडळी आहेत.

आहारः—हे सर्व ब्राह्मण शाकाहारी आहेत. कांहीं सुधारक मांसाहारी असतील.

ज्ञातिसंस्थाः—पुणें, मुंबई, भुसावळ, जळगांव, नाशीक, पंढरपूर, अहमदनगर, वगैरे ठिकाणीं आहेत. ज्ञातीच्या उन्नतीचा यत्न त्या संस्थेच्या द्वारें होतो.

भाषाः—महाराष्ट्रांतील शुद्ध मराठी.

महत्त्वाकांक्षाः—वैदिक, व आधिभौतिक वगैरे सर्व प्रकारचें शिक्षण मिळविणें, औद्योगिक उन्नति करणें, सांपत्तिक स्थिति सुधारणें, धार्मिक उन्नति करणें व शाखेची सर्वांगीण प्रगति करून ब्राह्मणसंघटणद्वारां राष्ट्रोद्धार करण्याची या जातीची महत्त्वाकांक्षा आहे.

२. माध्यंदिन ब्राह्मण (उत्तर कोंकणप्रांत)

पूर्वेतिहास व वास्तव्यस्थानेंः—हे ब्राह्मण योगी याज्ञवल्क्याचे अनुयायी आहेत. भरतखंडांत यांचें अस्तित्व फार प्राचीन काळापासून आहे. ब्रह्मावर्त व आर्यावर्त या देशांत धर्मगुरु आणि राजगुरु या नात्यानें त्यांचें वास्तव्य श्रीरामावतारापासून आहे. उत्तरेकडील क्षत्रियांचीं राज्यें दक्षिणेंत जसजशीं विस्तार पावत चाललीं तसतशी पैठण, पळशी, पुणतांबें, उत्तरकोंकण, औरंगाबाद, अहमदनगर, उमरावती, खानदेश, नागपूर, नाशीक, कोल्हापूर,

सातारा, या प्रांतांत, फार काय पण तंजावर–रामेश्वरापर्यंत शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मणांची वस्ती वाढतच गेली. राजाश्रयानें हीं ब्राह्मण मंडळी राजगुरु व राजपुरोहित या नात्यानें वागत होती. म्हणून सनातन वैदिक धर्मानुयायी प्रजेचें पौरोहित्य व धर्मगुरुत्व साहजिकच या यजुःशाखीयांना प्राप्त झालें.

तेराव्या शतकांत देवगिरी, वऱ्हाड वगैरे प्रांतांवर आणि त्यावेळच्या अष्टागर म्हणजे सर्व उत्तर कोंकणावर रामदेवराव यादव याचें राज्य होतें. अल्लाउद्दीनाच्या स्वारीच्या वेळीं रामदेवरायानें आपल्या वंशरक्षणासाठीं आणि कोंकण प्रांताच्या बंदोबस्तासाठीं आपला मुलगा भीमदेव (बिंब) याला राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे पैठणकर व इतर उमराव यांसह पाठवून दिलें. बिंबराजानें प्रधान कावळे यांच्या साह्यानें कोंकणची व्यवस्था लवकरच लाविली व महिकावती (माहीम) हें राजधानीचें शहर केलें. राजाची पैठणकर यांजवर मर्जी बसली. त्यानें त्यांना सरदेशमुखी, व सरदेशपांडेपणाची वृत्ति कायम करून दिली. आणि बिंबराजानें गोवर्धन चांगुणाबाई इजकडून उत्तर कोंकणची वृत्ति विकत घेऊन ती सूर्यग्रहणीं अंताजीपंत कावळे यास दान दिली. पुढें पुरुषोत्तमपंतांचे आप्तेष्ट हळुहळु त्या भागांत येऊन राहूं लागले. त्यांत कुणी पैठणकर, कुणी राहुरकर, कुणी पुणतांबेकर, कुणी नाशीककर वगैरे आडनांवांचे होते. त्यांच्या चरितार्थाकरितां पुरुषोत्तमपंतानें आपली वृत्ति विभागून दिली. यादवांच्या राज्यानंतर मुसलमानी अमदानींत राजगुरु कावळे व त्यांचे आप्तेष्ट यांच्याकडेच त्या भागाचें पौरोहित्य अबाधित होतें. पोर्तुगीजांच्या अमदानींत प्रजेला धर्मांतराचा फार त्रास होऊं लागला. त्यांनीं ठिकठिकाणीं धर्मछळाचे आखाडे उघडून लोकांना सळो कीं पळो करून सोडलें. त्या वेळीं या यजुर्वेद्यांपैकीं आगाशीचे पां. ह. पुरंदरे जोशी यांनीं पहिल्यानें शुद्धीकरणाप्रीत्यर्थ आज्ञापत्र मिळविलें व उत्तर कोंकणांत शुद्धिकार्य चालविलें. नंतर याच शुद्धिकार्याचा पुरस्कार रामचंद्रपंत जोशी प्रभृतींनीं पोर्तुगीजांचे वेळीं केला, म्हणूनच वसईप्रांतांत हिंदुत्व राहिलेलें आहे हें विसरतां कामा नये. ह्या प्रजेचा त्रास वांचावा म्हणून त्या प्रांताचे सरदेशमुख, सरदेशपांडे व जहागीरदार अंताजीपंत कावळे यांनीं श्रीछत्रपती शाहू यांना कोंकणप्रांत जिंकण्याबद्दल विनंती केली. शाहूनें तें काम बाजीरावाकडे सोंपविलें.

बाजीरावाच्या आज्ञेनें चिमाजीअप्पानें अंताजी रघुनाथ, त्यांचे क्षत्रिय यजमान गंगाजी नाईक, आर्जोजी यशवंतराव इत्यादि मंडळींच्या सहाय्यानें कोंकणप्रांत जिंकून तेथें हिंदुराज्य चालू केलें.

वास्तव्यस्थानें व लोकसंख्या—मुंबई, ठाणें, वसई, माहीम, चिंचणी, तारापूर, सोपारें, दमण, भिवंडी, आगाशी, विरार इत्यादि भागांत यांची वस्ती विशेष आहे. पुणें, कुलाबा वगैरे जिल्ह्यांत यांची तुरळक तुरळक वस्ती आहे. लोकसंख्या सुमारें चार ते पांच हजार आहे.

शाखा—यजुर्वेदांतर्गत माध्यंदिन वाजसनेयी शाखा हें नांव या ब्राह्मणांच्या शाखेचें आहे. पारस्कर, कात्यायन या सूत्रांनीं वैदिक धर्मकर्में होतात.

गोत्रें—बरींच आहेत, परन्तु सुमारें वीस पंचवीस गोत्रांचीं घराणीं वरील प्रांतीं आहेत. त्यांचीं नांवें:—भारद्वाज, भार्गव, शौनक, गौतमाख्य, वत्स, कौशिक, अत्रि, अगस्ति, वात्स्यायन, शांडिल्य, वासिष्ठ, मैत्रेय, काश्यप, पौनस, जामदग्न्य, उपमन्यु, गार्ग्य, गौतम, आत्रेय, कौंडिण्य, शारंग, चंद्रात्र, इत्यादि.

कांहीं प्रसिद्ध आडनांवें—कावळे, पैठणकर, नाईक, राव, जावळे, पळशीकर, पुणतांबेकर, पुरंदरे, छत्रे, मुंजे, सावरखेडकर, पंडित, नाईक, दांडेकर, जोशी, क्षीरसागर, पाध्ये, उपाध्ये, पुराणिक, कीर्तने, पिंगळे, बाबरेकर, मोगरे, देव, मांडे, धोंडे, पारायणे, पंचानन, वऱ्हाडकर, अयाचित, तरडे, त्रिवेदी, उपासनी, दीक्षित, देवघर, आचार्य, शिंगणे, धर्माधिकारी, राहुरकर वगैरे प्रसिद्ध आडनांवें आहेत.

धर्मकर्में—पारस्कर आणि कात्यायन गृह्यसूत्रांधारें षोडश संस्कार, श्राद्धपक्ष वगैरे नित्यनैमित्तिक धर्मकर्में होतात. प्रतिदिवशीं नैवेद्य–वैश्वदेवाची चाल घरोघरीं आहे. रुद्राभिषेक कांहीं ठिकाणीं नैमित्तिक चालू आहे. कांहीं घराण्यांत सोवळें–ओवळें, त्रिकाल स्नान–संध्या यांचे निर्बंध कडक आहेत.

देवदेवता—बहुतेकांच्या देवता पूर्वस्थलानुसार आहेत. कुलदेवतांमध्यें औंधची यमाई, कोल्हापुरची महालक्ष्मी, एकवीरा, कामाक्षी, सप्तशृंगी,

चंडिका, म्हाळसा, जोगेश्वरी, अंबिका, तुळजापुरची भवानी, तसेंच कुलाचारांत श्रीव्यंकटेश, श्रीगणपती, श्रीखंडोबा, श्रीनृसिंह, श्रीबालाजी, श्रीभैरवनाथ, वगैरे दैवतें आहेत. उपास्य दैवतें श्रीविष्णु, शिव, गणपती, श्रीराम, श्रीकृष्ण, विठोबा, दत्त, हनुमान, हीं कांहीं घरीं आहेत.

व्रतवैकल्यें व सण—इतर देशस्थ ब्राह्मणांप्रमाणें आहेत. शिवाय मार्गशीर्षांत नवरात्र असतें. आश्विनांत रविवारचे उपास करण्यांत येतात. भाद्रपद वद्य प्रतिपदेला मुका पाडवा असतो. व्यंकोबाची समाराधना सवडीनें वर्षांतून एकदां घालतात.

धर्मपंथ व मतें—बहुजन समाज स्मार्त शांकर मतानुयायी आहे. कट्टे वैष्णव बहुतेक नाहींत. शृंगेरी मठाचेंच अनुशासन चालतें. ते कधीं कधीं संचारार्थ येतात त्या वेळीं पाद्यपूजा होतात.

शिक्षण—शेंकडा नव्वद लोक पौरोहित्य करणारे म्हणजे धर्मकर्मे करणारे आहेत. पंचांग, पंचपात्रीं व पुडी म्हणजे ज्योतिष, पौरोहित्य व वैद्यक या त्रयीवर चरितार्थ चालविणारे शेंकडा पन्नास लोक आहेत. कांहीं कांहीं लोक आपल्या धंद्यांत उत्तम निष्णात आहेत. यामुळें जुन्या शिक्षणाकडे अद्याप पोट भरतें म्हणून बरीच प्रवृत्ति आहे; पण दिवसानुदिवस वकिली, डॉक्टरी व इंजिनिअरी अशा नवशिक्षणाच्या क्षेत्रांकडे प्रवृत्ति वाढत आहे. स्त्रीशिक्षणाची आवश्यकता अधिक भासत असून कांहीं पदवीधर स्त्रियाही आहेत.

सांपत्तिक स्थिति—मध्यम प्रकारची आहे. शेती आणि भिक्षुकी करून राहणारा बराच वर्ग आहे. कांहीं कांहीं घराणीं चांगलीं सधन आहेत.

राहणीः—शहरांतून व खेड्यांतून सुद्धां राहणी स्वच्छ आढळते. पोषाख, अन्न हा व्यवहारही सांपत्तिक स्थिति बरी असल्यामुळें व शहरांशीं बरेंच दळणवळण असल्यामुळें चांगल्या प्रकारचा आहे. खेड्यांतून क्वचित् क्वचित् गांवढळ राहणी दिसते.

रोग व आरोग्य—शहरांमध्यें स्त्रियांत बाळंतरोग, क्षयरोग यांचें प्रमाण वाढतें आहे. बालमृत्यूचीहि वाढ होत आहे. शहरांशीं तुलना केल्यास

चिंचणी, तारापूर, भागांतील आरोग्य चांगलें आहे. शहरांत क्षेत्रसंकोच व द्रव्यसंकोच यांमुळें इतर सर्व ब्राह्मणजातींप्रमाणें या जातींचें आरोग्य ऱ्हास पावत आहे.

आहार—सर्वत्र शाकाहार आहे. कांदा व लसूण हीं निषिद्ध मानतात. चातुर्मास्यांत कांदा व लसूण न खाण्याचा प्रघात आहे.

स्वभाव व महत्त्वाकांक्षा–मनमिळाऊ, आदरातिथ्यशील, स्वाभिमानी असे हे लोक आहेत. देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मणांशीं समरस होऊन जाण्याची त्यांची स्वाभाविक महत्त्वाकांक्षा आहे. वृक्षशाखान्यायानें कोणत्याही दृष्टीनें कमी नसल्याचा दृढ विश्वास ह्या समाजांत असल्यामुळें देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मणांशीं त्यांनीं आतांपर्यंत शेंपन्नास सोयरिकी केल्या आहेत. त्यांपैकीं कांहींचा यादी पुढें दिली आहे:—

१ रा० रा० पुरुषोत्तम वामन ढोले, पुणें; २ कृष्णाजी विठ्ठल महाजन, पंढरपूर; ३ पुरुषोत्तम वामन ढोले, पुणें; ४ काशिनाथ कृष्ण तावडे (नाईक), इंदूर; ५ अमृतराव मोरेश्वर पारधी, नागपूर (हल्लीं पारलें); ६ बळवंतराव र. शिल्लेदार, महू; ७ डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे, नागपूर; ८ तुकाराम दाजिबा जोशी, वणी; ९ केशवराव हरी बोधनकर, उमरावती; १० विष्णु श्रीपतराव रोडे, पुणें; ११ प्रो० तुकाराम रामचंद्र अमळनेरकर, इंदूर; १२ वैद्यभूषण व्ही. डी. पंडित, बंगलोर; १३ ब्यारिस्टर रा. ब. वासुदेव रामकृष्ण पंडित, नागपूर; १४ रा. सा. आनंदराव बाळकृष्ण पंड्ये, ए. अ. कमिशनर, रामटेक; १५ रा. रा. वासुदेव रामचंद्र पुराणीक, वकील, नागपूर; १६ महादेव मोरेश्वर पारधी, नागपूर; १७ बळवंत वामन गाजरे, सबजज्ज, धार; १८ डॉ. वासुदेव रामकृष्ण अळेकर, कोल्हापूर; १९ वे. शा. सं. चिंतामण केशव क्षिप्रे, सातारा; २० रा. सा. हरी पाठक (हेडमास्तर), नाशीक; २१ राजोपाध्ये यादवराव डोके, नागपूर; २२ रा. रा. माधवराव बाबाजी पंडित, नागपूर; २३ रंगनाथ नानाजी देशपांडे, पुणें; २४ रंगनाथ नानाजी पारनाईक, नगर; २५ विश्वनाथ रामचंद्र उज्जइनीकर, उज्जइनी; २६ लक्ष्मणराव स. कुबेर, इंदूर; २७ रा. सा. नारा-

यणराव आहेरकर, ग्वाल्हेर; २८ कुलकर्णी वकील, नागपूर; २९ श्री. बळवंतराव दा. मांडे, धार.

विद्यमान कर्ती माणसें:—रा.ब. पी. बी. जोशी, राजगुरु हरेश्वर महादेव पंडित, रा. ब. विनायक सदानंद जोशी, रा. काशिनाथ कृष्ण आचरे, डॉ. दीनानाथ बाळकृष्ण नाईक दांडेकर, डॉ. निळकंठ अनंत पुरंदरे (दादर), डॉ. य. वि पुरंदरे, दादर, डॉ. जावळे (दादर), केशवराव पाध्ये व भगवंतराव पाध्ये वकील (ठाणें), कीर्तने वकील (डहाणू), श्री. बाबासाहेब शिंगणे सरकारी वकील, मुंबई, वैद्य सखाराम रघुनाथ पुरंदरे, पुरंदरे कंपनीचे मालक, खंडेराव विनायक पुरंदरे, परशुराम निलकंठ शास्त्री, ह. भ. प. पंडित पंचांगकर्ते पुरंदरे वसई, होरा ज्योतिर्विभूषण भालचंद्र शास्त्री, वे. शा. स. अनंत वासुदेव देव, सखाराम शास्त्री, अनंत शास्त्री छत्रे, भालचंद्र मुकुंद पुरंदरे केळवें, दामोदर लक्ष्मण पुरंदरे वसई, सखाराम पांडुरंग नाईक सोपारें, भास्कर रघुनाथ कीर्तने, विनायक रघुनाथ मोगरे, तारापूर, आनंदराव आचार्य मुंबई, शांताराम बाबाजी जोशी, बाळकृष्ण सदाशिव नाईक मुंबई, हरी रामचंद्र पाठक, गणेश मोरेश्वर कीर्तने, भास्कर रघुनाथ नाईक, वामन गोविंद पंडित, रामचंद्र जगन्नाथ पुरंदरे, इत्यादि निरनिराळ्या क्षेत्रांत कर्ती माणसें आहेत. संख्येच्या मानानें कर्त्या माणसांचें प्रमाण बरें आहे.

हिंदुधर्माधिकारी:—पूर्वी निरनिराळ्या कोर्टांत धर्माबद्दल शास्त्रदृष्ट्या मत सांगण्याकरितां शास्त्री असत. त्याप्रमाणें काशिनाथ विश्वनाथशास्त्री पाठक, आत्माराम काशिनाथशास्त्री, व त्यांचे बंधु सखाराम पाठकशास्त्री, अनुक्रमें ठाणें, रत्नागिरी व धुळें या ठिकाणच्या डिस्ट्रिक्ट कोर्टांत काम करीत होते. वे. शा. सं. नीळकंठ विठ्ठलशास्त्री हे महामहोपाध्याय होऊन गेले. आचार्य, नाईक आणि पाध्ये घराण्यांतील पुरुषांना धर्माधिकाराच्या सनदा यावचंद्रदिवाकरौ अशा शाश्वतीच्या मुंबईच्या हायकोर्टाकडून मिळाल्या आहेत.

या ज्ञातीसंबंधीं वादाचें स्वरूप व पर्यवसान:—कोंकणांत पेशव्यांचा अम्मल श्री. चिमणाजी आप्पा यांनीं सुरू केला हें वर सांगितलेंच आहे.

तेव्हांपासून या उत्तर कोंकणांत कोंकणस्थ भिक्षुक वास्तव्य करूं लागले. कांहीं काल यजुर्वेदी व कोंकणस्थ यांमध्यें सख्य होतें. पुढें वृत्त्यंशमूलक तंटे सुरू झाले. यजुर्वेदी ब्राह्मणांचें धार्मिक बाबतींत वर्चस्व, पौरोहित्य या गोष्टी कोंकणस्थ भिक्षुकांच्या चरितार्थाच्या आड येऊं लागल्या. अर्थात् या पोटापाण्याच्या प्रश्नामुळें यजुर्वेद्यांचे व कोंकणस्थांचे तन्टे होऊं लागले. हे तंटे कांहीं वेळेला इतके विकोपाला गेले कीं, यजुर्वेद्यांचीं घरेंदारें लुटण्याची पाळी आली. या त्रासाला कंटाळून पेशव्यांचा अम्मल नसलेल्या ठिकाणीं म्हणजे मुंबई व माहीम येथें कांहीं यजुर्वेदी ब्राह्मण वसाहतीला आले; तरी पण तुकंभट जावळे पळशीकर हे अग्निहोत्री होते म्हणून ते वसईस कायम राहिले होते. कांहीं दिवसांनीं त्या बिचाऱ्याच्या अग्निहोत्रावरहि धाड आणली; व तुकंभट हा ब्राह्मण नाहीं, याला अग्निहोत्राचा अधिकार नाहीं अशा कंड्या पसरविण्यास सुरुवात केली. तुकंभटानें पेशवे सरकारकडे फिर्याद केली श्रीमंतांनीं तुकंभट जावळे पळशीकर यांस " तुम्हीं यजुःशाखीय ब्राह्मण, तुमचा श्रौताग्नि गोविंदभट जोगळेकर व फडणीस यांनीं विछिन्न केला; हा **अमार्ग अनाचर केला**. तुम्हीं तुमचा श्रौताग्नि पूर्वीप्रमाणें चालविणें, " असें आज्ञापत्र दिलें. या निकालानें कोंकणस्थांच्या मत्सराग्नीनें अधिकच पेट घेतला व पळशीकराचे बाजूच्या लोकांस पळश्या पळशे अशा तिरस्कारयुक्त शब्दानें संबोधण्यास सुरवात केली. कांहीं काल हा शब्द यजुर्वेद्यांना भूषणावह वाटला व तो रूढ झाला. पण पुढें हा शब्द जातिहीनत्वबोधक आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली व ते पळशे या शब्दाचा निषेध करूं लागले; कारण हा शब्द ग्रामवाचक आडनांवाचा द्योतक आहे. अर्थात् हा शब्द समूहवाचक किंवा जातिवाचक होऊं शकत नाहीं. यजुर्वेद्यांचे व कोंकणस्थांचे वसई, आगाशी, ठाणें या भागांत मत्सरमूलक तंटे होऊन कांहीं प्रकरणें सरकारी कोर्टांत गेलीं. त्याचे न्यायनिवाडे यजुर्वेदी ब्राह्मणांना बव्हंशीं अनुकूल असे झाले आहेत. माध्यंदिन शाखेच्या या शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांबद्दल तुकंभटाच्या अग्निहोत्रापूर्वी कधींहि प्रश्न उपस्थित झाला नव्हता. कोंकणस्थ भिक्षुकांनीं गांवोगांवीं पाहिजे तसल्या कंड्या उठवून त्या भिक्षुकांचा पाडाव करण्यास सुरवात केली. फार काय पण ब्राह्मण समाजांतून उठविण्याचे प्रयत्न

केले. परंतु यजुर्वेदी ब्राह्मणांनीं चिकाटीनें सर्व हल्ल्यांना तोंड देऊन ते मागें परतविले. सर्व प्रकरणांत कोंकणस्थांविरुद्ध निकाल झाला तरी हे कलह शांत न होतां एकेका प्रकरणामुळें अधिक अधिक चिघळतच गेले असें म्हणावें लागतें.

इंग्रजी राज्यांत १९ व्या शतकापर्यंत या ब्राह्मणांची शिरगणती देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण या सदराखालींच होत असे. परंतु कांहीं मत्सरी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नामुळें एका काळीं त्यांच्यापैकीं कांहींना पळशे ब्राह्मण या सदरांत नोंदण्यांत येऊं लागलें. पुढें १९११ सालीं यजुर्वेदी ब्राह्मणांनीं मुंबईसरकारच्या नजरेस ही गोष्ट आणली. त्या वेळीं सरकारनें या प्रकरणाची पूर्ण चौकशी करून पूर्वीप्रमाणें देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण या सदराखालीं खानेसुमारी करण्यांत यावी असा हुकूम दिला.

कलहशांतीचा नवीन प्रयत्नः—मुंबईकडील भागांत विशेषतः ब्राह्मणांमध्यें असलेले कलह असणें वाईट ही गोष्ट लो० टिळकांच्या ध्यानांत आली. आणि त्यांनीं हा वाद मिटविण्याचा प्रयत्न १९०४ सालीं केला. लोकमान्यांचे माध्यंदिन यजुर्वेदी शाखेचे मित्र डॉ. दीनानाथ बाळकृष्ण नाईक दांडेकर, यांना लोकमान्यांनीं प्रोत्साहनें देऊन हें सर्व प्रकरण श्रीमठ शृंगेरी याकडे नेण्यास सांगितलें. शृंगेरी मठाचे नेतृत्वाखालीं एक कमेटी नेमली होती. तिचें काम पुणें, मुंबई ठिकाणीं योग्य देखरेखीखालीं चाललें होतें वृत्यंशी माध्यंदिन ब्राह्मणांतर्फे केशवराव आप्पा पाध्ये वकील काम चालवीत होते. व त्यांच्या ब्राह्मणांसंबंधीं आक्षेप घेणाऱ्या वसई, माहीम वगैरे ठिकाणच्या कोंकणस्थ ब्राह्मणांतर्फे रा. पुरुषोत्तमराव खरे व माधवराव भट वकील काम चालवीत होते. कमेटींत लो० टिळक, दादासाहेब करंदीकर, सरदार मुतालीक, डॉ. भालचंद्र इत्यादि सद्गृहस्थ होते. उभय पक्षकारांचें म्हणणें ऐकून कमिटीनें माध्यंदिन ब्राह्मणांतर्फे निकाल दिला.

डॉ० दांडेकर यांनीं सर्व प्रकरण श्रीमठशृंगेरी येथें नेलें. श्रींनीं जाहीरपणें चवकशी केली. आणि कांहीं काळ सुटून गेलेल्या आपल्या स्वशाखीयांबरोबर शरीरसंबंध घडवून आणण्याबद्दल आज्ञापत्र दिलें. वऱ्हाड, नागपूर भागांत

माध्यंदिनसंख्या पुष्कळ आहे. उमरावतीस लोकमान्यांनीं श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्या वाड्यांत मुंबईकडील यजुर्वेद्यांची व तिकडील यजुर्वेद्यांची श्रावणी एकत्र करविली व जंगी भोजनसमारंभ घडवून आणला. यामुळें परस्पर शरीर-संबंध घडवून आणण्याचा मार्ग खुला झाला. तदनुसार शेंपन्नास शरीरसंबंध घडून आले आहेत. कांहीं प्रसिद्ध शरीरसंबंध वर दिले आहेतच. मुंबईकडील भागांत आतां कोंकणस्थांचा व यजुर्वेद्यांचा तंटा राहिलेला नाहीं ही संतोषाची गोष्ट होय. उत्तर कोंकणांतील या यजुर्वेदी ब्राह्मणांचा देशावरील अगदीं अल्प-संख्याक यजुर्वेदी उगाच मत्सर करीत असतात. हा मत्सराग्नि हळूहळू विझत आहे. वऱ्हाड, नागपूरकडील यजुर्वेद्यांशीं मुंबईकडील या यजुर्वेद्यांचे शरीरसंबंध झाले असल्यामुळें उत्तर कोंकणांतील शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण हे देशा-वरील यजुर्वेदी ब्राह्मणांशीं तद्रूप झाले आहेत यांत संशय नाहीं. सारांश, सद्-ब्राह्मण्य, वेदाधिकार, अन्नव्यवहार आणि शरीरसंबंध अशा सर्व क्षेत्रांत उत्तर कोंकणांतील हे माध्यंदिनी शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण व देशावरील सर्व यजुर्वेदी ब्राह्मण हे एकच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

३. वाजमाध्यंदिनशाखीय ब्राह्मण

१. पूर्वेतिहासः—हे ब्राह्मण वऱ्हाड, खानदेश व निजामच्या राज्यांत फार प्राचीन काळापासून आहेत. यांचा अधिक इतिहास मिळत नाहीं.

२. वास्तव्यस्थानें व लोकसंख्याः—नाशिक, पाचोरा, चाळिसगांव, नसिराबाद, जळगांव, रावेर, बऱ्हाणपूर, मलकापूर, रोहिनखेडें, खामगांव, पिंपळगांवराजा, उंडनगांव, फुलंबरी, वैजापूर, जालना, देऊळगांवराजा आणि शेंदुर्णी या ठिकाणीं यांची मुख्य वस्ती आहे. लोकसंख्या अंदाजीं पांच हजारां-पर्यंत असावी.

३. शाखा—यजुर्वेद, वाजमाध्यंदिन शाखा कात्यायन गृह्यसूत्राप्रमाणें सर्व धर्मकर्में होतात

४. पौरोहित्य——पौरोहित्याच्या वृत्त्या असलेले पुष्कळ घरंदाज लोक या समाजांत आहेत. रोहिनखेडकर पाठक व देशपांडे, एदलाबादकर जोशी व बारपांडे, उंडणगांवकर जोशी, जालनेकर जाहागिरदार इत्यादि पुरोहित घराणीं

प्रसिद्ध आहेत. पुरोहित बहुतेक स्वशाखीय असतो. अनुपपत्ति असेल तर ऋग्वेदी अगर यजुर्वेदी कोणताही याज्ञिक चालतो.

५ **गोत्रें**—जास्क, काश्यप, वत्स, भारद्वाज, गार्ग्य, अरिष्टिषेण, सांकृत्य, लोकाक्ष, शांडिल्य, गर्ग्य, उपमन्यु, भार्गव इत्यादि प्रसिद्ध गोत्रें आहेत.

६ **धर्मपंथ व मतें**—सर्व समाज आद्य श्रीशंकरमतानुयायी आहे. स्मार्त व भागवत असे दोन भेद आहेत. शृंगेरीपीठाचे निग्रहानुग्रह चालतात. संकेश्वर व करवीर हीं पीठें पूज्य आहेत.

७ **संस्कार**—गर्भादानादि अंत्येष्टिपर्यंत षोडश संस्कार शास्त्रोक्त विधीनें होतात. श्राद्ध, पक्ष, श्रावणी, नित्य यथाशक्ति पंचमहायज्ञ हे होत असतात.

८ **उपनांवें**—पाठक, धर्माधिकारी, दीक्षित, उपासनी, भोपे, खोपडे, जोशी, कुलकर्णी, देशपांडे, बारपांडे, जाहागिरदार, मुळे इत्यादि प्रसिद्ध आडनांवें आहेत.

९ **कुलदेवता**—मातापुरदेवी, शहादेदेवी, प्रकाशेदेवी, लोहाऱ्याची देवी, खंडोबा, रेणुका, सोमनाथ, बालाजी अशा कुलदेवता असून रामकृष्ण, बालाजी ह्या उपास्य देवता आहेत.

१० **उत्सव, सण, व्रतें व वैकल्यें**—चैत्र—ध्वजारोपण, पंचांगश्रवण, चैत्रगौरी, रामनवमी, हनुमानजयंती; चैत्र, श्रावण, आश्विन व माघ महिन्यांत मोठा कुलधर्म असतो. वैशाख—अक्षतृतीया; ज्येष्ठ—वटसावित्री; आषाढ—चातुर्मास्यारंभ, एकादशी, व्यासपूजा, दिव्याची अमावास्या; श्रावण—सोमवार, मंगळागौरी, जीवंतिका, बुधबृहस्पति, श्रावणी, रक्षाबंधन, श्रावणीपूर्णिमेला आई मुलाला वाण देते, गोकुळअष्टमी; भाद्रपद—हरतालिका, गणेश चतुर्थी, ऋषिपंचमी, शीतळासप्तमी, प्रोष्टपदी सप्ताह, अनंतचतुर्दशी, अविधवानवमी, मृतार्थक चतुर्थी, अपघातमृत चतुर्दशी; आश्विन—घट, दीप, माळ, सरस्वतीपूजन, सप्तशतीपाठ, क्वचित् होमहवन, विजयादशमी, वसुबारस, कोजागिरी, धनतेरस, आश्विन व॥ ८ मीस कराष्टमीचें व्रत, आवळी अष्टमी, कूष्मांडनवमी, दिपवाळी; कार्तिक—वैकुंठचतुर्दशी, त्रिपुरी पूर्णिमा; मार्गशीर्ष—सटीचें नवरात्र, बालाजीची

समाराधना, नागदिवाळी, वसंत-पंचमी, पौष—संक्रांत; माघ—रथसप्तमी, दांडी पूर्णिमा, संकष्टी, महाशिवरात्र; फाल्गुन—हुताशनी, रंगपंचमी. लग्नांत गोंधळ घालतात, किंवा दाहाका नांवाचें वाद्य वाजवितात. तांदुळाचें चक्र करून चक्र-पूजा करण्याची चाल आहे.

११ कर्तीं माणसें— वे. शा. सं. बुधंभटशास्त्री, नानाशास्त्री, बाळ-शास्त्री, वासुदेवशास्त्री, रंगशास्त्री, विष्णुशास्त्री, वे. मू. तोतारामभटजी, रामचंद्रभटजी, केशवभटजी, देवाजीबुवा, नीलकंठभटजी, गणेशभटजी, गोविंद भगत, शंकर श्रीपत, भास्करराव, धोंडोपंत, कालिदासपंत वैद्य, शुक्ल वकील, नानासाहेब—शाळाखातें-इनस्पेक्टर, रावसाहेब उपासनी वकील, संगम-नेरकर वकील, गणेश नारायण जोशी, इत्यादि बरींच कर्तीं माणसें आहेत.

१२ सांपत्तिक स्थिति—मध्यम प्रकारची आहे असेंच म्हणावें लागतें.

१३ शिक्षण—सर्व पुरुष शिकतात. मुली शिकूं लागल्या आहेत. जुन्या पिढींत निरक्षर पुरुष आढळतात. आतां मुळींच नाहींत. जुन्याकडे प्रवृत्ति कमी, तथापि जुन्या आचारविचारांकडेच समाजाची वृत्ति आहे. नव शिक्षणयुक्त माणसें प्रागतिक विचाराचीं आढळत आहेत.

१४ रहाणी—स्वच्छ, व्यवस्थित, टापटिपीची आढळते. दिवसानु-दिवस शहराशीं अधिक परिचय येत आहे. म्हणून घामटपणा व ओंगळपणा खेड्यांतूनही नाहींसा होत आहे.

१५ आरोग्य—ज्ञातिविशिष्ट रोग नाहीं. एकंदरींत इतर ब्राह्मणजाती-प्रमाणें आरोग्य खालावत आहे. स्त्रियांमध्यें बाळंतरोग व क्षयरोग वाढत आहेत.

१६ स्वभाव—बेताबातानें खर्च, मिळून मिसळून वागणें, विश्वासू, भोळसर, आदरातिथ्यशील, सत्यनिष्ठ असा यांचा स्वभाव आहे.

१७ विधवा—विधवाविवाह नाहीं. तो फारसा संमत नाहीं. वपन-विकल्प दृष्टीस पडत आहे.

१८ तीर्थें व पवित्र स्थानें—सर्व हिंदूंचीं पवित्रस्थानें पूज्य आहेत. काशीरामेश्वराच्या यात्रा करण्यांत पुण्य वाटतें.

१९ ग्रामण्यप्रकरण—वास्तविक हे माध्यंदिन ब्राह्मण असून या वाजमाध्यंदिनांविरुद्ध यजुर्वेद्यांनीं आजपर्यंत ग्रामण्यें उपस्थित केलीं आहेत. ग्रामण्याची भूमिका—" हे अब्राह्मण आहेत असें नाहीं. ब्राह्मण असतील वा नसतील, आम्हांला माहीत नाहीं, परंतु आम्ही अन्नलग्नव्यवहार करूं इच्छित नाहीं " अशी आहे. कांहीं कागदपत्र व कांहीं नकला आम्हीं खामगांवीं श्री. त्रिंबक अनंत पाठक यांचेकडे पाहिल्या, त्यावरून हें प्रकरण थोरल्या माधवरावांपासून चाललें आहे असें दिसतें. चोपडें व वर्धा येथेंही ग्रामण्यें उपस्थित झालीं होतीं, परंतु शेवटीं विरोधकांचा पराभव झाला. माध्यंदिन ब्राह्मण यांना आभीर ब्राह्मण म्हणतात म्हणजे कोळ्याचे ब्राह्मण बनविले असें सांगतात. अर्थात् आभीर ब्राह्मण चिड्न माध्या म्हणजे सोनार, जनी म्हणजे जैनबाई यांची संतती ते माध्यंदिन ब्राह्मण असें संतापानें म्हणतात. उखाळ्या पाखाळ्यांतील हे शब्द आहेत. अधीर शब्दांवरून अभीर शब्द झाला असें कोणी सांगतात. एका घरांत वाईट चालीची बायको होती. ती श्राद्धीय ब्राह्मणांना वाढण्याला आली असें कळतांच कांहीं ब्राह्मण अधीरपणें उठले व त्यांनीं जातांना पिंड तुडवून पलायन केलें, म्हणून अभीर किंवा अधीर म्हणतात. अहीर-अभीर नांवाची सोनार, गवळी व कुणबी यांचीही जात विद्यमान आहे.

आभीरग्रामण्य व निकाल—ता. २५ जून १९०५ रोजीं वर्धा येथें टाऊन हॉलमध्यें सभा भरली त्या सभेंत " आभीर हे ब्राह्मण आहेत, परंतु पंक्तिपावन नाहींत " असें ठरविण्यांत आलें. त्याबद्दल श्री. शंकराचार्य, मठ शृंगेरी, यांचेकडे अर्ज केला. ता. ९ माहे जून सन १९०६ रोजीं श्रींचा निकाल मिळाला.

पूर्वपक्षानें बृहज्ज्योतिषार्णव नामक ग्रंथांतील पुढें केलेलीं वचनें

श्रीमद्दाशरथी रामो पितुर्वाक्याद्यदा वनं ।
दंडकारण्यकं प्रागात् सीतालक्ष्मणसंयुतः ॥
वनाद् वनांतरं गच्छन् विंध्याद्रिनिकटे यदा ।
श्राद्धं प्राप्तं कुदेशे च कथं कर्म भविष्यति ॥

विप्राभावेहि चिंतायाम् निमग्ने सति राघवे ।
तत्रैव पंच कैवर्ताः संप्राप्ता वनचारिण: ।
रामो विचिंतयामास करिष्यामि द्विजानिमान् ।
गोमांतविन्ध्याद्रिमध्येतु यो देशोऽभीरसंज्ञितः ॥
तस्मिन् देशे समुत्पन्नऽआभीर इति कथ्यते ।
आभीरो नार्मदो विप्रो चरको गौड मालवौ ॥
भिन्नायां भोजयेत् पंक्तौ गंधमाल्यादि वर्जयेत् ।

पीठातर्फे खंडणाचे मुद्दे--१. पूर्वपक्ष, आभीरोत्पत्तीसंबंधानें जीं वचनें आहेत त्यांना बृहज्ज्योतिषार्णव ग्रंथाचा आधार देतों. परंतु हा ग्रंथ आधुनिक आहे व म्हणून प्रमाणभूत नाहीं. सर्व देशांतील कोणत्याही समाजांत तो आदरणीय नाहीं.

२. महाभक्त वाल्मीक ऋषींनीं श्रीरामचरित्र लिहिलें आहे व त्यांत श्रीरामजन्मोत्पत्तीपासून श्रीरामाकडून घडलेल्या प्रत्येक कार्यभागाचा साग्र उल्लेख आहे. अशा रामायणांतील चरित्रांत किरातयोनीपासून ब्राह्मणोत्पत्तीचें कोठेंही दिग्दर्शन नाहीं.

३. श्रीरामचंद्र वनवासांत असतांना हें श्राद्ध झालें असें म्हणतात, परंतु द्रव्याभाव व ब्राह्मणाभाव असतां श्राद्ध करणें झाल्यास मातापितरांच्या श्राद्धाचा धर्मक्रम धर्मशास्त्रानुरूप असा आहे कीं, **फक्त अग्नींत होम दिल्यानें, गाईंना गवत चारल्यानें, निव्वळ शोक केल्यानें किंवा विधिपूर्वक स्नान करून तिलतर्पण केल्यानें**, मातापितरांच्या श्राद्धाची पूर्णता होते. असें धर्मशास्त्र असतांना श्रीरामचंद्रानें या वचनांचा अव्हेर करून किरातयोनींत जन्म पावलेल्या ब्राह्मणांकरवीं श्राद्ध केलें असेल असें म्हणवत नाहीं व प्रसंगीं वरील प्रमाणें श्राद्धविधि केल्याचा रामायणांत उल्लेख आहे.

४. विश्वामित्र ऋषि हा ब्राह्मण वर्णाच्या समीप जो क्षत्रिय वर्ण त्या वर्णांत जन्म पावला असतांना सुद्धां त्यानें ब्राह्मणत्व प्राप्त करून घेण्याकरितां अत्यंत घोर असें सहस्र वर्षपर्यंत तप केलें तेव्हां कोठें त्यास ब्राह्मणत्व प्राप्त

झालें. असें असतांना श्रीरामचंद्रानें किरात योनींत उत्पन्न झालेल्या लोकांस ब्राह्मण केलें असें म्हणवत नाहीं.

५. श्रीरामचंद्रांच्या ठिकाणीं कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् अशी शक्ति होती व ते साक्षात् विष्णूचा अवतार होते. सबब त्यांना किराताचे ब्राह्मण करणें मुळींच अशक्य नव्हतें असें समजणें चुकीचें आहे;कारण श्रीरामचंद्र जरी विष्णूचा अवतार होते तरी ते या पृथ्वीतलावर केवळ साधारण मनुष्य म्हणूनच वावरले व त्यांनीं मी विष्णूचा अवतार आहें अशी अहंमन्यता कधींही गाजविली नाहीं, म्हणूनच त्यांचें एवढें माहात्म्य आपण गातों. क्षणभर अशी कल्पना केली कीं, त्यांनीं किराताचे ब्राह्मण केले व त्यांना श्राद्धीं बसविलें तर ज्यांना त्यांनीं **पितृस्थानीं बसविलें** अशा ब्राह्मणांना आपण ब्राह्मण कां मानूं नये ?

६. “ तुल्यत्वेत्यादि ” बृहज्ज्योतिषार्णव ग्रंथांत जीं वचनें आहेत त्यांचा अर्थ असा कीं श्रीरामचंद्रांनीं सप्तरेषा काढून किरातास त्या उल्लंघन करावयास सांगितलें व सहा रेषांचें उल्लंघन झाल्यावर किरात ब्राह्मण झाले. परंतु ही कथा शास्त्राच्या कसोटीस टिकत नाहीं; कसें तें पहा. सप्तरेषा ह्या वादविवादार्थ सप्तकन्या मानिल्या. याज्ञवल्क्य स्मृतींत आचाराध्यायांत वर्ण जाती विवेक प्रकरणांत “ ज्यात्युत्कर्षो युगे प्रेयः पंचमे सप्तमेऽपि वा । व्यत्यये कर्मणां साम्यं पूर्ववच्चाधरोत्तमम् ” वगैरे वचनांवरून हें दिसून येईल कीं, शूद्र स्त्रीचा ब्राह्मणाशीं विवाह झाला असतां त्यांचेपासून झालेली कन्या जर ब्राह्मणांसच देत गेलें तर जन्मातिक्रमणानें उत्तम वर्ण प्राप्त होतो असें शास्त्र आहे. परंतु **वर्णानुक्रमानें चौथ्या, पांचव्या किंवा सहाव्या पिढीच्या कन्येच्या पोटीं सातवी, सहावी किंवा पांचवी संतती** शुद्ध ब्राह्मण होत असल्याचें शास्त्र आहे. परंतु ब्रहज्ज्योतिषार्णवांत रामांनीं सप्तरेषा काढल्याचें वर्णन आहे. सहा, पांच किंवा चार रेषा काढल्याचें वर्णन असतें तर त्या कथेचें शास्त्रानुरूप कांहीं तरी समर्थन करितां आलें असतें.

७. मनुपाराशरस्मृतींत आभिरोत्पत्तीचें लक्षण असें सांगितलें आहे कीं वैश्य स्त्री व ब्राह्मण यांपासून झालेल्या कन्येस अम्बष्टा समजून तिच्या गर्भा-

तून जन्म घेणारा तो आभीर समजावा. परंतु बृहज्ज्योतिषार्णव ग्रंथांत वर्णन केलेलें आभिरत्व सप्तरेषा उल्लंघन करून सप्त जन्म अतिक्रमलेल्या किरातांस दुसऱ्या जन्मांत प्राप्त होऊन चुकलेलें आभिरत्व सातव्या जन्मांत श्रीरामचंद्रानें कसें कायम ठेवलें ? अशा रीतीनें बृहज्ज्योतिषार्णव ग्रंथांतील आभिरोत्पत्तीच्या कथेचें समर्थन, येणेंप्रमाणें शास्त्रवचनांचा त्या कथेस सोयीस्कर उपयोग करून सुद्धां होत नाहीं. सबब ती कथा असंभवनीय अतएव अग्राह्य आहे.

८. स्कंदपुराणांत गोमांतक व विंध्याद्रि पर्वताच्या मध्य भागांतील प्रदेशांस आभीर देश म्हणावें व त्या प्रदेशांत जन्म घेणाऱ्या मनुष्यमात्रांस आभीर अशी संज्ञा दिलेली आहे. आभीर हें नांव फक्त ब्राह्मणांस द्यावें असें स्पष्ट वचन नाहीं, सबब स्कंदपुराणांतील पूर्व पक्षानें उद्‌धृत केलेला हा आधार अगदीं डळमळित आहे.

९. बृहज्जोतिषार्णव व पांक्तापांक्तार्थदीपिकादि ग्रंथोक्त वचनांत फक्त आभीर हेच अपांक्त आहेत असें म्हटलें नाहीं तर नार्मद, चरक, गौड, मालवी, कान्यकुब्ज, दाक्षिण्य, कोंकणस्थ, अंगवंग, कलिंगादि सर्वच देशवासी ब्राह्मण वर्जनीय व पंक्तिबाह्य आहेत असें म्हटलें आहे. परंतु पंचगौड व पंचद्राविड हे आचारतारतम्यामुळें उत्पन्न झालेले मुख्य दोन भेद खेरीज करून आणखी असंख्य भेद मानिल्यानें कोणतेंही कार्य होणें शक्य नाहीं व भयंकर आपत्ति-प्रसंग ओढवेल, तर अपांक्तत्वासंबंधानें हे भेद प्रचारांत आणण्यापूर्वीं त्यांचा पूर्वापार संबंध व तीं वचनें कोणते प्रसंगीं कशा कशा करितां नमूद झालेलीं आहेत याचा साद्यंत विचार झाला पाहिजे. फार तर असें म्हणतां येईल कीं, आभीर ब्राह्मण हा एक प्रादेशिक भेद आहे; उदाहरणार्थ, महाराष्ट्र देशोत्पन्न ब्राह्मण हे देशस्थ, कोंकणांतील ब्राह्मण हे कोंकणस्थ, आंध्र देशोत्पन्न जे ब्राह्मण ते आंध्र, द्रवीड देशोत्पन्न ते द्रावीड, कर्नाटक देशोत्पन्न ते कर्नाटकी, तसेंच आभीर देशोत्पन्न ते आभीर ब्राह्मण. परंतु यामुळें गोत्र, शाखा, प्रवर, कुलशील यांनीं युक्त अशा ऋषिवंशांतील प्रसिद्ध असलेल्या ब्राह्मणांस कोणत्याही प्रकारें कमीपणा येत नाहीं.

१०. वर्धा येथें भरलेल्या सभेंत आभीर ब्राह्मण हे अपांक्त आहेत व त्यांची संतति ही जातिसंकर आहे असें म्हटलें आहे; परंतु त्याच सभेंत आभीर हे ब्राह्मण आहेत असेंही म्हटलेलें आहे व आभीर संज्ञा असलेल्या समुदायाचा परस्पर माध्यंदीन शाखीयांत शरीरसंबंध होत असल्याचें प्रमाण त्याच सभेंतील प्रश्नोत्तरांतून उघडकीस येतें. अशी वस्तुस्थिती असतांना वर्धा येथील सभेंत जो ठराव झालेला आहे त्याला शास्त्राधार नसल्यामुळें तो तिरस्करणीय आहे असा महासंस्थानाचा अभिप्राय आहे.

११. वरील १९०६ सालच्या ठरावानंतरचा ठराव म्हटला म्हणजे सन-१९१५ चा श्री. सच्चिदानंद विद्याशंकर भारती स्वामी जगद्गुरु संस्थान संकेश्वर व करवीर यांचा अभिप्राय होय. हाही बराच विस्तृत आहे. हा अभिप्राय स्वामींनीं चोपडें मुक्कामीं दिला. या वादाचे वेळीं पूर्व पक्षास यजुर्वेदी असें नांव दिलें आहे व उत्तर पक्षाकडील ब्राह्मणांस "माध्यंदिनी" असें नांव दिलेलें आहे. या अभिप्रायाचा सारांश थोडक्यांत असा आहे:—

(१) पूर्वपक्षांतील मंडळी ही ब्राह्मण आहेत, त्यांना वेदाचा अधिकार आहे—ते वेदाध्ययन करितात, त्यांचीं शास्त्रोक्त कर्में वेदोक्त होतात; आभीर या शब्दांत कांहीं दोष नाहीं. इतर शाखेचीं मंडळीं कांहीं त्यांचेकडे जेवतात, कांहीं जेवत नाहींत.

(२) उत्तरपक्षानें विद्यानगर महाराज संस्थान करवीर यांचे सहीचें आज्ञापत्र म्हणून एक कागद दाखल केला, परंतु तो कागद बनावट दिसतो.

(३) पेशवे सरकारचे वेळेस कांहीं ठराव पूर्वपक्षातर्फे झालेले आहेत, परंतु ते सर्व एक तर्फी आहेत व अखेर रद्द झालेले आहेत. पेशवे सरकारचा शेवटला ठराव उत्तर पक्षास म्हणजे ज्यांना या वादांत यजुर्वेदी म्हटलें आहे त्यांना अनुकुल आहे व तोच ग्राह्य समजला पाहिजे.

(४) पूर्वपक्ष आभीर या नांवाची एकादी शास्त्रोक्त शाखा आहे असें सिद्ध करूं शकत नाहीं, सबब उत्तरपक्षांतील ब्राह्मण आभीर नसून त्यांचेकडे कोणताही दोष नाहीं असा आमचा अभिप्राय आहे. याचें कारण परस्प-

यांचा अन्नव्यवहार व बेटीव्यवहार प्रत्यक्ष रीतीनें होत नसला तरी अप्रत्यक्ष रीतीनें होत आहे व ही गोष्ट उभयतांसही नाकबूल नाहीं. उत्तर पक्षांतील लोक हे अपांक्त नसोन त्यांचेकडे कोणताही दोष नाहीं व त्यांचें पंक्तीस कोणत्याहीं शाखेचे ब्राह्मणांस बसण्यास प्रतिबंध नाहीं.

(५) श्रीमंत पेशवे सरकारचे वेळेस जे निर्णय करण्यांत आलेले आहेत त्यांत खानदेशांत आभीर नाहींत असा स्पष्ट उल्लेख आहे व तो आम्हांस मान्य आहे.

वरीलप्रमाणें श्रीसच्चिदानंद विद्याशंकर स्वामी संस्थान संकेश्वर व करवीर यांचा अभिप्राय आहे. याप्रमाणें प्रसिद्ध धर्मगुरूंचे हे दोन अभिप्राय आहेत व याशिवाय ऐतिहासिक पुरावा म्हटला म्हणजे वरील अभिप्रायांत ज्याचें दिग्दर्शन झालें आहे तो श्रीमंत शेवटचे बाजीराव पेशवे यांचे वेळचा शेवटला ठराव. या ठरावावरून असें दिसून येतें कीं पूर्वपक्षांतील ब्राह्मणांनीं पेशवे सरकारकडून उत्तर पक्षासंबंधानें पुष्कळसे मिथ्या आरोप करून आज्ञापत्रें नेलीं. तीं सर्व गैरवाका आहेत. उत्तर पक्षांतील ब्राह्मणांचा पंक्तिव्यवहार, वृत्तिपेशनी वगैरे पूर्वीप्रमाणें चालविणें, नवीन न करणें वगैरे.

महत्वाकांक्षा—सर्व शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मणांशीं अन्नलग्नव्यवहारानें संबद्ध व्हावें. (कारण सांप्रत हे व्यवहार राजरोस सुरू आहेत.) ब्राह्मणसंघटण होऊन राष्ट्रोद्धार करावा अशी या जातीची तीव्र महत्वाकांक्षा आहे.

४. किस्ती वा रनावट ब्राह्मण

पुष्कळ दिवसांपासून ही जात खानदेश, वऱ्हाड व मध्यप्रांत या भागांत आहे. ही ब्राह्मणजात पंचद्राविडांपैकीं आहे. नगर जिल्ह्यांत किस्ती या नांवाचे ब्राह्मण आहेत. त्यांचा संबंध खानदेशांतील या ब्राह्मणांशीं पोंचतो कीं मध्यप्रांतांतील जंबू कण्वांशीं पोंचतो हें समजत नाहीं. चांदा व वरोडा या भागांतील जंबू कण्व म्हणतात कीं, नगर जिल्ह्यांत आमच्यापैकीं कांहीं लोक आहेत व ते व्याजबट्ट्याचा धंदा करितात. जातिभास्कर ग्रंथांत (पान ८४) या

ब्राह्मणांची श्रीरामचंद्रांनीं तापी तीरावर स्थापना केली. हें व्यापारनिष्ठ असल्यामुळें त्यांना किस्ती म्हणतात. यांच्या आचारविचारामध्यें महाराष्ट्र व गुर्जर प्रांताचें मिश्रण आहे. व्यापार व उद्योग यांमुळें विद्या व आचार यांचा लोप होऊं लागला असें म्हटलें आहे. सांप्रत एलिचपूर, उमरावती, अकोला, तेल्हारा, रायपूर, भंडारा, गोंदिया, नागपूर, बऱ्हाणपूर इत्यादि ठिकाणीं वऱ्हाड व मध्यप्रांतांत त्यांची वस्ती असून खानदेशांत ती पुष्कळ ठिकाणीं आहे. तथापि बऱ्हाणपूर व प्रकाशें हीं यांच्या वस्तीचीं मुख्य गांवें आहेत शहादें, तळोदें, एरंडोल, नंदुरबार, सारंगखेड, रावेर या ठिकाणीं थोडीं फार घरें आहेत. लोकसंख्या पूर्वीं तीन हजार होती, हल्लीं बाराशें ते सोळाशें लोकसंख्या आहे.

किस्ती वा रनावट म्हणजे काय:–हे लोक पूर्वीं व्याजबट्टयाचा धंदा करीत म्हणून त्यांना किस्ती असें नांव आहे. किस्त म्हणजे हप्ता, किस्ती म्हणजे हप्तेबंदीनें पैसे देणारा. खांदे किस्त म्हणजे हप्त्यानें पैसे देण्याचा व्यवहार. उदाहरणार्थः–शंभर रुपये व्याजीं दिले तर २५ रुपये व्याज धरून सवाई वाढ करावयाची आणि नंतर दरमहा दोन प्रमाणें ६२ महिन्यांत ते पैसे वसूल करावयाचे या व्यवहाराला किस्तीचा धंदा म्हणतात. हा सावकारी धंदा असल्यामुळें विद्येकडे स्वाभाविक दुर्लक्ष्य. म्हणून आचारमालिन्य दिसल्यामुळें रानवट, जंगली असे शब्द मत्सरमूलक वापरण्यांत येऊं लागले. रानवटचा अपभ्रंश रणावट असा आहे

वेदशाखा व सूत्र:–यजुर्वेद, माध्यंदिन, वाजसनेय शाखा. पारस्कर गृह्य सूत्राप्रमाणें सर्व धर्मकर्में होतात.

गोत्रें:–भार्गव, पाराशर, भारद्वाज, मुद्गल, पैंगिष, अगस्ति, काश्यप, वात्स्यायन, वत्स, यास्क, चंद्रात्रि, कृष्णात्रि इत्यादि प्रसिद्ध गोत्रें आहेत.

उपनांवें:–पुराणिक, दीक्षित, जोशी, वैद्य, नाईक, पाठक, शौचे, अग्निहोत्री, उपासनी, शुक्ल अशीं मुख्य उपनांवें असून पुणेकर, बेडेकर, वऱ्हाडकर, तावेरकर, वडनेरकर इत्यादि ग्रामवाचक उपनांवेंहि आहेत.

धर्मपंथ व मतें:–आद्य श्री शंकराचार्यांचे अनुयायी हे ब्राह्मण आहेत. स्मार्त व भागवत असे दोन्ही सांप्रदाय आहेत. मुख्य पीठ शृंगेरी, त्याची शाखा संकेश्वर, त्या पीठाचे निग्रहानुग्रह चालतात.

शिक्षण:–सर्व समाजांत सुमारें वीस याज्ञिक व वैदिक, १० पुराणिक व शास्त्री, २।४ हरिदास, २।४ ज्योतिषी, सुमारें २०।२२ वैद्य सांपडतील. पौरोहित्य करण्यास कोणताही विद्वान् ब्राह्मण चालतो. परंतु जातींतील पुरोहित सांगण्याचा प्रघात अधिक आहे, कारण ते कुलोपाध्याय असतात. नवीन शिक्षणाकडे प्रवृत्ति वाढत आहे. १० पदवीधर, २।३ वकील, २।३ डॉक्टर, सुमारें २५ शिक्षक सांपडतील. पुरुष सर्व साक्षर आहेत. स्त्रियांमध्यें साक्षरता वाढत आहे. अनेक कारणांमुळें मुलींना मराठी चार इयत्तांचें शिक्षण द्यावें लागतें.

संस्कार—गर्भादानादि अंत्येष्टीपर्यंत सर्व संस्कार होतात. तथापि चौल, उपनयन, विवाह, गर्भादान, अंत्येष्टी हे मुख्य आहेत. हुंड्याची चाल आहे. मातुलगोत्र पाहण्यांत येतें. मातुलकन्यापरिणय नाहीं. वधूचे घरीं चतुर्थी कर्माचा होम होतो. मेल्यावर मंत्राग्नीचा प्रघात आहे. १२।१६ व २०।२४ ही अनुक्रमें वधुवरांची वयोमर्यादा आहे.

सामाजिक दुःख व महत्त्वाकांक्षा—रनावट हें निंदाव्यंजक आणि किस्ती हें धंदावाचक नांव जावें. देशस्थ यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण हें नांव असावें. यजुर्वेदी माध्यंदिनांशीं बेटी व्यवहार व इतर षट्कर्माधिकारी सद् ब्राह्मणांशीं रोटीव्यवहार व्हावा. ब्राह्मणसंघटण होऊन राष्ट्रोद्धार व्हावा अशी आहे.

कर्तीं माणसें—श्री. रमाकांत जयशंकर पाठक, महादेव गोविंद पुराणिक, रामचंद्र रघुनाथ शास्त्री वकील, वे. मू. रामकृष्ण बाळकृष्ण पुराणिक, पुरुषोत्तम विष्णु वैद्य, बापू गोविंद भट, रामचंद्र नारायण अग्निहोत्री, वे. शा. सं. बाळकृष्ण मैराळ शौचे, जनार्दन महादेव अग्निहोत्री, काशिनाथ बळवंत वैद्य, भालचंद्र महादेव अग्निहोत्री, वासुदेव बळवंत वैद्य, दिवाकर रामचंद्र जोशी, माधव नारायण नाईक, देवराव नथोपंत दिक्षीत, गंगाधर बापूजी पाठक, रघुनाथ बाळकृष्ण नाईक, लक्ष्मण बाळकृष्ण पुराणिक, रघुनाथ गोपाळ जोशी, इत्यादि विविध क्षेत्रांतील कर्तीं माणसें आहेत.

सांपत्तिक स्थिति—कर्त्या माणसांच्या नांवांतील वरील पहिलीं तीन नांवें सोडून दिलीं तर सांपत्तिक स्थिति सर्व सामान्य आहे, अगदीं भिकारपणा आहे असेंही नाहीं. दिवसानुदिवस शेती बुडत आहे व सावकारी चालत नाहीं, त्यामुळें ही जात साधारणतः खाऊन पिऊन बरी आहे, इतकेंच म्हणतां येतें. सावकारी नोकऱ्या, इतर घरगुती नोकऱ्या, आणि सरकारी नोकऱ्यांत लोक शिरत आहेत. पण सांपत्तिक स्थिती समाधानकारक नाहीं.

आरोग्य—ज्ञातिविशिष्ट रोग नाहीं. आरोग्य चांगलेंच आहे. दिवसानुदिवस खेडीं सोडून शहराकडे जाण्याची प्रवृत्ति व जरूरी वाढत आहे. खेड्यांत निर्वाह होत नाहीं. शहराची वस्ती अधिक होऊं लागल्यामुळें बालमृत्यु, स्त्रियांचे बाळंतरोग, क्षयरोग यांचें प्रमाण पूर्वीपेक्षां अधिक वाढत आहे. तथापि आरोग्य एकंदरीनें चांगलें आहे.

रहाणी—महाराष्ट्र दक्षिणी ब्राह्मणांप्रमाणें रहाणी आहे. यांतील कांहीं ब्राह्मण पूर्वीं पुष्कळ दिवस गुजराथेंत होते. त्यामुळें पेहराव कांहींसा गुजराथ्यांसारखा असे. परंतु हल्लीं तो नाहींसा झाला आहे. नवीन सुशिक्षित मंडळींत रहाणी व्यवस्थित, टापटिपीची करण्याकडे प्रवृत्ति आहे. सामान्यतः लग्नकार्यांत खर्च अधिक होतो. त्यामुळें कर्जबाजारीपणा वाढला आहे.

अन्न—खानदेशांतील इतर ब्राह्मणांप्रमाणें भोजनपद्धत आहे व पंचद्रविडांप्रमाणें हे सर्व ब्राह्मण शाकाहारी आहेत.

स्वभाव—भोळसर, अज्ञानामुळें उदासीन, साहसाचा अभाव, पापभीरु, गतानुगतिक, जुन्याला चिकटणारा असा स्वभाव आहे.

वर्ण—निमगोरा, काळासावळा असून माणसें कुरूप नाहींत.

तीर्थें व पवित्र स्थानें—चारधाम, सप्तपुऱ्या, बारा ज्योतिर्लिंगें इत्यादि सर्व हिंदूंचीं पवित्र स्थानें व क्षेत्रें यांना पूज्य आहेत.

सामाजिक स्थिति—मुलींची संख्या मुलांपेक्षां अधिक आहे. मुलगे २०० तर मुली २५० असें धरलें तर पन्नास मुलींना विनाकारण स्वज्ञातींतील विधुरांच्या गळ्यांत बांधावें लागतें. त्यामुळें या ब्राह्मण ज्ञातीचा

पूर्वी १००–७५ घरें होतीं अशी ऐकींव माहिती मिळते. परंतु आज त्यांपैकीं ६-७ च घरें शिल्लक राहिलीं आहेत आणि त्यामुळें विवाहसंबंधाला फार अडचणी येत आहेत. ह्यांचीं आजचीं राहण्याचीं गांवें कर्जोद, बहादरपूर, पातोंडी एवढीं तीनच आहेत. हीं गांवें बऱ्हाणपूर व रावेर ह्यांच्या आसपासचीं आहेत.

शाखा—यजुर्वेदांतर्गत माध्यंदिन वाजसनेयी ही ह्या ब्राह्मणांची शाखा आहे. पारस्कर, कात्यायन ह्या सूत्रांनीं वैदिक धर्मकर्में होतात.

पौरोहित्य—ह्याच शाखेच्या बाविशे नामक गौड ब्राह्मणाकडे आहे. पल्लेवाळांचा मुख्य धंदा व्यापार असल्यामुळें स्वशाखीय पुरोहित आढळत नाहींत.

गोत्रें—भारद्वाज, पाराशर, शांडिल्य, वासिष्ठ, काश्यप इत्यादि आहेत.

आडनांवें—चौधरी व डालके ह्या आडनांवांशिवाय आडनांवें प्रसिद्ध नाहींत.

धर्मकर्में—पारस्कर आणि कात्यायन गृह्यसूत्राधारें षोडश संस्कार, श्राद्धपक्ष वगैरे नैमित्तिक धर्मकर्में होतात. वैश्वदेवाची चाल आहे. सोवळें-ओवळें पाळलें जातें.

देवदेवताः—देवास येथील देवी कुलदैवत आहे. पंचायतनपूजा, श्रीविष्णु, शिव, शिवगणपती, श्रीराम, श्रीकृष्ण, दत्त, हनुमान इत्यादि उपास्य दैवतें आहेत.

व्रतें, वैकल्यें व सणः—चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून फाल्गुन वद्य आमावास्येपर्यंत येणारे सर्व सण, व्रतें व उत्सव पाळले जातात.

धर्मपंथ व मतें:—बहुजन समाज स्मार्त शांकर मतानुयायी आहे. कट्टे वैष्णव कोणी नाहींत. शृंगेरी मठाचें अनुशासन चालतें.

शिक्षणः—खेड्यांतून वस्ती असल्यामुळें शिक्षणांत फारशी प्रगती नाहीं. ५-६ इयत्तेपर्यंत बहुतेकांचें शिक्षण झालें आहे.

सांपत्तिक स्थितिः—बहुतेकांचा उदरनिर्वाह शेती व व्यापार ह्यांवर अवलंबून असल्यामुळें सांपत्तिक स्थिति मध्यम प्रकारची आहे. दोन

घराण्यांकडे पाटिलकी आहे व एक गृहस्थ ऑननरी फर्स्ट क्लास म्याजिस्ट्रेट असून सरकारनें त्यांना रावबहादूर ही पदवी दिलेली आहे.

राहणी:—स्वच्छ, साधी व दक्षिणी पेशाची आहे. बायका दक्षिणी स्त्रियांप्रमाणें कासोटा घालतात.

आरोग्य:—चांगलें आहे. स्त्रियांचे रोग इतर जातीप्रमाणें वाढत आहेत.

आहार:—सर्वत्र शाकाहार आहे. कांदा व लसूण हीं निषिद्ध मानतात. चातुर्मास्यांत कांदे, लसूण न खाण्याचा प्रघात आहे.

स्वभाव:—मनमिळाऊ, आदरातिथ्यशील व स्वाभिमानी असा आहे.

इच्छा व विनंति:—दाक्षिणी यजुर्वेदी ब्राह्मणांशीं रोटीबेटीव्यवहारानें संबद्ध होण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय विवाहाची अडचण दूर होणें शक्य नाहीं. तसें न झाल्यास ब्राह्मणत्वाला मुकण्याची वेळ आली आहे. वैवाहिक अडचणीमुळेंच आजच्या कांहीं लोकांकडून सामाजिक अत्याचार घडत आहेत व ते शुद्ध कुळांना बाधक झाले आहेत. म्हणून सुज्ञ व विचारी ब्राह्मणांनीं ह्या समाजाला ब्राह्मणत्वाला मुकूं न देण्याची काळजी घ्यावी, अशी ह्या समाजांतील कर्त्या पुरुषांची सर्व ब्राह्मणांना विनंति आहे.

कर्तीं माणसें:—१ नथू रावजी पाटील कर्जोद, २ रावबहादूर नारायण मानाजी बहादरपूर, ३ काल्हराम रामजी चौधरी कर्जोद, ४ देवराव परशराम मास्तर शिरसोली इत्यादि कर्तीं माणसें त्या समाजांत आहेत. या अल्प समाजाच्या मानानें कर्त्या माणसांची संख्या अल्प असल्यास ह्यांत आश्चर्य नाहीं.

६. नार्मदीय ब्राह्मण. (नेमाडप्रांत)

खानदेशालगत सातपुड्या पलीकडे नेमाडप्रांत आहे. त्या प्रांतात नार्मदीय, जंबू, मालवीय, औदिच्य, औंदुबर, दसोरे, टोळके, बाविसे, चोविसे आणि पल्लेवाळ अशा दहा प्रमुख जाती आहेत. या सर्व जाती तुल्यबल आहेत, सर्व जाति आपल्या बरोबरीच्या आहेत असें समजण्यांत येतें. पंचद्राविडांतर्गत या दहा जातींत परस्पर भोजनव्यवहार होतो. या दशविध ब्राह्मणांमध्यें नार्मदीय ब्राह्मण पंधरावीस हजार आहेत. या बहुसंख्य जातीसारखेच इतर जातींचे

आचार विचार आहेत. कांहीं आचारांत थोडथोडा फरक आहे. तथापि नार्मदीयांच्या विस्तृत माहितीवरून इतरांची कल्पना येणें सुलभ आहे. हे बहुसंख्य नार्मदीय ब्राह्मण यजुःशाखीय असल्यामुळें औचित्याच्या दृष्टीनें याच प्रकरणांत यांची माहिती देणें इष्ट आहे.

पूर्वेतिहास— परिक्षितीच्या स्वर्गारोहणानंतर कांहीं ऋषी नर्मदा कांठीं मांधात्याच्या राज्यांत ओंकारेश्वरीं आले. तेथें त्यांनीं तपश्चर्या केली. नर्मदातीरीं त्यांचें वास्तव्य केवळ नर्मदेच्या कृपेमुळें झालें. नर्मदेच्या कृपेचे म्हणून नार्मदीय ब्राह्मण होत. श्रीओंकारेश्वराचाही त्यांचेवर कृपाप्रसाद झाला. यांचें वास्तव्य नेमाडप्रांतांत बाहुल्यानें व प्रामुख्यानें आहे.

वेदशाखा व सूत्र आणि गोत्रें— यजुर्वेद वाजसनेयी माध्यंदिन शाखा हीच सर्वांची आहे. कात्यायन सूत्राप्रमाणें धर्मकर्में चालतात. कश्यप, कौशिक, वत्स, मौनस, शांडिल्य, चांद्रायण, साकल्य, आत्रि, वसिष्ठ, मार्कंडेय, कौंडिण्य, गर्ग, गौतम, भागवत, मुद्गल, पैठप, कात्यायन, भारद्वाज, पराशर, कृष्णात्री, उपमन्यु, अगस्ति, विश्वामित्र, हारित, अशीं २५ गोत्रें आहेत.

उपनावें:—उपाध्ये, राजवैद्य, गीते, गांवसन्ध्ये, दांभक, अमळाथे, सिरठोके, कटोरे, स्वैपाकी, माळखेडे, चिवुडे, साडे, पिपरुबोध, सुलतानपुरे, भातके, जोशी, ठूरिया, ठेमल्या, पगोर, विजळपुरे, सोहनी, सकरगाये, डोंगरे, खळे, गुहा, महोघा, साडे, मलतारे, तारे, बाळापूरे, बघवाणे, भट्ट, आत्रि, ठणग्या, मार्कंडेय, चौवरे, अत्रे, कृष्णात्री, सदाफल, तलबाड्या, कात्यायनी, चौभा, मुजमेरे, काजवे, करहाडे, इत्यादि प्रसिद्ध उपनांवें आहेत.

कुल व उपास्य देवता:—विंध्यवासिनी, महालक्ष्मी, वाइंलासनी, आशापूर्णेश्वरी, श्यामजांगीं, बीजासणी, चामुंडा, दुर्गा, रोहिणी, रेणुका, श्रियाळ, चूडामणी, इत्यादि कुलदेवता आहेत.—राम, कृष्ण, विठ्ठल, हनुमान, दत्त हीं उपास्य दैवतें आहेत.

धर्मपंथ व मतें:—स्मार्त व वैष्णव असे दोन्ही भेद आहेत. द्वारकापीठाचे अनुशासन चालतें. परंतु शृंगेरी पीठाचे शिष्य आचार्य पूर्णानंद यांची

गादी भिकन परगण्यांत शिवनागांवीं आहे त्यांचेच निग्रहानुग्रह पुष्कळ अंशीं चालतात. या गादीची परंपरा हल्लीं ब्रह्मचाऱ्याकडे असते. संन्यासपरंपरा तीन पिढ्या झाली. याशिवाय ओंकारेश्वरी–दिक्षीत, ब्रह्मणपुरी रामचंद्रबुवा, खांडवा, तुळशीराम महाराज अशा महंतांच्या गाद्या चालत आलेल्या आहेत. त्यांचाहि शिष्यसंप्रदाय बराच मोठा आहे.

संस्कारः—गर्भादानादि उपनयन, विवाह हे संस्कार होतात. उपनयन व समावर्तन हे संस्कार एकाच दिवशीं होतात. देवक बसविण्याची चाल १०।२७।४० दिवसांपर्यंत आहे. बाहेरगांवीं देवापुढें संस्कार उरकावयाचा असेल तर घरीं सर्व उरकून जाण्याची चाल आहे. उपनयन आचार्य किंवा पिता करतो. यज्ञोपवीत घालतांना अनेकांनीं हात लावण्याची चाल बऱ्याच प्रमाणानें प्रचारांत आहे. उपनयनाला कमींत कमी २०० रुपये खर्च येतो. विवाहामध्यें वाग्निश्चय बराच पूर्वी होतो. कारण मागणी तिसऱ्या वर्षापासून करतात. आतिशयोक्तीनें कुणी असेंहि सांगतात कीं, गरोदर स्थितींतच विवाहाबद्दल आणभाक घेतात. मागणी मान्य झाल्यावर वाग्निश्चय होतो. मुलींचें वय ८ ते १३ व मुलांचें वय १२ ते २० अशा वेळींच बहुतेक लग्नें होतात. वाग्निश्चय झाल्यापासून विवाहापर्यंत जो काळ जातो, तो बराच असतो. तेवढ्या काळांत मुलगा मूर्ख, बदमाष, व्यसनी, कुरूप, व्यंग असा आढळला तरी वाग्दान फिरविलें जात नाहीं. शेंकडा १० लोक वाग्दान फिरवितात. वाग्निश्चयापासून लग्नापर्यंत तिवाऱ्या म्हणजे वस्त्रें मुलीकडे वर्षातून दोनतीन वेळां पाठविण्यांत येतात. या जातींत मातुलकन्यापरिणय नाहीं. मामाचें गोत्र पाहण्यांत येतें. असें सांगतात कीं, पूर्वी विवाहोत्तर गोत्राचा उच्चार करावयाचा तोंपर्यंत गोत्र वगैरेंची चौकशीच करावयाची नाहीं अशी चाल होती. हल्लीं ती बंद आहे. यामुळें सगोत्रविवाह पुष्कळ वेळां होत. प्रवरांचा विचार तर कुणीही करीत नाहींत. परंतु सगोत्रविवाहाचा प्रचार अलीकडे बराच बंद झाला आहे. तो बढवायच्या शिसावंशीराजानें बंद केला असें म्हणतात. हुंड्याची चाल मुळींच नाहीं. वरदक्षणा म्हणून पाहिजे तें द्यावें. मुलीला पाहण्याचे व दाखविण्याचे हाल नाहींत. लग्नांत अक्षत व सीमांतपूजन हें नसतें. मधुपर्क व सप्तपदी होम हींच असतात.

वरातीचा थाट कमी असतो. वरातीबरोबर बायका मिरवीत नाहींत. लग्नांत ३।५। ११।१४ गांवचे लोक बोलवून पंक्ति देण्याची चाल आहे. या पंक्तींच्या पायीं पुष्कळ पैसे फस्त होतात. पंक्ती कमी करण्याचा प्रचार हळूहळू पडत आहे. देवकस्थापना महिनाभर ठेविली तरी फक्त स्थापन व उत्थापन या दिवशींच काय तें मिष्टान्न करून नैवद्य दाखवितात. या जातींत विधुरविवाह आहे. एकदम ३।४ बायका नसतात. लग्नांत चतुर्थीकर्म असतें. मंत्राग्नीचा प्रकार जवळ जवळ नाहींच. अंत्येष्टीचे मंत्र व प्रयोग माहीत असणारे थोडेच, तथापि मंत्राग्नीची चालच नाहीं. दहा दिवसांनंतर उत्तरक्रिया तेरा दिवसापर्यंत होते. ज्ञातीला मिष्टान्न भोजन देण्याची चाल आहे.

पौरोहित्यः--पुरोहितांना शुक्ल किंवा शुकल ह्मणतात. पाहिजे तो ब्राह्मण पुरोहित चालतो. स्वजातीचाच पाहिजे असा आग्रह नाहीं. बहुतेक ज्ञातीचेच पुरोहित असतात.

नित्यनैमित्तिक कर्मः—शेंकडा दहा ब्राह्मण ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव करणारे आढळतील. स्नान, संध्या, पूजा (पंचायतन) करणारे पुष्कळ आहेत. श्राद्धपक्ष चटावर होतात. गांवढळ ब्राह्मण अग्निकुंडांत मृतांच्या नांवें आहुती टाकून जेवतात. पक्षपंध्रवड्यांत सर्व महालयें होतात. पुढें ठेवीत नाहींत. श्राद्धाला शुकल ह्मणजे पुरोहित येत असतो. अविधवानवमीप्रमाणें कुमारपंचमी भाद्रपद वद्यांत असते. कुमारपंचमीच्या दिवशीं जीं लहान लहान मुलें गेलीं असतील त्यांचें श्राद्ध व चतुर्दशीस अपघातानें मेलेल्याचें श्राद्ध करितात. श्राद्धें तिथीलाच होतात. दर्शश्राद्ध माहीत नाहीं. अक्षय्य तृतियेस कुंभदानाची पद्धति आहे.

शिक्षण—वैदिक, अग्निहोत्री, स्मार्ताग्नि ठेवणारे कुणीही नाहींत. फार तर १०।५ वैदिक, शेंकडों याज्ञिक, ५।२५ शास्त्री, ज्योतिषी, पुराणिक अशी जुन्या शिक्षणाची स्थिति आहे. नवीन शिक्षणांत बरीच मंडळी पुढें येत आहेत. परंतु त्यांचें प्रमाण लोकसंख्येच्या मानानें कमी आहे. स्त्रीशिक्षण, अक्षरओळखी-पुरतें आहे व तेंही शहरांत आहे.

सांपत्तिक स्थितिः—शेती, व्यापार, खासगी नोकऱ्या, भिक्षुकी यांवर सर्वथा निर्वाह चालतो. सांपत्तिक स्थिति मध्यम प्रकारची आहे.

रोग व आरोग्यः—ज्ञातिविशिष्ट रोग नाहीं. आरोग्य साधारण आहे. परंतु नार्मदीय ब्राह्मणांची संख्या १० वर्षांपूर्वी २० हजार होती ती आतां १५ हजारावर आली आहे. एकंदरींत जात घटत आहे.

विधवाः—प्रौढ विधवा अधिक. विधवाविवाह अद्याप झालेला नाहीं. वपनाची चाल आहे.

राहणीः—नेमाडांतील सर्व ब्राह्मण शाकाहारी आहेत. कांदा, लसूण निषिद्ध मानतात. पण लहान मुलें आठ महिने कांदा खातात. चातुर्मास्यांत कोणी खात नाहींत. डाळ, तांदूळ, गहूं, ज्वार, भाज्या हेंच सामान्य अन्न आहे. सोवळें-ओंवळें बरेंच आहे. शहरांत लोक भराभर जात आहेत. म्हणून राहणी सुधारत आहे. भोजनोत्तर ताटांतच आंचवण्याची चाल आहे. राहणी साधारण आहे.

अन्नव्यवहारः-फराळरूपानें सर्व ब्राह्मणांशीं होतो. खरकटें अन्न कुणी कुणाचें खात नाहींत. फराळ म्हणजे पक्की रसोयी नव्हे तर पोळीला दशमी व भाताला सोजी म्हटलें म्हणजे झालें ! ! ! चोरून परस्पर जेवणेंहि होतात. इतर ब्राह्मणजातींशीं जेवण्यांत अधर्म अगर अनाचार मानला जात नाहीं. केवळ रूढींचें बंधन म्हणून भोजनव्यवहार होत नाहीं. तोहि हळुहळु शिथिल होत आहे. एखाद्या शेटाच्या घरीं सर्व ब्राह्मण भोजनास जातात. फराळाला सर्व एकत्र बसतात. दुधाचे पदार्थ कोणी केले तरी चालतात. अर्थात ते करण्याकरितां ब्राह्मणाची योजना झालेली दिसते.

सामाजिक दुःखः—ब्राह्मणेतर हिंदुंकडून या समाजाला दुःख होत नाहीं. **यवनांकडून अतित्रास होतो.** मार, लूट, स्त्रियांची चेष्टा कर, अब्रू घे, असले अनन्वित प्रकार घडतात. सर्व नेमाडस्थ ब्राह्मणांना हें सामान्य दुःख आहे.

उत्सव, सण, व्रतें व वैकल्यें:—चैत्रामध्यें गजगौरी असतात. गजगौरी म्हणजे शंकरपार्वतीचें पूजन होय. फा. व॥ ११ला वेळूच्या टोपल्यांत माती घालून त्यांत गव्हाची पेरणी करतात. तीं शेतें आसपास ठेवून मध्यें महालक्ष्मीचा मुखवटा बसवितात. एका रथांत ही सर्व आरास करून पूजा करितात. चैत्र शुद्ध ८।९ ला या गौरीचा कुलधर्म असतो. आश्विनांत नवरात्र क्वचित्

असतें, परंतु विंध्यवासिनी, चामुंडा, रेणुका, महालक्ष्मी, या देवतांची पूजा असते. हनुमानजयंतीचा उपास असतो. चैत्र शुद्ध प्रतिपदेस ध्वजारोपण घरोघरीं नसतें, क्वचित् असतें. पंचांगश्रवण मात्र असतें. लिंब खाण्याची चाल आहे. अक्षय्य तृतियेस कुंभदान, ज्येष्ठांत दशाहार व वटसावित्रीउपास अगर एकभुक्त एक दिवस असावें. चातुर्मास्याच्या एकादशा बहुतेक करतात. आषाढ शु० १५ ला गुरुपूजा किंवा व्यासपूजा असते. स्त्रिया चातुर्मास्यांत बरेंच नियमधर्म करतात. श्रावणी सोमवारचे उपवास क्वचित् असतात. आषाढ व० ३० ला जरासंधाच्या आईची पूजा करतात. वारुळावरहि जातात. श्रावणीपूर्णीमेस श्रावणी करतात. श्रावणींत होम नसतो. भाद्रपदांत हरितालिकेचा उपास असतो. गणेशचतुर्थी घरोघरीं होत नाहीं. गांवांत कोठें उत्सव असल्यास तेथें जातात. ऋषिपंचमी, हलषष्ठी, शीतळासप्तमी, हीं असतात. शीतळासप्तमीस आदल्या दिवसाचें शिळें अन्न खातात. चूल पेटवावयाची नसते. म्हणून आंब्याचें लहान रोपडें चुलींत ठेवून त्याची पूजा करतात. प्रौष्ठपदीपर्यंत भागवतसप्ताहश्रावणाचा मोठा प्रघात आहे. भाद्रपद वद्यांत महालय. पंचमीस बाळापंचमी, सर्व लहान मुलांचीं श्राद्धें, अविधवानवमी, भाद्रपद वद्य १४ दिवशीं, अपमृत्यूनें मेलेल्यांचीं श्राद्धें करितात त्याला शस्त्रहत चतुर्दशी म्हणतात. सर्वपित्री अमावास्या असते. नवरात्रांत घटस्थापना, माळ, दिवा क्वचित् असतो; फक्त शुद्ध अष्टमीस व नवमीस देवीचा कुळधर्म असतो. सरस्वतीपूजन, बाळदान म्हणजे घरांत लिंबें कापून टाकतात, कोजागिरी, वसुबारस, धनतेरस व दिपवाळीचा चार दिवसांचा सण असतो. गोवर्धनपर्वत व गोकुळ हीं शेणाचीं करितात. एकादशीला गोपालकृष्णउत्थान असतें. तुळशीविवाह क्वचित् होतो. भाद्रपदांत अनंतव्रत क्वचित् दृष्टीस पडतें. वैकुंठचतुर्दशी, त्रिपुरी पूर्णिमा, या दिवशीं दिवे सोडणें, तुळशी वाहणें, वगैरे करितात. कार्तिकांतील सोमवारचे उपवास करण्याची चाल नाहीं. क्वचित् चंपाषष्ठी असते. खंडोबाच्या दर्शनास जाण्याचा प्रघात आहे. धनुर्मास करतात. तिळाचें दान करतात. धनसंक्रांतीस तीळ लावून स्नान करितात. माघ शुद्ध पंचमीस अंब्याचा मोहोर, गव्हाच्या लोंब्या आणून वसंतपूजा व मिष्टान्नभोजन करतात. पौष वद्य चतुर्थीस उपास करून रात्रीं

चंद्रोदयानंतर भोजन करतात. या संकष्टीचें व्रत सर्व करीत असतात. महाशिवरात्रीचा उपास असतो. फाल्गुन शु॥ पूर्णिमेस हुताशनी घरोघर नसते, रंगपंचमीहि क्वचित् असते.

शकुन-ज्योतिष:—यावर बराच विश्वास आहे. जरा आधिव्याधि दिसली कीं ज्योतिषाकडे जाण्याची लोकांना संवय आहे. त्यामुळें ज्योतिष धंदा उत्तम चालतो. दृष्ट काढणें, दोरे बांधणें, डाकिणीला मागून घेणें, तिला नैवेद्य करणें या गोष्टी नेहमीं होतात. शहरांपेक्षां खेड्यांत एकंदरीनें ही जात जास्त, तसेंच निरक्षरताहि जास्त; त्यामुळें मंत्र, तंत्र, जादू, टोणा यांचें विशेष प्रावल्य आहे.

७. श्रीगौर मालवीय ब्राह्मण (नेमाडप्रांत)

श्रीगौर मालवीय ब्राह्मण हे मूळचे गुजराथेंत राहणारे महालक्ष्मीचे उपासक पंचद्राविड ब्राह्मण. देवीच्या शापामुळें हे माळव्यांत आले व माळव्यांत मुसलमानांचा ताप होऊं लागला म्हणून ते नेमाडांत आले. वस्ती अंदाजीं २ हजार आहे. गुजराथेंत २६००० लोकसंख्या आहे. बहुतेक यजुर्वेदीय माध्यंदिन शाखीय हे आहेत. तथापि तीन्ही वेदांचे लोक आहेत. ऋग्वेदी, सामवेदी हीं फक्त नांवें आहेत. सर्व कर्में यजुर्वेदाप्रमाणेंच म्हणजे पुरोहित करतील तशीं होतात. कात्यायन गृह्यसूत्राप्रमाणें धर्मकर्में होतात.

गोत्रें:—काश्यप, कौशिक, कौंडिण्य, वत्स, शांडिल्य चांद्रायण, सांकल्य, अत्रि, वासिष्ट, हरित, मार्तंड, गार्गव, भार्गव, गौतम, मुद्गल, पैठिन्य, कात्यायन, भारद्वाज इत्यादि.

आडनांवें:—चतुर्वेदी, त्रिवेदी, द्विवेदी, मधभट, दीक्षित, उपाध्याय, पाष्कोत्तम, ज्योति, पंडित, व्यास.

शिक्षण:—वैदिक नाहींत. पुराणिक, ज्योतिष व याज्ञिक बरेच आहेत. श्रौतस्मार्त अग्नि ठेवणारे कोणीच नाहींत. नवीन शिक्षणक्षेत्रांत बरेच लोक हळु हळु पुढें येत आहेत.

सांपत्तिक स्थिति:—मध्यम प्रकारची. शेती, खासगी नोकऱ्या, व्यापार, यांतच पुष्कळ लोक गुरलेले आहेत. हळु हळु सरकारी नोकऱ्या,

वकिली, या धंद्यांत लोक पडत आहेत. पटवारी, मुनशीगिरी बरेच लोक करितात.

कुलदेवताः--नार्मदीयाप्रमाणेंच आहेत. पुरोहित बहुतेक स्वजातीचाच असतो. तदभावीं कोणत्याही ज्ञातीचा ब्राम्हण चालतो. अद्वैतानुयायी सर्व लोक आहेत. द्वारकापीठाचे निग्रहानुग्रह चालतात.

संस्कारः—गर्भादानादि अंत्येष्टीपर्यंत सर्व संस्कार होतात. लग्नकार्यांत देवक ३ किंवा ५ दिवस बसवितात. मातृभोजन, भिक्षावळ झाल्यानंतर समावर्तनोत्तर बटु पोषाक घालून देवदर्शन करतो. हुंडयाची चाल नाहीं. दिवा लग्न होत नाहीं. गोरज किंवा रात्रीं मुहूर्त धरतात. लग्नाचा वाग्निश्चय मागणीबरोबर झाला असला तरी पुढें तो अयोग्य आहे असें आढळल्यास बदलण्याची बरीच चाल असे. पूर्वीं या लोकांत गोत्र वगैरे न पाहतां मागणी करण्याची चाल होती व विवाहोत्तर गोत्रोपचार करीत यामुळें सगोत्रविवाह होत. अलीकडे ती चाल मोडत चालली आहे. सगोत्रविवाह केल्यास जातिबहिष्कृत करतात. प्रत्येक कार्यांत ज्ञाति-भोजनाची चाल इतर ब्राह्मणांप्रमाणें आहे. गृहप्रवेशोत्तर जो होम होतो तोच चतुर्थीकर्माचा होम होय. वरात बहुधा चवथ्या अगर पांचव्या दिवशीं निघते. उत्सव, सण, व्रतें, वैकल्यें हीं बऱ्याच अंशानें नार्मदीय ब्राह्मणांप्रमाणें आहेत. नार्मदीय, श्रीगौर, व जंबू ब्राह्मणांप्रमाणेंच इतर सर्व ब्राह्मणांचे आचारविचार बव्हंशीं आहेत. अर्थात् त्या तिघांच्या आचारांवरून त्यांची कल्पना करितां येईल. बाल—विवाह, लहानपणापासून वाग्निश्चय सगोत्रविवाह, ज्ञाति—भोजनें, वेदविद्येचा लोप या अनिष्ट गोष्टी या ब्राह्मणांत आहेत. नेमाडांतील सर्व ब्राह्मणांना मुसलमानांपासून पीडा होते. त्याचा प्रतिकार करण्याची बुद्धि त्यांनाही झाली आहे. रंगारी, रजपूत, अभीर, गुजराथी महाजन इत्यादि शूद्रांचें पाणी या सर्व ब्राह्मणांना चालतें. 'पाणी- पित्या जाती असें शूद्रांतील कांहीं जातींना हे ब्राह्मण म्हणतात.

प्रकरण २ रें.

कण्व, कात्यायन, व जाबाल शाखीय ब्राह्मण

पाहिल्या प्रकरणांत माध्यंदिन शाखीय पंचद्राविड ब्राह्मणांतील भेदांची माहिती दिली. या प्रकरणांत कण्व, कात्यायन व जाबाल या शाखांतील १ कण्व, २ जंबूकण्व (मध्यप्रांत व नेमाडप्रांत), ३ कात्यायन वा कास्त आणि ४ जाबाल नार्मदीय या पंचद्राविडांची माहिती देत आहें.

१. कण्व ब्राह्मण

पूर्वेतिहास—पूर्वी एक मोठा यज्ञ झाला. त्या यज्ञाला चतुःशाखीय ऋषी—महर्षी आले होते. पूर्वद्वारचें कर्म ऋग्वेद्यांचें, पश्चिमद्वारचें कर्म यजुर्वेद्यांचें असें असतांना कण्व महर्षींनीं पूर्वद्वारचें कर्म आमचें आहे असें सांगितलें. कण्वगुरु श्रीयाज्ञवल्क्य तेथें होते, त्यांनीं तसें होणार नाहीं असें सांगितलें. कण्व व याज्ञवल्क्य यांचा तंटा झाला. कण्व महर्षी म्हणाले कीं, सूर्याकडे जाऊन वेद शुद्ध करून येतों म्हणजे मग पूर्वद्वारचें कर्म द्याल किंवा नाहीं ? याज्ञवल्क्य म्हणाले, ठीक आहे. सूर्य हा कण्व आहे म्हणून कण्व सूर्याकडे गेले. सूर्य म्हणाला, वेद शुद्ध करूं नयेत, त्यांतील आर्ष प्रयोग काढूं नयेत, ते नाहींसे करण्याला ज्ञानदृष्टी पाहिजे. कण्व सूर्याचे कानांत बसले. सूर्यानें वेद म्हणावा व घोड्यानें स्वर द्यावेत अशी वेद म्हणण्याची रीत होती. सूर्यानें कण्वाला विचारिलें कीं, वेद शुद्ध झालाना ? कण्व म्हणालें झाले, आतां कांहीं म्हणणे नाहीं. पण चुकून अनुस्वाराबद्दल ँ कार ठेविला गेला. कण्वांनीं यज्ञांत येऊन वेद म्हणण्यास प्रारंभ केला. सर्व वेद शुद्ध पण अनुस्वाराचे जागीं ँ कार पाहून याज्ञवल्क्य म्हणाले, तुम्ही आजपासून प्रथम शाखीय आहांत. परंतु तुम्हाला पूर्व द्वाराचें कर्म न मिळतां आग्नेय द्वाराचें कर्म मिळेल. कण्व हे अग्नीचे उपासक म्हणून प्राग् वैश्वदेवस्तु काण्वाः अशी परिभाषा आहे. कण्वशाखा नवीन असून ती प्रथम आहे. यजुर्वेदी व कण्व यांच्या मध्यें फरक आहे. सर्व यजुर्वे-

द्यांना पुण्याहवाचनाला एक कलश लागतो तर कण्वांना दोन लागतात. " ततः उत्तर कलशं दक्षिणहस्ते दक्षिण कलशं वामहस्ते गृहीत्वा तांभ्या धारा सततं पात्रे निषिंच्ये ' असा संकल्प करावा लागतो. यजुर्वेद्यांना एक मंत्र, एक कलश, एक धारा आहे पण कण्व जर असतील तर दोन धारा करून "वास्तोष्पते इति मंत्रैः ' या ऋग्वेदांतील मंत्रांनीं अभिषेक करितात. सारांश, काण्वाः प्रथम शाखीयाः असें म्हणण्याचें कारण वरील इतिहास आहे. कण्वांचा उत्कर्ष ज्यांना सहन झाला नाहीं, ते " काण्वाः प्राणघातकाः " असें म्हणूं लागलें. व आश्वलायन दाता कण्व काटा अशी म्हण त्यांनींच प्रचलित केली.

लोकसंख्या व वास्तव्यस्थानें:—महाराष्ट्रभर कण्वशाखीय लोक आहेत. एकंदर लोकसंख्या अंदाजें निदान **आठहजार**पर्यंत असावी. नागपूर, इंदोर, भुसावळ, पंढरपूर, पुणें, नगर, सावदा, रावेर, वाशीम, कारंजा, देवळी, धरणगांव, खामगांव, पाचोरें, औरंगाबाद, अष्टी इत्यादि ठिकाणीं त्यांची बरीच वस्ती आहे. पश्चिम महाराष्ट्रांत हे ब्राह्मण कमी आहेत.

गोत्र—काश्यप, भारद्वाज, गौतम, पाराशर, रथीतर, मांडव्य, अत्रि, वसिष्ठ, इत्यादि प्रसिद्ध गोत्रें आहेत.

आडनांवें:—देशमूख, देशपांडे, कुलकर्णी, डहाळे, भालेराव, रत्नपारखी, राजगुरु, ओवे, भुरे, देव, सांबरे, प्रयागी, दहिहंडेकर, नेरीकर, मजुमदार, कानडे, पाटील, पटवारी, मालगुजार, गीद, नाईक, नेवासकर, धोंडगे, भुसारी, टालाटुले, जामदार, भडंग, इत्यादि प्रसिद्ध आडनांवें आहेत.

धर्मपंथ व मतें:—स्मार्त व भागवत पंथाचे आद्य श्रीशंकराचार्यांच्या मताचे अनुयायी असे हे लोक आहेत. संकेश्वरपीठाचे निग्रहानुग्रह चालतात. शृंगेरीपीठ पूज्य आहे.

वेदशाखा व सूत्र—यजुर्वेद कण्वशाखा प्रथम शाखीय असें म्हणतात. याज्ञवल्क्य सूत्राप्रमाणें धर्मकर्में होतात.

धर्मकर्में—उपनयनादि षोडश संस्कार होतात. हुंड्याची चाल आहे. ३०० रु. च्या आंत उपनयन होत नाहीं. वधुवरांचें वय अनुक्रमें

१२ ते १६ व २०।२४ असतें. चतुर्थीकर्म पूर्व स्थंडिलावर वधूच्या गृहीं होतें. तें एक तंत्रानें प्रथम दिवशीं किंवा चौथे दिवशीं होतें. श्राद्धपक्ष, श्रावणी, होमहवन हीं सर्व याज्ञवल्क्य सूत्राप्रमाणें होतात. मोठा श्रीमंत असला तरी ५०० पेक्षां अधिक हुंडा देत व घेत नाहीं.

कुलदेवतें:—देवी सप्तशृंगी, मातापुरी, वेंकटेश, मल्हारी, मार्तंड, या प्रसिद्ध कुलदेवता आहेत आणि रामकृष्ण, विठ्ठल इत्यादि उपास्य देवता आहेत.

पुरोहित—स्वशाखेचाच बहुतेक मिळतो, न मिळाल्यास कोणीही चालतो. पौरोहित्य बहुतेक वाज–माध्यंदिनच करितात. ते जवळचे वाटतात.

आरोग्य—ज्ञातिविशिष्ट रोग नाहीं, आरोग्य चांगलें आहे. साधारणतः स्त्रियांमध्यें स्त्रियांच्या रोगांचें प्रमाण पूर्वींपेक्षां वाढत आहे.

शिक्षण—जुन्या शिक्षणाकडे प्रवृत्ति कमी आहे. नव्या शिक्षणाकडे वाढत आहे. हा समाज सुखवस्तु असल्यामुळें शिक्षणांत मागसलेला आहे. कांहीं निरक्षर पुरुषहि सांपडतील. स्त्रियांमध्यें साक्षरता कमी. परंतु दिवसानुदिवस प्रमाण वाढत आहे. समाजाची प्रवृत्ति जुन्याकडे सामान्यतः असली तरी सुशिक्षित लोक प्रगतिप्रिय आहेत.

सांपत्तिक स्थिति:—बहुतेक सर्व लोक खाऊन पिऊन बरे आहेत. २५।३० घराणीं लक्षाधीश आढळतील. कण्व लोक बहुतेक जमीनदार आहेत. उत्पन्न नाहीं असा मनुष्य विरळा. शेती व सावकारी हे मुख्य धंदे आहेत. अलीकडे खासगी व सरकारी नोकऱ्या, डॉक्टरी, वकीली हे धंदे लोक करीत आहेत. सराफी, धान्य, कापड, या व्यापारांतहि लोक आहेत.

राहाणी—साधी, अलीकडे टापटिपीची व व्यवस्थित होऊं लागली आहे. शहरांशीं संबंध अलीकडे अनेक कारणांमुळें अधिक येऊं लागला आहे. म्हणून शहराचें अनुकरण खेड्यांतील ब्राह्मण करूं लागले आहेत. त्यांचा खेडगळपणा जात आहे.

अन्नव्यवहार:—सर्व चतुःशाखीय ब्राह्मणांशीं होतो. श्राद्ध, पक्ष, हव्यकव्य प्रसंगीं स्वशाखीय ब्राह्मणच सांगण्याची पद्धत आहे. अनुपपत्ती असेल

तर कोणताहि विद्वान् ब्राह्मण चालतो. मात्र त्याला देवस्थानींच श्राद्ध पक्षांत बसविण्यांत येतें. सर्व षट्कर्माधिकारी सद् ब्राह्मणांशीं पंक्तिव्यवहार करण्याची या समाजाची तयारी आहे.

स्वभाव—मनमिळाऊ, थोडा भोळसर, आदरातिथ्यशील, थोडासा कंजुष व असा या समाजाचा स्वभाव आहे.

विधवा—बालविधवांची संख्या बरीच असावी. विधवा विवाह संमत नाहीं व रूढ नाहीं. वपनविकल्प दृष्टीस पडतो.

संस्था—पंढरपुर येथें कण्व महर्षि संघ व सावदे येथें कण्व मंडळ मंडन अशा दोन ज्ञातिविशिष्ट संस्था आहेत. पंढरपुर संस्थेत श्री. डिंग्रेशास्त्री व बाळिराम शास्त्री हे काम करितात तर सावदा येथें रामकृष्ण मार्तंड कुलकर्णी व श्रीधर श्रीनिवास वगैरे मंडळी काम करितात.

सामाजिक महत्वाकांक्षा—ब्राह्मणसंघटना व्हावी. ब्राह्मण हिताचा विचार करण्याकरितां सर्व ब्राह्मण एकत्र जमावें. व हितविरोधी गोष्टीचा प्रतिकार व्हावा, अशीच इच्छा आहे.

कर्तीं माणसें—वे. मू. जयरामशास्त्री कृष्णशास्त्री, कारंजा; रामकृष्ण विष्णु राजगुरु वैद्य, सावदे; भगवान् शास्त्री धारूरकर, मंजुळ शास्त्री, बाळाराम शास्त्री, पंढरपूर; बाबा शास्त्री डिंग्रे, आप्पा शास्त्री डिंग्रे, केशवशास्त्री, बॅ. देशमूख, नागपूर; डॉ. देशमूख, मुंबई; भडंग वकील, खामगांव; नेरीकर वकील, खामगांव; भालेराव वकील, बैतूल; श्री. हडस नागपूर; श्री. कुलकर्णी अकोला; डॉ. भुरे, सावदा; श्रीमंत काणव, कारंजा; श्री. जामदार वकील, सोलापूर; देशमूख वकील, सोलापूर; डॉ. नाईक, मूर्तिजापुर; श्री. राजगुरु, नागपूर; इत्यादि अनेक कर्तीं माणसें आहेत.

उत्सव, सण, व्रतेंवैकल्यें—चैत्रप्रतिपदा, चैत्रा गौरी, रामनवमी, हनुमज्जयंति, अक्षय्यतृतिया, वटसावित्री, चातुर्मास्य एकादशा, व्यासपूजा अगर गुरुपूजा, दीप-अमावास्या श्रावण शुद्ध १४।१५ ला देवीचा कुलधर्म, शुक्रवारचें जिवंतीकापूजन, बुध, बृहस्पति, नारसिंह, सोमवारचे

उपास, नवोढा स्त्रियांचे मंगळागौरीचें पंचवार्षिक व्रत, तिथिप्रणीत पंचमी अगर पूर्णिमेला श्रावणी, रक्षाबंधन, गोकुळअष्टमी, हरितालिका, गणेशचतुर्थी, ऋषि-पंचमी, गौरी, शीतला सप्तमी, प्रौष्ठपदीचा सप्ताह, महालय, श्राद्ध, अविधवा-नवमी. आश्विनांत घट-माळ-दिवायुक्त नऊ दिवस नवरात्र, क्वचित् नवचंडीहोम, कूष्मांडबलिदान, सरस्वतीपूजन (क्वचित् श्रावणांत करण्याची चाल आहे) शारदीय नवरात्र, विजयादशमी, कोजागिरी, कन्यांची अष्टमी, (दिवाळीसारखें सर्व फराळाचें करितात), वसुबारस, धनतेरस, दिपवाळी. (गोवर्धन पर्वत भाताचा अगर पोह्याचा करितात.) तुळशीविवाह, वैकुंठचतुर्दशी, त्रिपुरीपूर्णिमा, मार्गशीर्षांत सटीचें नवरात्र सहा अगर नऊ दिवस, पौषांत संक्रांत, वसंतपंचमी, रथसप्तमी, माघी शिवरात्र, हुताशनी, रंगपंचमी, इत्यादि व्रतें, उत्सव व सण आहेत.

विशिष्ट कुळाचार व पद्धतिः—कांहीं घराण्यांत चैत्र शुद्ध १४ ला जोगतीण व मांगीण यांना पैसा, हळदकुंकू देऊन पानें वाढून देतात. आदल्या दिवशीं निमंत्रण देऊन न्हाणें–माखणेचें साहित्य देऊन येतात. ती आल्यावर “उदो बोला उदो, नवचंडी, नवदुर्गा, खटी, खारका, उदो बाई रेणुका, रेणुकेच्या भक्तीनें गोंधळ करिती राजाराणी, चौसष्ट जोगिणी पात्रें भरती” असें ती म्हणते. नंतर ती आशीर्वाद देते. मग तिला पानसुपारी व वाढलेलें पात्र देतात. क्वचित् जेवूं घालतात. सटीच्या नवरात्रांत कित्येक घराण्यांत मांगीण सुवासिनी असते. ती शारदीय नवरात्रांत नसते. येळकोट उचलण्याचा प्रघात आहे. “येळकोट घे मल्हारी, तूं मोरया, तूं चिंतामणी, सदानंदानें बोली ओंकार” असें म्हणून ती येळकोटाची तळी कपाळीं लावतात. लग्नांतील मंगळसूत्र कोणींही ओंवावें. अंत्येष्टीचा अग्नि प्रथम महारानें तयार करायाचा व मग तो आप्तांनीं घेऊन जावयाचा अशी पूर्वखानदेशांत चाल आहे.

२. जंबुकण्व ब्राह्मण (मध्यप्रांत)

पूर्वेतिहास—जंबुकण्व ब्राह्मण हें मूळचे दक्षिण गुजराथेंतील जंबुसर गांवचे असावेत. दक्षिण गुजराथेवर म्हणजे लाट प्रांतावर दुसऱ्या पुलकेशी पासून अनहिलवाडच्या सोळंखी राजा भीमदेवापर्यंत म्हणजे सुमारें ११

ठ्या शतकापर्यंत हिंदु राजे राज्य करीत होते. त्या वेळीं लाट प्रांतांत बरेच ब्राह्मण उत्तरेकडून व दक्षिणेकडून वसाहतीस आलेले दिसतात. गुजराथेंत खेडावा, मोताला या ब्राह्मण जाती दक्षिणी असून त्या कण्वशाखी आहेत. या दाक्षिणात्य ब्राह्मणांची कुलदेवता कोल्हापूरची महालक्ष्मी आहे. आणि यांच्या व गुजराथेंतील ब्राह्मणांच्या आचारविचारामध्यें फरक आहे. हा पूर्वेतिहास जरी अनिश्चित असला तथापि हे ब्राह्मण मूळचे कानून परगण्यांत व जंबू शहरांत राहणारेच होत. सांप्रत जंबू शहरांत व परगण्यामध्यें मिळून सुमारें दीड हजार जंबूकण्वांचीं घरें आहेत. जंबू शहरावरून यांस जंबू ब्राह्मण असें नांव पडलें. सांप्रत यांची वस्ती मध्यप्रांत, नेमाड, अहमदनगर या भागांत आहे.

गुजराथेंतून जंबू ब्राह्मणांची हकालपट्टी बेगडा महंमुदानें केली. बेगडा हा गुजराथचा प्रसिद्ध सुलतान होता. त्यानें १४५८ ते १५११ पर्यंत राज्य केलें. १४६८ त महंमदानें जुनागड व पावनगड हे दोन गड घेतल्यामुळेंच त्याला बेगडा असें नांव मिळालें. हा हिंदूंचा मोठा छलक होता. यानें गिरनारच्या रजपूत राजास जिंकलें, चंपानेर नगरीचा विध्वंस केला व हिंदु प्रजेला "सळो का पळो" करून सोडिलें. चंपानेरच्या विध्वंसानंतर बरेचसे हिंदु नेमाड, वऱ्हाड व मध्यप्रांताकडे सरकले. सारांश, जे जंबू ब्राह्मण नेमाड, मध्यप्रांत व नगर भागांत आढळतात त्यांना सुमारें ४५० वर्षांपूर्वी देशत्याग करावा लागला असा इतिहास मिळतो. प्रथमतः मध्यप्रांतीय जंबूंची माहिती देतों.

सांप्रत मध्यप्रांतांत कांहीं गुर्जर ब्राह्मण आहेत त्यांपैकीं जंबु ज्ञाति सर्वांत जुनी आहे. राजकर्तृक जुलुमामुळें हा ब्राह्मणसमूह मध्यप्रांतांत आल्यास ४५० वर्षें झालीं असावींत.

वास्तव्यस्थानें:—सध्यां या ब्राह्मणांची वस्ती मध्यप्रांतांत चांदा, वरोरा, ब्रह्मपुरी, उमरेड, नागपूर या भागांत आहे. याशिवाय इंदोर, खरगोण, महेश्वर व अहमदनगर जिल्ह्यांतही बरीच वस्ती आहे. पन्नास वर्षां-

पूर्वी नागपूर प्रांतांत लोकसंख्या हजार पांचशें होती. मध्यप्रांत व नगर भाग मिळून लोकसंख्या हजार आठशें होईल.

राहणी--हे ब्राह्मण जरी मूळचे गुजराथेंतील असले तरी यांची राहणी, भाषा व पोषाख हीं सर्व महाराष्ट्रीय ब्राह्मणांप्रमाणें झालीं आहेत. याला एकच कारण कीं, यांची या प्रदेशांत फार दिवस झालेली वसाहत हें होय.

व्यवसाय व सांपत्तिक स्थिति—शेती व सावकारी हे यांचे प्रमुख व्यवसाय आहेत. व्याजवट्याच्या धंद्यावरून नगर जिल्ह्यांतील या लोकांना किस्ती असें म्हणतात. किस्त म्हणजे हप्त्यानें व्याज व मुद्दल घेण्याचा व्यवहार. खानदेशांतील माध्यंदिन शाखीय ब्राह्मणांना किस्ती असें याच व्यवसायावरून म्हणतात. सांपत्तिक स्थिति खाऊनपिऊन उत्तम आहे. नगरकडील लोकांची मध्यम आहे.

अन्नव्यवहार—हे ब्राह्मण आचारविचारांत पूर्ण महाराष्ट्रीय झाले आहेत, म्हणून यांच्याशीं अन्नव्यवहार निःशंकपणें होतो. त्यास सुमारें साठ वर्षें झालीं. लग्नव्यवहारावांचून बाकीच्या सर्वच व्यवहारांत पूर्ण दळणवळण चालू आहे.

शिक्षण—हे ब्राह्मण इकडे आल्यावर जरी वैश्यवृत्तीनें राहूं लागले तथापि वेदविद्येकडे यांचें लक्ष्य होतें. शके १६५० मध्यें जंबूकण्वांपैकीं गोविंदशास्त्री पंडे यांनीं चंद्रपूर येथें कण्वशाखेची वेदशाळा स्थापन केली. पन्नास विद्यार्थ्यांना भिक्षा मागून भोजन घालून वेदशास्त्र शिकवून त्यांनीं प्रवीण केलें. पंडे हे उत्तम ज्योतिर्षी होते. शके १६७३ पासून भोसले सरकारकडून त्यांना सालीना तीनशें रुपये संभावना मिळूं लागली. त्यापूर्वी चांद्याच्या त्या वेळच्या सुभेदाराचें लक्ष या पाठशाळेकडे असे. ही संभावना दोन पिढ्या चालून तिसऱ्या पिढीचे नारायणशास्त्री पंडे यांच्या अज्ञानपणांत ती बंद झाली. वरील वेदशाळेंत शिकून महालक्ष्मे, खोंड, वुजोणे, कावडकर, कवेश्वर, घरोटे, उकनकार इत्यादि दाक्षिणी कण्व घराणीं नांवारूपास आलीं. तीं सांप्रत चांदा येथें विद्यमान आहेत. याच गोविंदशास्त्री पंडे यांचे वंशज रा. पुरुषोत्तम नारायण पंडे हल्लीं बरोडा येथें असतात. ते सार्वजनिक कार्यांत अतिशय झटत असतात. अलीकडे

नवीन शिक्षणांतही हे ब्राह्मण पुढें येत आहेत. वकील, डॉक्टर, पदवीधर या समाजांत उत्पन्न होत आहेत.

आहार व इतर गमकें:—ही जात पंचद्रविड असल्यामुळें शाकाहारी आहे. हा समाज शुक्ल यजुर्वेदांतर्गत कण्वशाखी आहे. यांचीं धर्मकर्में स्वशाखीयांकडून व क्वचित् वाजसनेयीयांकडून होतात. हे ब्राह्मण गुजराथेंतून आल्यामुळें महाराष्ट्रांत यांची जोशीवृत्ती फार थोडी आहे. ब्राह्मण जातींचीं सर्व गमकें यांना लागतात. कांहीं ब्राह्मण क्वचित् यांच्यांशीं पंक्तिव्यवहार करीत नसले तरी ते यांना अब्राह्मण म्हणण्यास केव्हांही सिद्ध होत नाहींत. ही जात स्वतःस ब्राह्मण समजते व इतर जाती यांना ब्राह्मण समजतात.

शाखा व गोत्रें–कण्वशाखा असून हरित, आत्रेय, काश्यप, भारद्वाज, गौतम, शौनक, वत्स, शौकायन, दर्भ इत्यादि गोत्रें आहेत.

आडनांवें–पंडे, पाटील, भुसारी, सावजी, भट, नाइक, छपनी, उवटी, भाई, इत्यादि.

धर्मकर्में–अहमदनगरकडील लोकांचीं धर्मकर्में माध्यंदिन ब्राह्मणांकडून होतात. कारण त्यांना स्वशाखीय पुरोहित मिळत नाहींत. इंदोरकडील लोकांचीं धर्मकर्में स्वशाखीयांकडून होतात. विवाह व उत्तरक्रिया यांमध्यें यांचा दाक्षिणी पद्धतीपेक्षां थोडा फरक आहे. कन्यादानाचे वेळीं वरास सर्व पोषाख घातलेला असतो. वधूच्या घरीं लग्न झालें तरी पुनश्च गृहप्रवेशानंतर वधुवरांचें लग्न लावितात. मात्र तें उघड समारंभानें करीत नाहींत. या समारंभाला जांबवतीच्या कथेचा आधार देतात. तसेंच उत्तरक्रिया अगर मातृश्राद्ध असेल त्या वेळीं आई, तिचा बाप व आजा अशी मातृत्रयी घेतात. याला कोकिलकारिकेचा आधार दाखवितात. गर्भाधानादि अंत्येष्टीपर्यंत सर्व संस्कार शास्त्रशुद्ध पद्धतीनें होतात. उत्सव, सण, व्रतें-वैकल्यें, धर्मकर्में हीं सर्व महाराष्ट्रीय ब्राह्मणांप्रमाणें होतात.

देवदेवता व धर्मपंथ—मध्यप्रांतांतील या ब्राह्मणांचें गिरीचा व्यंकटेश हें कुलदैवत आहे. आश्विनांत नवरात्र असतें. प्रत्येक शुक्रवारीं उपवास करितात. क्वचित् कांहीं घरीं रामनवरात्रही असतें. आद्य श्रीमच्छंकराचार्यांच्या

अद्वैतमताचे हे अनुयायी आहेत. शृंगेरी पीठाचे निग्रहानुग्रह मानतात. करवीर व संकेश्वर या पीठांना पूज्य समजण्यांत येतें.

कर्ते माणसें:—सॉलिसिटर, व्यापारी, वकील, इंजिनिअर, सार्वजनिक कार्यकर्ते अशा विविध क्षेत्रांत पुढें येत आहेत. देवराव बाबा पाटील वरोडा, पुरुषोत्तम नारायण पंडे वरोडा, भुसारी वकील चांदा, गोविंदराव चावजी बापूजी पाटील इजारदार, श्री. नाईक सावकार उमरेड, आत्माराम पंत उवटी, वामनराव भट, गोविंदराव जानी, देवराव पाटील , पांडुरंगराव पाटील इत्यादि कर्त्या मंडळीशिवाय आणखी वीस पंचवीस नांवें देण्याजोगीं आहेत, परंतु विस्तारभयास्तव तीं देतां येत नाहींत.

आरोग्य—सांपत्तिक स्थिती चांगली असल्यामुळें या जातीचें आरोग्य चांगलें आहे. कोणताही ज्ञातिविशिष्ट रोग नाहीं. समाज जुन्या कलाचा असल्यामुळें विधवाविवाह रूढ व मान्य नाहीं.

सामाजिक दुःख व इच्छा—या ब्राह्मणांचें मुख्य सामाजिक दुःख म्हणजे क्षेत्रसंकोच हें होय. सुमारें दीडशें दोनशें वर्षांच्या वास्तव्यानें हे ब्राह्मण पूर्ण महाराष्ट्रीय झाले असल्यामुळें महाराष्ट्रांतील काण्वशाखीयांशीं व इतर सद्ब्राह्मणांशीं शरीरसंबंध व्हावेत असें यांना वाटतें. क्षेत्रसंकोचामुळें वधूवरांची अडचण पडते व निरुपायानें जवळच्या नात्यागोत्यांत लग्नव्यवहार करावे लागतात. यांचे आचारविचार महाराष्ट्रिय झाल्यामुळें गुजराथेकडील जंबूंना यांच्याबद्दल परकेपणा वाटतो; म्हणून ते यांना मुली देत नाहींत. इकडे महाराष्ट्रियही त्यांच्याशीं शरीरसंबंध करण्यास बिचकतात. आपल्या अल्पसंख्य समाजाचा उत्कर्ष व्हावा म्हणून इतर सर्व सद्ब्राह्मणांनीं आपल्यांशीं शरीरसंबद्ध व्हावें अशी या जातीची इच्छा आहे. ही जात देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे व शुक्ल यजुर्वेदी इत्यादि जातींशीं रूप व वर्ण यांत साम्यता करते.

३ जंबू कण्व (नेमाड प्रांत)

हे ब्राह्मण मुसलमान सुलतान बेगडा महंमद याच्या त्रासामुळें सैंधवा नागलवाडी या भागांत आले. तेथेंही पीडा होऊं लागली म्हणून नेमाडांत आले.

नेमाडांत यांची वस्ती हजार आठशें आहे. यजुर्वेदी कण्वशाखीय हे ब्राह्मण असून पारस्कर गृह्यसूत्राप्रमाणें यांचीं धर्मकर्में होतात.

गोत्र—कौंडिण्य, दौंडिण्य, भारद्वाज, दर्भस, माठर, वैष्णव, शौनक इत्यादि प्रसिद्ध गोत्रें आहेत.

उपनांवें—देवळे, खोडे, परसयी, पागडे, पंठाये, पाठक, भटजी, बंदुके, कोकळे, फोफळे, जंबूसर, पडये, जोशी, घोडी, उपाध्ये, इत्यादि प्रसिद्ध उपनांवें आहेत.

शिक्षण—वैदिक व शास्त्री नाहींतच. पुराणिक, याज्ञिक ५० आहेत. निरक्षर लोक बरेच आहेत. खेड्यांत गायत्री मंत्र व गोत्र सांगणारे ब्राह्मण थोडेच आहेत. इंग्रजी शिकून पुढें आलेलीं १०।१२ कर्तीं माणसें आहेत. शेती, जोसपण करणारेच पुष्कळ आहेत. बहुतेक वस्ती शहरांत आहे.

सांपत्तिक स्थिति—मध्यम प्रकारची आहे. व्यापार, घरगुती नोकऱ्या, शेती, भिक्षुकी हे धंदे करणारे लोक असले तरी हा वर्ग फारसा संपन्न नाहीं.

धर्मपंथ व मतें—सर्व स्मार्त आहेत. शृंगेरी पीठाचें अनुशासन चालतें. बहुतेक तंटे ज्ञातींत संपवितात. केव्हां केव्हां पीठाकडे जावें लागतें.

संस्कार—गर्भादानादि अंत्येष्टीपर्यंत सर्व होतात. उपनयन ८।१० वर्षांपर्यंत होतें. देवक ३ अगर ५ दिवस ठेवतात. लग्नाच्या चालींत विशेष हा आहे कीं, वधूचे घरीं लग्न झाल्यापासून पांचवे दिवशीं पुनः वराच्या घरीं लग्न लागतें. त्या वेळीं मंगळाष्टकें व पुण्याहवाचनेंही होतात. लग्न होतांच चवथ्या दिवशीं उत्तर रात्रीं चतुर्थीकर्म होतें. चतुर्थीकर्म म्हणजे गणपतिपूजन व चौदा आहुतींचा होम हें होय. वधूवरसंयोगाचा बिलकुल संबंध नाहीं. कोणत्याही कार्यांत ज्ञातिभोजन दिलेंच पाहिजे असा नियम आहे. अनुकूल नसल्यास पंच त्याची क्षमा करितात. उपनयन व समावर्तन हे संस्कार एकाच दिवशीं होतात. उपनयन पिता किंवा आचार्य करितो. हुंड्याची चाल नाहीं. अंत्येष्टीचा प्रघात नाहीं. पुढें दहाव्या दिवसापासून सर्व कांहीं नार्मदीय ब्राह्मणाप्रमाणें होतें. होमाशिवाय (ऋषिपूजन, स्नान, यज्ञोपवीत-धारण) अशी श्रावणी होते.

कुलदेवता—गणेशांबिका ही पुष्कळांची आहे. बहुतेक स्त्रीकुल-देवता आहेत. उपास्य देवतांमध्यें पुरुष दैवतें अलीकडे राम-कृष्णादि आलीं आहेत. चैत्र, आश्विन, माघ व आषाढ महिन्यांच्या पहिल्या पंधरवड्यांत शुद्ध ७।८।९ हे तीन दिवस कुलधर्म, कुलाचार होतो.

उत्सव, सण व व्रतें—हीं सर्व नेमाडांतील नार्मदीय ब्राह्मणांप्रमाणें आहेत. फक्त श्रावणांत शीतळासप्तमी असते. पौष वद्य ३ ला गणपति-संकष्टी निमित्त मोठा उपास असतो व रात्रौ मिष्टान्न-भोजन करितात. गोकुळअष्टमीला राख्या बांधितात. ध्वजारोपण, गणेश चतुर्थी, होलिका हीं घरोघर नसतात. गणेश चतुर्थीस अकस्मात् मुलगा झाला तर घरांत गणेशचतुर्थी सुरू होते. त्या दिवशीं कांहीं अशुभ झालें कीं बंद होतें. नवरात्र बहुतेक नसतें. फक्त ७।८।९ ला देवीला कुलधर्म होतो.

४. कात्यायन ब्राह्मण

पूर्वेतिहास व वास्तव्यस्थानें—देवगिरीच्या राज्याचा निःपात अल्लाउद्दीनानें केल्याबरोबर देशांत मोठा हाहाःकार उडाला. हिंदु म्हणून सांगण्याची त्या वेळीं पंचाईत होती. मग ब्राह्मण म्हणून सांगण्याची गोष्ट कशाला ? अशा ह्या क्रांतीच्या वेळीं देवगिरी, देऊळगांव, जालना वगैरे देवगिरीच्या पंचक्रोशींत राहणारे कात्यायन शाखेचे ब्राह्मण देवगिरीहून पळून शेजारच्या नगर, नाशिक जिल्ह्यांत घुसले. नगर जिल्ह्यांत आकोले, कान्हूर, संगमनेर या ठिकाणीं त्यांची वस्ती आहे. सोलापूर व पंढरपूर येथें एकदोन घरें आहेत. पुण्यास यांची वस्ती दीडशें वर्षांपासून आहे. सुमारें वीस बावीस घरें पुण्यास आहेत. वऱ्हाडांत उमरावती, भंडारा, पातुरडा, या ठिकाणीं एकदोन घरें आहेत. कात्यायन ब्राह्मणांची लोकसंख्या सुमारें पांचशें आहे.

शाखा—शुक्ल यजुर्वेदांतर्गत कात्यायन शाखा ही वेद शाखा असून शाखेवरूनच कात्यायन असें नांव पडलें आहे. देवगिरीकडे व मध्यप्रांतांत सुद्धां कांहीं विशिष्ट हक्कदार अशा जमिनदार शेतकरी लोकांना कास्तकार किंवा कास्त असें म्हणत. हा शब्द हल्लींहि रूढ आहे. कात्यायन ब्राह्मण हे शेतकी करून

निर्वाह करीत असत म्हणून त्यांना कास्त ब्राह्मण असें नांव पडलें. कास्त हें नांव व्यवसायवाचक आहे. परंतु तें देशवाचक किंवा शाखावाचक नाहीं.

गोत्रें व उपनांवें--काश्यप, कौण्डिण्य, भारद्वाज, गौतम, पराशर, वासिष्ठ, अगस्ति, वत्स, कात्यायन व कौशिक इत्यादि गोत्रें आहेत; आणि काळे, जोशी, वैद्य, जवरे, देवगिरीकर, परांडेकर, पंडित, नागनाथ, गरुड, लोखंडे, विसाळ, वांगे, टाकेकर, सुरेराव इत्यादि उपनांवें आहेत.

धर्मकर्में--पारस्कर व कात्यायन सूत्रानें उपनयनादि षोडश संस्कार होतात; आणि श्राद्धपक्ष, हव्यकव्य इत्यादि धर्मकर्में चालतात. कात्यायन ब्राह्मणांच्या सद्ब्राह्मण्याबद्दल आणि वेदाधिकाराबद्दल कधींहि संशय उत्पन्न झाला नव्हता.

देव-दैवतें--गिरीचा व्यंकटेश, मातापूर, तुळजापूर, सप्तशृंगी येथील देवता कुलदेवतांमध्यें आहेत. जेजुरीचा खंडोबा या अलीकडे पुष्कळांचा कुल-दैवत झाला आहे. मार्गशीर्षांत सटीचें नवरात्र व आश्विनांत देवीचें नवरात्र करतात. कार्यप्रस्थांत गोंधळ घालण्याची चाल आहे. व्यंकोबाची समाराधना सवडीनुसार दरसाल करण्यांत येते.

व्रतें, वैकल्यें व सणः—चैत्र प्रतिपदेपासून फाल्गुनी पूर्णिमेपर्यंतचे सर्व सण पाळण्यांत येतात. राम, कृष्ण, हनुमान, दत्त, नृसिंह यांच्या जयंत्या करण्यांत येतात. महाएकादशी, शिवरात्र, संकष्टी, श्रावणी, व कार्तिकी सोमवाराचे उपवास करतात. चैत्रागौरी, अक्षत्रितियेचें कुंभदान, वटसावित्री, पिठोरी, बुधबृहस्पती, जिवत्या, अनंतचतुर्दशी, हरितालिका, ऋषिपंचमी, त्रिपुरी पूर्णिमा, संक्रांत, रथसप्तमी इत्यादि व्रतवैकल्यें आहेत.

कर्ती माणसेंः—पुण्याचे श्री. त्रिंबकराव पंडित मोतीवाले, कृ. ल. पंडित सर्वेअर, शंकरराव नागनाथ (सब रजिस्ट्रार), आणि वे. शा. सं. त्रिंबकभट्ट जोशी वैद्य, वे. मू. विश्वनाथभट्ट कवि, नगरचे गरुड वकील, विनायकराव वैद्य (एक्स्ट्रा असि० कमिशनर), वाठोडकर (असि० डि० जज्ज), ह. ग. जानोरीकर ओव्हरसिअर (अहमदाबाद), परांडेकर, कान्हूरकर, गरुड, पारनेर तालुक्याचे सावकार, अशीं कर्ती माणसें आहेत.

वे. शा. सं. त्रिंबक बळवंतभट्ट वैद्य यांचें घराणें अंमळनेर प्रांतांतील गांधली येथील वृत्तिवान जोशी यांचें होय. यांचे पूर्वजांपैकीं, कै. वे. शा. सं. आपा शिवदेव हे उत्तम जोतिषी व वैदिक होते. यांच्या हातचे शके १६१०-५० मध्यें जालनापूर येथें लिहिलेले बरेच जोतिषसंबंधीं ग्रंथ आहेत. कै. वे. शा. सं. बापू ब्रह्मगिरीभट्ट वैद्य हे उत्तम घनपाठी वैदिक, वैय्याकरणी व धर्मशास्त्री होते, (शके १६९० ते १७४०). हे पेशवाईंत श्रावणमासच्या दक्षिणेचे परीक्षकांत शुक्ल यजुर्वेदांच्या संहिता, पद, क्रम इत्यादींचे परीक्षक होते यांचा माध्यंदिन शाखेमध्यें बराच शिष्यवर्ग होता. उत्तम धर्मशास्त्री म्हणून अनेक ठिकाणाहून यांचेकडे धर्मशास्त्रार्थ विचारणा होत असे. कै. वे. शा. सं गोविंदबुवा वैद्य, ब्रह्मीभूत रघुनाथबुवा व बजाबा वैद्य हे उत्तम कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध होते. यांचे चिरंजीव विश्वनाथराव वैद्य हे बालाघाट येथें प्रसिद्ध व्यापारी आहेत. ब्रह्मीभूत रघुनाथबुवा यांची समाधी पुण्याजवळ मंमदवाडी येथें ब्रह्मीभूत पूर्णानंद सरस्वति यांचे मठांत आहे. काळे घराण्यापैकीं, कै. वे. शा. सं. काशीभट्ट, ज्ञानेश्वरभट्ट, ब्रह्मीभूत नारायणभट्ट काळे व भाऊभट्ट काळे वगैरे उत्तम वैदिक होते.

कवि घराण्यापैकीं, दत्तविरद विठ्ठल कवि म्हणून (शके १६७० ते १७२०) सिन्नर मुक्कामीं प्रसिद्ध कवि होऊन गेले. यांची कविता उत्तम प्रासादिक असून त्यांचा सर्व ग्रंथसंग्रह संगमनेर, अकोला येथें वे. मू. काशिनाथ आण्णा कवि यांचे संग्रहीं आहे. दत्तवरद विठ्ठल कवि यांस विद्वत्तेबद्दल पेशव्यांचे वेळीं वर्षासन मिळत होतें तें त्यांचे घराण्याकडे सन १९१८ पावेतों चालू होतें.

शिक्षण— चार दोन याज्ञिक, दोन तीन वैदिक, दहापांच पदवीधर एवढींच शिकलेलों माणसें आहेत. समाज शिक्षणांत मागसलेला आहे. स्त्रियांना थोडेबहुत लिहितां वाचतां येतें. सामान्य समाजाची प्रवृत्ति जुन्याकडेच आहे. पण शिकलेलीं माणसें प्रगतिप्रिय आहेत.

सांपत्तिक स्थिति—अगदीं गरीबीची; चारदोन घरें खाऊन पिऊन सुखी सांपडतील.

राहाणी— माध्यंदिन शाखेच्या इतर कांहीं ब्राह्मणाप्रमाणें या ब्राह्मणांतही शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य व अज्ञान ही असल्यामुळें राहाणी खेडगळ असणें साहजिक आहे. खेड्यांत वास्तव्य करणारेच पुष्कळ लोक आहेत.

आरोग्य व रोग—आरोग्य सर्व साधारण बरें आहे. विशिष्ट रोग नाहींत. तरीपण इतर ब्राह्मण समाजाप्रमाणें या ब्राह्मण वर्गाचें आरोग्य खालावत आहे. स्त्रियांत बाळंतरोग, क्षयरोग यांचें प्रमाण आणि लहान अर्भकांच्या मृत्यूचें प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

विधवा— विधवाविवाह अद्यापपर्यंत एकहि झालेला नाहीं. वपनाचा विकल्प दृष्टीस पडूं लागला आहे.

महत्वाकांक्षा व स्वभाव— माध्यंदिन ब्राह्मणाप्रमाणें कात्यायन ब्राह्मणांची थोडी कंजुष वृत्ति दिसून येते. तरी पण कार्यप्रस्थाच्या वेळीं सढळ हातानें खर्च होतो. स्वभाव भोळसर, श्रद्धाळू, आदरातिथ्यशील असा आहे. कात्यायन शाखेच्या ब्राह्मणांची महत्वाकांक्षा यजुःशाखीय माध्यंदिन शाखेशीं विवाह व्हावा एवढीच आहे. ब्राह्मणांतील दुसऱ्या कोणत्याही पोटजातीशीं या जातीचा हर्षामर्षाचा संबंध नाहीं. कास्त ब्राह्मणांशीं अन्नव्यवहार न करण्याबद्दल एक ग्रामण्य उपस्थित झालें होतें. ह्या प्रकरणीं संकेश्वर व करवीर या उभय पीठांनीं महामहोपाध्याय अभ्यंकरशास्त्री, पाठकशास्त्री, उपासनीशास्त्री यांचें एक चौकशी मंडळ शके १८४४ मध्यें नेमलें होतें. या मंडळानें विश्वसनीय पुराव्यावरून कास्त ब्राह्मण हे भोजनप्रतिभोजनास पात्र आहेत, असा अभिप्राय दिला व त्यांप्रमाणें श्रीमत् जगद्‌गुरु शंकराचार्य मठ करवीर व संकेश्वर (डॉ. कुर्तकोटी) यांनीं आज्ञापत्र दिलें त्याचा सारांश—"कास्त ब्राह्मण हे शुक्ल यजुर्वेदांतर्गत कात्यायन शाखेचे अध्ययन करणारे ब्राह्मण आहेत, हे बहुधा सर्वांना मान्य असूनसुद्धा कांहीं लोकांना संशय येऊन त्यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं याविषयीं वाद उत्पन्न केला. या वादाचा निर्णय अनेक अधिकारी मंडळींनीं व विद्वानांनीं पुष्कळ वेळां केला आहे. तरी पण "लोकांचे खऱ्या तत्वाकडे लक्ष असत नाहीं" या नियमाप्रमाणें शके १८३२ मध्यें हा वाद पुन्हा उपस्थित झाला, म्हणून प्रकृत उपक्रम करावा लागत आहे.

चौकशीमंडळांतील पुण्यांतील तिन्ही पंडितांनीं व इतर पंडितांनीं पुष्कळ लोकांना बोलावून व कांहीं ठिकाणीं स्वतः जाऊन वादग्रस्त कास्त ब्राम्हणांविषयीं लेखी किंवा तोंडी जी जी माहिती मिळाली ती सर्व विचारपूर्वक दाखल करून घेऊन सरळ व समंजस असा आपला अभिप्राय दिला. या सर्व शास्त्रीमंडळींच्या अभिप्रायावरून हे लोक कात्यायन शाखेचे अध्ययन करणारे, यजनादि षट्कर्मांचे अधिकारी असून सदाचारशील आहेत असें सिद्ध होतें. पंडिताप्रमाणें इतर मान्य गृहस्थांच्या अभिप्रायांचा विचार करून पीठाकडून असा निर्णय देण्यांत येतो कीं, कास्त ब्राह्मण हे शुक्ल यजुर्वेदांतर्गत कात्यायन शाखी, परंपरेनें श्रौतस्मार्तादि कर्मे करीत असणारे, महाराष्ट्रीय पंचद्राविडांतर्गत ब्राह्मण आहेत; म्हणून अन्य शाखीय ब्राह्मणांबरोबर शास्त्रविहीत (भोजन, प्रतिभोजन, कन्यादान, प्रतिग्रहादि) सर्व प्रकारचे व्यवहार करण्यास ते योग्य अधिकारी आहेत, याबद्दल कोणाही शास्त्राभिमानी (धर्मशास्त्र प्रमाण मानणाऱ्या) गृहस्थानें मुळींच शंका घेऊं नये.”

कात्यायन ब्राह्मणांशीं पंक्तिव्यवहाराचा प्रश्न वरील निर्णयामुळें संशयास्पद अशा स्थितींत राहिलेला नाहीं. उलट तो सशास्त्र पद्धतीनें सुटला आहे. आतां कात्यायनांशीं फक्त लग्नव्यवहाराचा संबंध होणें अवशिष्ट आहे. तो माध्यंदिनांनीं झपाट्यानें सुरू करावा तरच ही अल्पसंख्य जात ब्राह्मण्यवान् राहील. १९१६ सालीं कै. लोकमान्य टिळक विलायतेस जाण्याच्या वेळीं त्यांस या प्रकरणाचे सर्व कागदपत्र वे. शा. सं. त्रिंबक बळवंत वैद्य यांनीं दाखविले होते. कै. लोकमान्यांचें मत या कामीं पूर्ण अनुकूल असून राजकीय कामाची त्यांच्या मागें गर्दी नसती तर त्याच वेळीं श्रीशंकराचार्य यांच्याकडून या प्रकरणाचा योग्य निकाल करवून घेण्याची त्यांची इच्छा होती.

यंदा श्रीमत् जगत्गुरु शंकराचार्य (डॉ० कुर्तकोटी) यांचें चातुर्मास निमित्त नगर येथें वास्तव्य असतांना तेथील कात्यायन शाखेपैकीं श्री. गरुड यांच्या येथें श्री. शंकराचार्य पाद्यपूजेस व भिक्षेस गेले होते. नगर, कान्हूर व पारनेर येथील बराच ब्राह्मणसमुदाय श्रीबरोबर प्रसादास गेला होता. त्या वेळीं

इतर शुक्ल यजुर्वेद्यांनीं कात्यायन ब्राह्मणांशीं शरीरसंबंध करून त्यांना आत्मसात् करावें म्हणून श्रींनीं सर्वांस आग्रहानें सांगितलें.

५. जाबाल–नारमद ब्राह्मण

पूर्वेतिहास व वास्तव्यस्थानें—या ब्राह्मणांचे पूर्वज सुमारें एक हजार वर्षांपूर्वी नर्मदेच्या दक्षिण तीरावरून गुजराथच्या बाजूनें विदर्भांत आले व त्यांनीं आपलें स्थान पयोष्णी तीरावर कायम केलें. पयोष्णी व वान या नद्यांचे संगमावर (मेळजाणोरी जि. बुलढाणें) जाबालेश्वराचें एक प्रसिद्ध ठिकाण आहे. यांना नार्मद हें नांव नर्मदा तीरावरून आल्यामुळेंच पडलें आहे. जसें माळव्यांतून आलेले माळवी, कोंकणांतून आलेले कोंकणस्थ, कऱ्हाड प्रांत-तले कऱ्हाडे तसेंच हे नर्मदातीराहून आलेले नार्मद झाले. या प्रांतांत आल्यावर यांनीं जोशी व कुळकर्णीपणाची वृत्ति संपादन केली. नर्मदोत्तरवासी " नार-मदीय " ब्राह्मग व " जाबाल नार्मद " हे भिन्न आहेत.

> नर्मदोत्तर तीरस्थो नारमदेवोश्व संज्ञकः ॥ १ ॥
> षष्ठो वाजसनेयस्य भेदस्य नर्मदोत्तरे ।

नारमदेय ब्राह्मणोत्पत्ति या पुस्तकांत वरील श्लोक आहे. त्यावरून नर्मदोत्तरवासी नारमदीय व जाबाल नार्मद हे एक नाहींत असें ठरतें. त्यांचे एक-मेकांचे आचार, विचार, पोषाख, आडनांवें, कुलदैवतें इत्यादि सर्वच भिन्न प्रकारचीं आहेत.

> जयस्य पुत्रा जाबाला रामेण बलिना पुरा ।
> पूजिता स्थापितास्तेन यज्ञसम्पूर्णहेतवे ॥ १ ॥
> नर्मदाविंध्ययोर्याम्ये स्थापिता भार्गवेण वै ॥
> नार्मदा इति विख्याताः सर्वे लोकेषु विश्रुताः ॥ २॥
>
> भारद्वाज संहितायाम्

वरील उताऱ्यावरून जाबाल नार्मदीय ब्राह्मण हे पयोष्णीतीरावर किती प्राचीन कालपासून आहेत याची कल्पना येते. सांप्रत यांचें वास्तव्य अकोला, उमरावती, बुलढाणें, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, चांदा या जिल्ह्यांत आहे. यांची लोकसंख्या पांच हजार आहे.

आडनांवें—पाठक, कठाळे, देव, करकरे, क्षीरसागर, मुळे, शुक्ल, घोडेराव, समुद्रकार, नवग्रह, निंबाळेकर, जोशी, तिडके, धर्माधिकारी, पाचखेडे, भारद्वाज, पुरोहित, राजवैद्य, घनपाठी, आग्निहोत्री, इत्यादि.

अन्नव्यवहार—या ब्राह्मणांचे आचारविचार महाराष्ट्रीय ब्राह्मणांप्रमाणें असल्यामुळें कांहीं ठिकाणीं ह्यांच्याशीं भोजन-प्रतिभोजन व्यवहार होतो. कोठेंकोठें धान्यफराळ रूढ आहे. दाक्षिणी पंचद्राविड ब्राह्मण व हे ब्राह्मण यांचें सहानुष्ठान होतें. हव्यकव्य प्रसंगीं परस्पर प्रेमानें व मानानें व्यवहार होतात.

वेदशाखा व सूत्र—शुक्ल यजुर्वेद, जाबाल वाजसनेय शाखा पारस्कर आणि कात्यायन गृह्यसूत्राप्रमाणें धर्मकर्में होतात.

गोत्रें—वत्स, शांडिल्य, काश्यप, कृष्णात्र, चंद्रात्र, मौनत, गार्ग्य, भारद्वाज, कपिल, हारित, धारव्य, भार्गव, आंगिरस, इत्यादि प्रसिद्ध गोत्रें आहेत.

धर्मपन्थ व मत—सर्व जाबाल शाखेचे ब्राह्मण आद्य श्रीशांकरमताचे अनुयायी आहेत. स्मार्त व भागवत हे दोन्हीही संप्रदाय आहेत. श्रीशृंगेरी मठाचे निग्रहानुग्रह चालतात. संकेश्वर व करवीर या पीठांना पूज्य मानितात.

देवदैवतें—तुळजापूरची भवानी, माहुरची रेणुका हीं कुलदैवतें व राम, कृष्ण, विठ्ठल, दत्त, व्यंकटेश, शंकर हीं उपास्य दैवतें आहेत.

संस्कार व धर्मकर्में—गर्भादानादि अंत्येष्टीपर्यंत संस्कार शास्त्रोक्त पद्धतीनें वैदिक मंत्रांनीं होतात. श्राद्धपक्ष, श्रावणी, नित्य नैवेद्य–वैश्वदेव, व यथाशक्ति पंचमहायज्ञहि होतात.

पौरोहित्य—पुरोहित बहुधा स्वशाखीयच असतात. इतर शाखांशीं सहानुष्ठान होतें. स्वशाखीय ब्राह्मण नसल्यास यजुर्वेदी माध्यंदिन व तो नसल्यास कोणीहि शुक्ल यजुर्वेदी विद्वान् ब्राह्मण चालतो. जोशीपणाची वृत्ती असलेलीं वतनदार घराणीं ठिकठिकाणीं आहेत.

आहार—सर्व जाबाल शाकाहारी आहेत. कांदा, लसूण निषिद्ध मानण्याची चाल आहे.

व्रतें, वैकल्यें, सण व उत्सव--ध्वजारोपण, पंचांगश्रवण, लिंबभक्षण, रामनवमी, हनुमज्जयंति, चैत्र पूर्णिमेस कुलदेवतेचें पूजन, अक्षतृतीया, नृसिंहजयंति, दशाहार वटसावित्री, आषाढी व कार्तिकी एकादशी, गोकुळअष्टमी, व्यासपूजन, हरितालिका, ऋषिपंचमी, गणेशचतुर्थी, महालक्ष्मीपूजन, प्रौष्टपदी, ललितापंचमी, अविधवानवमी, अपघातांनीं वारलेल्यांचें श्राद्ध, देवीचें नवरात्र, बालाजीचें नवरात्र, माळ, नंदादीप, घट, सप्तशतीचे पाठ, होम, हवन वगैरे, विजयादशमी, कोजागरी, मंत्रजागर, कालाष्टमी, गोवत्सपूजन, धनत्रयोदशी, नरकत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, यमद्वितीया, नागदिपवाळी, चंपाषष्ठी, दत्तजयंति, व्यंकटेशाचीं पारणें, रविव्रत, धनुर्मास, संक्रांत, माघस्नान, भीष्माष्टमी, महाशिवरात्र, हुताशनी धुलीवंदन, इत्यादि. कांहीं ठिकाणीं लग्नकार्यांत गोंधळ घालण्याची चाल आहे.

कर्तीं माणसें--वे. देविदास क्षीरसागर, त्र्यंबक ज्ञानेश्वर नवग्रह, गोविंद आबाजी सुनगांवकर, त्र्यंबक गंगाराम पाठक, शामरावशास्त्री रोहिणीकर, शारमावशास्त्री ब्रह्मपुरीकर, सोनाजी व्यंकटेश जोतिषी, माधव वासुदेव शुक्ल, शंकर गंगाराम जोशी, शंकर जानकीराम माटरगांवकर, नारायण सोनाजी नांदुरेकर, त्र्यंबकराव आकोलकर, विठ्ठल गणेश आंबोडकर, नाना भडजी आंबोडकर, माधव शिवराम समुद्रकार, काशिनाथ गणेश मलकापूरकर, वासुदेवशास्त्री लांडनापुरकर, गोपाळभडजी कोलतकर, वामन अंबादास निंबोळकर, बाळिराम नानाजी बेलखेडकर, हरीभाऊ निरपिंगळाईकर, मुकुंदराव पाठक हायकोर्ट वकील, कठाळे सबडिविजन रामचन्द्र व्याघ्रांबरे, पांडुरंगपंत मुळे, त्र्यंबकराव कुलकर्णी, पाठक डॉक्टर, जोशी डॉक्टर, कर्मवीर पाठक, आबासाहेब कठाळे हायकोर्ट वकील, कोंडभडजी, गोविंद शामराव घोडेराव इत्यादि.

शिक्षण—शेंकडा ८० लोक पौरोहित्य करणारे, वैद्यक, ज्योतिष, याज्ञिक इंग्रजी वगैरे शिकणारे आहेत.

सांपत्तिक स्थिति—साधारण बऱ्या तऱ्हेची. चार पांच जण लक्षाधीश आहेत. शेती व भिक्षुकी करून राहणारा बराच वर्ग आहे. कुलकर्णीपणाचें

वतन असलेलीं, सावकारी व शेती करणारीं घराणीं या समाजांत बरींच आहेत. नवसुशिक्षित नव्या सांपत्तिक क्षेत्रांत वावरत आहेत.

राहाणी—शहरांतून आणि खेड्यांतून सुद्धां नव्या जुन्या तऱ्हेची स्वच्छ अशी आहे. सांपत्तिक स्थिति साधारण असल्यामुळें राहणी काटकसरीची आहे.

रोग, आरोग्य—नैसर्गिक वंशपरंपरागत रोग नाहींत. बालमृत्यूची संख्या बरीच वाढत आहे.

स्वभाव—गरीब, सालस, मनमिळाऊ, प्रगमनशील, आतिथ्यप्रिय असा आहे.

महात्त्वाकांक्षा—महाराष्ट्रांतील षट्कर्माधिकारी सद्ब्राह्मणांशीं शरीर-संबंधानें एकरूप होऊन धर्म व राष्ट्र यांचा उद्धार करण्याची या ब्राह्मणांची महत्त्वाकांक्षा आहे.

प्रकरण ३ रें.

कृष्ण यजुर्वेदी तैत्तिरीय ब्राह्मण

गेल्या दोन प्रकरणांत पंचद्राविडांतील शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांची माहिती दिली. शुक्ल यजुर्वेदांतील माध्यंदिन, कण्व, कात्यायन व जाबालशाखेशीं संबंध असलेल्या पंचद्राविड ब्राह्मण समाजाच्या माहितीनंतर कृष्ण यजुर्वेदीय ब्राह्मणांची माहिती देणें क्रमप्राप्त आहे. कृष्ण यजुर्वेदी तैत्तिरीय शाखांतर्गत हिरण्य-केशी व आपस्तंब शाखेशीं संबंध असलेले पंचद्राविडांतील चित्पावन, देवरुखे, आपस्तंब व तिगुळ इतके ब्राह्मणसमूह आहेत. बरेच चित्पावन व देवरुखे ब्राह्मण ऋग्वेद शाकलशाखीयहि आहेत. तथापि या दोन्ही ब्राह्मणसमूहांतच हिरण्यकेशी शाखाध्यायी ब्राह्मण आहेत. म्हणून त्यांची व आपस्तंब शाखेशीं संबद्ध असलेल्या देशस्थ स्मार्तांची व त्रिगर्त देशांतून आलेल्या तिगुळांची माहिती या प्रकरणांत देतों.

१. चित्पावन ब्राह्मण

कोंकणस्थ म्हणजे चित्पावन अशी हल्लीं चुकीची समजूत झालेली आहे. वास्तविक कोंकणस्थ ब्राह्मणांमध्यें चित्पावन, देवरुखे, क्रमवंत, कऱ्हाडे, जवळ, कुडाळदेसकर, सारस्वत इत्यादि सर्व ब्राह्मण येतात. आख्यायिका अशी आहे कीं, पेशव्यांना चित्पावन शब्दाबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला व त्यांनीं तो शब्द नाहींसा करून 'चित्पावन म्हणजे कोंकणस्थ असा' पर्यायशब्द बनविला. वास्तविक कोंकण हा ज्यांचा मूळचा प्रांत—ही ज्यांची जन्मभूमी—अशा सर्व ब्राह्मणांना कोंकणस्थ असें म्हणावयास पाहिजे. गोमान्तकाकडे सारस्वतांना कोंकणस्थ म्हणण्याची रूढी आहे म्हणून आम्हीं कोंकणस्थ शब्दाच्या जागीं मुद्दाम चित्पावन ब्राह्मण असें म्हटलें आहे. चित्पावन ब्राह्मण हा अग्रणी समजला जातो. या जातीचा इतिहास ब्राह्मणांतील पोटजातींच्या एकीकरणाला बराच बोधप्रद होणार आहे.

पूर्वपीठिका—परशुरामानें पृथ्वी निःक्षत्रिय केली, त्या संहाराबद्दल परशुरामाला यज्ञाचें प्रायश्चित्त घ्यावेंसें वाटलें. पण यज्ञ करण्यास ब्राह्मण मिळेनात, म्हणून त्याला चिंता पडली. इतक्यांत जहाज फुटल्यामुळें कांहीं प्रेतें वाहात येत आहेत असें परशुरामानें सह्याद्रीच्या टेकडीवरून पाहिलें. त्या प्रेतांना त्यांनीं जिवंत करून ब्राह्मणधर्म शिकविला आणि त्या १४ प्रेतांपासून उत्पन्न केलेल्या ब्राह्मणांना समुद्र हटवून जागा करून दिली. ती जागा म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यांतील वाशिष्ठी नदीकांठचा ४० मैलांचा किनारा ही होय. वाशिष्ठी व शिव या दोन नद्यांच्या पुलिनांवर म्हणजे चिपळूण येथें कोंकणस्थांची वसाहत झाली, असें सह्याद्रिखंडांत लिहिलें आहे असें म्हणतात. पण छापील सह्याद्रिखंडांत हीच कथा थोडी निराळ्या रीतीनें सांगितली आहे.

समुद्रतीरीं परशुराम स्नानास गेला असतां कांहीं मनुष्यें अचानक त्याच्या दृष्टीस पडलीं. परशुरामानें त्यांची विचारपूस केली. त्यांनीं 'आम्ही कोळी आहोंत; मासे मारण्याचे कामीं कुशल आहोंत, समुद्रतीरीं राहतों,' अशीं उत्तरें दिलीं. परशुरामानें त्यांच्या जाळ्यांचीं जानवीं करून दिलीं आणि साठ कुळें

पावित केली. चितास्थानीं पवित्र केल्यामुळें 'चित्पावन' असें नांव प्राप्त झालें. असा सह्याद्रिखंडाचा निष्कर्ष आहे. सह्याद्रिखंडाला किती प्रमाण मानावयाचें हा एक मोठा प्रश्नच आहे.

कोणी ह्मणतात- चित्त पोळणारे, चित्तपोळे म्हणजे— चित्तपावन. ह्यालाही आधार सह्याद्रिखंडाचा देतात. परशुरामानें समुद्र हटवून ब्राह्मणांची स्थापना केल्यावर तो गोकर्ण महाबळेश्वराकडे गेला. जातांना त्यानें सांगून ठेविलें होतें कीं, संकट पडल्यास माझें स्मरण करा; ह्मणजे मी त्याचें निवारण करीन. परशुरामानें दिलेलें आश्वासन पडताळून पहावें ह्मणून त्या ब्राह्मणांनीं आक्रोशाला सुरवात केली. त्याबरोबर परशुराम धांवत आला. पण त्याला असें आढळलें कीं, या ब्राह्मणांनीं आपणाला फसविलें. परशुराम क्रोधाविष्ट झाला आणि 'तुह्मी निंद्य व्हाल, दुर्गुणी व्हाल, पतित व्हाल;' इत्यादि प्रकारें शाप देऊन तो निघून गेला. ब्राह्मणांनीं हात जोडून प्रार्थना केल्यावर 'तपश्चर्या केल्यास शुद्ध व्हाल' असेंही अभयवचन परशुरामानें दिलें. सह्याद्रिखंडाचा आधार घेऊन 'चित्त पोळलेले ह्मणजे चित्तपावन' असेंही ह्मणतात.

रा. गुंजीकर हे आपल्या सरस्वतीमंडळांत ह्मणतात कीं, "सह्याद्रिखंड हें फार अलीकडच्या लेखांनीं भरलेलें आहे. पुस्तकाची रचना अस्ताव्यस्त दिसते. रचना एकाच्या हातची असेल असें म्हणवत नाहीं. तथापि सह्याद्रि-खंडाच्या पोथ्या प्रायः देशस्थ ब्राह्मणांच्या संग्रहींच आढतात. यावरून सह्याद्रि-खंडाचा कर्ता कोणी तरी कोंकणस्थ-कऱ्हाडे द्वेष्टा असावा".

रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक म्हणतातः—चित्पावन ब्राह्मणांचे आद्यपूर्वज हे परप्रांतांतून जहाजावर बसून आलें खास! मग ते हिंदु-स्थानच्या किनाऱ्यावरीलच एकाद्या दूरच्या बंदरांत जहाजावर चढले म्हणा, किंवा कोंकणपट्टीच्या पश्चिमेस अरबी समुद्रापलीकडे असलेल्या दक्षिण आफ्रि-केच्या किनाऱ्यावरून चढले म्हणा. हिंदुस्थानांत आल्यावर येथील पूर्वीच्या द्राविड-ब्राह्मण-संघांत त्यांची गणना होऊं लागली.

गुंजीकर म्हणतात—चित्पावन ब्राह्मण ज्या प्रदेशांमध्यें पूर्वीपासून रहात आले आहेत, त्या प्रदेशाला बर्बर कोंकण हें नांव आहे. बर्बर कोंकणच्या थेट

पश्चिमेस समुद्रापलीकडे आफ्रिकाखंडांतील इजिप्त देश आहे. तेथें किनाऱ्यापासून पश्चिमेस ५० कोसावर 'बर्बर' या नांवाचें प्राचीन नगर आहे. त्या प्रदेशाला ' बर्बरी देश ' अशी सामान्य संज्ञा आहे.

केरलाश्च तुलिङ्गाश्च तथा सौराष्ट्रवासिनः
कोंकणाश्च कुडालाश्च वरालाटाश्च बर्बराः ॥

बर्बर देशांतील लोक हिंदुस्तानांतील लोकांपेक्षां गोरे, उंच बांध्याचे, सरळ नाकाचे आणि घाऱ्या डोळयांचे असतात. रावसाहेब मंडलीकांच्या तर्काप्रमाणें चित्पावन हा ' जिप्तवान् ' म्हणजे ' इजिप्तवाला ' ह्याचा अपभ्रंश आणि ' बर्बर कोंकण ' म्हणजे कोंकणच्या ज्या प्रदेशांत वर्बर देशचे हे लोक येऊन राहिले तो प्रदेश; असा तर्क संभवतो. परशुरामाचे वेळेस हे लोक आले आणि ते तारवांतून आले असा अंमळ उदार मनानें अर्थ घेतला म्हणजे रावसाहेबांचा तर्क व सह्याद्रिखंड यांचा संबंध जुळतो.

मि. डी. आर. भांडारकर हे चित्पावनांचीं नांवें व प्यालेस्ताइन प्रांतांतील स्थळांचीं नांवें यांतील सादृश्यावरून त्या प्रांतांशीं चित्पावनांचा संबंध जोडतात. चित्पावनांबद्दल अशी एक अख्यायिका आहे कीं, हे मूळचे देशस्थ ब्राह्मण. आंब्याची जोगाई हें त्यांचें कुलदेवत. यास मोमिनाबाद नांव आहे. या मोमिनाबादेहून परशुरामानें १४ पुरुष व १४ स्त्रिया कोंकणांत आणिल्या व तेथें त्यांची वसाहत करून दिली. आमचें असें मत आहे कीं, " जोगाईच्या आंब्याकडेच चित्पावनांचे मूलस्थान असावें. उत्पातप्रिय क्षत्रियांचा मोड करण्याचे कामीं परशुरामाचे जे सहकारी होते त्यांना स्वस्थपणें राहण्याकरितां परशुरामानें कोंकणांत नवीन वसाहत करून दिली." कुडाळदेशकर इतिहाससंशोधक रा० ब० बांबर्डेकर म्हणतात कीं, चित्पावन हे मूळचे तुर्की ब्राह्मण. सोरटी सोमनाथ येथें अद्याप तुर्की ब्राह्मण आढळतात. तुर्कस्थान, अरबस्थान, आशियामायनर या भागांत पूर्वीं चातुवर्ण्य होतें व आर्यसंस्कृतीचें साम्राज्य मुसलमानी उत्पातापूर्वीं त्या प्रांतांत होतें, अर्थात् आज ज्याला तुर्कस्थान म्हणतात त्या प्रांतांतील हिंदुधर्मीय चातुवर्ण्यवान् ब्राह्मण जे इकडे जहाजांत बसून आले ते चित्पावन ब्राह्मण."

'शतप्रश्नकल्पलता' या ग्रंथाचा कर्ता माधव म्हणतो कीं "सह्याद्रीच्या पश्चिमेस १४ ब्राह्मण वेदवेदांगज्ञ असे यज्ञकर्में करीत असत. दैवयोगानें अकस्मात् समुद्रवासी बर्बरांनीं त्यांना नेलें, हे सर्व ब्राह्मण म्लेंच्छसंगतीनें पतित झाले. कालेंकरून परशुरामानें त्यांना प्रायश्चित्त देऊन शुद्ध केलें. १४ गोत्रें व साठ उपनांवें दिलीं. शाकल आणि तैत्तिरीय अशा शाखांचें अध्ययन करण्यास सांगितलें. परशुरामानें त्यांच्या चित्ताची शुद्धि केली म्हणून हें चित्तपावन ब्राह्मण;" हा माधव सह्याद्रिखंडांतील आख्यायिकेचें खंडन करतो. याचा काल राजारामाची कारकीर्द हा असावा. राजारामछत्रपतींच्या कारकीर्दींत चित्पावन ब्राह्मण नुकतेच देशावर येऊं लागले होते, आणि राज्यकारभारामध्यें शिरण्याची धडपड करीत होते त्या वेळचा हा कुत्सित लेखक माधव असावा, असें गुंजीकर म्हणतात.

श्रीयुत न. चिं. केळकर टिळकचरित्रांत म्हणतात कीं, कोंकणस्थ ब्राह्मण हे उत्तरेकडून खालीं कोंकणपट्टीनें उतरत उतरत आले असावेत किंवा समुद्रापलीकडूनही आले असण्याचा संभव आहे. एन्थोवेन आपल्या 'Tribes and Castes' या ग्रंथांत लिहितो कीं, १७१५ पर्यंत कोंकणस्थ हा शब्द प्रचारांत नव्हता. बाळाजी विश्वनाथापासून चित्पावन शब्द मागें पडून कोंकणस्थ हा शब्द पुढें आला. पेशव्यांचा उदय होण्यापूर्वी चित्पावनांची स्थिति अगदीं शोचनीय होती. ते प्रामुख्यानें हरकारूचें म्हणजे गुप्तहेराचें काम करीत असत. बरेच दिवसपर्यंत कोंकणस्थांच्या पंक्तीला देशस्थ ब्राह्मण बसत नसत. कोणत्याही धर्मकर्माला देशस्थ ब्राह्मण चित्पावनाला ब्राह्मण ह्मणून भोजनास सांगत नसत. चित्पावनांच्या मूळ पीठिकेबद्दल आतांपर्यंत बरींच मतें वर निर्दिष्ट केलेलीं आहेत. आतां महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्रीयुत विसुभाऊ (विश्वबंधु) राजवाडे यांचें मत नमूद करितों.

'परशुराम किंवा पर्शुराम यालाच भार्गवराम असेंही म्हणतात. परशु म्हणजे फरश अथवा कुऱ्हाड. पर्शु हें पुरातनकालीन एका आयुधजीविसंघाचें नांव आहे. पाणिनीनें ५।३।११७ याचा उल्लेख केला आहे. असुर लोकांचे इतिहासांत 'पर्सुअ' या नांवानें पर्शूचा उल्लेख आढळतो. हे पर्शु अर्वाचीन

पारसीकांचे पूर्वज होत. पर्शुराम पर्शु होता. म्हणजे प्राचीन पारसीकांचे व ग्रीसमधील प्राचीन ग्रेशियन् लोकांचे पूर्वज यांचे अन्योन्य संबंध असावेत असें म्हणावें लागतें. पर्शुमधील जो पर्शुराम त्यानें शालिवाहन शकापूर्वी १२२५ च्या सुमारास १४ चित्पावनांची कोंकणांत ऊर्फ आपरान्तांत स्थापना केली. पुरातनकालीं पर्शु, भृगु या प्रांतांत म्हणजे आशियामायनरमध्यें चातुवर्ण्य होतें. पर्शूच्या जनपदांतील पराक्रमी पर्शुरामानें १४ ब्राह्मण कोंकणांत आणिले असावे. चित्पावन ब्राह्मण इजिप्त, पालेस्ताईन प्रांतांतून आलेले कोणी तरी लोक असावेत व ते प्राचीनकाळीं एकवर्णी असावे असा तर्क कोणी करतात. या तर्कांत अशी एक असंभाव्यता होते कीं, हिंदुस्थानांतील इतर ब्राह्मणांनीं या मूळच्या यहुदी किंवा मिस्ली एकवर्णी म्लेंच्छांना ब्राह्मण म्हणून ब्राह्मण्यांत समावून घेतलें ! **गोत्रप्रवरांना डोळ्यांत तेल घालून जपणारे भारतीय ब्राह्मण म्लेंच्छांना ब्राह्मण करून घेतील किंवा मानतील हें असंभाव्य आहे.** चित्पावन ब्राह्मण पश्चिमेकडून आलेले असले तर ते पर्शु लोकांच्या देशाकडूनच आले असले पाहिजेत. पर्शुकालांत पुरातनकालीं चातुर्वण्य होतें. पर्शूच्या शेजारीं असूर लोकांचें मोठें साम्राज्य त्या कालीं पसरलें होतें. मुसलमानांच्या जुलमानें पारशी जसे हिंदुस्थानांत आले तसे असुरांच्या जुलमामुळें चित्पावन ब्राह्मण कोंकण किनाऱ्याच्या आश्रयाला आले असण्याचा संभव आहे. कारण मुसलमानांप्रमाणें असुरहि पुष्कळ क्रूर होते.

चित्पावन हा चित्तपावन शब्दाचा अपभ्रंश. चित्तपावन हा चित्यपावन शब्दाचा अपभ्रंश. चितिसंबंधक तें चित्य. फक्त वांवभर जमीन नांगरून नाना प्रकारच्या विटांनीं पक्ष्यांच्या आकारासारखें जें एक स्थान करावयाचें त्याचें नांव चिति. अग्निचयनांत अशा पांच चित्या लागतात. चितींतला अग्नि तो चित्याग्नि किंवा नुसता चित्य. या चित्यग्नीच्या उपासनेनें म्हणजे अग्निचयनानें पावन झालेले जे लोक ते चित्यपावन होत. मुख्य मुद्दा इतका कीं, पर्शुरामानें आणिलेलें १४ ब्राह्मण हे वैदिक धर्माप्रमाणें वागणारे व यज्ञयागादि करणारे होते. चिपळुणापासून ३ मैलांवर ‘ पर्शुराम नांवाचा पर्वत

आहे, तेथें भार्गवरामाचें देवालय आहे. चित्पावन जे कोंकणांत उतरले ते दाभोळच्या खाडींतून पर्शुराम पर्वतावर येऊन राहिले. या पर्वताच्या पायथ्याशीं आसपास वस्ती करून राहणाऱ्या चित्यपावन ब्राह्मणांवरून त्या भूमीला 'चित्यपावन भूमि' अशी संज्ञा पडली. चिपळूण व चित्यपावन यांचा कोणी संबंध जोडतात, पण तो चुकीचा आहे. पुरातन चिपळूण किंवा चिपोळण वासिष्ठी किंवा शिव या दोन नद्यांच्या संगमावर आहे. चित्पावन ब्राह्मणांनी या स्थानाला 'चिपळूण' असें नांव दिलें असावें. सुमारें तीन हजार अठ्याऐंशीं वर्षांपूर्वी चित्पावन ब्राह्मण कोंकणांत आले ते अग्निचयन करणारे होते; म्हणजे गृहस्थ होते. अग्निहोत्र्यांना यजमानीण प्रायः अवश्य लागते. चित्पावनांचें पुरुष दैवत 'पर्शुराम' व स्त्रीदैवत 'जोगेश्वरी' होय. चित्पावन पुरुष जसे परशुरामचे तशा मूळ चित्पावन स्त्रिया जोगाईच्या आंब्याच्या असाव्यात. एवंच, परशुरामाचे १४ ब्राम्हण व आंबाईच्या १४ मुली यांची जी संतती ती सध्यांचे चित्पावन ब्राह्मण होत. यावर भा. इतिहास सं. मंडळाचे अध्यक्ष श्री. का. ना. साने (कल्याण) म्हणतातः—"जोगाईच्या आंब्याजवळच्या १४ गोत्रांच्या १४ ब्राह्मणांकरितां स्त्रिया आणिल्या. त्यांनीं जोगेश्वरी ही आमची कुळस्वामीनी असा आग्रह धरिला." ह्या विधानास रा. राजवाडे यांनीं आधार दिलेला नाहीं. निजामच्या हद्दींतील आंब्याची जोगेश्वरी ही कोंकणासारख्या दूर प्रदेशांतील चित्पावनांची कुलस्वामिनी कशी झाली हें एक गूढच आहे. तें गूढ रा. राजवाडे यांच्या अनुमानानें समाधानकारक उलगडत नाहीं. तथापि वस्तुस्थिति तशी आहे खरी. अकोल्याचे रा. केळकर वकील हे भाषाशास्त्राच्या अभ्यासानें चित्पावनाची मूळ पीठिका उलगडेल असें लिहितात व गो. कृ. मोडक पुणें हे पुढील प्रमाणें म्हणतात.

'कोंकणस्थ ब्राह्मणांस चित्पावन ही संज्ञा लावितात. तिच्या मुळाचा थोडासा विचार येथें करतों. परशुरामानें बाणानें समुद्र हटविला वगैरे अलंकारिक पौराणिक वर्णनावरून अनुमित होणारी वस्तुस्थिति पुढील प्रकारची होय. सह्याद्री पर्वतास लागून असलेलें समुद्राचें पाणी परशुरामानें भर टाकून मागें हटविलें, व सुमारें २० कोस रुंदीची जमिनीची पट्टी तयार केली. तीवर

वसाहत करण्यास त्यानें ब्राह्मण बरोबर नेले. हेच चित्पावन किंवा कोंकणस्थ ब्राह्मण होत. यांनीं तेथें काय केलें ? जमीन साफसूफ करून वसतिक्षम केली. या कामांत फोडणें, खणणें, सपाट करणें वगैरे क्रियाचा अंतर्भाव होतो.

डुकर आपल्या तोंडानें खणतें, त्याच्या तोंडास पोत्र म्हणतात. बायका कपड्यानें शेणखळा पसरून जमीन शुद्ध करतात, या फडक्यास पोतेरें म्हणतात. पोत्र व पोतेरें हे दोनहि शद्ब पू-धातूपासून निघालेले आहेत. तेव्हां खणणें, स्वच्छ करणें वगैरे क्रिया पू-धातूचा अर्थ ठरतो. त्यानें दर्शित क्रिया करणारा तो पावन (पुनाति सः), जसें नंदयति सः नन्दनः, मथ्नाति सः मथनः. हा पू-चा अर्थ घेऊन वसाहत करणारा तो पृथ्वीचा पावन असें ठरतें. आतां परशुरामास अशा पावनांची म्हणजे क्षेत्रनिवासक्षम करणारांची जरूर लागली हें उघड आहे. या लोकांना कोणती संज्ञा प्राप्त होणार ? अशा वसाहतवाल्यांना भूमिपावन किंवा एतादृश दुसरी एखादी संज्ञा लावण्यांत येणार. त्यांतल्या त्यांत क्षिति-पावन हा शब्द विशेष समर्पक दिसतो. तो कसा ? भूमि साफ करणें जरूर खरें, पण ती साफ करून काय करावयाचें ? ती वसाहतीस उचित बनवावयाची. अर्थात ह्या ठिकाणीं माणसाचे वस्तीस योग्य होणें हा पृथ्वीचा धर्म लक्ष्य आहे. तेव्हां पृथ्वीच्या अनेक पर्यायांपैकीं जो पर्याय प्रस्तुतार्थाचे निर्वाहास योग्य असेल त्याचीच योजना येथें प्रशस्त होय. यमक्षय म्हणजे यमाचें वसतिस्थान इत्यादि शब्दांत क्षि-धातूचा अर्थ वसणें असा, व क्षितीचा अर्थ जिच्यावर वसतात ती असा आहे. अर्थात क्षिति हा शब्द येथें आपणांस योग्य दिसतो, तोच पावन याशीं समस्त होऊन क्षिति-पावन ही संज्ञा बनली आहे. हिचा अर्थ जमीन साफसूफ करून तिला क्षिति म्हणजे राहाण्यास उचित प्रदेश बनविणारा असा ठरतो. सारांश, परशुरामाच्या साथीदार ब्राह्मणांस लावण्यास क्षितिपावन ही संज्ञा अन्वर्थक दिसते. रचनादृष्ट्या हिचा संबंध चित्पावन ह्या शब्दाशीं जुळतो काय ? क्षेत्रसिंह याचें रूपांतर छेतिंसग (चेतिंसग); लक्ष्मण याचें लछमन; या धर्तीवर क्षचा छ बनून क्षितीचें रूपांतर छिति असें झालें. पुढें छोटिका-छुटिका-चुटकी या धर्तीवर छितीचे जागीं चिति आलें. रीति-रीत, लहरी-लहर, या धर्तीवर चितीचें चित्. ज्ञानप्रकाश याचे उच्चारांत न चा अ गळतो, तसा चितचा

अ गळून चित् बनला. हा चित्पावनशीं समस्त होऊन चित्पावन बनला. तात्पर्य, क्षितिपावन म्हणजेच चित्पावन.

नवीन कार्यक्षेत्रांत प्रथम उडी घेणारा, अग्रेसर इत्यादि लाक्षणिक अर्थ (क्षितिपावन) नवीन वसाहत करणाऱ्यांच्या अंगभूत आहेच. परशुरामाच्या बरोबरच्या वसाहतवाल्यांचे वंशज असल्यानें या परंपरेस अनुसरून, कोंकणस्थ लोकांनींहि आपल्या अंगच्या धाडसानें आपला हा धर्म अनेकवार सिद्ध केला आहे. सारांश, चित्पावन हा शब्द, पौराणिक कथेस धरून कोंकणस्थांस लावण्यांत येणारा, त्यांच्या ऐतिहासिक व वर्तमान काळांतील कर्तबगारीस अनुसरूनच आहे. या विवेचनावरून चित्पावन ही संज्ञा निंदाव्यंजक नसून सर्वथा प्रशस्तिपर आहे, हें स्पष्ट सिद्ध होतें.

वेदशाखा—चित्पावन ब्राह्मण हे कृष्णयजुर्वेदी तैत्तिरीय शाखेचेच असावेत व पुढें कांहीं कारणामुळें चित्पावन ऋग्वेदी बनले असें एक मत आहे. सांप्रत ऋग्वेद शाकलशाखा आणि कृष्णयजुर्वेद तैत्तिरीयशाखा ह्याच कांय त्या चित्पावनांमध्यें आढळतात. आश्वलायन व सत्याषाढ वा हिरण्यकेशी सूत्रानुसार ह्यांचीं धर्मकर्में होतात.

गोत्रें व आडनांवें-काश्यप—लेले, गानू, जोग, लवाटे, गोखले. **शांडिल्य**—सोमण, गांगल, भाटे, गणपुले, दामले, जोशी, परचुरे, **वासिष्ठ**—साठे, बोडस, ओक, बापट, बागुल, धारू, गोगटे, भामे, पोंगशे, विंझे, साठ्ये, गोवंडये, दिवेकर. **विष्णुवर्धन**—किडमिडे, नेने, परांजप्ये, मेहेंदळे. **कौंडिण्य**—पटवर्धन, फणशे. **नितुंदन**—वैशंपायन, भाडभोके, **भारद्वाज**—आचवल, टेणे, दर्वे, गांधारे, घांघुरडे, रानडये. **गार्ग्य**—कर्वे, गाडगीळ, लोंढे, माटे, दावके. **कपि**—लिमये, खांबेटे, जाईल, माईल. **जामदग्नि**—पेंडसे, कुंटे. **वत्स**—मालशे, बाभ्रव्य, बाळ, वेहरे. **कौशिक**—गद्रे, बाम, भाव्ये, वाड, आपटे. **अत्रि**—चितळे, आठवले, भाडभोळे.

एकूण गोत्रें १४ व उपनांवें साठ आहेत. पैकीं गोत्रें कायम असून आडनांवें मात्र हल्लीं पुष्कळच झालेलीं आहेत. त्याचा इतिहास इतिहास-संशोधक राजवाडे पुढीलप्रमाणें देतात.

" चित्पावनांच्या लोकसंख्येच्या वाढींत आजपर्यंत सांपडलेल्या साधनांवरून पांच टप्पे आढळतात. प्रथम फक्त चौदा गोत्रें ऊर्फ आडनांवें ऊर्फ भिन्न घराणीं होतीं; हा पहिला टप्पा. त्या चौदा आडनांवांचीं नंतर साठ आडनांवें झालीं; हा दुसरा टप्पा. साठांचीं पुढें एकशेंतीस आडनांवें झालेलीं दिसतात; हा तिसरा टप्पा. एकशेंतिसांचीं कालांतरानें अडीचशें आडनांवें झालीं; हा चौथा टप्पा आणि अडीचशेंचीं सध्यां साडेतीनशें आडनांवें झालेलीं प्रचलित आहेत; हा पांचवा टप्पा. तिसऱ्या टप्प्यापर्यंत प्रायः बहुतेक आडनांवें ऋषिनामांवरून पडलेलीं आढळतात. ह्या तिसऱ्या टप्प्यानंतर माल नांवावरून व धंद्यावरून आडनांवें निर्माण झालीं. म्हणजे तिसरा टप्पा पोंहोंचेतोंपर्यंत यद्यपि निरनिराळ्या आसपासच्या गांवांत चित्पावन जाऊन निराळीं घरें करून राहिले असले तथापि त्या त्या गांवचें किंवा धंद्याचें पूर्ण तादात्म्य झालेलें आढळत नाहीं. एकशें तीस आडनांवें प्रचलीत होत तोंपर्यंत यज्ञयागादि वैदिक कर्म करण्यांतच हे ब्राह्मण गुंतले होते. नंतर आस्ते आस्ते यज्ञयाग हळुहळू सुटून जोसपण, कुळकरण, महाजनकी, खोती, हुद्देदारी, देशपांडेपण, इत्यादि व्यवहार ह्या लोकांनीं सोईप्रमाणें व लभ्यांशाप्रमाणें उचललेले दिसतात. " (भा० इ० सं० मं० ग्रं०)

देवदैवतें—चित्पावनांचा कुलस्वामी परशुराम व दुसरें कुलदैवत जोगेश्वरी असें श्रीयुत राजवाडे म्हणतात. परंतु कल्याणचे कै. साने यांनीं परशुराम, चिपळूण, खेड, दाभोळ, गुहागर, रत्नागिरी, पुणें या ७ गांवांतील सुमारें २८३ घराण्यांची यादी पुणें येथील भारत इतिहास-मंडळाच्या संग्रहीं दिलेली आहे. त्यावरून २८० घरण्यांचे कुलस्वामी वेळणेश्वर, वाडेश्वर, काळेश्वर, लक्ष्मीनृसिंह, केशवराज, हरेश्वर, इत्यादि निरनिराळे आहेत. पुष्कळ चित्पावन हल्लीं कोंकणांतील देव विसरलेले आहेत. देवदिवाळीच्या दिवशीं जरी ते रसवड्यांचा नैवेद्य कोंकणांतल्या देवांना दाखवितात, तथापि त्या दैवतांचीं नांवें माहीत असलेले चित्पावन देशावर फारच थोडे आहेत. देशांवरील भुवनेश्वरी, महालक्ष्मी, व्यंकटेश इत्यादि दैवतें पुष्कळांचीं कुलदैवतें झालेलीं आहेत. आम्ही यांईंतील १५० चित्पावन घराण्यांच्या कुलदेवतांची माहिती मिळाविली, त्यांत प्रामुख्यानें

वाडेश्वर, सिद्धेश्वर, जोगेश्वरी, जोगाई, काळेश्वर, वेळणेश्वर, हरिहरेश्वर, नारायण, अंबाबाई, (कोल्हापूर) लक्ष्मी, भिरेश्वर, गणपति, केशव, यवतेश्वर, श्रीराम, नृसिंह, भवानीशंकर, कृष्णाबाई, रवळनाथ, बनशंकर इत्यादि कुलदैवतें आहेत. पुष्कळ चित्पावनांचीं उपास्यदैवतें वासुदेव, विठ्ठल, दत्तात्रय, कृष्ण, मारुती, इत्यादि आहेत. देशावर आलेल्या चित्पावनांच्या घरांत देशावरील देवतांनीं प्रवेश केला असल्यास त्यांत नवल तें काय ? श्रौतस्मार्त देवतांचा प्रतिनिधि म्हणून पंचायतन पूजा बहुतेक चित्पावनांच्या घरीं आहे.

लोकसंख्या—१९०१ सालीं ५८१५० पुरुष व ५५४४५ बायका एकूण १,१३,६०५ लोकसंख्या होती. १९११ सालीं ती १,१०,७१२ झाली आणि १९२१ सालीं १,०९,१०७ लोकसंख्या झाली. यावरून चित्पावन जात ही कशी घटत आहे ह्याचें स्पष्ट प्रत्यंतर येतें.

धर्मपंथ व संप्रदाय--बहुतेक चित्पावन ब्राह्मण अद्वैत मतानुयायी स्मार्तसंप्रदायी आहेत; क्वचित् एकाद दुसराच माध्व-मतानुयायी आढळेल! संकेश्वर व करवीरपीठाच्या शंकराचार्यांचे निग्रहानुग्रह चालतात. विशिष्ट शास्त्रार्थ क्षेत्रस्थ शास्त्री मंडळींच्या विचारानें होत असे. या जातींमध्यें उपाध्याय प्रायः स्वकीयच असतात. ही जात इतर ब्राह्मणांचें व हिंदूंचें पौरोहित्य करते.

स्वभाव—चित्पावन ब्राह्मणांच्या अंगीं गरिबीमुळें किंवा इतर कांहीं कारणामुळें उद्योगशीलता हा मोठा गुण आहे. घर, दार, बायकापोरें सोडून हे लोक पाहिजे तेथें जाण्याला तत्पर असतात. अल्पप्राप्तीमुळें टापटिपीनें संसार करण्याची हातोटी ह्या जातींत आहे. विद्येच्या कामीं हे सर्वांत पुढारलेले आहेत. आर्जवशक्तीच्या योगानें चित्पावन लोक पाहिजे तें दुष्कर कार्य करून दाखवितात. मानापमान बाजूला ठेवणें व आपलें कार्य साधण्याकरितां पाहिजे तें करण्यास तयार असणें हें गुण ह्या जातींत आहेत. चित्पावनांत कांहीं लोक अतिशय स्वार्थी, मनानें क्षुद्र व आपल्यापुरतें पाहणारे असेही आहेत. अल्पस्वल्प स्वार्थासाठीं किंवा प्रतिष्ठेसाठीं राज्यें किंवा कार्यें धुळीस मिळविण्याची यांची तयारी असते. राजद्रोही निमकहरामपणा करणारी मंडळी कोंकणस्थांत उत्पन्न झालेली आहेत. रा. गुंजीकर म्हणतात कीं " चित्पावनामध्यें जसे राजद्रोही

झाले तसे राजनिष्ठही झाले. निमकहराम झालें तसे निमकहलालही झाले. कार्यनाशक जसें झाले तसें कार्यसाधकही झाले. एवंच, चांगले व वाईट **उत्कट गुण** या जातींत आढळतात. **उत्कटता हा या जातीचा विशेष होय.** चित्पावन हे इतराप्रमाणें ज्ञातिहित साधण्याचे कामीं तत्पर असतात. चित्पावन हा बिनहिशेबी नाहीं, भोळसट नाहीं, मनाचा मोठा उदारहि नाहीं, पण एकदा एक कार्य मनावर घेतलें कीं त्याकरितां सर्वस्वांची होळी करण्यासही तो तयार होतो. चित्पावनाची स्वार्थाबद्दल जशी ख्याति आहे तशी त्यागाबद्दल **अलीकडे प्रख्याति** आहे. राष्ट्रकार्यांत स्वार्थाचा होम करणें, सर्वस्वावर लाथ मारणें, अंगीकृत कार्यार्थ स्वतःला विसरणें हेहि सद्‌गुण चित्पावनांत चमकूं लागले आहेत. स्वाभिमानी, धोरणी, बुद्धिमान, हिशेबी, कर्ती, राजकारणी, दूरदर्शी, व्यवहारदक्ष अशी ही जात आहे. भांडखोरपणा, फाटाफूट, हें दुर्गुण तर पांचवीलाच पुजलेले आहेत. केसरीकर्ते श्री. नरसोपंत केळकर यांनीं या जातीचें स्वभावचित्र थोडक्यांत असें रेखाटलें आहे. “ स्वावलंबी, मेहनती, कोठेंही पुढें घुसणारे, दीर्घसूचना मनांत असणारे पण कांहीं अंशीं आपल्यापुरतें पहाणारे, बुद्धिमान् , पण संकुचित दिलाचे असे हे आहेत. (टिळक चरित्र).

कुलधर्म व कुलाचार—इतर कोणत्याहि ब्राह्मण जातींत विशेष न आढळणारा असा एक बोडणाचा कुलाचार चित्पावनांत आढळतो. बहुतेक घराण्यांत बोडणाची चाल आहे. त्याची माहिती राजवाड्यांनीं दिली आहे ती अशी—“ नित्य जे वार्षिक कुलाचार व नैमित्तिक जे विवाहादि संस्कार करतात त्यांच्या प्रारंभीं किंवा अंतीं बोडण भरण्याची चाल कोकणस्थांत आहे. बोडण भरणें म्हणजे कोणत्याही शुभ धातूची देवीची प्रतिमा अथवा प्रतीक घेऊन तिला अन्नाचे प्रायः कणकेचे अलंकार घालून, अन्नाचा प्रायः दहीदुधाचा अभिषेक करून, अन्नाचा म्हणजे पुरणाचा नैवेद्य दाखविणें. नैवेद्य दाखविल्यावर, मूर्तीसुद्धां सर्व संभार सुवासिनी एकत्र कालवितात आणि शेवटीं उत्तरपूजेकरितां प्रतिमा काढून घेऊन, नंतर त्या कालविलेल्या संभारांतून भोजनास आलेल्या सर्व कुलस्त्रियास, कुलपुरुषांस व कुलबालकांस प्रसाद वाटतात. असा हा बोडणाचा विधि आहे. हा विधि श्रुतिस्मृतिशास्त्रोक्त नाहीं, तंत्रोक्त आहे. गोपीनाथ

दिक्षीत ओक यांनीं शके १६८७ त समाप्त केलेल्या संस्काररत्नमालानामक ग्रंथांत, हा बोडणाचा कुलाचार सांगितला आहे. सैंपाक करावा, पांच अप्रसूत स्त्रिया, पांच कोंवारणीसह बोलवाव्या, जोगेश्वरीची प्रतिमा घ्यावी, मोठी परात घ्यावी, तींत मध, तूप, साखर, दही, दूध व नैवेद्य घालावा व त्या स्त्रिया व कोंवारणी ह्यांच्याकडून तो संभार कालवावा. यानें विघ्न निवारण होतें असा समज आहे व बोडणाप्रमाणेंच इतर ब्राह्मणांत न आढळणारें असें महालक्ष्मीचें व्रत आश्विन शु० ८ स करतात. तें लग्न झाल्यानंतर सुवासिनींनीं ५ वर्षेपर्यंत करावयाचें असतें. मंगलागौरीप्रमाणेंच पुष्कळ विवाहित मुली जमवून देवीची पूजा करावयाची असते. रेशमाचा तातू करण्याचा एक प्रकार असतो. रात्रीं तांदळाच्या उकडीचा मुखवटा करून गौरीची आरास करतात व तिच्यापुढें मातीच्या किंवा धातूच्या घागरी फुंकून रात्रभर जागरण करून पहाटें उत्तरपूजा करून गौरीचें विसर्जन करतात. या दोहोंशिवाय इतरत्र न आढळणारा व सांगण्यासारखा विशेष आचार चित्पावनांमध्यें नाहीं.

उत्सव, सण व व्रतें — हीं इतर ब्राम्हणांप्रमाणें आहेत. मात्र मार्गशीर्ष शु. १ स देवाची दिवाळी करतात, त्या दिवशीं वड्यांचा नैवेद्य कोंकणच्या देवतांना दाखविण्याचा प्रघात आहे. देवदिवाळी कांहीं कारणानें अंतरली तर गोंवर, देवी, डोळे येणें, ह्यांचा उपद्रव मुलांना होत असतो अशी समजूत आहे. बोडण हें पुष्कळ घरांतून वार्षिक व्हावें लागतें. कांहीं ठिकाणीं नवसाचें असतें; क्वचित् कार्यप्रस्थानंतर बोडण भरण्याची चाल आहे. हा कुलाचार अंतरला तर अनिष्ट होतें अशी समजूत आहे. चित्पावन ब्राह्मणांत हजारांत एकादा अग्निहोत्री अद्याप आढळतो. शंभरांत एकादा स्मार्ताग्नि ठेवणाराही आढळतो. पार्थिवपूजा, रुद्राभिषेक नित्यएकादशनी हीं पुष्कळ घराण्यांत असतात. अनंतव्रत हें चित्पावनांत फार थोड्यांच्या घरीं आहे व तें कऱ्हाड्यांपासून घेतलें असावें, असें म्हणतात.

संस्कार—गर्भाधानापासून अंत्येष्टीपर्यंत सर्व संस्कार शास्त्रोक्त पद्धतीनें होतात. पुरोहित स्वशाखेचा व चित्पावनच प्रायः असतो. तदभावीं कोणताही जाणता ब्राम्हण चालतो.

शिक्षण—वैदिक व लौकिक अशा दोन्ही तऱ्हेचें शिक्षण चित्पावनांत आहे. जुन्या नव्या तऱ्हेच्या विद्वत्तेच्या, कर्तृत्वाच्या, समाज सुधारणेच्या, सर्व क्षेत्रांत चित्पावनाची बुद्धी अनिरुद्ध चालते; बुद्धिमत्ता, वर्णसौष्ठव, स्पष्ट वर्णोच्चार या गुणांनीं शिक्षणाच्या कोणत्याही क्षेत्रांत चित्पावन पुढें येतो. लोकसंख्येच्या मानानें चित्पावन शिक्षणांत पुढारलेले आहेत असें म्हणतात, परंतु खानेसुमारीचे वृत्तान्त चाळले तर ब्राह्मणेतर जाती आणि मुसलमान यांच्यामध्यें साक्षरतेची झपाट्यानें वाढ होत आहे, असें दिसेल. स्त्रीशिक्षणांत चित्पावन पुढारलेले असें म्हणतात. पण तोही भ्रम सारस्वतांचे आंकडे पाहिले म्हणजे दूर होतो. अगदीं निरक्षर म्हणजे (Illiterate) असा स्त्रीवर्ग व पुरुषवर्ग बराचसा चित्पावनांत आहे असें खानेसुमारीचे आंकडे बोलतात.

कार्यकर्ते—चित्पावनांत साधुसंत व महंत फार थोडे झालेले आहेत; परंतु, विद्या, व्यवहार, व्यापार, शोध, शास्त्र, कला, तत्वज्ञान, इतिहास, सुधारणा, राजकारण, धर्मकारण अशा सर्व क्षेत्रांत चित्पावन पुरुष व स्त्रिया इतरांच्या मानानें बऱ्याच कर्त्या झालेल्या आहेत. त्यांची स्मृति ताजी असल्यामुळें त्यांच्या यादीच्या भरीस पडत नाहीं.

विवाह—बहुतेक विवाह चित्पावनांतच होतात. कऱ्हाडे, देशस्थ, देवरुखे यांच्याशीं विवाह केला तरी कोणी अडथळा करीत नाहीं. असें मिश्र विवाह पंचद्राविडांतील सर्व तुल्यबल ब्राह्मण जातींशीं करण्याकडे अधिकाधिक प्रवृत्ति होत आहे. वधुवरांच्या वयोमर्यादा बेजाबता वाढत आहेत. त्याचे दुष्परिणाम दिसूं लागले आहेत.

विधवा—इतर ब्राह्मणाप्रमाणें विधवाविवाह फारसा संमत नाहीं. पण त्याबद्दल मोठासा विरोधहि नाहीं. विधवाविवाह पांचपन्नास झालेले आहेत. विधवाविवाहितावर अलीकडे कोणी बहिष्कार घालीत नाहीं. विधवावपनाचा विकल्प रूढ होऊं लागला आहे.

तीर्थें व पवित्र स्थानें—सप्त पुऱ्या, चार धाम, बारा ज्योतिर्लिंगें, गंगा, यमुना इत्यादि नद्या हीं पवित्र समजून यात्रा करण्यांत येतात.

राहणी—स्वच्छ, साधी, काटकसरीची अशी आहे; पण देशावरील गरीब चित्पावन देशस्थांप्रमाणें वोंगळ राहूं लागले आहेत. कोंकणांतील चित्पावनांत जी टापटीप दिसते किंवा मुंबईच्या चित्पावनांत जी आढळते ती देशावर आढळत नाहीं. घरें स्वच्छ, झुळझुळीत, मुलेंबाळें व्यवस्थित, कपडेलत्ते नीटनीटके ठेवण्याकडे प्रवृत्ति आहे.

सांपत्तिक स्थिति—चित्पानांतील कांहीं संस्थानिक, जहागीरदार, बडे सरकारी नोकर सोडले तर चित्पावन समाज ह्या सांपत्तिक दृष्ट्या अगदीं दरिद्री आहे. पुष्कळ चित्पावन भुकेबंगाल आहेत. मधुकरीचे फडकें घेऊन विद्याभ्यास करण्याचाच प्रसंग चित्पावन पोरावर असतो. जमीन नाहीं, वतन नाहीं, घर नाहीं, आणि जवळ कांहीं माया नाहीं, असे किती तरी चित्पावन आढळतील. कांहीं जवळ नसलेला चित्पावनांतील एकादा कर्ता पुरुष जेव्हां निवर्ततो तेव्हां बायकापोरांची अन्नान्नदशा होते. चित्पावन हे उधळे नाहींत, चित्पानांचीं पोरें व बाया चहाकॉफीच्या दुकानांतून व खाणावळींतून खेड्यांत व शहरांत आढळतात. अनाथ विधवा व पोरकीं पोरें हीं या समाजांत पुष्कळ आहेत. पुष्कळ चित्पावन तरुण राष्ट्रहितकारक अनेक कार्यांत त्यागानें पडत असल्यामुळें त्यांचीही सांपत्तिक स्थिति वाईट असते. सुशिक्षित चित्पावन त्यागप्रधान व व आशिक्षित कृषिजीवी असें वर्णन या समाजाचें करण्यास हरकत नाहीं. हल्लीं तर ब्राह्मणेतर कुणबी, शेतकरी, माळी, यांची सांपत्तिक स्थिति चित्पवानांपेक्षां कितीतरी चांगली आहे असें ह्मणावें लागतें.

आरोग्य—या सांपत्तिक स्थितीचा परिणाम आणि पोटाकरितां शहरांत भराभर गेल्याचा परिणाम चित्पावनांच्या आरोग्यावर होत आहे. इतर सर्व ब्राह्मणजातींपेक्षां चित्पावन स्त्रीपुरुषांत **क्षयाचें** प्रमाण वाढत आहे. एवढी बुद्धिमान् जात रोग व दारिद्र्य यांच्या कात्रींत मरून जाणार कीं काय अशी भीती वाटते. बालमृत्यूचें प्रमाण व स्त्रियांतील बाळंतरोगाचें प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे.

आहार—चित्पावन समाज शाकाहारी आहे. कांहीं सुधारक मांसाहारी होऊं लागले आहेत व कांहीं **मांसाहार** करावा असें प्रतिपादन करूं लागले आहेत. परंतु बहुजनसमाज हा **मांसाहाराविरुद्ध** आहे.

विशिष्ट चालिरीति—नालच्छेदनापूर्वी चातुर्वर्णिकांतील कोणताहि मुलगा चित्पावन आपल्यांत समाविष्ट करून घेतात असें एन्थोवेन लिहितो, परंतु ती चाल हल्लीं प्रचारांत दिसत नाहीं.

महत्त्वाकांक्षा--चित्पावनांतील सुशिक्षित कर्त्या व जबाबदार माणसांच्या अंतःकरणाचा जर ठाव घेतला तर असें दिसतें कीं, हिंदुस्थानचें पुढारीपण पत्करून जगाशीं टक्कर मारण्याचें सामर्थ्य त्यांचे ठिकाणीं आणावें आणि त्याकरतां सामाजिक, धार्मिक, राजकीय जोम जितका समाजांत आणतां येईल तितका आणावा. जगांतील निरनिराळ्या संस्कृतींशीं हिंदुस्थानानें झगडून आर्यसंस्कृति टिकवावी; तो मार्ग महाराष्ट्रानें दाखवावा, त्यांत चित्पावनांनीं पुढाकार घ्यावा अशी यांची भावना आहे. अर्थात् पाहिजे त्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, खळबळी हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें करण्यास चित्पावन ब्राह्मण तयार आहेत असें म्हणतां येतें. समाजांतील वैषम्य, अस्वाभाविक वैलक्षण्य घालविण्याला चित्पावन हा सर्वांच्या पुढें आहे आणि हीच त्याची सामाजिक महत्त्वाकांक्षा आहे.

चित्पावनांचें पंक्तिपावनत्व—चित्पावन ब्राह्मण बरेच दिवस पंक्तिपावन नव्हते. त्यांना औंधच्या पंतप्रतिनिधींनीं पंक्तिपावन केलें असें म्हणतात. " ज्या वेळेस श्रीनिवास परशुराम पंडित प्रतिनिधी यांच्या मुलाची कऱ्हाडाजवळ कोळेगांवास **मुंज** झाली, त्या वेळेस बाळाजी विश्वनाथ यांस पेशवेपद प्राप्त झालें होतें; त्यांनीं प्रतिनिधींची आपली मैत्री जाणून सर्व ब्राह्मणांकडून एक पंगत करविली आणि तेव्हांपासूनच कोंकणस्थ व देशस्थ पंक्तिव्यवहारांत एक झाले. (देशमुखकृत ऐतिहासिक भाग २, गोष्ट ३३.) मध्यप्रांतांत बऱ्याच दिवसांपूर्वी चित्पावनांचे पंक्तीस बसल्यास पुन्हां मुंज करावी लागेल असा समज होता. डॉ. मुंजे यांनीं परवांच्या दौऱ्यांत लहानपणचा आपला हा समज कित्येक ठिकाणीं जातींबद्दलचे कसे समज असतात याकरितां सांगितला. लोकहितवादींनीं आणखी एक गोष्ट दिली आहे, ती बरीच बोधप्रद आहे. कोंकणस्थांना पूर्वी हलके समजत व सकाळीं उठून कोंकण्याचें तोंड पाहूं नये असें

विशिष्ट चालिरीति—नालच्छेदनापूर्वी चातुर्वर्णिकांतील कोणताहि मुलगा चित्पावन आपल्यांत समाविष्ट करून घेतात असें एन्थोवेन लिहितो, परंतु ती चाल हल्लीं प्रचारांत दिसत नाहीं.

महत्त्वाकांक्षा—चित्पावनांतील सुशिक्षित कर्त्या व जबाबदार माणसांच्या अंतःकरणाचा जर ठाव घेतला तर असें दिसतें कीं, हिंदुस्थानचें पुढारीपण पत्करून जगाशीं टक्कर मारण्याचें सामर्थ्य त्यांचे ठिकाणीं आणावें आणि त्याकरतां सामाजिक, धार्मिक, राजकीय जोम जितका समाजांत आणतां येईल तितका आणावा. जगांतील निरनिराळ्या संस्कृतींशीं हिंदुस्थानानें झगडून आर्यसंस्कृति टिकवावी; तो मार्ग महाराष्ट्रानें दाखवावा, त्यांत चित्पावनांनीं पुढाकार घ्यावा अशी यांची भावना आहे. अर्थात् पाहिजे त्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, खळवळी हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें करण्यास चित्पावन ब्राह्मण तयार आहेत असें म्हणतां येतें. समाजांतील वैषम्य, अस्वाभाविक वैलक्षण्य घालविण्याला चित्पावन हा सर्वांच्या पुढें आहे आणि हीच त्याची सामाजिक महत्त्वाकांक्षा आहे.

चित्पावनांचें पंक्तिपावनत्व—चित्पावन ब्राह्मण बरेच दिवस पंक्तिपावन नव्हते. त्यांना औंधच्या पंतप्रतिनिधींनीं पंक्तिपावन केलें असें म्हणतात. "ज्या वेळेस श्रीनिवास परशुराम पंडित प्रतिनिधी यांच्या मुलाची कऱ्हाडाजवळ कोळेगांवास **मुंज** झाली, त्या वेळेस बाळाजी विश्वनाथ यांस पेशवेपद प्राप्त झालें होतें; त्यांनीं प्रतिनिधींची आपली मैत्री जाणून सर्व ब्राह्मणांकडून एक पंगत करविली आणि तेव्हांपासूनच कोंकणस्थ व देशस्थ पंक्तिव्यवहारांत एक झाले. (देशमुखकृत ऐतिहासिक भाग २, गोष्ट ३३.) मध्यप्रांतांत बऱ्याच दिवसांपूर्वी चित्पावनांचे पंक्तीस बसल्यास पुन्हां मुंज करावी लागेल असा समज होता. डॉ. मुंजे यांनीं परवांच्या दौऱ्यांत लहानपणचा आपला हा समज कित्येक ठिकाणीं जातींबद्दलचे कसे समज असतात याकरितां सांगितला. लोकहितवादींनीं आणखी एक गोष्ट दिली आहे, ती बरीच बोधप्रद आहे. कोंकणस्थांना पूर्वी हलके समजत व सकाळीं उठून कोंकण्याचें तोंड पाहूं नये असें

म्हणत. त्याबद्दलची गोष्ट अशीः—‘ कोंकणस्थ ब्राह्मण हे प्रथमतः अगदीं मूढ असत व कोंकणांतून फारसे घाटावर येत नसत आणि देशस्थ लोकही त्यांस अगदां हलके समजत. यामुळेंच शिवाजीपर्यंत कारभारांत मुत्सद्दी परभू किंवा देशस्थ असत. पुढें शाहुमहाराजांचे कारकीर्दीत बाळाजी विश्वनाथ हे घाटावर येऊन सासवडचे कुलकर्णी महादोबा पुरंदरे यांचे आश्रयानें राहिले. ते स्वतः वाढले व त्यांनीं पुरंदऱ्यांसही वाढविलें. कांहीं दिवसांनीं कोंकणचीं मुलें घाटावर येऊन स्वयंपाक व शागिर्दी करण्यास रहात. एके दिवशीं बाळाजी बाजीराव (नानासाहेब) पेशवे यांनीं महादोबा पुरंदरे यांस ग्रामान्तरास जाण्यास सांगितलें होतें. ते दोन चार दिवस गेले नाहींत. म्हणून पेशव्यांनीं त्यास पुन्हां विचारलें. तेव्हां ते म्हणाले कीं, कोणी कोंकण्या ब्राह्मण पाहून निघतों. हें ऐकून त्यांला फार वाईट वाटलें कीं, आपली जात निंद्य मानली जाते ! मग त्यांनीं कोंकणांतून दोनशें मुलें पुण्यास आणविलीं आणि पर्वतीस दर्शनास जात तेव्हां तेथें त्यांस स्वतः कित्ते घालून देत आणि चांगलीं अक्षरें करा म्हणून सांगत. ते मुलगे लिहिण्यांत वाकबगार करून त्यांना फडावर दप्तरांत वगैरे जागा देऊं लागले. मग कांहीं वर्षांनीं सर्व दप्तर व फड कोंकणस्थांनीं भरला. त्यांत पहिलें परभूंचें चिटणिशी वळण असें, तें सोडून कोंकणस्थांनीं विवलकरी व जनोबाभट्टी अशीं वळणें काढिलीं. याप्रमाणें पेशवाईंत कोंकणस्थांचा उद्धार झाला. ’

स्वरूप—चित्पावन जात गोरी, नीटस, देखणी आहे. क्वचित् डोळ्यामध्यें अधूपणा व घारेपणा आढळतो. घाऱ्या डोळ्यांचें प्रमाण अलीकडे कमी होत आहे. देशावर बरेच दिवस राहिलेल्या चित्पावनांचे डोळे चांगले व वर्ण काळासावळा असें स्वरूप असतें. घाऱ्या डोळ्यांचा चित्पावन मोठा वस्ताद व अनुदार असा समज आहे.

देवर्षि ऊर्फ देवरुखे ब्राह्मण.

पूर्वेतिहास—देवरुखे ही पंचद्राविडांतर्गत महाराष्ट्र ब्राह्मणांपैकीं एक जात आहे. देशस्थ ब्राह्मणांप्रमाणेंच या ज्ञातीच्या उत्पत्तीविषयीं प्राचीन अर्वाचीन

ग्रंथांत कांहीं उल्लेख मिळत नाहीं. देवर्षी या शब्दाचा देवरुखे हा अपभ्रंश आहे. देवर्षि शब्द सह्याद्रि खंडांत

बादराः सिंधुजाश्चापि तथा वैभाण्डका द्विजाः
देवर्षियश्चिताजातास्तथा संकरजातयः ॥

स्कं० पु. स. खं. उ. ५.

आलेला आहे. देवरुख्यांचें मूलस्थान कोल्हापूर, विशाळगड, संगमेश्वर, हा टापू असावा. कारण याच भागांत या समाजाच्या कुलदेवतांचीं स्थानें आहेत. कालचक्राप्रमाणें देवर्षि ब्राह्मणांना रत्नागिरींतून देशावर, देशांवरून कोंकणांत अशीं परिवर्तनें प्राचीन काळीं करावीं लागलीं. मध्ययुगांत देवर्षि ब्राह्मण रत्नागिरी प्रांतांत पाण्याची चांगली सोय व सुपीक जमीन पाहून जोसपण, शेती, व खोती पतकरून राहिले. कांहीं कुटुंबें पेशवाईत जकाती व करोडगिरी हे धंदे पतकरून देशावर आलीं. हल्लीं सर्व महाराष्ट्रभर देवरुखे ब्राह्मण पसरलेले आहेत. संशोधनाचार्य राजवाडे देवराष्ट्र म्हणजे कृष्णा नदीच्या पूर्व बाजूचा प्रदेश व तेथील राहणारे ते देवराष्ट्रिय ब्राह्मण असें म्हणतात. पण त्यांचें म्हणणें प्रबळ प्रमाणांभावीं चुकीचें ठरतें. कारण, त्या भागांत देवरुख्यांचीं कुलदैवतें आणि इतर विश्वासार्ह अवशेष उपलब्ध नाहींत. शिवाय स्कंध व पद्म पुराणांमध्यें ब्राह्मणांच्या यादींत

मागधाः कान्यकुब्जाश्च देवराष्ट्राश्च माथुराः ।
सौराष्ट्र यमलावन्त्याः पाराशाः साल्व सौपराः ॥
देवर्षयो महाराष्ट्राः काराष्ट्राः खरपृष्ठजाः ।
चिताजाः कौकणा विप्राः सर्वकर्माधिकारिणः ॥

देवर्षि व देवराष्ट्रिय अशा दोन भिन्न ब्राह्मण पोटजाति दिल्या आहेत. त्या वरून देवर्षि (देवरुखे) व देवराष्ट्रिय हे एक नव्हत असें सिद्ध होतें. जीं कांहीं प्रमाणें आज उपलब्ध आहेत त्यांवरून देवरुख्यांचें मूल स्थान करवीर भागाकडेच असावें असें वाटतें.

वसतिस्थानें व लोकसंख्या—सांप्रत या देवरुखे ब्राह्मणांची लोकसंख्या सर्व हिंदुस्थानांत सुमारें १२ हजार असून ते मराठी भाषा चाल-

णाऱ्या सर्व प्रांतांत थोडे फार आढळतात. मुंबई इलाख्यांत या लोकांची संख्या सुमारें ७ हजार असून त्यांचा विशेष भरणा रत्नागिरी जिल्ह्यांतील रत्नागिरी, चिपळूण व संगमेश्वर या तीन तालुक्यांत सुमारें ९० गांवीं आहे. ठाणें जिल्ह्यांत उंबरगांव टापूंत सहा गांवीं यांची बरीच वस्ती आहे. कुलाबा जिल्ह्यांत अलिबाग, महाड, कर्जत येथें यांची वस्ती असून देशावरील बहुतेक जिल्ह्यांत हे तुरळक तुरळक आढळतात. पेशवाईंत करोडगिरी व जकातीचे सुभे या कामामुळें यांची वस्ती सर्वत्र पसरलेली आहे. कर्नाटकांत ह्मैसूर, धारवाड, भागांतही देवरुखे आहेत पण ते वैष्णव बनून व तिकडील गावांचीं नांवें स्वीकारून तद्रूप बनलेले आहेत.

वेदशाखा व सूत्र—ऋग्वेद शाकलशाखा व कृष्णयजुर्वेद तैत्तिरीय हिरण्यकेशी शाखा या ब्राह्मणांत आहेत. आश्वलायन व सत्याषाढ सूत्राधारें त्यांची श्रौतस्मार्त कर्मे चालतात.

आहार व राहाणी—देवरुखे शाकाहारी असून त्यांची राहाणी स्वच्छ व टापटिपीची आहे.

धर्मपंथ—सर्व देवर्षि ब्राह्मण स्मार्त असून अद्वैत शांकरमतानुयायी आहेत. संकेश्वरपीठाचें अनुशासन चालतें. पण कल्याणच्या उत्तर भागांत द्वारकेच्या शारदापीठाचा निग्रहानुग्रह चालतो. कांहीं कुटुंबें वैष्णव बनलीं आहेत, पण तीं कर्नाटकांत आहेत.

गोत्रें—देवरुख्यांचीं चित्पावनांप्रमाणें १४ गोत्रें आहेत. अत्रि, आंगिरस, कपि, काश्यप, कौंडिण्य, कौशिक, गार्ग्य, जामदग्न्य, पाराशर, भारद्वाज, मुद्गल, वाशिष्ठ, शांडिल्य, शौनक. चित्पावनांचीं गोत्रें चौदाच असून त्यांत आंगिरस, पाराशर, मुद्गल, व शौनिक हीं नाहींत. या ऐवजीं त्यांच्यांत नितुंदन, बाभ्रव्य, वत्स, व विष्णुवृद्ध हीं आहेत. कऱ्हाड्यांत २४ गोत्रें आहेत, म्हणून शतप्रश्नकल्पलताकाराचें विधान 'देवरुखे हे कऱ्हाडे होत' हें चुकीचें ठरतें. देवर्षींचीं सर्व गोत्रें देशस्थांत आढळतात. म्हणून ही देशस्थांची पोट जात आहे असें कोणी म्हणतात.

उपनावें—सुप्रसिद्ध अशीं सुमारें ७५ उपनावें आहेत. त्यांचें गोत्र-वार वर्गीकरण पुढें दिल्याप्रमाणें होतें--१२ अत्रिगोत्री, २९ काश्यपगोत्री, ४ कौशिकगोत्री, ६ वशिष्टगोत्री व बाकाच्यांत १ पासून ३ पर्यंत विभागलीं आहेत. आंबेडकर, असावकर, आरेकर, आयझरवाले, उपाध्ये, करवडे, कानडे, शेंडे, कार्लेकर, कोगजे, खटावकर, गोसावी, गोवधेकर, चांदे, जोशी, वीरकर, पिंपुटकर, काळे, देवधेकर, दाभिलकर, धामणसेकर, बनकर, बाठे, रोडे, मराठे, शितूत, साले, सावले, सलटकर, इत्यादि; बाकी नांवें विस्तारभयास्तव येथें देत नाहीं.

कर्तीं माणसें—विविध क्षेत्रांत अनेक कर्तीं माणसें या समाजांत होऊन गेलीं आहेत. जुन्या परंपरेंत मांदुसकर, भाटलेकर, भोळे, वीरकर, आरेकर, वगैरे घराणीं प्रसिद्ध होतीं. खंडोबल्लाळ, नागो देवचक्के, अंताजी दामोदर, बापूसाहेब बाटे, बापूजी दाजी, पार्वतीबाई पिंपुटकर इत्यादि या समाजांस इतिहासप्रसिद्ध माणसें होऊन गेलीं. सांप्रत पिंपुटकर, प्रिन्सिपाल डांगे, चिंतोपंत देवळे, अंताजी दामोदर काळे, डॉक्टर व प्रो. निमकर, वीरकर, जुवेकर, चांदे, मुळे, मुकादम, देवधेकर, कारुळकर, काळे, डॉ. काशीबाई नवरंगे, इत्यादि विविध क्षेत्रांत या समाजांतील माणसें चमकत आहेत.

शिक्षण—प्राचीन कालापासून वेदवेदांगांचा अभ्यास या जातींत होत आहे. सांप्रत कालमानाप्रमाणें प्राचीन शिक्षणाची अनास्था इतराप्रमाणें याहि जातींत होत आहे. इंग्रजी शिक्षणाकडे कल वाढत्या प्रमाणांत आहे. वकील, डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, अशा क्षेत्रांत शेंकडों लोक पुढें येत आहेत. स्त्रीशिक्षणही हळुहळु वाढत आहे. बहुतेक समाज जुन्या प्रवृत्तीचा आहे. शहरांतील शिकलीं सवरलेलीं माणसें सुधारणाप्रिय आहेत. जुन्या लोकांत सुधारणेला कसून विरोध करणाऱ्यांपेक्षां उदासीनांचीच संख्या जास्त आहे.

विधवा—विधवा-विवाह या जातींत रूढ नाहीं. विधवाविवाहाचें समर्थन कोणी करीत नाहीं. परंतु कांहीं देवरुख्यांनीं देशस्थ, कोंकणस्थ विध-

वांशीं विवाह केले आहेत. कालमानाप्रमाणें विधवावपनाचा विकल्प दिसूं लागला आहे. कांहीं विधवा समाइक कुटुंबांत राहतात, तर कांहीं स्वतंत्रतेनें उद्योग-धंदा करून आपला निर्वाह करूं लागल्या आहेत. विधवांमध्यें शिक्षणाची जरूरी उत्पन्न झाली आहे.

आरोग्य—देवरुख्यांची वस्ती उत्तम हवापाण्याच्या खेड्यांत आहे. म्हणून स्वाभाविकच त्या भागांत रोगराईचा प्रादुर्भाव कमी आहे. शेतीसारखा शरीरकष्टाचा व्यवसाय हे करीत असल्यामुळें शरीर निकोप व कणखर असतें. पूर्वी आयुर्मान ७०--७५ वर्षें होतें. अलीकडे कष्टतर जीवन-कलहामुळें सांपत्तिक स्थिती खालवली आहे व इतर ब्राह्मण जातींप्रमाणें या जातीचेंही शरीर-बल व आयुष्य क्षीण होत आहे. क्षयरोग, बाळंतरोग यांचें प्रमाण शहरांतील स्त्रियांमध्यें वाढत आहे.

सांपत्तिक स्थिती--मुख्य धंदा शेतीचा असल्यामुळें जमीनवाल्यांचें प्रमाण जास्त आहे. अलीकडे सर्व शेतीवाले सांपत्तिक दृष्ट्या क्षीण झालेले आहेत. देवरुखे तत्त्वप्रवीण असल्यामुळें अधिक दरिद्री होऊं लागले आहेत. कोंकणांत, शेती, सावकारी, खोती, जोशीवृत्ती हे या जातीचे मुख्य धंदे आहेत. भिक्षुकीकडील कल उत्तरोत्तर कमी होत आहे. प्रशस्तपणें पैसा व प्रतिष्ठा ज्यांत मिळते असे सराफी, दलाली, सावकारी, इत्यादि धंदे पुष्कळ लोक करूं लागले आहेत. शिल्पकला, ललित, वैद्यकी, डाक्टरी, एंजिनियर या धंद्यांतही ही जात पुढें येत आहे.

स्वभाव--देवरुखे यांचा स्वभाव बाह्यतः ऋग्वेदी देशस्थांसारखा वाटतो. पण त्यांचे आचारविचार व सामाजिक चालीरीती चित्पावनांप्रमाणें आहेत. खाजगी व्यवहारांत प्रेमळ, सरळ, दृढस्नेही, कष्टाळू, काटकसरी, निरुपद्रवी व कांहींसे शीघ्रकोपी असा यांचा स्वभाव आहे. मानीपणा हा यांच्या स्वभावांतील विशेष आहे.

सार्वजनिक संस्था—पूर्वी या जातीच्या पंचायत संस्था होत्या. त्या संस्थांनीं दिलेले निकाल हे लोक पाळीत. या जातींचीं निराळीं देवालयें नाहींत. इतर ब्राम्हणांच्या देवळांत हे जातात, व यांच्या देवळांत इतर सह-

अनुष्ठान करणारे ब्राह्मण येतात. या जातीच्या मालकीच्या सार्वजनिक चाळी किंवा वरें कोठेंही नाहींत. लग्नकार्यांत सव्वा रुपयापासून पंचवीस रुपयांपर्यंत रक्कम सार्वजनिक कार्याकरतां काढून घेण्याची चाल आहे. देवरुखे जातीचा असा फंड नाहीं. पण गरीब विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला मदत व्हावी म्हणून देवरुखे विद्यार्थी सहाय्यक मंडळ आणि देवरुखे विद्यामृत पोषक संस्था अशा दोन संस्था मुंबईस चालू आहेत. विद्यामृत पोषक संस्था मुंबई, विद्याप्रसारक मंडळ बडोदें, देवरुखे विद्यार्थी सहाय्यक संघ इंदूर, या संस्था मॅट्रिकपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अल्पस्वल्प मदत करतात. उंबरगांव टापूंत 'देवरुखे सहकारी पतपेढी' नुकतीच स्थापन झाली आहे.

उत्सव, सण, व्रतें, वैकल्यें, धर्मकर्में, संस्कार वगैरे श्रौतस्मार्त पौराण-कर्में इतर सद् ब्राह्मणांप्रमाणेंच देवरुखे ब्राह्मणांतही होत आहेत.

सामाजिक स्थान व महत्त्वाकांक्षा—देवरुखे ब्राह्मण षट्कर्माधिकारी व सद्ब्राह्मण्यवान् आहेत. देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे ब्राह्मणांशीं देवरुखे समानत्वानें वागतात. परस्परांचें पौरोहित्य करतात. श्राद्धप्रसंगीं पितृस्थानीं क्षण देतात. पुणें, मुंबई, बडोदें, नाशिक, वांई इत्यादि ठिकाणच्या पाठशाळांमध्यें देवरुखे विद्यार्थी इतर ब्राह्मण विद्यार्थ्यांसमवेत अध्ययन व अध्यापन करीत आलेले आहेत. मोठमोठ्या क्षेत्रांत देवरुख्यांचे पुरोहित देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण आहेत. देशस्थ, कोंकणस्थ, कराडे, देवरुखे असा महाराष्ट्र ब्राह्मणजातींचा वाक्प्रचार केवळ लोकसंख्याबलानुसार आहे. देवरुख्यांचा दर्जा महाराष्ट्र ब्राह्मणांप्रमाणें समानत्वाचा आहे. ऋग्वेदी देशस्थ व देवरुखे यांचे आजपर्यंत परस्पर सुमारें २५० शरीरसंबंध झाले आहेत. चित्पावन व कऱ्हाडे यांच्यांशीं अलीकडे होत असलेले देवरुख्यांचे विवाह पोटजातींच्या एकीकरणाच्या दृष्टीनें अभिनंदनीय व अनुकरणीय नाहींत असें कोण ह्मणेल? **पंचद्राविड ब्राह्मणांतील सर्व तुल्यबल जातींशीं अंतर्ज्ञातिविवाह करण्याविषयीं या समाजाचें बहुमत अनुकूल आहे. फक्त एक लहानसा पक्ष विवाहसंबंधांत तटस्थ वृत्ती ठेवावी असें ह्मणणारा आहे. इतर ब्राह्मणजातींप्रमाणें या जातींतही एक पुराणप्रिय**

परंतु अल्पसंख्य अकिंचित्कर पक्ष असला तथापि देवरुख्यांतील समंजस बहुसंख्य समाज पोटजातींच्या एकीकरणाला सर्वस्वीं अनुकूल असा आहे. या जातीची महत्त्वाकांक्षा ब्राम्हण्यसंरक्षण व्हावें, सत्ववृत्तिप्रधान ज्ञानपरंपरा चालावी ब्राह्मणसंघटन होऊन अखिल भारताची सेवा व्हावी व राष्ट्रोद्धार करावा अशी आहे.

अपंक्तित्वाचा आरोप—देवरुख्यांच्या पंक्तीस बसलें असतां संकटें येतात, दारिद्र्य ओढवतें, अशी समजूत आहे. या समजुतीमुळें पूर्वी यांच्या पंक्तीला इतर ब्राह्मण जेवण्यास तयार नसत. अलीकडे त्या समजुतींतील खुरचटपणा पटूं लागल्यामुळें भोजनव्यवहार होऊं लागले आहेत. वरील 'किंवदन्ति' रत्नागिरी भागांतील थोड्या चित्पावनांशिवाय इतर ब्राह्मणांत रुढ नाहीं. गेल्या पांचशें वर्षांचा इतिहास पाहिल्यास या 'किंवदन्तीनें' दर ५०, ७५ वर्षांनीं उचल खाऊन देवरुख्यांस कायिक, वाचिक, मानसिक, ताप दिलेला आहे. त्याकरितां देवरुख्यांना काशी, नाशिक, पुणतांबें या क्षेत्रांकडे जावें लागलें, राजदरबार पहावा लागला व धर्मशास्त्रें धुंडाळावीं लागलीं. संशोधक राजवाड्यांच्या सोपारें येथील निर्णयपत्रानें हा वाद पुन्हां उकरला गेला. या 'किंवदन्तीचें' मूळ पुढील गोष्टींत आहे. "चितळेभट्ट नांवाचा धनधान्यसंपन्न ब्राह्मण मौजे वसणी येथें राहात असे. त्यानें गांवच्या बुजलेल्या तळ्यांतील माती काढण्याचें काम लोकोपयोगार्थ सुरूं केलें. सार्वजनिक कार्य म्हणून जाणायेणाऱ्यांकडून तो तें काम करवून घेई. त्याच मार्गानें एकदां देवरुखे देसाई दहा पांच ब्राह्मणांसमवेत आले. त्यांनीं चितळेभट्टाची माती वाहाण्याची आज्ञा 'ब्राह्मणस्य तु देहोऽयं क्षुद्रकामाय' या वचनाला अनुलक्षून अमान्य केली. चितळेभट्टानें शाप दिला कीं, तुमच्या समवेत जेवतील ते दरिद्री होतील. झालें. या गोष्टीवरून ग्रामण्यें सुरूं झालीं. देवरुख्यांना हा अपमान सहन न होऊन त्यांनीं काशींतील मुक्तिमंडपांत शके १५०५ मध्यें चितळेभट्टाच्या पदरांत चुकीचें माप घातलें. तथापि वाद मिटला नाहीं. त्यामुळें चित्पावन व देवरुखे यांचे संबंध कटुतर होऊं लागले. देवरुखे कोंकणांतील मूळचे रहिवाशी व चित्पावन मागाहून आलेले म्हणून हा तंटा वसाहतस्वरूपांत विकोपास गेला असें कांहींचें

मत आहे. कांहीं असलें तरी देवरुख्यास अपंक्त ठरविण्याचा अव्यापारेषु व्यापार चित्पावनांनीं गेल्या पांचशे वर्षांपासून चालविला आहे यांत संशय नाहीं. वरील आख्यायिका अक्षरशः खरी मानली तरी त्यांत अपंक्त ठेवण्यासारखें पातक कांहींच नाहीं. अभक्ष्यभक्षण, अपेयपान, पंचमहापातकांपैकीं पातक यांचा संबंध नसल्यामुळें शास्त्राचा संबंधच या क्षेत्रांत पोंचत नाहीं. दिवसानुदिवस या आख्यायिका अप्रमाण ठरत आहेतच. कारण अशा अयुक्तिक दंतकथा फार वेळ टिकत नाहींत. या पुढें देवरुख्यासंबंधीं हें आचरट विधान कोणीहि करूं नये असें आमचें मत आहे. ब्राह्मणविघटना होते कशी? मत्सर वाढतो कसा? याचा एक मासला या वृत्तातांत सांपडतो.

आपस्तंब ब्राह्मणांची सामान्य माहिती:— आपस्तंभ शाखेचे देशस्थ ब्राह्मण कर्नाटकांत, बेळगांव, धारवाड, विजापूर, म्हैसूरापर्यंत सर्वत्र आहेत. ऋग्वेदी लोकांच्या मानानें आपस्तंबांची संख्या कमी असती तरी महाराष्ट्रांत आपस्तंब ब्राह्मण (देशस्थ) जसे क्वचितच दृष्टोत्पत्तीस येतात तसें मात्र कर्नाटकांत नाहीं. किंबहुना तेथील हिरण्यकेशीय लोकांच्या संख्येपेक्षां आपस्तंबांची संख्या जास्त भरेल. ते मूळचे गोदावरीकांठचे असून कर्नाटकांत वसाहत करून राहिले आहेत असें कांहीं वाटत नाहीं. त्यांची जन्मभाषा कानडी असून मराठी भाषेची सुद्धां त्यांना आवड असते. त्या ठिकाणीं राहणाऱ्या ऋग्वेदी लोकांच्या ज्या कांहीं देवता आहेत त्याच यांच्याहि आहेत. यांच्या म्हणून विशिष्ट अशा देवता नाहींत. सण वगैरेहि दोघांचे एकच आहेत. आपस्तंबामध्यें मोठमोठे विद्वान आजवर होऊन गेले आहेत. जगद्गुरू शंकराचार्य यांच्या शृंगेरी इत्यादि मठांतून धार्मिक विधी आपस्तंभ शाखेप्रमाणें चालत असतात. आद्य शंकराचार्य आपस्तंब शाखेंतीलच होते असा त्यांचा समज आहे. श्रौतामध्यें निष्णांत असे लोक या शाखेंत होऊन गेले व त्याप्रमाणें आजहि आहेत. प्रसिद्ध श्रौति वासुदेव दिक्षीत, त्र्यंबक दिक्षित (रामदुर्ग), दत्तू दीक्षित हानगलकर, सीताराम दीक्षित हानगलकर यांची प्रसिद्धी काशीपासून रामेश्वरपर्यंत आहे. वरील पंडितांनीं "चयन, वाजपेय" वगैरे मोठमोठे याग केले आहेत. हल्लीं हयात असलेले हानगलचे महामहोपाध्याय ब्रह्मश्री विरूपाक्षशास्त्री हे आपस्तंब

शाखेचे असून ते म्हैसूर संस्थानांतले आस्थान पंडित आहेत. सांप्रतचे श्रीशृंगेरीपीठाचे जे शंकराचार्य आहेत त्यांचें अध्ययन बहुतेक विरूपाक्ष-शास्त्र्यांच्या जवळच झालें आहे. दुसरे हयात असलेले त्या प्रांतांतले प्रसिद्ध विद्वान् ब्रह्मश्री कृष्णशास्त्री गोटखिंडीकर यांच्या तोडीचा वैय्याकरणी त्या प्रांतांत दुसरा कोणी नाहीं. इतर सर्व गोष्टी ऋग्वेदी व आपस्तंब यांच्यासारख्याच आहेत.

आपस्तंब त्रिगुळ ब्राह्मण.

पूर्वेतिहास व वासस्थानें—ह्या लोकांचें मूळ वसतिस्थान आंध्र देशांतील सप्तगोदा प्रदेश व त्याच्या आसपासचा मुलूख म्हणजे हल्लींचे राजमहेंद्री, मच्छलीपटण व बिजवाडा वगैरे जिल्ह्यांचा कांहीं भाग होय. प्राचीन काळीं कांहीं दैवी आपत्तीमुळें (दुष्काळादि) ह्या लोकांनीं आपला देश सोडला व ते उदरभरणार्थ उत्तर, पश्चिम वगैरेकडे लांब लांब ठिकाणीं आपलें वास्तव्य करून राहूं लागले. बल्लारी जिल्हा व हल्लींचा निजाम इलाखा ह्या प्रांतांत त्यांनीं पहिल्या प्रथम आपली वस्ती करून ते पुढें क्रमाक्रमानें नाशीक, नगर, पुणें, सोलापूर, सातारा, बेळगांव, विजापूर वगैरे जिल्ह्यांत पसरले. हल्लीं या लोकांची वस्ती वर लिहिलेल्या सर्व जिल्ह्यांशिवाय बंगलूर, म्हैसूर इत्यादि ठिकाणीं दक्षिणेंत व वऱ्हाड, मध्यप्रांत वगैरे ठिकाणीं उत्तरेंत पसरली आहे. यांची लोकसंख्या अजमासें २५।३० हजारपर्यंत भरेल.

त्रिगुळ राष्ट्राचा इतिहास—सप्तगोदा प्रदेशांतून आलेल्या या आपस्तंब यजुर्वेदी, तैत्तिरीय शाखी ब्राह्मण लोकांना महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतांच्या कांहीं भागांत जेथें हे लोक पानमळे करतात, तेथें, ' तिरगुळ '' त्रिगुळ', '' तिगडस '', '' तिगळस '' अशा नांवानें संबोधण्याची चाल पडली आहे. हे लोक आपला देश सोडून दुसरीकडे जाऊन राहूं लागले त्या वेळीं त्यांच्या समाजांत द्राविडी भाषा चालू होती. त्याच भाषेला '' तिगळ भाषा '' असें म्हणत असत. तिगळ भाषा बोलणाऱ्या लोकांनाच कांहीं काळानंतर तिगळ हें नांव प्राप्त झालें. तिगळांसंबंधीं सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक वि. का. राजवाडे यांचें मत असें आहे कीं—'' कालिदासाच्या काळीं

म्हणजे सुमारें शके ३००–४०० त थळगाटाशेजारीं त्रैकुटक राजाचें राज्य असे. या राज्यांतील ब्राह्मणांस " त्रैकुटक ब्राह्मण " म्हणत. त्रैकुटक = तिर कुडअ = तिरगूळ. या पलीकडे या शब्दांत जास्त गूढ नाहीं. " (राजवाडे यांनीं पाठविलेलें खासगी पत्र, मिती भाद्रपद वद्य ३० शके १८४५, मुक्काम पुणें.) त्याचप्रमाणें अंबेजोगाई नामक मोंगलाईतल्या गांवीं झालेला श्री हंपी विरुपाक्ष मठाचा क्रमांक $\frac{७८३}{१८३१}$ चा जो ठराव आहे त्यांतील शास्त्रार्थांत या तैत्तिरीय आपस्तंब ब्राह्मणांना त्रिगुळ कां म्हणूं लागले याचें कारण दिलें आहे तें असें: मंगु नामक संकरजाती पुरुषापासून कुंभकार स्त्रीच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला शाल्मक तोच त्रिगुळ. त्याची वृत्ति पानमळे लावण्याची होय. ती वृत्ति या ब्राह्मणांनीं स्वीकारल्यामुळें त्यांना त्रिगुळ ही संज्ञा प्राप्त झाली. उदाहरणार्थ—कित्येक ब्राह्मणांना देववाहन कर्मामुळें " भोई " ही संज्ञा प्राप्त झाली आहे, तशीच शाल्मकाची वृत्ति आपद्धर्मासाठीं पतकरलेल्या या आपस्तंब तैत्तिरीय ब्राह्मणांना त्रिगुळ हें नामाभिधान मिळालें. हल्लीं कित्येक मुसलमान, इत्यादि वगैरे जातींच्या पानमळे लावणाऱ्या लोकांनाहि त्रिगुळ असें म्हणतात. यावरून शाल्मकाची नागवल्या रोपणाची वृत्ति जो स्वीकारतो तो त्रिगुळ असा लोकव्यवहार दिसतो. एकंदरींत आपस्तंब व तैत्तिरीय शाखी परंतु पानमळे करूं लागल्यामुळें त्रिगुळ संज्ञा मिळालेले हे लोक पंचद्राविडांतर्गत षट्कर्माधिकारी ब्राह्मणच आहेत, पण ते पानमळे लावण्याचा धंदा करतात येवढ्यावरूनच त्यांना त्रिगुळ ही संज्ञा मिळाली आहे.

विपरित ग्रह व मत्सर—महाराष्ट्र व कर्नाटकाच्या कांहीं भागांत या त्रिगूळांबद्दल कांहींसा गैरसमज झालेला दिसून येतो. या गैरसमजुतीचा ऊर्फ अज्ञानाचा दुष्परिणाम या लोकांना कांहीं काळापासून आजपर्यंत भोगावा लागत आहे. उदरभरणार्थ आर्यावर्ताच्या लांबलांबच्या प्रदेशांत पसरलेल्या या आपस्तंब तैत्तिरीय ब्राह्मणांना देशकालपरिस्थित्यनुरूप आपद्धर्म म्हणून शेतकीच्या धंद्यावर मुख्य मदार ठेवल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. त्यांतून कर्तबगार, धाडशी व बुद्धिमान् लोकांशिवाय इतर सर्वांनीं शेतकीचाच अवलंब

केला. शेतकीमध्यें बागाईत फायदेशीर आणि बागाइतीमध्यें ही पानमळा करणें विशेष फायद्याचें हें लक्षांत आणून त्या पानमळ्याच्या धंद्यावर विशेष परिश्रम करून हा धंदाच त्यांनीं आपल्या पूर्ण हस्तगत केला. परदेशांतून (प्रांत) आलेले हे ब्राह्मण पानमळ्याच्या धंद्यांत प्राविण्य मिळवून गबर व पुढारी होत चालले ही गोष्ट तद्देशीय इतर ब्राह्मणांच्या मनांत विशेष सलूं लागली. त्यामुळें इतर ब्राह्मण लोक या नूतन तिगळ भाषा बोलणाऱ्या ब्राह्मणांना पाण्यांत पाहूं लागले. कोणी एखादा अन्यदेशीय किंवा अन्यप्रांतीय परका माणूस एखाद्या गांवीं येऊन विशेष प्रसिद्धीस न येतां कोठें तरी अप्रसिध्द राहून आपलें पोट भरीत असतो तोंपर्यंत त्या गांवच्या लोकांचें त्याच्याकडे लक्ष जात नाहीं. परंतु आपल्या कर्तबगारीनें, दीर्घोद्योगानें, चिकाटीनें आणि बुद्धिचातुर्यानें जेव्हां तो पुढें येऊं लागून स्थानिक लोकांना मागें टाकीत जातो त्या वेळेपासून सर्वांचें लक्ष त्याकडे लागतें व विशेषतः त्याचे जातिबांधव त्याचा मत्सर करूं लागून त्याला मागें टाकण्याच्या उद्योगाला लागतात! हा एका व्यक्तिविषयींचा नियम किंवा अनुभव समजालाही लागूं पडतो; आणि या प्रांतांतले मूळ रहिवासी आश्वलायनादि ब्राह्मण व परप्रांतीय पोट भरण्यास आलेले तैत्तिरीय ब्राह्मण यांच्या संबंधांतहि हीच गोष्ट प्रामुख्यानें दिसून येते.

भिक्षुकी मत्सर—हे सप्तगोदाप्रदेशीय ब्राह्मण इतर प्रांतांत पाय पसरून आपला योगक्षेम उत्तम प्रकारें चालवीत असतां त्यांच्यामध्यें व इतर ब्राह्मणांत परस्पर दळणवळण कमी होण्याला आणखी एक कारण झालें तें असें. प्रथम या लोकांचें व इकडील ब्राह्मणांचें सख्य असून त्यांचे परस्पर व्यवहार सुरळीतपणें चालत होते. इकडचे आश्वलायनादि ब्राह्मणच त्यांचें पौरोहित्य करीत होते. परंतु या तिगळ लोकांनीं आपला जम नीट बसल्यावर आपल्या प्रांतांतील स्वशाखीय वैदिक कुलपुरोहितांना इकडे आणून जेव्हां ते आपलीं सर्व हव्यकव्यादि कर्मे त्यांच्या हस्तें करूं लागले तेंव्हांपासून त्यांचें पौरोहित्य केलेल्या अन्य शाखीय ब्राह्मणांशीं त्यांचा संबंध सुटूं लागला. पुढें ह्याच दूरीकृत अन्य-शाखीय ब्राह्मणांनीं या तिगळांवर कांहीं तरी आरोप करून त्यांना कमी लेखण्याला

सुरुवात केली. एकंदरींत पाहतां या परप्रांतीय लोकांना पुढें स्वधर्मीय बांधवांकडून त्रास होऊं लागला. पानमळ्याचा धंदा करणें हिंसामय आहे, हिंसा करणें शास्त्रदृष्ट्या निषिद्ध आहे आणि हे लोक पानमळ्याचा धंद करतात म्हणून हेहि निषिद्धाचरण करतात, निषिद्धाचरण करणाऱ्यांशीं ब्राह्मणानें अन्नोदकशरीरसंबंधादि व्यवहार करूं नये वगैरे समजुतींचा जाणून बुजून प्रसार केला गेला व त्यापासून तुटकपणें वागणाऱ्या या परप्रांतीय आपस्तंब तैत्तिरीय ब्राह्मणांना उपसर्ग पोंहचूं लागला. याचा परिणाम प्रतिष्ठा मिळवून पुढारी झालेल्या बऱ्या लोकांवर विशेष झाला नाहीं. परंतु कमनशिबी व अशिक्षित खेड्यापाड्यांत राहणाऱ्या सामान्य त्रिगुळ जनतेवर विशेष झाला. जे पानमळा हा कृषीचा धंदा सोडून इतर व्यवसाय करीत होते, अशा लोकांपैकीं पुष्कळांशीं इकडच्या मूळच्या ब्राह्मणांचे भोजनशरीर-संबंधादि व्यवहार सुरळीत होत होत परस्परांमधला भेद नाहींसा झाला. परंतु पानमळा करून तुटकपणें राहणाऱ्या लोकांशीं मूळच्या ब्राह्मणांचे एकेक व्यवहार कमी कमी होत गेले. याचें प्रत्यंतर म्हणजे बल्लारी, बेंगळूर, विजापूर वगैरे जिल्ह्यांच्या भागांत पूर्वींपासून आजलाहि भोजनशरीरसंबंधादि व्यवहार निःशंकपणें चालतात; नाशीक, त्र्यंबकेश्वरच्या बाजूला व मोंगलाईच्या कांहीं भागांत भोजन-प्रतिभोजन येवढेच विनहरकत चालतात; सातारा, सोलापूर, नगर, पुणें, बेळगांव वगैरे जिल्ह्यांत मात्र वरील दोन्ही व्यवहार जसे चालावेत तसे चालत नाहींत. यावरून वरील अनुमान सप्रमाण सिद्ध होतें. अशा प्रकारें अज्ञानमूलक चालत आलेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन कांहीं लोक हल्लीं त्याला रूढीच्या नांवाखालीं मजबुती आणूं पहात आहेत. परंतु ही गोष्ट अनिष्ट आहे हें विचारी जनतेला सांगण्याची जरूरी नाहीं. परप्रांतीय परंतु समानधर्मीय या ब्राह्मणांना जेव्हांपासून इतरशाखीय ब्राह्मणांकडून दूर लोटण्याचे व त्यांच्यांशीं अन्नोदकशरीरसंबंधादि व्यवहार वर्ज करण्याचे अदूरदर्शीपणाचे प्रयत्न होऊं लागले तेव्हांपासून त्रिगुळ नामा-भिधान प्राप्त झालेल्या पुष्कळ तैत्तिरीय शाखी या ब्राह्मणांनीं आपल्या प्रति-पक्षियांचे डोळे उघडण्याचे प्रयत्नही केलेले आहेत. या प्रयत्नांपासून थोडाफार फायदाही झालेला आहे.

ग्रामण्यें व निर्णय––गेल्या पांचपन्नास वर्षांत या आपस्तंब तैत्तिरीय शाखी त्रिगुळ या नांवानें संबोधिले जाणाऱ्या ब्राह्मणांबद्दल इतर शाखीय ब्राह्मणांकडून जे जे आक्षेप घेतले गेले आहेत त्यांत पुढील आक्षेप महत्त्वाचे आहेत : [१] पानमळयाचा निषिद्ध धंदा. [२] ह्या लोकांचे आचार शूद्रांपेक्षां कमी प्रतीचे. [३] ह्या लोकांचा इतर शाखीय ब्राह्मणांशीं शरीरसंबंधाभाव. [४] हे लोक भोजनप्रतिभोजनास पात्र नाहींत.

या सर्व आक्षेपांचें निरसन—परंतु महाराष्ट्र व कर्नाटकांतल्या आपस्तंब तैत्तिरीय शाखी त्रिगुळ ब्राह्मणांनीं अनेक विद्वान् ब्राह्मण, शास्त्री, पंडित व श्रीशृंगेरी, हंपी विरुपाक्ष, श्रीउत्तरादि व राघवेंद्र मठाधिष्ठित शांकर व माध्वमतानुयायी पीठाधिपतींकडून या आक्षेपांचें निरसन केलें आहे. अनेक निर्णयांपैकीं कांहीं महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे.

१—सुमारें अर्ध शतकामागें म्हणजे शके १८०३ वृष संवत्सरीं विजापूर जिल्ह्यांतील गणी गांवांत राहणारे भास्कर गोविंद हुनूरकर या गृहस्थांनीं श्रीउत्तरादि मठाधिष्ठित श्रीमत्सत्यवीर स्वामींकडून सहभोजनादि सद्व्यवहार वगैरे उत्तरादि मठांच्या समस्त शिष्यवर्गांनीं आपण व आपला परिवार यांजबरोबर निशंकपणें करण्याबद्दल ९७५ नंबरचें आज्ञापत्र मिळविलें आहे. धर्मशास्त्रादि ग्रंथ पाहून अनेक पंडित लोकांकडून माहिती आणवून विचार करून श्रीमत्सत्यवीर स्वामींनीं हें आज्ञापत्र आपल्या अशेष विद्वद्वैदिक, अशेष गृहस्थ व त्याप्रमाणें आपले सर्व मठाधिकारी यांना लिहिलें आहे. या आज्ञापत्राप्रमाणें समस्त शिष्यवर्ग व सर्व मठाधिकारी यांनीं वागावें, कोणीहि व्यत्यास करूं नये असे या आज्ञापत्रांत स्पष्ट शब्द आहेत. उत्तरादि मठाचें वास्तव्यस्थान दक्षिणेंत असल्यामुळें व तिकडे त्रिगुळ हे इतर ब्राह्मणांपेक्षां कोणत्याहि रीतीनें कमी दर्जाचे ब्राह्मण नाहींत, त्रिगुळांशीं इतर ब्राह्मणांचे भोजनशरीरसंबंधादि सर्व व्यवहार निःशंकपणें चालतात ह्या गोष्टी श्रीमत्सत्यवीर स्वामींना पूर्ण माहित असल्यामुळें त्यांनीं त्रिगुळ भास्कररावांबरोबर व त्यांच्या परिवाराबरोबर भोजन-प्रतिभोजन-शरीरसंबंध इत्यादि सर्व व्यवहार करण्यास आज्ञा केली आहे. या आज्ञापत्राप्रमाणें सर्व ब्राह्मणांना त्रिगुळांशीं अन्नलग्नव्यवहार करण्यास पूर्ण मोकळीक आहे.

२—शके १८१० सालीं श्रीश्रृंगेरीमठाच्या जगद्गुरु स्वामींकडून विजापूर मुक्कामीं लक्ष्मण तुळजाराम अग्निहोत्री, बाबाराव कृष्ण पाटील, अप्पाजी गणेश पाटील, शिवराम दाजिबा काळे व विठ्ठल शामराव दबडे वगैरे मंडळी राहणार नान्नज, राजाराम कृष्णा नारकर राहणार पांगरी व नारायण जयराम आरोळे राहणार सोलापूर इत्यादि लोकांनीं ३६३ नंबरचें आज्ञापत्र मिळविलें आहे. श्रृंगेरी मठाधीश श्रीनवनृसिंहस्वामींनीं उघड रीतीनें सोलापूर प्रांताच्या सर्वशाखीय प्रमुख ब्राह्मणांना आणवून सभेमध्यें त्रिगुळांच्या प्रश्नांचा पूर्णपणें साधक बाधक दोन्ही प्रकारें विचार करून अनेक लोकांचे तोंडी व लेखी पुरावे घेऊन त्या सर्वांचा विमर्श्य करून मग हें आज्ञापत्र दिलें आहे. या सभेमध्यें त्रिगुळांच्या विरुद्ध पक्षांत सुप्रसिद्ध कै० महादेव गोविंद रानडे यांचे बंधु वामन गोविंद रानडे हे प्रमुख होते. त्यांनीं त्रिगुळ हे शूद्रांप्रमाणें आचरण करणारे लोक आहेत, त्यांचे व आमचे सर्व व्यवहार एक नाहींत असा आक्षेप पुढें आणला. त्रिगुळ लोक पानमळे करतात आणि पानमळा करणें शास्त्रीत्या निषिद्ध आहे, ह्मणून ते इतर ब्राह्मणांबरोबर सर्व व्यवहाराला अयोग्य झाले आहेत, असा दुसऱ्या कांहीं लोकांनीं आक्षेप काढला. श्रीस्वामींनीं रानडे व इतर आक्षेपकांना लेखी व तोंडी प्रमाणदर्शी पुराव्यानें आपलें ह्मणणे सिद्ध करण्यास सांगून त्यांना मुदत दिली. परंतु रानडे व दुसरे आक्षेपक ह्यांना पुराव्यानें आपलें ह्मणणें सिध्द करतां आलें नाहीं. स्वामींना त्रिगुळ वादी लोकांचें म्हणणें पटलें, आणि ह्मणून स्वामींनीं हें आज्ञापत्र दिलें. सदर आज्ञापत्रांत खालील शद्ब आहेत. "प्रस्तुत हातीं आलेल्या या लेखी पुराव्यांनीं समक्ष विचार करून घेतलेल्या गोष्टींनीं आणि या अर्जदार त्रिगुळांच्या वैष्णव मतावलंबी अनुबंधियांना श्री उत्तरादि व श्री राघवेंद्र मठाकडून मिळालेल्या रायसपत्ता (आज्ञापत्र) वरून हे अर्जदार (त्रिगुळ) ब्राह्मणच असून वामन गोविंदराव रानडे इत्यादि दोघे तिघे मात्र ह्मणतात त्याप्रमाणें शूद्रांप्रमाणें आचरण करणारे आहेत असें ह्मणण्यास अधिकार नाहीं........त्रिगुळ हा शद्ब जातिवाचक नाहीं. कोणत्याही शास्त्रांत हा जातिभेद सांगितला नाहीं. पानमळयाचा धंदा ह्या काळांत पुष्कळ ठिकाणीं अनेक ब्राह्मण करूं लागले आहेत. परंतु ते कोणत्याही आक्षेपाला पात्र झाले नाहींत........इत्यादि

कारणांचा विचार करतां त्रिगुळ म्हणून संबोधिले जाणारे हे अर्जदार सर्व ब्राह्मणांबरोबर भोजन प्रतिभोजनादि सव्यवहारास अर्ह आहेत" असा निकाल दिला आहे.

३–शके १८३१ सालीं मोंगलाईंतील आंबेजोगाई नामक क्षेत्रीं हंपी-विरुपाक्ष मठाच्या श्रीमत्सच्चिदानंद मिनवोद्दंड विद्यारण्य भारती स्वामींकडून गणेश गोविंद वेळंबे इत्यादि लातूरकर मंडळींनीहि एक आज्ञापत्र घेतलें. आंबेजोगाई क्षेत्रांतील श्रीदत्तमंदिरांत आश्वीन वद्य ९ शके १८३१ रोजीं स्वामींनीं सर्व गृहस्थ व वैदिक ब्राह्मणलोकांची सभा भरवून तेथें त्रिगुळांच्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून हें आज्ञापत्र पुढें आश्वीन वद्य १२ ला लिहून दिलें आहे. प्रतिपक्षियांचे त्रिगुळांवरील सर्व आक्षेप त्यांना सिद्ध न करतां आल्यामुळें द्वेषमूलक आहेत असें लिहून स्वामींनीं आज्ञापत्राच्या शेवटीं "प्रस्तुत कालीं देशकालानुरोधानें विचारदृष्ट्या व शास्त्ररीत्या व्यवहारादि पूर्ण विचार करून, (तसेंच शके १८१० सालांतील श्रीशृंगेरी मठाचा निर्णय झाला तो विचारपूर्वक झाला आहे, त्यास अनुसरून) या तैत्तिरीय आपस्तंब यजुर्वेदी ब्राह्मणांबरोबर भोजनप्रतिभोजनादि व्यवहार करण्यास कोणत्याहि शाखेच्या ब्राह्मणास हरकत नाहीं" असें म्हटलें आहे.

४–श्रीयुत बाबूराव नाईक गणी यांनीं श्रीराघवेंद्र मठाच्या श्रीमत्सुशिलेंद्र-तीर्थ स्वामींकडून शके १८४६ सालीं श्रीक्षेत्र मंत्रालय मुक्कामीं २५६ नंबरचें आज्ञापत्र मिळविलें आहे. सदर आज्ञापत्रांत खालील शब्द आहेत. "धर्म, शास्त्र, देशाचार, व्यवहार इत्यादींचा विचार करून बाबूराव नाईक गणीकर व त्यांचा परिवार भोजन–प्रतिभोजन–शरीरसंबंध वगैरे व्यवहार करण्यास अर्ह आहेत ह्मणून आमच्या मठाच्या सर्व शिष्यवर्गांनीं सदर बाबूराव व त्यांचा परिवार यांजबरोबर भोजन–प्रतिभोजन–शरीरसंबंधादि सर्व व्यवहार निपरेक्ष-बुद्धीनें करीत जावें ह्मणून श्रीमन्मन्त्रालय सुक्षेत्रीं श्रीमन्नारायणस्मरणपूर्वक हें आज्ञापत्र लिहून पाठविलें आहे." **श्रीराघवेंद्र मठाचे अनेक शिष्य त्रिगूळ असून त्यांचे इतर सर्व ब्राह्मणांशीं बळ्ळारी, बेंगरुळ वगैरे जिल्ह्यांत सर्व व्यवहार निःशंकपणें आजपर्यंत होत आले**

आहेत व आजही बिनधोक होतात ही गोष्ट रा. बाबूराव यांना मुद्दाम सांगून श्री स्वामींनीं हें पत्र त्यांना दिलें आहे.

अन्नलग्नव्यवहार—आपस्तंब तैत्तिरीयशाखी त्रिगुळ ह्मणून संबोधिले जाणारे ब्राह्मण व सर्व मध्वमतानुयायी सर्वशाखी अनेक ब्राह्मण यांच्यामध्यें केव्हांही व कसलाही भेद नव्हता ह्याला बरेच पुरावे आहेत. वैष्णवमत-संस्थापक **श्रीमन्मध्वाचार्य यांचे गुरु श्रीसुब्राह्मण्यतीर्थ हे त्रिगुळ ब्राह्मण होते** असा मध्वविजयांत स्पष्ट उल्लेख आहे. तसेंच **चंद्रिका ग्रंथाचे कर्ते श्रीव्यासराय स्वामी यांचे गुरुही श्री ब्रह्मण्यतीर्थ नामक त्रिगुळ होते.** त्यालाही ग्रंथांतरींचे आधार आहेत. श्रीव्यासराय स्वामी नंतर **व्यासराय मठाच्या कुंदापुर शाखेच्या गादीवर आजपर्यंत बरेच त्रिगुळ स्वामी होऊन गेले. इतकेंच नाहीं तर कुंदापुर पीठावर असलेले हल्लींचे श्री लक्ष्मीमनोज्ञतीर्थ स्वामी हे अस्सल त्रिगुळ असून त्यांचें पूर्वाश्रमींचें नांव गुराचार्य अब्बूर असें आहे.** भोजनास अनर्ह, शरीरसंबंधास अपात्र, आचरणांत शूद्रांपेक्षां कनिष्ठ वगैरे त्रिगुळांसंबंधीं विधान करणाऱ्या व आक्षेप घेणाऱ्या ब्राह्मण बंधूंनीं कुंदापुर मठाच्या सध्याच्या स्वामींविषयीं पूर्ण विचार करून मग त्रिगुळांना वाटेल तें म्हणावें अशी सर्व त्रिगुळांची इच्छा आहे. पुणें, सातारा, सोलापुर, बेळगांव भागांतील ब्राह्मणांची त्रिगुळांशीं इतर ब्राह्मणांचे शरीरसंबंध होत नाहींत अशी समजूत झालेली दिसते. ती चुकीची आहे, **कारण त्रिगुळ व इतर सर्वशाखीय ब्राह्मण यांजमध्यें शरीरसंबंध होण्यास शास्त्राची किंवा रुढीची आडकाठी नव्हती व नाहीं हें आजपर्यंत झालेल्या अनेक शरीरसंबंधांच्या उदाहरणांवरून सिद्ध होत आहे.** कुंदापुर मठावर सध्यां असलेल्या स्वामींच्या घराण्यांशीं बल्लारी जिल्ह्यांतील कंपली गांवच्या व्यंकोबाराव पाटील व नरसिंगराव पाटील यांच्या घराण्यांचे शरीरसंबंध झाले आहेत. व्यंकोबाराव पाटील व त्यांचे बंधू कृष्णराव पाटील कंपली यांना अनुक्रमें पंगनाम कष्टराव बळ्ळारी व दंडिन कोपरेशराव हरपनहळ्ळी यांच्या कन्या श्री: सौ० तुळसाबाई व सोनुबाई यांना

दिल्या आहेत. व्यंकोबाराव व कृष्णराव हे दोघेहि त्रिगुळ आहेत. ते राघवेंद्र मठाचे शिष्य आहेत. पंगनाम कृष्णराव व दंडिन कोपरेशराव हे दोघेहि वैष्णव असून उत्तरादि मठाचे शिष्य आहेत. व्यंकोबाराव व कृष्णराव यांची माता बेळगांव जिल्ह्यांतील अथणी तालुक्यांतील मलाबाद गांवीं राहणारे गृहस्थ रा. शंकरराव डबळकर यांची कन्या असून सदर शंकररावांची पुतणी ही गणीचे बाबुराव नाईक यांची चुलती आहे. शंकररावांचे आप्तइष्ट आडह्ळ्ळी, बिरुळ वगैरे ठिकाणीं आहेत. तसेंच बाबुराव नाईक यांच्या घराण्याचे गळगली येथील वैष्णव घराण्यांशीं व चिकोडी, रामपूर, यरनाळ इत्यादि बेळगांव जिल्ह्यांतील नान्नज, मंगरूळ वगैरे सोलापुर जिल्ह्यांतील, मेहेकरी, नान्नज, जवळे वगैरे अहमदनगर जिल्ह्यांतील त्रिगुळ घराण्यांशीं शरीरसंबंध झालेले आहेत. **बळ्ळारी व बेंगरूळ जिल्ह्यांत त्रिगुळ व इतर ब्राह्मण हा भेदच नाहीं.** म्हणून तेथें अशा प्रकारचे शरीरसंबंध किती झाले आहेत हें पाहण्यांत अर्थ नाहीं. तेथें असे शरीरसंबंध अनेक झालेले आहेत. **जो त्रिगुळ व्यासराव मठाच्या गादीवर स्वामी म्हणून बसून अनेक शिष्यशाखांवर धर्मराज्य करण्यास अपात्र ठरत नाहीं, तो भोजनशरीरसंबंधास अपात्र म्हणणें हें अज्ञानाचें व अदूरदर्शीपणाचें** लक्षण होय. बळ्ळारी, बेंगळूर म्हणजे दाक्षिणदेशीं त्रिगुळ व इतर हा भेद दिसून येत नाहीं, आणि म्हणूनच तेथले त्रिगुळ स्वामींच्या पीठापर्यंत जाऊं शकतात. बेळगांव, पुणें, सातारा, नगर, सोलापूर इत्यादि जिल्ह्यांतील इतर ब्राह्मणांनीं वरील परिस्थितीचा विचार करून काय तें ठरवावें एवढीच कित्येक ठिकाणच्या आक्षेपकांना केव्हां केव्हां त्रास सोसणाऱ्या त्रिगुळांची नम्र सूचना आहे. धर्म, वेदाधिकार, संस्कार, आहारविहार, आचारविचार, पोषाख इत्यादि मध्यें इतरांशीं एकरूप असलेले लोक केवळ धंद्यामुळें त्रिगुळ नामाभिधान पावतांच भोजन-शरीर-संबंधादि धार्मिक व सामाजिक व्यवहारास पारखे होतात ही कल्पनाच चुकीची आहे.

शाखा व गोत्रें--कृष्ण यजुर्वेदांतर्गत तैत्तिरीय शाखा ही मुख्य शाखा आहे. श्रीवत्स, भारद्वाज, कौशिक, काश्यप, गौतम, हरित, लोहित, इत्यादि गोत्रांच्या मंडळींचा महाराष्ट्र-कर्नाटकांत विशेष भरणा आहे.

आडनांवें—काळे, महाजन, नाईक, कानडे, खोत, शेंडे, देशमुख, देशपांडे, कुळकुर्णी, पाटील, पटवारी, राजपुरोहित वगैरे नांवांशिवाय बहुतेक आडनांवें गांवावरून पडलेलींच फार आहेत.

धर्मकर्में—आपस्तंब सूत्राप्रमाणें स्वशाखीय ब्राह्मणांकडून व स्वशाखीय नसेल तेथें अन्य शाखीयांकडून श्राद्धपक्ष, हव्यकव्यादि सर्व कर्में करून घेतात. देवपूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव हीं नित्यकर्में चालत असून कांहीं कांहीं ठिकाणीं अग्निहोत्रेंही परंपरागत चालत येऊन आजलाहि अस्तित्वांत आहेत. आपस्तंब सूत्राप्रमाणें सर्व कर्में करविणाऱ्या पुरोहितांचीं २५–३० घराणीं असून त्यांपैकीं परळी, पूस, नान्नज, राडी, मंगरूळ, व्याहाळी, बेडकीनागांव, कुंभारी इत्यादि मोंगलाई, नगर व सोलापूर जिल्ह्यांतील घराणीं विशेष प्रसिद्ध आहेत. बेळगांव व विजापूर वगैरे जिल्ह्यांत या तैत्तिरीय शाखेचे आपस्तंब सूत्राप्रमाणें सर्व कामें चालवणारे पुरोहित नाहींत म्हणून या जिल्ह्यामध्यें कित्येक वेळां ऋक् शाखीयांकडून या लोकांना कार्य भागवावें लागतें व अलीकडे ही चालच पडत चालली आहे. याशिवाय दक्षिण कर्नाटकांत पुष्कळ लोक वैष्णव झालेले आहेत. तेव्हां त्यांचे पुरोहितही त्रिगुळ नसलेले अन्य शाखीय व तैत्तिरीय शाखीही ब्राह्मण आहेत. त्रिगुळ म्हणजे कमी असें समजले जाणाऱ्या या आपस्तंब तैत्तिरीय ब्राह्मणांमध्यें हल्लीं चांगलें वेदाध्ययन केलेले पुष्कळ दशग्रंथी ब्राह्मण आहेत.

देवदेवता—व्यंकटेश तिरुपती, महालक्ष्मी कोल्हापूर, श्रीभवानी तुळजापूर, खंडोबा जेजुरी, मैलार मंगमुळी, पालीगांवचा संगमेश्वर–कडपटी, वनशंकरी बदामी, वगैरे मुख्य कुलदैवतें असून ह्याशिवाय राम, कृष्ण, गणपती, शिव, विठ्ठल, दत्त, बलभीम, हीं उपास्य दैवतें आहेत.

धर्मपंथ व मतें—महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक व निजामच्या राज्यांत असणारे लोक बहुतेक स्मार्त शांकरमतानुयायी असून दाक्षिणेकडे वैष्णवपंथी माध्वमतानुयायांचा भरणा विशेष आहे. श्रृंगेरी, संकेश्वर, हंपी इत्यादि स्मार्त व उत्तरादि, राघवेंद्र, व्यासराय वगैरे वैष्णव मठांचे हे शिष्य आहेत.

सण, व्रतें, वैकल्यें, विवाह—हिंदुधर्मांतले महाराष्ट्र, कर्नाटक प्रांतांत प्रचलित असलेले सर्व सण व व्रतें करतात. मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा १० पासून १३ पर्यंत असून रजोदर्शनापूर्वी लग्न करण्याबद्दल कडक निर्बंध पाळतात. महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकांत स्वशाखीयांतच विवाह होत असून अलीकडे अलीकडे कोंकणस्थ व अन्यशाखीयांबरोबरहि कांहीं विवाह होऊं लागले आहेत. आधुनिक पुनर्विवाहाच्या सुधारणेपासून सुदैवानें हे लोक अजून अलिप्त आहेत. विधवाकेशवपनाची चाल फारच कडकपणें पाळली जाते.

धंदा व उदरनिर्वाहाचें साधन:—शेतकी व व्यापार हेच मुख्य व्यवसाय आहेत. पानमळ्याचा धंदा विशेष प्रमाणांत करतात. अलीकडे २०–२५ वर्षांपासून सरकारी नोकरींत शिरून व खासगी पेढ्या वगैरे काढून कांहीं कांहीं लोक पुढें येऊं लागले आहेत.

शिक्षणप्रसार व आरोग्य—शेतकीचा धंदा मुख्य असल्यामुळें खेड्यापाड्यांत विशेष लोकांना रहावें लागतें. त्यामुळें शिक्षणाचा प्रसार फारसा झालेला दिसून येत नाहीं. शहर गावांत राहणाऱ्या लोकांत शिक्षणप्रसार आस्ते कां हाईना पण वाढत्या प्रमाणावर आहे. सुसंघटित प्रयत्न झाल्यास थोडक्या काळांत सुसंस्कृतता वाढण्याची खात्री आहे. विश्वविद्यालयाचे पदवीधर व उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांची संख्या मोठी नाहीं. पुण्याचे वकील रा० माधवराव तारकुंडे यांचे ज्येष्ठ चिरंजीव आप्पासाहेब हे बी. एस्सी. ची परीक्षा पास होऊन उच्च शिक्षणासाठीं ते गेल्या वर्षी विलायतेला गेले आहेत. परदेशांत शिक्षणासाठीं जाणारे हेच पहिले गृहस्थ होत. तसेंच सदर माधवराव यांचे दुसरे चिरंजीव भाऊराव हेहि मॅट्रिक्युलेशनच्या परिक्षेंत पहिले आले व जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळविली. या शिवाय इतर कॉलेजांत १०।१५ विद्यार्थी शिक्षण घेतात. गरीब पण होतकरू विद्यार्थ्यांना द्रव्याभावामुळें व सुसंघटित प्रयत्न करून अशा होतकरू विद्यार्थ्यांना मदत देणाऱ्या सहाय्यक संस्था नसल्यामुळें अभ्यास मध्येंच सोडून पोटामागें लागण्याची पाळी येते. हें एक शिक्षणप्रसार न होण्याचें कारण आहे. शरीरप्रकृति सुदृढ. जातिविशिष्ट रोग नाहीं.

कर्ते पुरुषः—माधवराव तारकुंडे, हायकोर्ट वकील, सासवड–पुणें; विष्णुपंत भिंगे, बी. ए., एल.एल. बी., वकील, पुणें; रामचंद्र बाळकृष्ण हनूरकर, हायकोर्ट वकील, विजापूर; विनायकराव तुळजापूरकर, १ला वर्ग मॅजिस्ट्रेट, पुणें; दत्तोपंत इंदापूरकर, एम. ए., असिस्टंट डेप्युटी ए. इन्स्पेक्टर, अहमदनगर; नारायणराव हवेली, पुणें; तुकाराम नानाजी काळे, शंकर केशव महाजन, प्रल्हाद आबाजी आरणकेले, गोपाळ गोविंद मिरजे इत्यादि लोक मुंबईस प्रसिद्ध वखारवाले आहेत. तसेंच विष्णु तुकाराम नणदीकर, विरुळ; रामचंद्र सखाराम डंबळगर, आडहळ्ळी; बाळकृष्ण बाबुराव मनोळीकर बॅंकर, चिकोडी; बाबाजी शंकर लाटकर, यरनाळ; व्यंकोबाराव पाटील कंपली; नारायणराव नलाजकर मंगरूळ; बाबुराव सुर्डी, सोलापूर; नरहरपंत दबडे, नान्नज; लक्ष्मण नारायण मेहेकरीकर, मेहेकरी (नगर) व हरि त्र्यंबक तारकुंडे, वडनेर, जि. नाशिक, दिगंबर नारायण वडवळकर–बार्शी इत्यादि विविध क्षेत्रांत कर्ती माणसें वावरत आहेत.

सांपत्तिक स्थिति व राहाणी—कांहीं घराणीं चांगलीं संपन्न आहेत. सामान्य जनता मध्यम व कनिष्ठ स्थितींत आहे. दुष्काळ व दारिद्र्याचे परिणाम शेतकीच्या धंद्यावर विशेष झाल्यामुळें ह्यांची राहणी आधुनिक सुधारलेल्या कल्पनेइतकी उच्च नसली तरी साधी पण स्वच्छ असते.

भाषा व स्वभाव—कानडी, मराठी, तेलगू या मुख्य भाषा असून मोंगलाईंत उर्दूहि बोलतात. या लोकांचा स्वभाव विशेष मनमिळाऊ व साधा आहे.

आकांक्षा—धर्म, आचार, विचार, चालीरीति, संस्कार इत्यादि सर्व इतर ब्राह्मणांप्रमाणें असल्यामुळें त्रिगुळांशीं सर्वशाखीय ब्राह्मणांनीं निष्कारण कांहीं तरी खेंकटें न काढीत बसतां त्रिगुळांना एकजीव करून घ्यावें ही एक आकांक्षा आहे. त्रिगुळ हे ब्राह्मण असले तरी ब्राह्मणांच्या मध्यें असलेल्या अनेक पोटजातींप्रमाणें एका पोटजातीचे ब्राह्मण असून कनिष्ठ आहेत अशी पुष्कळ ब्राह्मण लोकांची चुकीची समजूत आहे. ह्या समजुतीनेंच या त्रिगु-

ळांना दूर लोटण्याचें अदूरदर्शी कृत्य ब्राह्मणांकडून होत आहे. पण हें धर्मदृष्ट्या व देशकालपरिस्थितीदृष्ट्या आनिष्ट आहे. म्हणून सुसंघटित प्रयत्न करून लोकांतील ही चुकीची समजूत काढावी हीहि एक या लोकांतील पुढाऱ्यांची इच्छा आहे. **त्रिगुळ ही स्वतंत्र पोटजात नाहीं. त्रिगूळ हें जातिवाचक नांव नाहीं. देशस्थ ब्राह्मणांत व त्रिगुळांत कांहीं-सुद्धां भेद नाहीं.** म्हणून ब्राह्मणसंघटनार्थ पोटजातींचें एकीकरण करावें व राष्ट्रोद्धार व्हावा अशी दुसरी इच्छा आहे. इतर ब्राह्मण व त्रिगुळ यांच्यांत कोणालाही भेद करतां येत नाहीं.

ब्राह्मणांनीं कृषिकर्म करण्यास पराशर स्मृतीचा आधार आहे. शिवाय हल्लीं बहुतेक सर्व ब्राह्मणांनीं जर आपद्धर्म ह्मणून सांगितलेलेच काय परंतु आपत्कालींहि करूं नयेत असे सांगितलेले धंदे जर करण्यास सुरवात केली आहे तर पानमळ्याबद्दल त्रिगुळांवर बहिष्कार घालणें हें न्याय्य नाहीं. **पान-मळ्यामुळेंच या लोकांवर हा आक्षेप आला आहे, असें जातिविवेक ग्रंथांत लिहिलें आहे.** बऱ्याच ठिकाणीं अन्नलग्नव्यवहार असल्याचा उल्लेख वर केलाच आहे. ह्मणून या बाबतींत अर्धवट चाल, (रूढी नव्हे,) असल्यासारखे दिसतें. **रूढी ही 'सागम, दीर्घकाल, निरंतर निरनुक्रोश,** प्रत्यर्थी प्रत्यक्ष अशी असावयास पाहिजे (मिताक्षरा व्यवहाराध्याय) अर्धवट चालीस रूढी ही संज्ञाच शास्त्रीय रीत्या देतां येत नाहीं. शिवाय चुकीची रूढी मोडण्यास शास्त्राधारही आहे. वेदांचें प्रामाण्य निरपवाद आहे. स्मृतींचें तसें नाहीं. कित्येक विकारमूलक स्मृति मानूं नयेत असें "हेतु दर्शनाच्च" ॥ जै. सू. १-३-४ यांत सांगितलें आहे. "वैसर्जनीय होमीयं वासो अध्वर्यु गृण्हाति" ही स्मृति उपाध्यायाच्या लोभमूलकत्वामुळें अप्रमाण होय, असें जैमिनीनें या सूत्रांत व शबर स्वामींनीं त्यावरील भाषणांत स्वच्छ सांगितलें आहे. त्याप्रमाणें पाहतां पराशर स्मृतीनें अनुमोदित कृषिकर्म त्रिगुळांनीं केल्याबद्दल त्यांजवर बहिष्कार घालण्याचा सदाचार (स्मृतीच्या खालचें प्रमाण) अज्ञानमूलक व द्वेषमूलक असल्यामुळें तो अप्रमाण होय. हल्लींच्या संघटनेच्या काळांत असले निराधार आक्षेप पाळण्याची अंधपरंपरा चालवणें हें एकंदरींत ब्राह्मणांच्या

नाशास मदत करण्यासारखें आहे. या त्रिगुळांच्या ब्राह्मण्याबद्दल बऱ्याच शास्त्री मंडळींशीं पत्रव्यवहार करून त्यांचीं मतें मागविलीं आहेत. वेदशास्त्रसंपन्न वामनशास्त्री किंजवडेकर, पुणें; नागेशशास्त्री बेटिगिरी, धारवाड; नारायणशास्त्री मराठे, वांई; सिद्धेश्वर शास्त्री चित्राव पुणें; नरहरशास्त्री घारूळकर, आस्थान पंडित, श्रीशंकराचार्य मठ कोल्हापूर व भारताचार्य श्रीयुत चिंतामणराव वैद्य यांनीं, 'सर्व ब्राह्मणांनीं त्रिगुळांशीं अन्नलग्नव्यवहार करण्यास हरकत नाहीं,' असें स्पष्ट लिहिलें आहे.

प्रकरण ४ थें.

आद्य यजुर्वेदी पंचद्राविड ब्राह्मण

१. मैत्रायणी ब्राह्मण.

पूर्वेतिहास व वास्तव्यस्थानें:—मैत्रायणी व चरक या शाखा निगद यजुर्वेदाचें अध्ययन करितात, म्हणजे या दोन्ही शाखा शुक्ल-कृष्ण भेदाव्यतिरिक्त आहेत. या दोन्ही शाखांचें उत्सर्जन व उपाकर्म वाराहसूत्राप्रमाणें "वर्षासु श्रवणेन स्वाध्यायानुपाकुरुते स जुहोति" या सूत्रवचनाप्रमाणें वर्षाऋतूंतील श्रवण नक्षत्रावर होतें. या दोन शाखांपैकीं मैत्रायणी शाखा खानदेशांत आहे. या शाखेची माहिती चरणव्यूह, पतंजलमहाभाष्य, हेमाद्री, देवीपुराण, श्रीमद्भागवत, वेदविचार, गुरुचरित्र इत्यादि ग्रंथांत सांपडते, त्यावरून आद्य यजुर्वेदांतील ही शाखा असून तैत्तिरीय शाखेशीं हिचें सादृश्य आहे, असे सिद्ध होतें. महार्णव ग्रंथांत या शाखेचें वसतिस्थान सालेरमुल्हेरपासून गुर्जर देशापर्यंत आहे असें वर्णन आहे. सांप्रत ही शाखा नाशिक, येवलें, मालेगांव पूर्व व पश्चिम खानदेशांत भडगांव, नगरदेवळें, धनेर या ठिकाणीं असून बऱ्हाणपूर, जव्हार, भंडारा, नागपूर व शेगांव येथेंही तुरळक वस्ती आहे. लोक-

संख्या सरासरी दीड हजार आहे. या समाजाचें मुख्य केंद्र भडगांव हें होय. या शाखेचे सात भेद सांगितले आहेत. पैकीं मानव व वाराह एवढेच अस्तित्वांत आहेत. मैत्रायणी ब्राह्मण (मानवसूत्री) फक्त महाराष्ट्रांतच आहेत. नंदुरबारकडे वाराहसूत्री आहेत.

आडनांवें—फासे, बल, निशाणदार, कुलकर्णी, जकातदार, देशपांडे, सदावर्ते, बळेल, हनमंते, मोहरीर, अर्कडी, बुड्क, मैदानें, देवळे, नागरदेवळेकर, कनाशीकर, शिंदाडकर, पूर्णपात्रे, भुसारी, भटमुळे, थेडके व्यवहारे, मोडक, मुंठ, दलाल, आर्भाणकर, धारडे, रायते, कवि, जानोरकर पुराणिक, शेंदुरणेकर, जामनेरकर, कुसुभाडकर, महाजन, फटांगळे, भट, दावचवाडकर, देशमुख, पाठक, धटिंग, दिनकर, धनाईत, कुऱ्हे, मोहोडकर, ज्ञानसागर, हिंगे, उपळेकर, पांडे, इत्यादि.

लग्नव्यवहारः—यज्ञकन्याविभाग वर्णन पृ. १८०।१८१ मध्यें विवाहसंबंधाला या शाखेस शाकलशाखा जवळची आहे असें म्हटलें आहे. हारित स्मृतींतही "ऋग्यजुस्तु मैत्रेयः परस्पर विवाहकं" असें म्हटलें आहे. त्यास अनुसरूनच भंडाऱ्याचे विष्णु महादेव जकातदार वकील यांनीं आपली मुलगी कऱ्हाड्यास दिली असून कऱ्हाड्याची मुलगी आपल्या मुलास केली आहे. संघटणदृष्ट्या असले लग्न—व्यवहार अनुकरणीच आहेत. मानवसूत्री मैत्रायणी व वाराहसूत्री मैत्रायणी यांमध्यें परस्पर लग्नव्यवहाराविषयीं प्रयत्न चालू आहेत.

उत्सव, सण, व्रतें व वैकल्यें:—वर्षप्रतिपदा, चैत्रागौरी, रामनवमी, हनुमज्जयंती, अक्षय्यतृतीया, वटसावित्री, चातुर्मास्यांतील एकादशा, संकष्टी, महाशिवरात्र यांचे उपास, गुरुपूजा अगर व्यासपूजा, नागपंचमी, शीतला सप्तमी, श्रावणांतील पहिल्या तीन रविवारांपैकीं एखाद्या रविवारीं, रेणुका उत्सव हा विशिष्ट कुलाचार आहे. रक्षाबंधन, बुध बृहस्पती, जिवत्या, सोमवारचे उपास, मंगळगौरी, गोकूळअष्टमी, हरितालका, गणेशचतुर्थी, महालक्ष्म्या, ऋषिपंचमी, वामनद्वादशी, अनंत चतुर्दशी, महालय, अविधवा नवमी, घटस्थापना, नवरात्राचे उपास, सप्तशतीचे पाठ, क्वचित् होमहवन,

लक्ष्मीव्यंकटेशाचें नवरात्र आश्विनांत असतें, विजयादशमी, कोजागरी, कराष्टमी, आश्विन व॥ ८ ला पुत्रवतीनें रात्रीं, बारा वाजतां चंद्राची पूजा करून मुलांना जेऊं घालणें. धनत्रयोदशी, दिपवाळी, गोवत्सद्वादशी, त्रिपुरी पूर्णिमा, मार्गशीर्षांत खंडोबाचें नवरात्र. तोपर्यंत कांदा व लसूण भक्षकास, कांदे लसूण निषिद्ध समजण्याचा प्रघात आहे. संक्रांत, वसंत पंचमी, रथसप्तमी, हुताशनी, रंगपंचमी, इत्यादि सण, व्रतें, वैकल्यें, व उत्सव, आहेत. चैत्र, श्रावण, मार्गशीर्ष आणि माघ असा, चार वेळां कुलधर्म होतो, तो शुद्ध ८।१४।१५ या दिवसांपैकीं एखाद्या दिवशीं होतो.

कर्तीं माणसें—वे० म० लक्ष्मण वामन भटमुळे भडगांव, रावजी दामोदर अरकडी भडगांव, शंकर बाळकृष्ण जकातदार भडगांव, शंकर लक्ष्मण भटमुळे, विष्णु सदाशिव बुडूख भडगांव, बळवंत वामन मोडक भडगांव, सदाशिव वामन भटमुळे भडगांव, नारायण रामचंद्र भरमुळे भडगांव, ज्योतिर्षी मनोहर यज्ञेश्वर जानोरकर भडगांव, गोविंद विठ्ठल पाठक, अंदरसूल येवलें, शंकर हरी अभोणकर नाशिक, शिवराम रामचंद्र पुराणिक नाशिक, नारायण रामचंद्र पुराणिक नाशिक, जगन्नाथ बाळकृष्ण उपळेकर मालेगांव, विश्वनाथ हरि रायंत पुराणिक नाशिक, वे. शा. काशिनाथ त्र्यंबक पुराणिक जळगांव, विष्णु माधव जकातदार बी. ए. बी. एल. भंडारा, विष्णु जकातदार बार-ॲट-ला, नागपूर.

धर्मपंथ व मतें:—आद्य श्रीशंकराचार्यांच्या अद्वैतमताचे अनुयायी आहेत. मुख्यपीठ शृंगेरी, संकेश्वर, शारदापीठाचे निग्रहानुग्रह चालतात. स्मार्त व भागवत, असे दोन्ही पंथ आहेत, वैष्णव कुणीही नाहीं.

कुल व उपास्यदेवता:—सप्तशृंगी, जेजुरीचा खंडोबा, लक्ष्मीवेंकटेश, कोल्हापुरची अंबाबाई, म्हाळसा, देऊळगांव, बाळाजी, हीं कुलदैवतें आहेत. राम, कृष्ण, विठ्ठल, हनुमान, दत्त, गणपती, हे उपास्य देव आहेत.

प्रसिद्ध गोत्रें:—१ काश्यप २ गौतम भारद्वाज ४ कृष्णात्रेय ५ भार्गव ६ सैंधव ७ शुक्र ८ पाराशर ९ शांडिल्य १० कौशिक ११ वत्स

अवशिष्ट कर्तीं माणसें:—प्रल्हाद वासुदेव भुसारी, बी. ए. एल एल. बी. इंदोर; नरहर वासुदेव भुसारी, बी. ए., एल एल. बी. जळगांव; नारायण रघुनाथ पूर्णपात्रे, चाळीसगांव; काशीनाथ रघुनाथ पूर्णपात्रे, हायकोर्ट वकील, भडगांव; विनायक सदाशिव जकातदार वकील, बी. ए., एल. एल., बी. चाळीसगांव; रामकृष्ण श्रीधर बाग, मेडिकल प्रॅक्टीशनर जळगांव, स. अ. सर्जन; डॉ. जोशी स. अ. सर्जन, बडोदे; राजाराम कृष्ण मुठे वकील, चाळीसगांव; विश्वनाथ विठ्ठल फासे वकील, भडगांव; व्यंकटेश आनंदराव निशाणदार सावकार व ऑनररी मॅजिस्ट्रेट; मनोहर रामचंद्र हिंगे, मालेगांव; रंगनाथ चिमणाजी बाग जहागीरदार, भडगांव; गणेश रघुनाथ पूर्णपात्रे जहागिरदार, भडगांव; गणेश कृष्णाजी मोहरीर, भडगांव; गोपाळ रावजी बळेल, मुंबई; गोपाळ प्रल्हाद मुठे, अमळनेर; दिनकर गणेश मुठे, नाशिक; रंगनाथ अण्णाजी पुराणिक, नाशिक; प्रल्हाद नारायण महाजन; द्वारकानाथ पांडुरंग महाजन वकील, नाशिक; गोविंद पांडुरंग कुलकर्णी, येवले; शंकरराव बापूजी कुलकर्णी, येसगांव; बाबाजी अमृत कुलकर्णी, एरंडगांव; दत्तात्रय लक्ष्मण जोशी, पुणें.

पौरोहित्य—स्वशाखेचे बहुतेक पुरोहित असतात. इतरांना प्रसंगीं बोलाविण्यांत येतें. ऋग्वेदी ब्राह्मण किंवा हिरण्यकेशी ब्राह्मण हा पौरोहित्याला पसंत पडतो. याचें कारण मैत्रायणी ब्राह्मणांची म्हणणी हाताची नाहीं. त्यांचे स्वर हिरण्यकेशी ब्राह्मणांशीं जास्त जुळतात. निर्वाहच नसेल तर शुक्ल यजुर्वेदी बोलावतात. पुराणिक, भटमुळे, कारकर्डा, जोशी, उमळेकर, फांसे, फटंगळे, हीं घराणीं पौरोहित्याबद्दल प्रसिद्ध आहेत. येवलें, भडगांव, मालेगांव, आभोपा, चांदोरी, आंदरसूर, नागमाठाणें इत्यादि ठिकाणीं ग्रामजोशांच्या वृत्त्या आहेत.

धर्मकर्में—पंचद्राविड षट्कर्माधिकारी ब्राह्मणांप्रमाणें सर्व धर्मकर्में होतात. गर्भाधानादि-अंत्येष्टीपर्यंत सर्व संस्कार, श्राद्धपक्ष, हव्य, कव्य, वास्तुशांत, उदकशांत, श्रावणी, इत्यादि धर्मकर्में होतात.

शिक्षण—५।७ चांगले वैदिक, २०।२५ याज्ञिक १०।१५ पुराणिक, ५।७ ज्योतिषी, ४।२ वैद्य इत्यादि मंडळी जुन्या विद्येमध्यें निष्णात आहेत.

नव्या विद्येंत ७।८ पदवीधर, १ बॅरिष्टर, दोन डॉक्टर असे आढळतील. दिवसानुदिवस जुन्या शिक्षणाकडे कल कमी होत असून नव्याकडे प्रवृत्ति वाढत आहे. समाज शिक्षणांत साधारणपणें मागासलेलाच आहे. स्त्रियांत साक्षरतेचें प्रमाण वाढत आहे. मॅट्रिक झालेल्या स्त्रिया १।२ आहेत. पुरुषांत निरक्षर एकहि नाहीं. समाज साधारणतः जुन्याला चिकटणारा आहे परंतु नवीं शिकलेलीं माणसें प्रगतिप्रिय आहेत.

धंदा व सांपत्तिक स्थिति—सरकारी नोकरी, खासगी नोकरी, व्यापार, शेती, वकीली, डॉक्टरी या धंद्यांत हे लोक आहेत. पूर्वी सांपत्तिक स्थिति चांगली होती. हल्लीं मध्यम प्रकारची आहे. पावसामुळें शेती व इतर अन्य कारणांमुळें सावकारी बुडूं लागल्यामुळें सांपत्तिक स्थिति मध्यम प्रकारची आहे. सामान्यतः खाऊन पिऊन लोक बरें आहेत इतकेंच ह्मणतां येतें.

राहाणी—दिवसानुदिवस खेड्यांतील लोकांना शहराकडे जाण्याची जरूर भासत आहे. त्यामुळें राहाणी व्यवस्थित, स्वच्छ व टापटिपीची होत आहे.

स्वभाव—भोळसर, आदरातिथ्यशील, पापभीरु, आणि दीर्घसूत्री असा आहे; कारण पूर्वी एक मोठा यज्ञ झाला त्या यज्ञाला मैत्रायणी ऋषी बरेच उशीरां गेले. तो उशीराचा आनुवंशिक गुण अद्याप या समाजांत आहे. हा समाज फार कंजुष नाहीं, तरी पण खर्च बेताबातानेंच होतो. मायाळुपणा मनाचा मोकळेपणा, हे या समाजाचे विशिष्ट गुण आहेत.

महत्त्वाकांक्षा—ऋग्वेदी, देशस्थ, आश्वलायन, अथवा कऱ्हाडे यांच्यांशीं बेटीव्यवहार करून समरस होण्याची इच्छा व महत्त्वाकांक्षा आहे. तशा सोयरिकी होत आहेत. कऱ्हाडे हे मारक, घातक आहेत, अशी यांची समजूत नाहीं. 'काण्वाः प्राणघातकाः' अशी ह्मण ह्या समाजात आहे. यजुर्वेदी माध्यंदिन किंवा वाजमाध्यंदिन यांच्यांशीं एकरूप होण्याची या जातीची इच्छा नाहीं. त्यांचे आचार, विचार, उच्चार यांना आवडत नाहींत. यजुर्वेद्यांतील **णकार**वर्जत्व पाहून हे विनोदानें म्हणतात " यजुर्वेदी वाणी श्रवणिं पडता त्रासाचि गणा। गनानांत्वा आनि, गनपति इनायेकचि म्हना ॥ " मैत्रायणींचे सात भेद आहेत.

वाराहसूत्री नंदुरबारकडे आहेत. ते दूरचे वाटतात याचें कारण सहवास नाहीं हें होय. चरक वाराहसूत्री, व वामनसूत्री मैत्रायणी यांची म्हणणी अगदीं सारखी आहे, हाताचे स्वर नाहींत, या स्वशाखीयांस आपल्या बरोबरीचे करावे असें मैत्रायणी ब्राह्मणांना वाटतें. कऱ्हाड्यांशीं विवाह होत आहेत. नागपूरचे माधवराव पाध्ये यांच्यांशीं सोयरीक झालेली आहे.

लग्नाची पध्दति—ब्राह्म विवाह आहे. हुंडा घेतात. मातुलकन्या-परिणय नाहीं. गोत्रप्रवराचा विचार होतो. विवाहाचे वेळीं १२ ते १६ वधूचे वय असतें. विधुरविवाह होतो.

विधवा--पुनर्विवाह झालेला नाहीं व मान्य नाहीं. केश-वपनाची प्रवृत्ति कमी दिसत आहे. विकल्पच दृष्टीस पडतो.

आरोग्य—ज्ञातिविशिष्ट रोग नाहीं. आरोग्य चांगलें आहे. खेड्यांत आरोग्य विशेष चांगलें; त्या मानानें शहरांत कमी. इतर ब्राम्हणांप्रमाणें स्त्रियांत बाळंतरोग, क्षयरोग आणि बालमृत्यु यांचें प्रमाण पूर्वीच्या मानानें बरेंच वाढत आहे.

अन्नव्यवहार—हा समाज पूर्णपणें शाकाहारी आहे. शहरांत सर्व षट्कर्माधिकारी सत्‌ब्राह्मण्यवान् ब्राम्हणांशीं अन्नव्यवहार होतो. खेड्यांमध्यें मधून मधून ग्रामण्याचीं खुसपटें निघतात व पंक्तिपावनत्वाचा वाद उद्भवतो.

तीर्थे व पवित्र स्थानें—चार धाम, बारा ज्योतिर्लिंगें, सप्तपुऱ्या आणि सर्व हिंदूंचीं तीर्थे व पवित्रस्थानें यांना पूज्य मानून यात्रा करण्याचीहि चाल आहे.

पंक्तिपावनत्वाचा वादः—पूर्वी कांहीं मत्सरग्रस्त मंडळींनीं काढला होता. त्या वेळीं मैत्रायणी ब्राह्मणांनीं आपला अर्ज श्रीशंकराचार्य मठ संकेश्वर व द्वारकापीठ या उभयतांकडे करून आपणांबद्दलचा साक्षीपुरावा गोळा करून तो वाद जिंकला. पूर्वीचे ते वाद विस्तृत आहेत व छापून प्रसिद्ध आहेत. पीठानें नेमलेल्या विद्वन्मंडळाचा अभिप्राय व पीठाचे निर्णय—यजुर्वेदाच्या त्यांयशीं

शाखांपैकीं मानवसूत्री मैत्रायणी शाखा आहे. हिरण्यकेशी, सत्याषाढी, आपस्तंबी, बौद्धायनी शाखेप्रमाणें या शाखेचे ब्राह्मण द्राविडांतर्गत असून ते पंक्तिपावन आहेत. या शाखेच्या ब्राह्मणांच्या आचारविचारांसंबंधानें कांहीं अल्प सुद्धां भेद दिसत नाहीं. या शाखेच्या ब्राह्मणांशीं इतर शाखेच्या ब्राह्मणांचा पंक्तिव्यवहार व भोजनव्यवहार हे चालू आहेत. तथापि अलीकडे भडगांवांत बखेडा माजला आहे. मैत्रायणी समाजातर्फे श्रीमहासंस्थानास आलेले वे रा. वा. पु. आकडी व भय्याशास्त्री पूर्णपात्रे, वास्तव्य भडगांव, यांनीं श्रीद्वारकामठाधीशांपुढें अर्ज-द्वारां १७।१०।०८ रोजीं विनंति केली. त्यावरून श्रीद्वारकामठाधीशांनीं सतत ९ महिने पूर्ण चौकशी करून जो शेवटीं निर्णय दिला आहे तो आम्हांस मान्य आहे. मैत्रायणी शाखेच्या प्रतिपक्षांपैकीं कोणी रूढीचा आक्षेप घेतात असें दिसून येतें. पण हा आक्षेप भडगांवकरांनीं व इतरांनीं सांगितल्यावरून व्यर्थ ठरतो. शिवाय या रूढीस शास्त्रप्रमाण दाखविलें गेलें नाहीं. एकंदरींत विचार करून श्रीशारदापीठ संस्थान द्वारकामठ मु. डाकोर यांनीं आश्विन वद्य ८ शके १८३० रोजीं निर्णय दिला तो असा—मैत्रायणी शाखा दूषित नाहीं. त्या शाखेचें अध्ययन करणार अर्जदार पंचगौड नसून पंचद्राविडच आहेत. तद्धस्त—याचित अन्नभोजन व त्यांच्यांशीं पंक्तिव्यवहार द्राविडांपैकीं इतर शाखीय सर्व ब्रह्मवृंदांनी करण्यास शास्त्र व रूढी यांचा वाद नाहीं, अशी आज्ञा करण्यांत येते. श्रीपीठ शृंगेरी यांनींहि चैत्र शु. १ शके १८३३ रोजीं निर्णय दिला आहे तो असा—मानवसूत्री मैत्रायणी शाखा आद्य यजुर्वेदांतर्गत असून पंच-द्राविडांपैकीं आहे. या शाखेच्या ब्राह्मणांशीं इतर शाखीय ब्राह्मणांनीं अन्नव्यव-हार करण्यास कोणत्याही तऱ्हेचा बाध नाहीं.

२. यजुर्वेदी चरकशाखीय ब्राह्मण

वैदिक इतिहास—यजुर्वेदस्य षडशीति भेदा भवन्ति ॥ तत्र चरकानाम् द्वादश भेदा भवन्ति ॥ चरकाः आव्हरकाः कठाः प्राच्यकठाः कपिलाकठाश्चारायणीया वारायणीया वार्तांतवेयाः श्वेताः श्वेततरा औपमन्यवः पातांडनीया मैत्रायणीयाश्चेति ॥'' (चरणव्यूह खंड २).

यजुर्वेदाचे ८६ भेद आहेत; त्यांत उपरिनिर्दिष्ट चरकनामक मुख्य १२ भेद आहेत. त्यांत चरकशाखा ही आद्य आहे. शुक्ल आणि कृष्ण हे भेद ह्या शाखेला लागूं नाहींत. कारण व्यासशिष्य वैशंपायन व त्यांचे शिष्य याज्ञवल्क्य त्या दोघांच्या भांडणानंतर शुक्ल व कृष्ण हे भेद उपस्थित झाले, व ते कसे उपस्थित झाले ह्याची आख्यायिका श्रीमद्भागवत १२ स्कंध, अध्याय ६४, विष्णुपुराण अंश ३ अध्याय ५ यांत दिलेली आहेच. या आख्यायिकेवरून विदित होतें कीं, वमन केलेला वेद ग्रहण करणारे ते कृष्ण यजु व याज्ञवल्क्यानीं सूर्यापासून आणलेला वेद पठण करणारे शुक्ल यजु होत. या शुक्ल व कृष्ण भेदाचें प्रत्यंतर असें आहे कीं, "चतुर्दशीयुक्तपूर्णिमाग्रहणात् शुक्लयजुः। प्रतिपदायुक्त पूर्णिमा ग्रहणात् कृष्णयजुरिति" (चरणव्यूह भाष्य–खंड ३). ह्याला शुक्ल म्हणण्याचें कारण असें कीं, हा माध्यान्हसूर्यदत्त म्हणून व दुसरें, त्या शाखेंतील ब्राह्मण वेदोत्सर्जनाख्य कर्माला चतुर्दशीला प्रारंभ करून त्याची समाप्ति पूर्णिमेला करितात आणि ही पूर्णिमा शुक्ल पक्षांतील शेवटची तिथि असल्याकारणानें शुक्लयजुर्वेद अशी संज्ञा देण्यांत आली. आतां कृष्ण म्हणण्याचें कारण असें कीं, कृष्णयजुर्वेद शाखेंतील ब्राह्मण वेदोत्सर्जनाख्य कर्माला पूर्णिमेला प्रारंभ करून त्याची समाप्ति प्रतिपदेला करितात आणि ही प्रतिपदा कृष्णपक्षांतील असते. ह्यावरून लक्ष्यांत येईल कीं, उपरिनिर्दिष्ट शुक्ल-कृष्ण-भेद हा वैशंपायनदत्त निगदाख्य मूळ यजुर्वेदाला लागूं नाहीं व म्हणूनच चरक गणांतील वाराह व मानवसूत्रांत "वर्षासु श्रवणेन स्वाध्यायाऽनुपाकुरुते स जुहोति" या वचनाप्रमाणें वर्षाऋतूंतील श्रवण नक्षत्रीं वेदोत्सर्जनोपाकरण करण्यास सांगितलें आहे. तात्पर्य असें कीं, वैशंपायनदत्त निगदाख्य यजुर्वेदाध्यायी चरक ही आद्यशाखा आहे व ती शुक्ल किंवा कृष्ण भेदव्यतिरिक्त आहे.

वेदशाखा व सूत्र—वैशंपायनदत्त निगदाख्य मूलयजुर्वेद, चरकशाखा; ह्या शाखेचीं धर्मकर्में मानवसूत्राधारें होतात, परंतु क्वचित् ठिकाणीं वाराह सूत्र देखील प्रचलित आहे.

मूलदेश, वास्तव्यस्थानें व संख्या--या शाखेचें मूलस्थान मयूरपर्वतापासून दक्षिण गुर्जर देशापर्यंत होतें. तेथून ही शाखा कारणपरत्वें भोंसल्यांच्या स्वारीबरोबर निझामचा प्रांत, वऱ्हाड प्रांत, मध्य प्रदेश या ठिकाणीं गेली. हल्लीं ही शाखा निझाम प्रांत, वऱ्हाड प्रांत, व मध्यप्रदेश या ठिकाणीं विस्तृत आहे. लोकसंख्या जवळजवळ २००० पर्यंत आहे.

धर्मकर्मै व पौरोहित्य—गर्भादानादि उद्वाहान्त संस्कार, श्रौत स्मार्तादि कर्मै या शाखेंत वेदोक्त पद्धतीनें होतात. पौरोहित्य स्वशाखीयांकडूनच होतें. या शाखेंत कांहीं मंडळींनीं अग्निहोत्रदीक्षा कांहीं दिवसांपूर्वी घेतली होती व दहा वर्षांपूर्वी रुद्रस्वाहाकार यज्ञही केला होता. या शाखेस मैत्रायणी शाखा जवळ आहे. चरकांचे स्वशाखीय पुरोहित सांप्रत कमी झाले आहेत. म्हणून मैत्रायणी शाखेच्या पुरोहिताकडून धर्मकर्मै करून घेण्यांत येतात. मैत्रायणी पुरोहितांजवळ शिकून कांहीं चरक मंडळी तयार होत आहेत.

व्रतें, वैकल्यें व सण—व्रतें, वैकल्यें हीं सर्व चतुःशाखीय ब्राह्मणांप्रमाणें पाळलीं जातात. व्रतांमध्यें या शाखेंत महाशिवरात्र, एकादशी, वटसावित्री, गणेशचतुर्थी इत्यादि सर्वच पाळलीं जातात. चैत्रप्रतिपदेपासून फाल्गुनी अमावास्येपर्यंत सर्व सण होतात. रामनवमी, गोकुळाष्टमी, दत्तजयंती, बालाजीचें व देवीचें नवरात्र वगैरे सर्व उत्सव होतात. श्रीमंत बुटी घराण्यांत गोकुळाष्टमीचा उत्सव पूर्वापार चालत असून तो मोठ्या थाटानें करण्यांत येतो व सतत नऊ दिवसपर्यंत चतुःशाखीय ब्राह्मणांचीं सहस्रभोजनें होतात.

कुलदैवतें—शंकर, राम, कृष्ण, दत्त, गणपति, नृसिंह, बालाजी, देवी इत्यादि.

गोत्रें—वशिष्ठ, पाराशर, काश्यप, गौतम, विश्वामित्र, भारद्वाज, शांडिल्य, कौंडिण्य, भार्गव, मुद्गल, वत्स इत्यादि.

उपनांवें--बुटी, विन्ने, अहके, झिंजरडे, गान, नरके, पंध्ये, नाजबिले, वांईकर, नानोटी, जोशी, भांबुरकर, देव, बऱ्हाणपुरे, डोंगरे, एकताटे, झाडकर, गुळवी, तिडके, इंगळे, कोहळे, गारसे, पोटफोडे, कोके, लांबकाणे, धुपे,

चिखलीकर, दापूरकर, शृंगारकर, पावडे, भालेराव, चौथे, दुरुगभार, कांडेरे, भाटवणकर, कुळकर्णी इत्यादि.

धर्मपंथ व मतें—श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या पीठाला पूज्य मानतात. स्मार्त व भागवत हे दोन्ही सांप्रदाय चालतात.

आहार—अपेय-पान व अभक्ष्य-भक्षणाची मुळींच चाल नाहीं. सर्व समाज शाकाहारी आहे.

राहाणी व आरोग्य—महाराष्ट्रिय जुन्या व नव्या पद्धतींची राहाणी असून आरोग्य चांगलें आहे.

स्वभाव—धर्मशील, आदरातिथ्यशील, श्रद्धाळू व स्वाभिमानी.

विधवा—विधवा-विवाहाची मुळींच चाल नाहीं व केशवपनाचा प्रघात आहे.

सांपत्तिक स्थिति—मध्यप्रांतांतील बहुतेक समाज सुखवस्तु असून मालगुजार व जमीनदार आहे. बुटी घराणें कोट्यधीश असून तें नागपुरांतील प्रमुख श्रीमंत घराण्यांत मोडतें. वऱ्हाड व मोंगलाईंतील लोकांकडे जोसपणाचीं व पांडेपणाचीं वतनें असून प्रत्येकाकडे थोडीबहुत शेती आहे. मध्यप्रांतांतील कांहीं लोक मोठमोठ्या हुद्यांच्या सरकारी नोकरीवर आहेत. पांडे, कुलकर्णी व जोशी मंडळी अनुक्रमें आपलीं वतनें व वृत्त्या गहाण ठेवून कर्ज काढतात व लग्नाकार्यांत अस्ताव्यस्त खर्च करितात. शिक्षणाभाव व जुन्या रूढींचा प्रभाव यामुळें बरींच घरें खालावत चाललीं आहेत.

शिक्षण—शाखेंतील प्रत्येक व्यक्ति साक्षर आहे. समाजांत ज्याप्रमाणें कांहीं याज्ञिक, वैदिक, पुराणिक, शास्त्री व हरिदास आहेत, त्याप्रमाणेंच पाश्चात्य शिक्षणांत पुढें आलेले पदवीधर, वकील, डॉक्टर, वैद्य, प्रोफेसर व शिक्षकही आहेत. स्वशाखीय विद्यार्थ्यांची शिक्षणोन्नति व्हावी म्हणून एक फंडही उभारला गेला आहे.

विद्यमान् कर्ती माणसें—रावबहादूर श्रीमंत आबासाहेब बुटी ऑनररि मॅजिस्ट्रेट, श्रीमंत दाजीसाहेब बुटी ऑनररि मॅजिस्ट्रेट, श्रीमंत केशवराव

बुटी, अध्यक्ष बोर्ड ऑफ डायरेक्टरर्स, पुलगांव मिल, श्रीमंत पूर्णचंद्रभय्या बुटी सावकार व जमीनदार, श्रीमंत सदाशिवराव बुटी सावकार व जमीनदार, श्रीयुत भास्करराव विघ्ने ॲडिशनल डिस्ट्रिक्ट अन्ड सेशन्स जज्ज, प्रोफेसर गणपतराव नरके, एम्. ए. एम्. एस्. (मँचेस्टर) जिऑलॉजिस्ट ॲन्ड मायनिंग एन्जिनिअर, एंजिनिअरिंग कॉलेज, पुणें, श्री. यादवराव डाके रिटायर्ड ई.ए.सी., श्री० आनंदराव झिंजरडे हायकोर्ट वकील, श्री० बळवंतराव पंध्ये सुपरिंटेंडेंट सिव्हिल सेक्रेटरीएट नागपूर, डॉ. गोविंदराव डोंगरे, प्रायव्हट प्रॅक्टिशनर, प्रोप्रायटर सेंट्रल मेडिकल स्टोअर्स व सेक्रेटरी मेडिकल असोसिएशन, नागपूर, वे. शा. सं. बापूजी गुळवीशास्त्री उमरावती, श्री० बापूजी बऱ्हाणपुरे, स्वार्थत्यागी मुकुंद श्रीकृष्ण पंध्ये, श्री० जयकृष्ण श्रीधर लामकाणे सावकार.

विवाह—ब्राह्म विवाह रूढ आहे. १० ते १५ व २० ते २५ हीं अनुक्रमें वधूवरांची वयोमर्यादा आहे. मातुलकन्यापरिणय नाहीं. **हुंड्याची चाल मुळींच नाहीं.** या शाखेंतील बुटी घराण्याशीं एका कृष्ण यजुर्वेदी कोंकणस्थ सहस्रबुद्धे घराण्याचा शरीरसंबंध झाला आहे. तसेंच पंध्ये घराण्याशीं एका नंदुरबारकर मैत्रायणीय शाखेंतील वाराहसूत्री घराण्याचा शरीरसंबंध झाला आहे.

आकांक्षा—समाज प्रगतीच्या मार्गावर चालला आहे. सर्व तऱ्हेनें समाज उन्नत व्हावा अशी इच्छा आहे. ब्राह्मणसंघटण व पोटजातींचें एकीकरण होऊन राष्ट्रोद्धार व्हावा व धर्मोद्धार व्हावा अशी या समाजाची महत्त्वाकांक्षा आहे.

प्रकरण ५ वें

ऋग्वेदी शाकलशाखीय ब्राह्मण.

अखिल महाराष्ट्रांत शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मणांच्या खालोखाल ऋग्वेदी ब्राह्मणांची संख्या आहे. महाराष्ट्रांत ऋग्वेदाची शाकल शाखाच अस्तित्वांत आहे. देवरुखे व चित्पावन ब्राह्मणांमध्यें पुष्कळ ब्राह्मण या शाखेचे आहेत. पण

त्यांची माहिती कृष्ण यजुर्वेदी हिरण्यकेशी शाखेंत तिसऱ्या प्रकरणांत दिली असल्यामुळें या प्रकरणांत देशस्थ स्मार्त, वैष्णव, क्रमवंत, कऱ्हाडे, भट्टप्रभु, जवळ व गोवर्धन येवढ्या ब्राह्मणांची माहिती देण्याचें योजिलें आहे.

१. देशस्थ स्मार्त ब्राह्मण

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण वर्ग हा महाराष्ट्रांत सर्वत्र आहे. महाराष्ट्रांत यजुर्वेदी ब्राह्मण येण्यापूर्वी हा ब्राह्मणवर्ग बाहुल्यानें अस्तित्वांत होता. हा ब्राह्मणवर्ग उत्तरेकडून महाराष्ट्रांत घुसला किंवा तेलंगण-कर्नाटकांतून वर आला तें समजत नाहीं. पुष्कळ तेलंगी ऋग्वेदी स्मार्त ब्राह्मण महाराष्ट्रांत येऊन तद्रूप झाले आहेत. दे. भ. माधवराव अणे यांचें मूळ अन्नंवार घराणें तेलंगणांतीलच होय. उत्तरेकडे बहुतेक गौड ब्राह्मण आहेत व ते यजुर्वेदी आहेत असा एक समज आहे. तो खरा मानला तर ऋग्वेदी ब्राह्मण वरून खालीं खास आले नाहींत असें म्हणतां येतें. ही ब्राह्मणजात मान्य ब्राह्मणांत मोडते. ह्या ब्राह्मणांच्या उत्पतीबद्दल निंदाव्यंजक माहिती कोठेंहि नाहीं. इतर ब्राह्मण यांना चांगलीच मान्यता देतात. पौरोहित्य व जोसपण यांच्या सनदा या जातींत पुष्कळ आढळतात. देशमुखी, देशपांडेगिरी, जोसपण व कुलकर्णीपण करणारी फार प्राचीन घराणीं या जातींत आहेत. इतिहाससंशोधनाच्या दृष्टीनें महत्त्वाचे कागदपत्र या घराण्यांत मिळतात. सद्यःस्थितींत अग्निहोत्र चालविणारे श्रौतविद्यानिष्णात ब्राह्मण या जातींत आहेत गोत्रप्रवर, गृह्यसंस्कार उत्सव, सण, व्रत–वैकल्यें, धर्मकर्में यांची अविच्छिन्न परंपरा या जातींत आहे. व्रतें, वैकल्यें, कुलधर्म, कुलाचार या प्रीत्यर्थ सढळ हातानें खर्च करण्यांत येतो. खंडोबा, व्यंकोबा, म्हाळसा, अंबाबाई हीं मुख्य कुळदैवतें आहेत. या जातीच्या धर्मकर्मांतील विशिष्ट चाली पाहिल्या तर त्यापासून इतिहाससंशोधनांत भरच पडेल. कार्यप्रस्थांत गोंधळ घालण्याची आणि नवरात्रांत व इतर कुलधर्माचे वेळीं अस्पृश्य सुवासिनींना वाढून देण्याची चाल आहे. कार्यप्रस्थांत अठरापगड जातींचा त्यांच्या घरीं या ना त्या रूपानें संबंध येतो. याचें कारण पुष्कळ घराणीं इनामदार, वतनदार, जहागीरदार अशा इतमामाचीं आहेत हें होय. देशस्थ ब्राह्मणांत सर्वत्र शाकाहार रूढ आहे.

अपवाद म्हणून कांहीं व्यक्ती कांहीं अखाद्य खात असल्या तरी संबंध जातीवर तो आरोप करतां येणार नाहीं.

देशस्थ ब्राह्मणांच्या पंक्तीला इतर सर्व ब्राह्मण बसतात. मात्र देशस्थ ब्राह्मण चित्पावनाला शिष्टाचाराव्यतिरिक्त धर्मकर्मांत भोजनास फारसे सांगत नसत. देशस्थ ब्राह्मणांमध्यें एक मोठें शास्त्रीय वैगुण्य आहे, त्याकडे पाहून इतर ब्राह्मण नाकें मुरडतात, इतकेंच नव्हे, तर उत्तरेकडील ब्राह्मण दाक्षिणी ब्राह्मणांना याच कारणामुळें कमी समजतात. तें वैगुण्य म्हटलें म्हणजे मातुल-कन्यापरिणय हें होय. मातुलकन्यापरिणय हा मान्य अनाचारांत घातल्यामुळें देशस्थ ब्राह्मणांत मामेबहीण व भाऊ आणि मामा व भाची यांचीं राजरोस लग्नें होतात. बहीण आपली मुलगी सख्ख्या भावाला देते. जी मुलगी पूर्वी 'मामा मामा' म्हणून ज्याला हाक मारी तोच पुढें तिचा नवरा होतो ! ! हा संकोच सापिंड्याच्या दृष्टीनें चुकीचा आहे. अर्थात् शास्त्रविरुद्ध असलेल्या या चालीमुळें या ब्राह्मणांना इतर ब्राह्मण हलके समजतात. सुप्रजाजननशास्त्राच्या दृष्टीनें ह्यांत कांहीं वैगुण्य आहे कीं काय तें आम्हांला ठाऊक नाहीं. परंतु शास्त्रदृष्टीनें हें वैगुण्य आहे व संघटनेच्या दृष्टीनें हा दोष आहे. मामेबहीण व भाऊ आणि मामा व भाचींच्या लग्नानें संकोच होऊं लागला तर इतर तुल्यबल, तुल्याचार, तुल्यसंस्कृतियुक्त ब्राह्मणाशीं यांचे लग्नसंबंध कसे होणार? या क्षेत्रसंकोचामुळें कांहीं विशिष्ट घराण्यांचे आपापसांत पांचपन्नास वर्षें सारखे उलटसुलट संबंध घडत आहेत ह्मणून त्याबाहेर जाण्याचा प्रसंगच येत नाहीं. देशस्थांत स्थळें मिळत नाहींत असें नाहीं; परंतु संख्या थोडी अशी स्थिति नसतां हा संकोच होत आहे याचा विचार देशस्थ ब्राह्मणांनीं करावा अशी विनंति आहे.

२. वैष्णव ब्राह्मण.

पूर्वेतिहास—देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण स्मार्त व भागवत पंथी अद्वैत मतानुयायीआहेत. परंतु यांमध्यें परमार्थमतमूलक व उपास्यमूलक एक भेद आहे. तो म्हटला म्हणजे वैष्णव ब्राह्मणवर्ग हा होय. माध्वमतानुयायी ब्राह्मण कर्नाटकांत जास्त आहेत. तेथून कांहीं ब्राह्मण महाराष्ट्रांत आले असावेत किंवा येथील कांहीं ब्राह्मणांचें वैष्णवीकरण अर्वाचीन काळीं झालें असावें. वैष्णव ब्राह्मण

आचारविचारांत अधिक कडक व सोवळे. सांप्रत उपासनावैशिष्ट्यामुळें इतरांना कमी समजण्याची प्रवृत्ति या ब्राह्मणवर्गांत आहे. सांप्रत वैष्णव ब्राह्मणांच्या खऱ्या-खोट्या आख्यायिका सोवळ्याबद्दल ऐकूं येत नाहींत. तथापि शूरपार्ली, गलगली, ऐनापूर या भागाकडील वैष्णव सांगलीमिरजेकडे आले कीं, स्मार्तांच्या दगडावर पाणी टाकून धुतात किंवा स्नानास बसतात! वैष्णव ब्राह्मण उपासनाग्रहामुळें पूर्वी स्मार्तांशीं लग्नव्यवहार करीत नसत. अलीकडे हा बदल होऊं लागला आहे. पूर्वेतिहास विशेष मिळत नाहीं. तथापि श्रीमन्मध्वाचार्य यांच्या अवतारापासून वैष्णवांची प्रगति विशेष झाल्यासारखी दिसून येते. या गोष्टीस अजमासें ७०० वर वर्षे झालीं असतील. या पूर्वीही ते होतेच असें इतिहासावरून दिसून येतें. भारतांतही याजबद्दल कांहीं ठिकाणीं उल्लेख आढळतो. हा पंथ आगमोक्त पांचरात्र नारायणीय उपासनेचा अनुयायी आहे.

वास्तव्यस्थानें—वैष्णव समाजाचें वास्तव्य कर्नाटकांत विशेष आहे. ह्यांची वस्ती बेंगलूर, म्हैसूर, श्रीरंग, कुंभकोण, हैद्राबाद, मद्रास, मंगलूर, राजमहेंद्री, बिझवाडा, कडपा, गुंतूर, बल्लारी, बेळगांव, धारवाड, विजापूर व सोलापूर या ठिकाणीं आहे. कोल्हापूर, सातारा, पुणें, नगर, नाशीक, वऱ्हाड इत्यादि ठिकाणींही तुरळक आहे.

पोटभेद—या समाजांत आरवत्त, वक्कल, कर्नाटक, देशस्थ, सह्वासी, कण्वशाखा, तिगल व तुळव वगैरे भेद आहेत; कऱ्हाडे वैष्णव थोडे आहेत. तुळव वैष्णव ब्राह्मण उडपी प्रदेशांत फार आहेत. ते खेरीज करून इतर पोटभेदांतील वैष्णव ब्राह्मणामध्यें अन्नव्यवहार होतो. तुळवांशींही उडपीच्या पंचक्रोशींत अन्नव्यवहार होतो. परंतु त्यांच्यामध्यें लग्नव्यवहार होण्याची चाल नाहीं. वैष्णवसमाजाचें मतस्थापक श्रीमन्मध्वाचार्य यांचा जन्म श्रीक्षेत्र उडपीनजीक झाला असून ते तुळव ब्राह्मण होते अशी आख्यायिका आहे. असें असून तुळवांशीं अन्न-व्यवहार कां होत नाहीं हें समजत नाहीं. परंतु अलीकडे उडपीचे स्वयंपाकी चहूंकडे पसरल्यामुळें हा निर्बंधही शिथिल होत चालला आहे.

वेदशाखा—वैष्णव समाजांत ऋग्वेदी व कृष्ण यजुर्वेदांतर्गत तैत्तिरीय आपस्तंब शाखेचे लोकच प्राय: आहेत. ऋग्वेदी शाकलशाखीय फार आहेत.

सामवेदी ब्राह्मणही थोडे आहेत. वांईचे श्रीनिवासाचार्य यांचें घराणें सामवेदी आहे.

गोत्रें--विश्वामित्र, भारद्वाज, गौतम, जमदग्नि, वसिष्ठ, सांख्यायन-अगस्ति, काश्यप, कौंडिण्य इत्यादि गोत्रें आहेत.

आडनांवें--या समाजांत आडनांवें फार कमी. तीं फार करून त्यांच्या त्यांच्या गांवावरून अगर धंद्यावरून पडलेलीं दृष्टोत्पत्तीस येतात.

धर्मपंथ व मतें--वैष्णव समाजाचे द्वैतमतस्थापक मुख्याचार्य श्रीमन्मध्वाचार्य हे असून यांना पूर्णप्रज्ञाचार्य व आनंदतीर्थ इत्यादि प्रसिद्ध नांवें आहेत. वैष्णवसमाज सर्व त्यांचाच अनुयायी आहे. त्यांच्यानंतर पुढें व्यासरायमठ, राघवेंद्रस्वामीमठ हे पोटमतस्थापक झाले आहेत. या दोन्ही मठांचे अनुयायी या समाजांत बरेच आहेत. षोडश संस्कार, श्राद्धपक्ष वगैरे नित्य नैमित्तिक धर्मकर्मे विशेष श्रद्धेनें होतात. सोंवळें ओवळें या समाजांत फार पाळलें जातें.

कुलदेवता व उपास्य दैवतें--श्रीविष्णु, श्रीकृष्ण, श्रीवेंकटेश, श्रीविठ्ठल, श्रीनरसिंह, कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजाभवानी, बनशंकरी इत्यादि आहेत. वैष्णवांचें गुरुदैवत (मुख्यप्राणदेव) मारुती आहे. यांस रुद्राचा अवतार मानतात. शिवोपासना गुरुभावानें करितात. हा वैष्णव व श्रीवैष्णव यांत मुख्य भेद आहे. श्रीवैष्णव शिवाचें नांवही घेत नाहींत !

व्रतें-वैकल्यें--श्रीमन्मध्वाचार्यांचे अनुयायी एकादशी, विष्णुपंचक, हनुमतव्रत, गोकुलाष्टमी, ऋषिपंचमी, अनंतव्रत, नवरात्र, गौरी वगैरे व्रतें करणारे आहेत. या समाजांतील शिष्ट मंडळी चातुर्मास्यांतील शाखाव्रत पाळतात.

पुरोहित--पुरोहित व उपाध्ये वंशपरंपरागत आहेत. कोणी वाटल्यास नवेही करतात.

आहार-वैष्णव समाज अगदीं शाकाहारी आहे.

शिक्षण--हा समाज बहुतेक सुशिक्षित आहे. वेद व शास्त्राध्यायन करणारी वैदिक मंडळी ठिकठिकाणीं आढळतात व अशा पाठशाळाही आहेत.

वेदाध्ययनापेक्षां शास्त्राध्ययनाकडे कल जास्त आहे. बरीच मंडळी नवीन पदवीधर झालेली आहेत. कांहीं तरुण मंडळी परदेशास अभ्यासाकरितां गेलेली आहेत. स्त्रीशिक्षण कमी आहे.

भाषा—कानडी विशेष आहे. मराठी तुंगभद्रेच्या उत्तरेस फार करून सर्वांस समजते व कित्येकांस बोलतांही येते. कांहीं लोक तेलगू व तामील बोलतात. पुणें, सातारा, कोल्हापूर इकडील वैष्णव लोकांना मराठीच येतें.

विवाह—वैष्णव समाजांत जे पोटभेद आहेत त्यांच्यामध्यें आपापसांत शरीरसंबंध करण्याचा संप्रदाय कमी आहे. तथापि असा लग्नव्यवहार न करण्याबद्दल शास्त्राधार मिळत नाहीं. वैष्णवांचे शरीरसंबंध देशस्थ स्मार्तांशीं पुष्कळ झालेले आहेत, परंतु कऱ्हाडे ब्राह्मणांशीं झालेलें उदाहरण क्वचित्! ब्राह्मणांतील इतर पोटवर्गांशीं शरीरसंबंध न करण्याबद्दल शास्त्राधार मात्र आढळत नाहीं व **मठाधिपति स्वामींनीं उपवर्गांशीं शरीरसंबंध करूं नये म्हणून स्पष्ट आज्ञा दिलेलीही आढळून येत नाहीं.** समाजांत विधवावपन विशेष पाळलें जातें. सकेशा स्त्रियांना बहिष्कार घातला जातो. पुनर्विवाह या समाजांत अशास्त्रीय मानले आहेत व होतही नाहींत.

उदरनिर्वाहाचीं साधनें—सरकारी नोकरी, शेतकी, वकीली, वैद्यकी हे मुख्य धंदे आहेत. व्यापार करणारेही क्वचित् आहेत. थोडे वैदिक ब्राह्मण पुराण सांगून व व्रतवैकल्यें करून उपजीविका करतात.

आरोग्य—या समाजांतील लोक साधारण निरोगी असून प्रकृति सुदृढ असते. परंतु या समाजांत तालीम करून शरीरसंपत्ति वाढविणारे फारच कमी आहेत. यांची राहाणी स्वच्छ आहे. परंतु व्यवस्थितपणा कमी.

स्वभाव—मनमिळाऊ, श्रद्धाळू, आदरातिथ्यशील, स्वाभिमानी व उदार आहे. परंतु आळस व अव्यवस्थितपणा जास्त प्रमाणांत दिसून येतो. परिस्थितीशी झगडण्याची वृत्ति कमी !

सांपत्तिक स्थिति—या समाजाची सांपत्तिक स्थिति वाखाणण्याजोगी नाहीं. क्वचित् इनामदारांचीं घराणीं श्रीमान् आहेत. हातावर पोट भर-

णारे लोकच फार आहेत. गरीब लोकांची संख्या बरीच आहे. क्वचित् शुल्कवृत्ति करून उपजीविका करितात. श्रीमंत व्यापारी असे लोक फार कमी. दिवसानुदिवस या समाजाची स्थिति खालावत आहे. या समाजांत धार्मिक कार्यांत व इतर सामाजिक कार्यांमध्यें खर्च विशेष करण्याची रूढी पडली असून त्यामुळें कांहीं लोक कर्जबाजारी झाले आहेत. खर्च करण्यामध्यें शिस्त नाहीं.

लोकसंख्या—नक्की आंकडा कळत नाहीं, तथापि एक लक्ष असेल असें वाटतें.

यात्रास्थळें—श्रीबदरी, काशी, रामेश्वर, तिरुपति, कोल्हापूर, मंत्रालय, मळखेड, उडपी, पंढरपूर इत्यादि.

महत्त्वाकांक्षा—या समाजाची सामाजिक महत्त्वाकांक्षा इतर समाजाबरोबर सर्वसाधारण जाण्याची आहे. धर्मसंबंधीं महत्त्वाकांक्षा बाळगणारीं माणसें फारच कमी आहेत. गतानुगतिकताच जास्त आहे. कर्तीं माणसेंही या समाजांत बरींच होऊन गेलीं आहेत व हल्लींही थोडीं आहेत. स्थलसंकोचास्तव नांवें देण्याची आवश्यकता दिसत नाहीं.

३. सहवासी वैष्णव

वैष्णव समाजांत वर लिहिल्याप्रमाणें वरील नांवाचा एक पोटभेद आहे. हा पोटभेद पूर्णांशानें वैष्णवाशीं तुल्यबल आहे. परंतु हा समूह अद्याप थोडा स्वतंत्र असल्यामुळें ह्या समूहाची माहिती स्वातंत्र्यानेंच देणें इष्ट आहे.

पूर्वेतिहास व वास्तव्यस्थानें—देशस्थ सहवासी ब्राह्मण हे मूळचे जुन्या कर्नाटक देशांतील आहेत. टिपू सुलतानाच्या वेळीं किंवा त्या आगेमागें हे ब्राह्मण वर सरकले आहेत असें दिसतें. श्रीरामचंद्राच्या सहवासांत हे ब्राह्मण दंडकारण्यांत होते म्हणून सहवासी, किंवा आचार्य सहवासांत होते म्हणून सहवासी किंवा सह्याद्रीच्या जवळचे म्हणून सह्यवासी अशी व्युत्पत्ति सांगतात. सहवासीचा अपभ्रंश सव्वाशें असा आहे. पण त्याला कागदोपत्रीं आधार नाहीं. हे सर्व वैष्णव आहेत ही गोष्ट कर्नाटकांतील त्यांच्या वास्तव्याला उपोद्बलक अशी आहे. एक संशोधक इतिहासज्ञ असें म्हणतात कीं,

हे कोंकणस्थ असावेत ! परंतु 'ब्राह्मणोत्पत्ति मार्तंड' या ग्रंथांत त्यांची गणना कर्नाटक ब्राह्मणांत केली आहे. यांचा समाज चोहोंकडे थोडा थोडा वाटला गेला आहे. कोल्हापूर, कऱ्हाड, मिरज, सांगली, अथणी, कागल, हावेरी, म्हैसूर, हुबळी, अध्वनी या ठिकाणीं त्यांची वस्ती आहे. हावेरी, कऱ्हाड, कोल्हापूर, या ठिकाणीं त्यांची संख्या बरीच आहे. इतरत्र तुरळक दहापांच घरें या प्रमाणांत आहेत.

लोकसंख्या—जास्तींत जास्त एक हजार संख्या सहवासी देशस्थ ब्राह्मणांची असावी.

वेदशाखा—ऋग्वेदी शाकलशाखीय सहवासी ब्राह्मण आहेत. आश्वलायन गृह्यसूत्राधारें त्यांचीं धर्मकर्में होतात. दोन तीन कुटुंबें कृष्ण यजुर्वेदी आहेत.

धर्मपंथ व मतें—देशस्थ सहवासी ब्राह्मण वैष्णव आहेत. श्री० राघवेंद्रस्वामींचा मठ हें गुरुस्थान होय. तो मंत्रालय या क्षेत्रीं आहे. हें क्षेत्र तुंगभद्रा स्टेशन नजीक आहे. उडपी, व्यासराय व राघवेंद्र या तीनही मठांशीं यांचा संबंध आहे. शृंगेरी मठांतहि जातिविषयक प्रश्न सोडविले जातात. वरील तीन मठांशीं सहवासी ब्राह्मणांचा अन्नव्यवहार राजरोस होतो, इतर मठांतले थोडेसे कुरकुरतात. तप्त-मुद्रा-धारण हा ऐच्छिक विधि आहे. मद्रास इलाख्यांत १०।१५ स्मार्त सहवासी ब्राह्मण आहेत.

गोत्रें व आडनांवें—उपमन्यू, भारद्वाज, कौशिक, वासिष्ठ गौतम, वृषवण, श्रीवत्स, भार्गव व लौगाक्ष इत्यादि गोत्रें. शिराळकर, सापकर, कोल्हापुरे, जांबळे, सरडे, धोपाटे, वाघमारे, अथणीकर, शिखरे, कातगडे, करनाटकी, कोटबागे, भुरे, लोखंडे, महाजन, बिंदुरकर, चिपडे, इंकर, नखाते, कानडे, गुत्तल, चवटी, हिरेमणी, देवगडे, अष्टपुत्रे, दास इत्यादि आडनांवें आहेत.

देव-दैवतें—गिरीचा व्यंकटेश, उडपीचा श्रीकृष्ण, धोम आणि कोळे नरसिंगपूर येथील नृसिंह हीं मुख्य कुलदैवतें आहेत. पालीचा खंडोबा हें पुष्कळांचें कुलदैवत आहे. हावेरीचे नखाते पाली येथें दरसाल येतात. हा

समाज वैष्णव आहे, तथापि सोमवारचे उपास व पार्थिव पूजा हीं पुष्कळ घरांत आहेत. कोल्हापूरची अंबाबाई हें पुष्कळांचें कुलदैवत आहे. आश्विनांत जसें देवीचें नवरात्र तसेंच मार्गशीर्षांत खंडोबाचें नवरात्र असतें. व्यंकटेश व श्रीकृष्ण यांच्या समाराधना आणि राघवेंद्रस्वामींचे उत्सव या गोष्टी विशेष समजल्या जातात. राघवेंद्र स्वामींचा उत्सव मिरज व हावेरी येथें मोठ्या थाटानें होतो.

धर्मकर्में—हा ब्राह्मण समाज षट्कर्माधिकारी असून त्यांचा अंत-र्भाव पंचद्राविडांत होतो. अतएव गर्भादानादि अंत्येष्टीपर्यंत सर्व संस्कार श्राद्ध, पक्ष, हव्य, कव्य, इत्यादि वैदिक धर्मकर्में होतात.

पौरोहित्य—सहवासी ब्राह्मणांत भिक्षुकांची संख्या अत्यल्प आहे, म्हणून कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे ब्राह्मण यांचें पौरोहित्य करितात. सरडे, जांबळे हीं घराणीं पूर्वीं वेदविद्येंत चांगलीं निष्णांत होतीं. जांबळे व सरडे घराण्यांतील वैदिक ब्राह्मणांना श्रीराजाराममहाराज यांजकडून कऱ्हाड जवळ सैदापूर गांवीं मिळालेली अग्रहाराची जमीन अद्याप त्या घराण्याकडे चालू आहे. जांबळे घराणें तर सच्यसाची होतें. १७६० सालीं पेशव्याबरोबर लढाईवर गेलेल्या ब्राह्मण सरदारांत जांबळे यांचें नांव असून ५०० सैन्य घेऊन गेल्याचा उल्लेख पारसनिसांच्या यादींत आहे. कऱ्हाडच्या गिजरे घराण्यांतील एका सत्पुरुषाच्या पूजेचा मान जांबळ्यांकडे आहे. कोळे नरसिंगपूर येथील उत्सवमुहूर्त बसविण्याचा मान वाघमारे व शिखरे यांकडे आहे. कोल्हापुरे यांचें घराणें चांगलें वैदिक ह्मणून प्रसिद्ध होतें. त्यांना धारवाड जिल्ह्यांत त्याबद्दल इनाम मिळालें आहे. म्हैसूर येथील दास घराणें वैदिक असून श्रीमारुतीपूजेबद्दल त्यांना उत्पन्न आहे. तिकडे हें मोठें मान्य घराणें आहे.

धंदा व सांपत्तिक स्थिति—सराफी, सावकारी, जमीनदारी हे मुख्यतः धंदे आहेत. नखाते यांना टिपु सुलतानच्या वेळीं इनाम मिळालें आहे. नखाते यांनीं वैष्णव मठाला अग्रहार दिले आहेत. सावकारी, सराफी हे पूर्वींचे धंदे आहेतच. शिवाय वकील, डॉक्टर, शिक्षक या क्षेत्रांत हा समाज

बराच पुढें जात आहे. सरकारी नोकरीच्या क्षेत्रांतहि कांहीं लोक पडत आहेत. खाजगी व्यापारी नोकऱ्यांत बरेच लोक आहेत. मूळची राहाणी स्वच्छतेची आणि उच्च दर्जाची असल्यामुळें कांहीं घरें सोडून दिल्यास इतरांची सांपत्तिक स्थिति बरी आहे. नवीन राहाणीला पुरेसा पैसा पुष्कळांना मिळत नाहीं. इतर ब्राह्मणांप्रमाणें या जातींतील कांहीं घराणीं दरिद्री आहेत.

शिक्षण---कांहीं तरुण मंडळी शिक्षणांत आधुनिक क्षेत्रांत पुढें येत आहेत. तथापि कांहीं कुटुंबांचें दारिद्र्य, कांहींचें सराफी आणि सावकारी यामुळें फाजील स्वास्थ्य आणि क्षेत्रसंकोचामुळें मुलामुलींचीं लवकर लग्नें करण्याची आपत्ती यामुळें शिक्षणांत जोराची प्रगति दिसत नाहीं. अलीकडे वकील, डॉक्टर, शिक्षक असे कांहीं होत असले तरी ते वरील कारणत्रयीच्या कोंडींतून मोठ्या मारामारीनें वर आले आहेत असेंच म्हटलें पाहिजे. शिक्षणाचें प्रमाण वाढत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. सहवासी ब्राह्मणसमाज हा जुन्या प्रवृत्तीचाच असल्यामुळें वैष्णवी आचारविचार कडकपणें पाळण्यांत येतात. नवीन प्रागतिक मताला समाजाची फारशी अनुकूलता दिसत नाहीं. तथापि त्यांतील नवसुशिक्षित, सुबुद्ध आणि समजुतदार वर्ग प्रगतिप्रिय आहे. स्त्रीशिक्षण फारसें नाहीं. लग्नाच्या वेळीं मुलीच्या साक्षरतेची चौकशी होत असते म्हणून स्त्रीशिक्षण वाढत आहे. समाजांत निरक्षर पुरुष क्वचितच आढळतील.

राहाणी—उच्च, स्वच्छ, टापटिपीची आढळते. दारिद्र्याचा परिणाम राहाणीवर होतो. खेड्यांतील राहाणीहि चांगली असते.

महत्त्वाकांक्षा—सहवासी ब्राह्मणांची सामाजिक महत्त्वाकांक्षा इतर तुल्यबल ब्राह्मणांशीं तद्रूप होऊन जाण्याची आहे. कारण आचार, संस्कार, आहार, व्यवहार इत्यादि बाबतींत हे ब्राह्मण कोणत्याही दृष्टीनें कमी नाहींत व तसा त्यांना आत्मप्रत्यय वाटत आहे. कर्नाटकांत देशस्थांशीं बुद्धिपुरःसर दहापंधरा विवाह घडून आल्याचें पुढें लिहिलेंच आहे. महाराष्ट्रांत इतर सर्व तुल्यबल ब्राह्मणांशीं आपले शरीरसंबंध व्हावेत, असें या समाजाला वाटणें साहजिक आहे. ब्राह्मणांची संघटना व्हावी व त्याद्वारें ब्राह्मण्य-रक्षण होऊन राष्ट्रोद्धार व्हावा अशी या समाजाची महत्त्वाकांक्षा आहे.

व्रतें वैकल्यें, सण व उत्सव—चैत्र शुद्ध १ ते फाल्गुनी पौर्णिमे-पर्यंतचे सर्व सण, नरसिंह, राम, कृष्ण, हनुमान, दत्त या जयंत्या, चैत्रा व भाद्रपदा गौरी, वटसावित्री, हरतालिका, ऋषिपंचमी, अक्षय्यतृतीया, महाएका-दश्या, शिवरात्र, श्रावणांतील बुधबृहस्पति, जिवंत्या, सोमवार, शनिवार, आश्विनी आदित्यवार, कार्तिकी सोमवार, तुलसीविवाह, इत्यादि सर्व व्रतें या समाजांत आहेत.

स्वभाव व अन्न—सहवासी ब्राह्मणांचा स्वभाव सभ्य, स्वास्थ्यप्रिय व सौम्य असा आहे. एकंदरीत स्वभाव मितव्ययी, मितभाषी आणि आतिथ्यशील आहे. व्यापारी क्षेत्रांतहि धडाडीचा अभाव दिसतो. सहवासी ब्राह्मण शाकाहारी आहेत. कांदा लसूण निषिद्ध मानतात.

लग्नसंबंध व आरोग्य—गेल्या चारपांच वर्षांत बंगलूरकडे सहवासी ब्राह्मणांचे व देशस्थ ब्राह्मणांचे दहाबारा लग्न-संबंध झाले आहेत, आणि ते समजून उमजून झाले आहेत. हे संबंध असेंच वाढत जाणें इष्ट आहे. सहवासी ब्राह्मणांत क्षेत्र संकोचामुळें मातुलकन्या परिणय तर होतोच होतो; परंतु **मामा व भाची यांचींहि लग्नें होत आहेत.** समाज थोडा म्हणून लग्नें न होतील या भीतीनें लवकर लवकर लग्नें करतात. या समाजांत मुलें जास्ती व मुली कमी अशी स्थिती आहे. म्हणून चांगल्या घराण्यांतील मुलगे अविवाहित आढळतात. पहिल्या लग्नाच्या मुलांना जेथें मुली मिळत नाहींत तेथें विधुर विवाहाचा प्रश्नच नको! दारिद्र्याचा परिणाम जसा संततीवर होत आहे तसा क्षेत्र संकोचाचाहि होत आहे. कोठें शारीरिक व बौद्धिक दोषहि संततीमध्यें आढळत आहेत. इतर ब्राह्मण जातीप्रमाणें या जातीचा ही ऱ्हास होत आहे. ज्ञातिविशिष्ट असा कोणताच रोग नाहीं. या जातीस विधवा-विवाह संमत नाहीं. एकहि पुनर्विवाह झालेला नाहीं.

कर्तीं माणसें—समाजाची संख्या अवघी १ हजार आहे. क्षेत्रसंकोच, दारिद्र्य, जुने संस्कार इत्यादि अडथळे असले तरी या सहवासी ब्राह्मण समाजांत बरींच कर्तीं माणसें आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. चिपडे या घराण्यानें

सराफींत चांगलाच लौकिक मिळविला आहे. हुबळीचे गुत्तल वकील पहिल्या प्रतीचे वकील म्हणून प्रसिद्ध आहेत. नवीन पिढींतील वाघमारे व राघुअण्णा थोपाटे वकील (कऱ्हाड) आणि सोनोपंत शिराळकर मिरज ही वकील मंडळी चांगलीच पुढें येत आहेत. शिराळकर घराण्याचा लौकिक औदार्य, दातृत्व, सौजन्य, आणि दाक्षिण्य या बाबतींत विशेष आहे. कऱ्हाडचे श्री० पांडुअण्णा शिराळकर यांचे आचारनिष्ठा, आदरातिथ्य, सार्वजनिक कार्यप्रेम, शिक्षणाबद्दल आस्था हे गुण प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रांत अशी संस्था क्वचितच आढळेल कीं, जिला अल्पस्वल्प मदत श्री. पांडुअण्णा शिराळकर यांनीं केलेली नाहीं. संपत्ति व तिचा योग्य विनियोग हा गुण यांच्या प्रमाणें इतर श्रीमंतांमध्यें आला तर चांगलें होईल. मिरजेचे शिराळकर एके काळीं नगरशेट होते व दक्षिणेंतील संस्थानिकांना कर्ज देत होते. श्री० काकासाहेब व अण्णासाहेब यांनीं आपल्या घराण्याची पूर्वींची परंपरा राखिली असून भावी पिढीहि राखील असा भरंवसा वाटतो. श्री० जांवळे, कोल्हापुरे, शिखरे, पुंडलीकजी इत्यादि नवी मंडळी शिक्षण व सार्वजनिक कार्य या क्षेत्रांत सर्वांची बरोबरी करीत आहेत.

अन्नव्यवहार:—वैष्णवांपैकीं श्रीराघवेंद्रस्वामी मठ व उत्तरादि मठ यांच्यामधील तंट्यांचा परिणाम या वर्गावर वारंवार होऊन त्यांच्याबद्दलच्या कुत्सित दंतकथा रूढ झाल्या. त्यामुळें कांहीं वैष्णव व स्मार्तहि या ब्राह्मणांशीं कांहीं दिवसांपूर्वीं अन्नव्यवहार करीत नसत. परंतु शिक्षणाच्या परिणामामुळें ती दंतकथा आतां अविश्वसनीय वाटूं लागली आहे. हल्लीं कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे यांच्या बरोबर भोजन-प्रतिभोजन-व्यवहार होतो. सुमारें आठ वर्षां-पूर्वीं सहवासी ब्राह्मणांशीं भोजनव्यवहार करण्यास महाराष्ट्रांतील नव्या जुन्या विद्वानांनीं सम्मति दिली. पंडित नारायणशास्त्री मराठे, महादेवशास्त्री दिवेकर, श्रीधरशास्त्री पाठक, बाळाचार्य गजेंद्रगडकर, अशांच्या त्या संमतिपत्रावर सह्या आहेत. पुष्कळ देशस्थ वैष्णव ब्राह्मणांनीं ती मान्यता व्यवहारांत दाखविली आहे. सारांश, या पोटजातीशीं कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे इत्यादि जातींचा अन्नोदकव्यवहार सर्वांशीं होतो असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. सहवासी

ब्राह्मणांबद्दलची दंतकथा आतां पुरुषांना अविश्वसनीय वाटते, इतकेंच नव्हे तर ती स्त्रियांनांही तशी वाटूं लागली आहे हें विशेष लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

गतवर्षी मिरजेच्या शिराळकरांच्या घरीं श्रीयुत महादेव शास्त्री दिवेकर यांचा विवाह झाला. दिवेकरांशीं संबंध असलेली जुन्या विचारांची कोंकणस्थ घराणीं सिद्धये, काळे, गोखले, सोहोनी, गद्रे, रिसबूड, आपटे, करमरकर, नेने, फडके, जोशी हीं कार्यानिमित्त मिरजेस आली होतीं. दिवेकर-शास्त्र्यांच्या ८० वर्षांच्या वृद्ध मातुश्रीपासून तों आठ वर्षांच्या मुलीपर्यंत सुमारें ५० बायका शिराळकरांच्या घरींच त्यांच्या घरच्या २०–२५ बायकांत इतक्या मिसळल्या होत्या कीं, तेथें कोंकणस्थ व देशस्थ हाहि भेद आढळत नव्हता. पुरुष मंडळी समजुतदार असते. परंतु स्त्रियांनींहि या कार्यांत उभय-पक्षीं इतका समंजसपणा दाखविला कीं, सहवासी ब्राह्मण म्हणून कोणी एक पोटजात जणुं नाहींच असें कृतीनें सिद्ध केलें. सारांश सहवासी ब्राह्मणांसंबंधाचा अन्नव्यवहाराचा प्रश्न सुटल्यासारखा आहे. फक्त लग्नव्यवहाराचा प्रश्न सुटला कीं काम संपलें.

४. क्रमवंत ब्राह्मण

अष्टागरांत क्रमवंत या नांवाचा एक लहानसा ब्राह्मणसमूह आहे, तो ऋग्वेदी शाकलशाखीय देशस्थ ढुल्लू घराण्याचा विस्तार होय. अष्टागरांतील ढुल्लू-क्रमवंत व गोमांतकांतील किरवंत यांचा अर्थाअर्थी कोणत्याहि तऱ्हेचा संबंध नाहीं. क्रमवंतांचें मूळ स्थान जोगाईचें आंबें हें होय. दुर्गादेवीच्या भयंकर दुष्काळांत ढुल्लू घराण्यांतील चार पुरुष जोगाईच्या आंब्याहून निघाले. त्यांपैकीं एक अष्टागरांत आला, तो क्रमांत अध्ययन केलेला असल्यामुळें त्याला व त्याच्या वंशजांना क्रमवंत या विद्वत्तादर्शक नांवानें संबोधूं लागले. याच मूळ पुरुषाचा क्रमवंत घराणीं हा विस्तार होय. क्रमवंतांनीं आपल्या विद्वत्तेच्या जोरावर अष्टागरांत सुमारें २५० गांवांच्या उपाध्येगिरीच्या वृत्त्या मिळविल्या होत्या. आंग्र्यांचे हेच कुलगुरु व धर्माधिकारी होते. अष्टागरांतील ढुल्लू-क्रमवंतांचे देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे या तीनही

ब्राह्मणजातींशीं शेकडों वर्षांपासून शरीरसंबंध झाले आहेत. हें टुल्लू घराणें देशस्थ असल्यामुळें प्राचीन किंवा अर्वाचीन कोणत्याही ग्रंथांत यांच्याबद्दल स्वतंत्र पणें माहिती दिली नसल्यास नवल नाहीं. यांचा इतर सद्ब्राह्मणांशीं अन्नलग्न-व्यवहार नेहमीं चालत असतो आणि ब्राह्मणांत दिसून येणारे उत्सव, सण, व्रतें, संस्कार, धर्मकर्में वगैरे सर्व आचार या समाजांत उज्ज्वलतेनें चालत आहेत. क्रमवंतामध्यें टिल्लू, मुळेकर, क्रमवंत, खांदेरकर, पुराणीक, अशीं आडनांवें आहेत.

गोमांतकांतील किरवंत व अष्टागरांतील क्रमवंत हे एकच समजून यांच्यावर पूर्वीं ग्रामण्यें झालीं आहेत. हीं ग्रामण्यें कमी अधिक प्रखरतेनें दीडशें वर्षें सारखीं धुमसत होतीं. ग्रामण्याच्या निराकरणासाठीं सभा होऊन, क्रमवंतांना शिष्ट ब्राह्मणांचीं संमतिपत्रें व पेशव्यांचीं आज्ञापत्रें मिळालीं व प्रत्येक चौकशीच्या वेळीं क्रमवंतांचाच सत्पक्ष सिद्ध झाला आहे. तरी अजूनही कित्येक लोक त्यांना किरवंत शब्द वापरून त्यांच्या सद्ब्राह्मण्याबद्दल अल्पांशानें कां होईना पण संशय प्रकट करूं पहातात ही त्यांची कशी चूक आहे, हें पुढील ग्रामण्यप्रकरणावरून समजेल.

ग्रामण्यप्रकरण—एकदां नागांवचे हरभट्ट लेले हे कांहीं कामाकरितां गोमांतकांत गेले होते. तेथील किरवंत जातीचा इतर सत्ब्राह्मणांशीं अन्नव्यवहार होत नाहीं, हें पाहून पुढें अष्टागरांत परत आल्यावर क्रमवंत सुद्धां त्या किरवंतांपैकींच असावे काय असा त्यांनीं संशय प्रगट केला. क्रमवंतांच्या वृत्तीवर डोळा ठेवणाऱ्यांना तेवढेंच फावलें. शेवटीं हें प्रकरण इतकें विकोपास गेलें कीं क्रमवंतांबद्दलची संशयनिवृत्ती होईपर्यंत त्यांच्याशीं अन्नोदकव्यवहार बंद राहावा असा श्री० कान्होजी आंग्रे यांच्या समक्ष ठराव करण्यांत आला. ग्रामण्यांतून मुक्त होण्यासाठीं क्रमवंतांनीं आपले गोत्रपुरुष पुणतांबें, नाशिक, त्र्यंबकेश्वर वगैरे ठिकाणीं होते त्यांचीं पत्रें आणविलीं. गोमांतकांत चक्रचूडामणी सामंत यांजकडे सहस्रचंडी अनुष्ठान चाललें होतें तेथें सहस्रावधि जमलेल्या ब्राह्मणसमूहाचें संमतिपत्र, तेथील किरवंतांचें संमतिपत्र व हरभट्ट लेले

यांच्या चिरंजीवांचें संमतीपत्र कुलाब्यास आणिलें. पण या पुराव्याचा कांहींएक उपयोग न झाल्यामुळें त्यांनीं सातार्‍यास शाहूछत्रपतींकडे गार्‍हाणें केलें. हा ब्राह्मणांचा विषय असल्यामुळें त्यांनीं मुद्गलभट्ट पंडीतराय यांस आज्ञा केली कीं श्रीबाळाजीपंत प्रधान हे माहुली संगमीं महानुष्ठान करीत आहेत, तेथें जमलेल्या ब्रम्हवृंदांकडून याचा निर्णय व्हावा. क्रमवंतांजवळचा सर्व पुरावा नीट पाहून जमलेल्या ब्रह्मवृंदांनीं शके १६४१ सालीं त्यांस संमतीपत्रें दिलीं व त्यांचा बहुमानपूर्वक गौरव करून त्यांची पाठवणी केली. परंतु पेशव्यांनीं व इतर ब्राम्हणांनीं क्रमवंतांशीं अन्नव्यवहार केला नव्हता एवढ्या सबबीवर पुन्हां अष्टागरांतील ब्राह्मण अडून राहिले. पुन्हां क्रमवंतांनीं पंढरपुरांत पेशवे होते, तिकडे जाऊन तेथें दाद मागितली. पेशव्यांनीं शिष्टासहवर्तमान त्यांच्याशीं अन्नव्यवहार करून पुन्हां आज्ञापत्र दिलें कीं, क्रमवंतांशीं सर्वांनीं अन्नोदक-व्यवहार पूर्वीप्रमाणें चालू ठेवून त्यांच्या वृत्त्या त्यांच्या हवालीं कराव्या. अशा रीतीनें क्रमवंतांचा व्यवहार सुरळीत चालू झाला. पुढें एकदां कल्याणामध्यें रामचंद्र दिक्षीत जोगळेकर यांच्या येथें समाराधना होती. त्या वेळीं क्रमवंत पंक्तींत होते म्हणून अष्टागर प्रांतस्थ चौघे ब्राह्मण पंक्तीमधून उठून गेले. ही गोष्ट पेशव्यांना कळल्यावर त्या चौघां ब्राह्मणांना राजाज्ञा मोडल्याबद्दल निबंधोक्त प्रायश्चित देण्यांत आलें. नंतर कुलाब्यांत तडागोत्सर्ग करण्यांत आला त्या वेळीं श्री. आंग्रे यांनीं समस्त ब्राह्मणांना पाचारण करून क्रमवंतांच्या बाबतींत ज्यांना श्रीमंतांची आज्ञा मान्य नसेल त्यांनीं पुण्यास जाऊन उलट पत्र आणावें असें निक्षून सांगितल्यावरून शके १६९२ सालीं सर्व ब्राह्मणांनीं पुन्हां एकदां संमत्तीपत्र लिहून दिलें. त्या संमत्तीपत्रावर अष्टागरांतील प्रमुख २२२ ब्राह्मणांच्या सह्या आहेत. अशा रीतीनें हें ग्रामण्यप्रकरण कायमचें मिटलें.

खुद्द अष्टागरांत पेशव्यांच्या अव्वल अमदानींत क्रमवंतांचीं सात आठशें घराणीं असतां, ग्रामण्याच्या वणव्यांमध्यें क्रमवंत होरपळून निघाले, व कित्येक कर्ते पुरुष स्थानत्याग करून परदेशीं गेल्यामुळें आज अष्टागरांत फक्त पांचपन्नास घराणींच शिल्लक राहिलीं आहेत. क्रमवंत घरण्यांतील लोक

आजही मुंबई, ठाणें, इंदूर, पुणें, बडोदें, त्र्यंबकेश्वर इत्यादि ठिकाणीं राहात आहेत. क्रमवंतांच्या लोकसंख्येच्या मानानें त्या समाजांत बरेच आंग्लविद्याभूषित लोक असून, स्त्रियांनाही थोडेंबहुत शिक्षण देण्याकडे प्रवृत्ति आहे.

कर्तीं माणसें:—वे० शा० संपन्न रघुनाथभट्ट क्रमवंत व बालकृष्ण भट्ट क्रमवंत हे गागाभट्टाबरोबर श्रीशिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकास काशीहून आले होते. अष्टागरांतून रघुनाथ क्रमवंत, वीरेश्वर क्रमवंत व जनार्दन क्रमवंत असे त्रिवर्ग आले होते. पेशवाईच्या अस्तास वे० शा० संपन्न जगन्नाथ शास्त्री क्रमवंत हे महाविद्वान पुरुष महाराष्ट्रांत गाजत होते. सांप्रत रा० गणेश दामोधर टिल्लू M. A., अलिबाग येथील हायस्कूलचे सुपरिन्टेन्डन्ट, रा० दत्तात्रय विठ्ठल टिल्लू वकील, रा० मुकुंदराज जनार्दन मुळेकर मुंबई, रा० त्रिंबक विनायक टिल्लू मामलेदार, रा० भास्कर रावजी टिल्लू स्टेट सर्जन जत, रा० जगन्नाथ रावजी टिल्लू ग्रन्थकार, रा० हरी केशव टिल्लू इत्यादि कर्तीं माणसें या समाजांत आहेत.

विशेष संस्मरणीय गोष्ट—अष्टागर प्रांतस्थ देशस्थ टुल्लू क्रमवंतांचे चित्पावन, देशस्थ, कऱ्हाडे ब्राह्मणांशीं शेंकडों विवावसंबंध झालेले आहेत. म्हणून अष्टागर प्रांतांतील या क्रमवंत ब्राह्मणांची निराळी जात समजण्याचें मुळींच कारण नाहीं किंवा यापुढें स्वतंत्र माहिती देण्याचेंहि प्रयोजन नाहीं.

५. कऱ्हाडे ब्राह्मण

बृहन्महाराष्ट्रांत कऱ्हाडे ब्राह्मणांची मान्य ब्राह्मण जात आहे. यांची वस्ती कोंकण, देश, मध्यप्रांत, वऱ्हाड, बडोदें, हैद्राबाद, झांशी, इंदूर, ग्वाल्हेर अशा सर्व भागांत आहे. चित्पावनांप्रमाणें या जातीचा इतिहासहि सुसंगत मिळत नाहीं. कऱ्हाडे हें नांव प्रादेशिक आहे. कऱ्हाड प्रांतांतील ते कऱ्हाडे असें चटकन् मनांत येतें व बऱ्याच प्रमाणांनीं तोच तर्क खरा ठरणार आहे असें वाटतें.

संशोधनाचार्य राजवाडे म्ह०—“नरसिंह भट्टाचें हें कऱ्हाडे घराणें दक्षिण कोंकणांत पहिलें व महत्त्वाचें होय. करहाटक ब्राह्मणांचें राजापूर, संगमेश्वर टापूंत नरसिंह भट्टाच्या अनुषंगानेंच आगमन झालें हें निश्चित होय.” (इतिहास-ऐतिहासिक). शके १२०० नंतर शिलाहारांच्या राजवटींत कऱ्हाडे उदयास आले व त्यांच्या नाशाबरोबर कऱ्हाड्यांचें उच्चाटण झालें असें राजवाडे अन्यत्र लिहितात. कोंकणांतील एक लेखक रामतनय राजवाड्यांच्या मताचा अनुवाद करितात व कऱ्हाडे हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण होत असें म्हणतात. त्यांनीं पुढील प्रमाणें दाखविलीं आहेतः—१. शिलाहारांच्या दानपत्रांत करहाटकांचा उल्लेख आहे; २. शिलाहार राजे महालक्ष्मीभक्त होते. बहुतेक कऱ्हाड्यांचें महालक्ष्मी हें कुलदैवत आहे. ३. शिलाहार घराण्याची तिसरी शाखा कोल्हापूर-कऱ्हाड या भागांत होती. या भागांत अद्याप ऋग्वेदी ब्राह्मणांचीच वस्ती अधिक आहे. ४. शिलाहार राजे बव्हंशीं ऋग्वेदीच असावेत. ५. देशस्थ ऋग्वेदी व कऱ्हाडे त्यांच्या सोयरिकी आजपर्यंत झालेल्या आहेत.

परंतु देशस्थ ऋग्वेदी व कऱ्हाडे यांच्या स्वभावांत व वागणुकींत जें वैलक्षण्य भासतें, त्याची चर्चा या लेखकांनीं केलेली नाहीं. तिचें यथास्थित विवेचन झाल्यास हाच तर्क खरा ठरेल.

कऱ्हाड प्रांतांतून कऱ्हाडे ब्राह्मण कोकणांत राजापूर प्रांतांत गेले, त्यास सुमारें ४०० वर्षें झालीं असावीं असें रा. गुंजीकर सरस्वतीमंडळांत म्हणतात. शतप्रश्नकल्पलता व सह्याद्रिखंड यांमध्यें चित्पावन व कऱ्हाडे यांबद्दल जितकें वाईट लिहितां येणें शक्य आहे, तितकें लिहिलें आहे. त्या ग्रंथांना ऐतिहासिक महत्त्व नाहीं. या दोन्ही ग्रंथांचा कर्ता चित्पावन व कऱ्हाडेद्वेष्टा असावा असें रा. गुंजीकर म्हणतात. कऱ्हाड्यांची एक पोटजात “पद्ये” म्हणून गोमंतकांत आहे. एन्थोवेन हा आपल्या ग्रंथांत गुर्जर आडनांवावरून शक, पल्हव, हूणांशीं कऱ्हाडथांचा संबंध जोडतो. परंतु हें विधान अत्यंत असंबद्ध आहे असें राजवाड्यांनीं म्हटलें आहे.

कऱ्हाडथांमध्यें कऱ्हाडे, पद्ये व भट्टप्रभु अशा तीन पोटजाती आहेत. पद्ये हे प्रायः गोमंतकांतील ‘अंत्रूज’ नांवाच्या प्रदेशामध्यें आहेत. देशा-

वरील कऱ्हाडे पद्यांना हलके समजतात. ' पाध्ये ' हा एक पद्यांतीलच भेद आहे असें कोणी म्हणतात. पाध्ये हे खोती व शेती करतात. पद्ये हे कऱ्हाडे नव्हत असें कांहीं कऱ्हाडे म्हणतात. भट्टप्रभु ही एक पद्यांतील ह्मणजे कऱ्हाड्यांतील पोटजात आहे, पण ती बहिष्कृत आहे. तिचीं फक्त ४० घरेंच आहेत. शंकराचार्यांनीं कांहीं कारणामुळें ४० पद्यें ब्राह्मणांना बहिष्कृत केलें. ते पद्ये ह्मणजेच भट्टप्रभु. भट्टप्रभु हें वृत्तिवाचक नांव आहे.

वेद, शाखा, सूत्र व गोत्रें:—सर्व कऱ्हाडे ब्राह्मण ऋग्वेदी आहेत. ऋग्वेदांतील शाकलशाखा असून आश्वलायनसूत्राप्रमाणें यांचीं धर्मकर्में होतात. ह्यांचीं गोत्रें २४ आहेत. अत्रि, आंगिरस, उपमन्यु, काश्यप, कुत्स, कौंडिण्य, कौशिक, गार्ग्य, गौतम, जामदग्न्य, नैध्रुव , पार्थिव, बादरायण, भार्गव, भारद्वाज, मुद्गल, लोहिताक्ष, वत्स, वासिष्ठ, वैन्य, विश्वामित्र, शांडिल्य, शालाक्ष.

कांहीं प्रसिद्ध आडनांवें—अभ्ये, अध्यापक, अधिकारी, अमते, अयाचित, आगट्ये, आचार्य, आठल्ये, आडर्ये, आळवणी, उंबरे, एकांडे, ओझे, ओर्प्ये, कमळाकर, कयाळ, कर्करे, किबे, किराणे, कीर्तने, कोटिभास्कर, कोले, खरे, गगनग्रास, गाणपते, गर्दे, गलांडये, गुण्ये, गोडे, गोरे, गोसावी, घगवे, घुग्रे, चिकणे, चिरमुले, जठार, जडये, जोशी, टेंबे, टोळ्ये, ठकार, ठाकूर, डगळ्ये, डांग्ये, डिके, टेंगशे, डोंगरे, ढवळे, ढोकरे, ढोल्ये, ताटके, तांबे, तोफखाने, दाणे, दीक्षित, दुबळे, दुवेद्ये, देवधर, देवस्थळी, देसाईप्रभु, पळसुले, धोंडये, नवरे, नवाथे, नाईक, नाखरे, नानले, नाफडे, नारगवेंडी, नारिंगे, पखंडे, पटवर्धन, पत्की, परांडये, पाटील, प्राणी, पित्रे, पुराणिक, पुरोहित, पंडित, फग्रे, फणशे, बखले, बहुतुले, बाखरे, बिनिवाले, बेर्डे, बोंद्रे, बंदरे, भट, भडभडे, भागवत, भाट्ये, भासल, भाटवेडकर, भांड्ये, भोदे, मत्से, महाजनी, माळी, मिराशी, मुळ्ये, मुंडल्ये, मोचे, मंडालिक, योगी, रिंगे, रेडे, लघाटे, ललित, लुकतुके, लोके, वाळके, विंझे, वैद्य, शाहणे, शेवडे, शौचे, श्रीखंडे, श्रोत्री, सेत्ते, सप्रे, सर्वट्ये, साखरे, साधल्ये, सारमांडले, हयग्रीव, हर्षे, हळबे, हडप, किर्लोस्कर, हर्डीकर, पेंढारकर, चिंचाळकर, चांदोरकर, इत्यादि.

संस्कार—गर्भाधानादि षोडश संस्कार वैदिक पद्धतीनें होतात. पौरोहित्य कऱ्हाडे, चित्पावन, ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण ह्यांकरवीं केलें जातें. प्रसंगीं कोणताही ब्राह्मण पुरोहित चालतो.

लोकसंख्या व वास्तव्यस्थानें:—१९०१ सालीं ३२४२६ ही लोकसंख्या होती. पैकीं १६८१३ पुरुष व १५६१३ स्त्रिया होत्या. १९११ सालीं ३१८९४ एवढी लोकसंख्या आणि १९२१ सालीं ३०१७९ इतकी लोकसंख्या भरली. यावरून ही जात कशी घटत आहे हें स्पष्ट दिसतें. रत्नागिरी, राजापूर, सावंतवाडी, मालवण, गोवें, शहापूर, बेळगांव, खानापूर, आजरें, कोल्हापूर, या भागांत ह्यांची विशेष वसाहत आहे. सातारा, वांई, पुणें, सोलापूर, नागपूर, बडोदें, हैद्राबाद, इंदूर, ग्वालेर, काशी अशा सर्व भागांत कऱ्हाडे ब्राह्मण पसरलेले आहेत. मध्यप्रांतांत सागर, दमोह व वर झांशी–जबलपुराकडे यांची बरीच वस्ती आहे.

धर्मपंथ व मतें—बहुतेक कऱ्हाडे स्मार्त अद्वैतमतानुयायी आहेत. फार थोडे वैष्णव आहेत. संकेश्वर येथील शंकराचार्यांच्या मठाचें अनुशासन कऱ्हाडे ब्राह्मणांवर चालतें. त्या पिठाचेंच निग्रहानुग्रह मानण्यांत येतात. कऱ्हाडयांचे उपाध्याय प्रायः स्वकीयच असतात. विशिष्ट शास्त्रार्थाचा निर्णय क्षेत्रस्थ पंडितांकडून व शंकराचार्यांकडून होतो.

देवदैवतें—कऱ्हाडे ब्राह्मणांच्या कुलदेवता प्रायः देवी आहेत. कऱ्हाडदेशीं यांची 'मातृका' म्हणून देवी होती. सांप्रत घाटावरील आणि राजापुराकडील बहुतेक कऱ्हाडे ब्राह्मण कोल्हापुरच्या अंबाबाईचे भक्त आहेत. सावंतवाडी, गोवें, वगैरे स्थळीं कऱ्हाडे ब्राह्मण हे अलीकडे म्हणजे शें-दोनशें वर्षांत गेले असल्यामुळें गोमांतकांतील सारस्वत ब्राह्मणांच्या ज्या शांतादुर्गा, म्हाळसा, महालक्ष्मी, अजादुर्गा, विजयादुर्गा, इत्यादि देवता आहेत, त्यांचेच ते भक्त झाले आहेत. मांगरीशाचेही भक्त कित्येक आहेत. परंतु त्या देवतांची जी सारस्वत महाजन मंडळी आहे, तिजमध्यें यांचा समावेश नाहीं. हे केवळ येथील भजकांमध्येंच मोडतात. देशावरील दैवतें हीं बऱ्याच कऱ्हाडयांच्या

घरीं शिरलीं आहेत. राम, कृष्ण, विठ्ठल, हनुमान, दत्त, अशीं उपास्य दैवतेंही झालेलीं आहेत.

कुलधर्म व कुलाचार—कऱ्हाड्यांमध्यें ‘ मातृका ’ म्हणून जी कुलदेवता आहे तिच्यासंबंधीं विलक्षण लोकप्रवाद आहे. देवीला बळी देण्याची चाल या लोकांत होती असें म्हणतात. कऱ्हाडे हे विष घालतात म्हणून त्यांच्या घरीं भोजनास जाऊं नये अशी समजूत पूर्वीं होती. आह्मीं स्वतः पुष्कळ कऱ्हाड्यांना याबद्दल अगदीं खोदखोदून विचारलें; पण कांहीं पत्ता लागत नाहीं. जुन्या कागदपत्रांत कऱ्हाड्यांच्या मागें ‘ मारक, घातक ’ अशीं विशेषणें लाविलेलीं आढळतात. एन्थोवेन ह्मणतो कीं, नानासाहेब पेशव्यानें कडक रीतीनें शासन करून कऱ्हाड्यांची विष घालून मारण्याची चाल बंद केली. तेलंगी ब्राह्मण हा सहसा कऱ्हाड्यांच्या घरीं जेवायला जात नाहीं. कऱ्हाडे म्हणतात कीं, आमचा बोभाटा तेलंग्यांनींच केला. कऱ्हाड्यांबद्दल वरील प्रवाद असले किंवा कर्कोटक व तक्षक असें जरी त्यांना विनोदानें म्हणत असले तथापि चित्पावन, देशस्थ व इतर ब्राह्मणांशीं घरोबा असलेलीं शेंकडा ९५ घराणीं कऱ्हाड्यांचीं सांपडतील. घरोबा असलेल्या कऱ्हाड्यांबद्दल कोणीहि ब्राह्मण शंका घेत नाहींत. उलट १५०।२०० वर्षांचे ऋणानुबंध दाखवून या कऱ्हाड्यांबद्दल आमचा मुळींच संशय नाहीं असें सांगतात. चित्पावन किंवा देशस्थ ब्राह्मणांशीं स्नेहसंबंध नसलेला कऱ्हाडा अत्यंत विरळा ! स्नेहसंबंधामुळें या प्रवादावर विश्वास ठेवीत नाहींत, पण बेजाबदारी किंवा विनोद या दृष्टीनें कऱ्हाडे हे विष घालतात, असें ह्मणण्याची चाल समाजांत आहे. पूर्वीं कधीं काळीं कुणीं एकाद्यानें कांहीं केलें असेल; पण तोच प्रवाद अद्याप त्या जातीवर चालू ठेवणें अत्यंत अनिष्ट होय.

कऱ्हाड्यांमध्यें चित्पावनांप्रमाणें बोडण नाहीं. विवाह झाल्यावर ५ वर्षें पर्यंत महालक्ष्मीपूजनाची चाल नाहीं. उत्सव, सण, व्रतें, वैकल्यें हीं सर्व चित्पावन व ऋग्वेदी देशस्थांप्रमाणेंच आहेत. अनंतव्रत हें कऱ्हाड्यांमध्यें विशेष आहे. कऱ्हाड्यांकडूनच अनंतपूजा चित्पावनांत आणि देशस्थांत आली आहे,

असें पुष्कळ समजतात. नवरात्रांत कऱ्हाडयांमध्यें सप्तशतीचे पाठ असतात ते प्रायः चित्पावनांत नसतात. ललितापंचमी, दुर्गाष्टमी इत्यादि देवींचीं व्रतें कऱ्हाडयांमध्यें विशेष आढळतात. देवदिवाळी करण्याची चाल कऱ्हाडयांत आहे.

तीर्थें व पवित्र स्थानें—महाराष्ट्रांतील व आर्यावर्तांतील सर्व तीर्थें व पवित्र स्थानें कऱ्हाडयांना पूज्य आहेत. बारा ज्योतिर्लिंगें, चार धाम, काशी, रामेश्वराची यात्रा करण्याची चाल आहे.

राहाणी—स्वच्छ, साधी, काटकसरीची व झकास अशी आहे. व्यवस्थितपणा हा कऱ्हाडयांचा विशेष गुण आहे यांत संशय नाहीं. साधी भोळी राहाणी ऋग्वेदी देशस्थांची, त्यापेक्षां जरा व्यवस्थित कोंकणस्थांची व त्याही पेक्षां वरचढ कऱ्हाड्यांची असा अनुक्रम लागतो. पांगारकर म्हणतात, "अभंग, ओंवी हीं मराठी भाषेंतील वृत्तें देशस्थांच्या भाबडया बायको-सारखीं; वामन पंडिताचा श्लोक, रामदासांचा भुजंगप्रयात हा चित्पावनांच्या व्यवस्थित बायकोसारखा; आणि मोरोपंताची आर्या ही कऱ्हाडयांच्या नटून सजून आलेल्या बायकोसारखी होय. ह्या दृष्टांतावरून राहाणीचें स्वरूप लक्षांत येईल.

विवाह—चित्पावन, ऋग्वेदी व देशस्थ आणि कऱ्हाडे यांमध्यें विवाह होण्यास शास्त्रांची कांहींच आडकाठी नाहीं पण असें मिश्र विवाह फार थोडे झालेले आहेत. बहुतेक स्वजातींतच विवाह होतो. प्रौढविवाह रूढ होऊं लागला आहे.

आरोग्य—कऱ्हाड्यांत ज्ञातिविषयक असा कोणताही रोग नाहीं. खेडगांवांतील कऱ्हाडे चांगले धणधाकट आहेत. त्याचें कारण नैसर्गिक अनु-कूलता व चांगली राहणी हें होय. नोकरीधंद्याच्या निमित्तानें. हल्लीं शहरांत जावें लागतें; त्यामुळें स्त्रियाचें आरोग्य ऱ्हास पावत आहे व बालमृत्यूंची संख्या वाढत आहे. स्त्रियांत बाळंतरोग व क्षयरोग हे दिसतात. तथापि राहाणी व्यव-स्थित असल्यामुळें तितका परिणाम फारसा भासत नाहीं. पण खानेसुमारीच्या आंकड्यांवरून लोकसंख्या घटत आहे हें सिद्ध होतें.

विधवा—विधवांची संख्या ब्राह्मणसमाजाच्या पाहाणीशिवाय सांपडणें अशक्य आहे. तथापि विधवावपनाचा विकल्प दृष्टीस पडत आहे. क्वचित् पुनर्विवाह होतात; पण त्याबद्दल मोठासा विरोधही आढळत नाहीं किंवा तिरस्कारही आढळत नाहीं. जुन्यामताच्या लोकांना तो नापसंत आहे व अमान्य आहे.

शिक्षण—वैदिक व लौकिक असें दोन्ही प्रकारचें शिक्षण या समाजांत आहे. कऱ्हाडे ब्राह्मण वैदिक परंपरेशीं बरेचसे जवळ आहेत. स्त्रीशिक्षणांत पाऊल पुढें पडत आहे. लोकसंख्येच्या मानानें साक्षरतेचें प्रमाण वाढत आहे. शिक्षणाकरितां ज्ञातिविशिष्ट संस्था, निधि, इत्यादि व्यवस्था या जातींत होत आहे.

कर्ती माणसें—साधुसंत, सत्पुरुष, वैदिक, शास्त्री, पुराणिक, याज्ञिक, हरिदास, गवई, वकील, डॉक्टर, इंजिनीयर, वैद्य, कारखानदार, कंत्राटदार, शिक्षक, प्रोफेसर, ग्रंथकार, लेखक, संशोधक, सार्वजनिक कार्यकर्ते या नात्यानें या समाजांतील पुष्कळ कर्ती माणसें महाराष्ट्रांत वावरत आहेत; स्थल संकोचास्तव नांवें दिलेलीं नाहींत.

आहार—सर्व कऱ्हाडे ब्राह्मण शाकाहारी आहेत.

सांपत्तिक स्थिति—कऱ्हाड्यांची सांपत्तिक स्थिति कांहींची उत्तम व कांहींची मध्यम आहे. कऱ्हाडे हे व्यवस्थित, हिशेबी व नेहमीं हात राखून असणारे असे असल्यामुळें त्यांच्यामध्यें अगदीं भुकेबंगाल फार थोडे आढळतात. तथापि लोकसंख्येच्या मानानें या समाजांतही दारिद्य वृद्धिंगत होत आहे असें दिसतें. निरनिराळ्या अर्थोत्पादक धंद्यांत कऱ्हाडे हे पडत आहेत. देशावरील कऱ्हाडे हें कोंकणांतल्यापेक्षां सधन आहेत आणि कोंकणांतील कऱ्हाडे हे गोमांतकांतील पद्ये ब्राह्मणांपेक्षां सांपत्तिक दृष्ट्या बरे आहेत.

स्वभाव—चित्पावनाइतकी धडाडी कऱ्हाड्यांत नाहीं. व्यवहारदक्षता व टापटीप हे गुण जाज्वल्य दिसतात. एकंदर समाज जुन्या धार्मिक आचारविचाराला जास्त चिकटून राहिलेला; परंतु नवसुशिक्षित स्त्री-पुरुष प्रगतिशील व देशकालवर्तमान जाणणारे आढळतात. चित्पावनाइतकी कऱ्हा-

ज्यांची बुद्धिमत्ता असून ते पुढें आलेले नाहींत. याचें कारण धडाडीचा व उत्कट भावनेचा अभाव हें होय. कर्तव्यदक्ष, एकमार्गी, सरळ, स्वाभिमानी असें कऱ्हाड्यांच्या स्वभावाचें वर्णन करतां येईल. कऱ्हाडे ब्राह्मण एकीकरणाच्या आड येण्याइतके दुराग्रही नाहींत.

महत्त्वाकांक्षा—आपली जात सर्व दृष्टीनें समर्थ आणि अनुकरणीय करावी आणि इतरांनाही अभ्युदयनिःश्रेयसाच्या ध्येयाकडे नेण्यांत मदत करावी अशी या जातीची महत्त्वाकांक्षा आहे.

स्वरूपः—हा समाज वर्णानें काळासावळा किंवा निमगोरा आहे. अगदीं गोरीपान माणसें या समाजांत आढळतात. नीटस, देखणीं, सुस्वरूप अशींच या समाजांत माणसें आहेत. चित्पावनांप्रमाणें डोळ्यांचा अघ्रूपणा नाहीं व घारेपणा नाहीं.

पद्ये ब्राह्मण—गोमंतकांत गेलेल्या कऱ्हाडे ब्राह्मणांना पद्ये असें ह्मणतात. हे कऱ्हाडे ब्राह्मण उपाध्यें या नात्यानें तिकडे गेले. उकार लोप होऊन पाध्ये व नंतर पद्ये असें शब्द व्यवहारांत आले. वर जे कऱ्हाडे ब्राह्मणांची आचारविचार सांगितले आहेत ते सर्व बव्हंशीं पद्यांमध्यें आढळतात. पद्ये हे गोमांतकांत एका बाजूस असल्यामुळें प्रांतभेदानें कांहीं आचारविचारांत स्वाभाविक फरक पडले आहेत. कांहीं तसे किरकोळ फेरबदल पडले तरी कऱ्हाडे व पद्ये हे एकच ह्मणून त्यांची स्वतंत्र माहिती येथें देण्याचें कारण नाहीं. या ब्राह्मणसमाजाची लोकसंख्या गोमांतकांत सरासरी आठनऊशें आहे.

६. भट्टप्रभू ब्राह्मण

गोमांतकांत भट्टप्रभू या नांवानें संबोधिला जाणारा एक लहानसा ब्राह्मण समाज आहे. तो पंचद्राविडांतर्गत पद्ये या ब्राह्मण-समाजांतून एका क्षुल्लक कारणामुळें फुटून बाहेर पडला आहे. भट्टप्रभू हा समाज पद्यांशीं विभक्त होण्याची एक दंतकथा ऐकण्यांत येते. ती दंतकथा, तज्जन्य ग्रामण्य, गतवर्षीची परिषद् हा सर्व विषय आधीं या समाजाची माहिती देऊन शेवटीं देतों.

वेद, शाखा, सूत्र—सर्व भट्टप्रभू ब्राह्मण ऋग्वेदी आहेत. शाकल-शाखा आश्वलायन सूत्राप्रमाणें यांचीं धर्म-कर्में होतात.

गोत्रें व आडनावें--हीं पद्यांचीं व प्रभूंचीं बहुतेक सारखींच आहेत. **वत्स**—गांवकर, प्रभुदेसाई, भट्ट. **कौशिक**—भट्ट, प्रभुदेसाई. **भारद्वाज**—प्रभु. (यांपैकीं एकदोन घराणीं व्यापारविषयक महत्त्वामुळें 'सावकार' या उपनांवास पात्र झालीं आहेत.) **अत्रि**—प्रभु (हे 'देवारी' या नांवानें, श्रीनवदुर्गादेवीची पूजा करीत असल्यामुळें ओळखिले जातात). **कौंडिण्य**—२०।२५ वर्षांपूर्वीं नामशेष झालें.

लोकसंख्या व वास्तव्यस्थानें—१९२० सालीं ४७५ इतकी एकंदर लोकसंख्या होती, ती १९२६ सालीं ४१६ भरली. यावरून ही पोटजात किती घटत असून नामशेष होण्यास किती अल्प काळ लागेल हें सांगावयास नकोच. या समाजाचीं सांप्रतचीं वास्तव्यस्थानें बोरी व शिरोडें हीं आहेत. त्या शिवाय बांदोडें, नागेश, कुंडई, प्रियोळ येथेंहि कांहीं घरें विद्यमान आहेत. हुडणें, कंकुळयें येथील घरें केव्हांच नामशेष झालीं !

देवदैवतें--पद्ये ब्राह्मणांच्या ज्या कुलदेवता नवदुर्गा, म्हाळसा, इत्यादि आहेत, त्याच भट्टप्रभूंच्याही आहेत.

कुलपुरुष--हा कुलपुरुष पद्यांपैकीं एका शाखेचा व भट्टप्रभूंपैकीं एका शाखेचा मिळून एकच आहे.

धर्मपंथ व मतें--भट्टप्रभू हे पद्यांप्रमाणें स्मार्त अद्वैतमतानुयायी आहेत. संकेश्वर येथील शंकराचार्य मठाचें अनुशासन चालतें.

संस्कार—गर्भादानादि अंत्येष्टीपर्यंतचे सर्व संस्कार वैदिक मंत्रांनीं भट्टप्रभू व पद्ये या दोनही समाजांत एकाच पद्धतीनें होतात. विवाहानंतर दर्शपूर्णमास, स्थालीपाक हे यथाशास्त्र होतात. पुरोहित स्वकीयच आहेत. तदभावीं पंचद्राविडांपैकीं कोणताही ब्राह्मण चालतो. शके १६५३ सालांत प्रभूंनीं पद्यांतील उपाध्यायास एक करार लिहून दिलेला आहे. त्यावरून पद्यांतून फुटल्यानंतर कांहीं वर्षांनीं प्रभूंनीं स्वाज्ञातींतीलच उपाध्ये तयार केले असें कळतें. हे उपाध्याय इतर द्राविडांबरोबर सहानुष्ठान करतात. सगळ्या हिंदूंकडून दानदक्षणा मिळते.

आन्हिक—संध्या, देवपूजा, वैश्वदेव इत्यादि सर्व पद्ये ब्राह्मणांप्रमाणेंच आहेत.

कुळधर्म, कुलाचार व सण—चैत्र महिन्यांत गौर बसविणें (गौरी-दोळोत्सव), तन्निमित्त उत्सव व हळदीकुंकू इत्यादि समारंभ करणें, आणि वर्ष-प्रतिपदेपासून चैत्र महिनाभर सूर्योदयीं नियमानें आंगण सारवून रंगवल्लिका काढणें, हे व आणखी अशा सारखे कुलाचार उभय समाजांत समान आहेत. अक्षय्य तृतीया, श्रावणी, हरितालिकादि व्रतें हीं सारखींच चालू असतात. कांहीं घराण्यांत ललिता पंचमीचें व्रत कडाक्यानें होत असतें. चैत्रापासून फाल्गुनापर्यंत सर्व सण व उत्सव होतात.

शिक्षण—वैदिक व लौकिक असें व्यवहारापुरतें आहे. आज ६ मुलें वैदिक शिक्षण घेत आहेत. पैका ४ मुलें सांगलीच्या न्यायशाळेंत विद्याभ्यास करीत आहेत. भट्टप्रभूत गेल्या दोन पिढ्यांत बुद्धिमान्, कर्तबगार व वजनदार अशीं माणसें होऊन गेलीं आहेत. पुरुष मंडळींत आज १०।१२ इसम निरक्षर व तेही पहिल्या पिढीचे असे आढळतील. आतांच्या मुलीं व मुलगे निरक्षर असत नाहींत. मुलींस खडखडीत वाचावयास येईपर्यंत तरी शिकवितात.

विवाह—प्रौढ विवाह सुरू नाहीं; तरी मुलींचीं लग्नें अलीकडे चौदा वर्षांचे आंत होत नाहींत. पद्ये जातींतही असें व्हावयास लागलें आहे. मुलगे मिळण्याची पंचाईत पडते, व मिळालेच तर त्या वराशीं त्या मुलीचे दोन चार तरी नात्यागोत्याचे संबंध निघतात. पद्यांशीं या समाजाचें एकीकरण न झालें तर पुढें सगोत्रांत किंवा भावाबहिणींमध्यें सुद्धां व्यवहार होण्याचा घोर प्रसंग येईल असल्या आपत्तींत हा समाज आहे. मृत्युसंख्या वाढती असल्यानें विधवा विपुल दिसतात.

राहणी—साधी व बहुतेक स्वच्छ अशी आहे. पोषाखाचें साम्य पद्यांशीं आहे. कांहीं गृहस्थ-घराणीं मात्र सारस्वत ब्राम्हणांप्रमाणें शेजार-धर्माचें पोषाख करतात.

सांपत्तिक स्थिति--प्रभु समाज हा सुसंपन्न होता, हेंच कारण तो असा विभक्त राहण्यास झालें. उपरिनिर्दिष्ट गांवांत त्यांचीच अबाधित सत्ता होती. परंतु कालपरिस्थितीप्रमाणें ती आज नाहींशी होऊन दोनचार घराणीं साधारण बऱ्या स्थितींत आहेत. पद्यांप्रमाणेंच प्रभु हे पोफळीच्या बागा, नारळीचीं झाडें यांवर स्वतःची गुजराण करतात. हल्लीं कांहीं गृहस्थांनीं व्यापारांत रिघाव केला आहे.

आहार—हा समाज गोमांतकांत असून इतर पंचद्राविडांप्रमाणेंच शाकाहारी आहे.

स्वभाव—सरळ, गोड, उमदा व उदार आहे. कोणाही अतिथि-अभ्यागताचा आदरसत्कार गोव्यांतील कोणत्याही जातीपेक्षां चांगला करण्यांत येतो. पद्यांपेक्षां हा यांचा विशेष आहे. दुसऱ्याशीं सभ्यतेनें वागण्यांत भट्टप्रभु कोणासही हार जाणार नाहींत. हल्लीं गरीब दशा आली असली तरी अंतःकरणाचा दिलदारपणा कायम आहे. धडाडी इतर ब्राह्मणांप्रमाणेंच आहे. पूर्वी देसाई घराणीं अतिशय शूर होतीं. त्यांना सगळे लोक थरथर कांपत असत. परंतु आतां या गोष्टी इतिहासांतच वाचण्यालायक वाटतात. स्वाभिमान जागृत आहे.

महत्त्वाकांक्षा—आपली जात सर्व दृष्टींनीं अनुकरणीय व समर्थ व्हावी अशी आतांच्या तरुणांची महत्त्वाकांक्षा आहे व याला साधन म्हटलें म्हणजे संततिदृष्ट्या होणारा ऱ्हास, इतर सद् ब्राह्मणांशीं शरीरसंबंध होऊन थांबविणें हें होय. ब्राह्मणसंघटणेचें पहिलें श्रेय आपण घेऊन इतरांनाहि या कार्यास मदत करण्याची या जातीची महत्त्वाकांक्षा आहे.

स्वरूप—हा समाज वर्णानें निमगोरा असा असून रूपानें नीटस आहे.

कर्ती माणसें--श्रीविठ्ठल विश्वंभर प्रभुगांवकर, श्रीमंत रघुनाथ रावशाबाभट्ट प्रभु, रामचंद्र नारायण प्रभुदेसाई, शंकर गोविंद प्रभुगांवकर, म्हाड्व व्यंकटेश प्रभुगांवकर, सदाशिव प्रभु, व्यंकटेश नारायण प्रभुदेसाई.

ग्रामण्यप्रकरण—अशी दंतकथा सांगण्यांत येते कीं, 'कपिलेश्वर' मुक्कामीं श्रीजगद्गुरूंनीं पंचक्रोशींतील ब्राह्मणांस तीर्थप्रसादास बोलाविलें असतां बोरी व शिरोडें येथील कांहीं ब्राह्मण अव्यवस्थितपणामुळें पहिल्या पंक्तीस

भोजनास न जातां श्रीस्वामींची स्वारी भोजन करून तेथून निघून गेल्यावर गेले, आणि जागेच्या संकोचामुळें मागच्या पंक्तीस जेवले. हें निमित्त पुढें करून त्यांस बाकीचे ब्राह्मण अपंक्त समजूं लागले. हे अपंक्त ब्राह्मण चांगले संपन्न असल्यानें ह्या चूकभुलीची शहानिशा करून घेण्यास अभिमानानें गेले नाहींत व समाजास न जुमानतां तसेच राहिले. ही आख्यायिका जरा चमत्कारिक आहे. तथापि कांहीं आधारांवरून वरील आख्यायिकेचा अर्थ सुसंगत लागतो तो असा—पद्ये समाज संबंधच्यासबंध कोणत्यातरी एका अज्ञात कारणानें पूर्वी अपंक्त होता. अर्थात् त्यास तीर्थप्रसादानुग्रहरूप प्रायश्चित्तविधीनें पंक्तिपावन करण्याचें ठरवून त्याप्रमाणें श्रीशृंगेरी स्वामींनीं कवळयाच्या मुक्कामांत सर्व पद्ये व इतर ब्राह्मणांस आमंत्रण केलें. त्या वेळीं कांहीं मानी पद्ये हट्टाग्रहानें प्रसादास गेले नाहींत. ते पूर्वी अपंक्त होते तसेच राहिले. नवा बहिष्कार श्रींनीं त्यांजवर घातला नाहीं. आणि तेच आज ‘ भट्ट प्रभु ’ नांवानें ओळखले जात आहेत.

प्रचलित आख्यायिकेचा खरा अर्थ असा असून त्याच अर्थास पोषक अशी माहिती कुडाळचे विद्वद्वर महादेवशास्त्री बाक्रे यांच्या अभिप्रयांत मिळते. श्रीजगद्गुरूंनीं (त्यावेळच्या शृंगेरीस्वामींनीं) विशेष प्रायश्चित्त न सांगतां केवळ तीर्थप्रसादास विद्यमान राहणें एवढ्यावर व्यवहार सुरू करण्याचें ठरविलें होतें. यावरून त्यांच्या हातून पातित्यादि दोष घडला नसून कांहीं तरी अल्प कारणानें इतर ब्राह्मणांशीं यांचा विरोध आला असावा व एका पक्षाच्या आग्रहानें तो दीर्घकाल चालला असावा असें दिसतें. यावरून इतकेंच ठरतें कीं, सगळा पद्ये ब्राह्मणांचा समाज कोणत्यातरी अविज्ञात कारणानें एका काळीं अपंक्त होता. याला प्रत्यंतर म्हणजे कर्नाटकांत मंगळूरच्या आजूबाजूस पद्यांची वस्ती असून ते आज घटकेला तिकडे अपंक्त आहेत. (वे. विष्णुशास्त्री सावैकर मु. बेतगी, हे श्रृंगेरी मठांत असतांना त्यांच्याशीं तिकडीलच एका पद्ये जातीच्या बाईशीं झालेल्या एका संवादावरून ही गोष्ट स्पष्ट होते).

गेल्या वर्षी श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य (शिरोळकर) मठ संकेश्वर यांच्या अध्यक्षत्वाखालीं ‘ भट्टप्रभु ऐक्य परिषद् ’ भरून ‘ प्रभु ’ हे पद्यांतीलच असा उघड रीतीनें पुरस्कार झाला. परिषदेंत या एकीकरणास विरोध करणाराही

एक पक्ष निर्माण झाला. परंतु 'आजपर्यंत झालें नाहीं तें यापुढें होऊं नये' या दुराग्रहमिश्रित भाषेशिवाय त्या पक्षानें कांहीं केलें नाहीं. (आम्हीं परिषदेंत समक्ष उपस्थित असल्यानें प्रत्यक्ष सर्व पाहिलेंच आहे.) सुदैवानें आतां भट्टप्रभूंचें 'पद्यत्व' सिद्ध करणारे पुरावेही उपलब्ध झाल्यानें या एकीकरणास दुराग्रहाशिवाय कोणताच अडथळा उरलेला नाहीं.

नुकताच परिषदेचा साग्र वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे. त्यास लिहिलेल्या उपोद्घातांत पुण्याचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. द. वि. आपटे हे शके १०९५ च्या कदंबाच्या शिलालेखावरून सिद्ध करतात कीं, "गोव्यांत श्रीशके १०९६ सालीं राज्य करणाऱ्या शिवचित्त कदंबाची पट्टराणी श्री. कमलादेवी इनें चतुःशास्त्र-संपन्न सदाचारनिरत असे तीस ब्राह्मण आणून त्यांना यथाविधि भूमिदानही केलें आहे. त्यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, या सर्व तीसही ब्राह्मणांना 'भट्टोपाध्ये' या उपनांवानें संबोधिलें आहे. तेव्हां गोव्यांत शके १०९६ मध्यें उपाध्ये आणिले हें ठरलें. मूळ कदंबांनीं जीं ३० घराणीं आणलीं तीं सर्वच आज अस्तित्वांत दिसत नाहींत. उलट त्याच घराण्यांमध्यें मागाहून आलेल्या ब्राम्हणांची भर पडलेली आहे. हे मागाहून आलेले ब्राह्मण शके १३०० च्या सुमारास आले असावे. 'भट्टोपाध्ये' यांतील भट्ट म्हणजे **वेदवेत्ता** निदर्शक पद वेगळें काढिलें असतां वृत्ति-वाचक 'उपाध्ये' हेंच नांव शिल्लक राहतें. ("गोव्यांत कदंबांनीं आणलेल्या ३० ब्राह्मणांचेच वंशज जे फोंडे महालांत राहातात ते 'पद्यें' होत" (रा. ब. बांबर्डेकर.) परंपरेची समजूतहि तशीच आहे. उपाध्ये यांतील 'उ' कार लोपला तेव्हां पद्ये हें नाम झालें. (शके १७०७ मधील गणेश अनंत ग्रामाधिकारी यांचा लेख). या लोकांनीं जन्मोजन्मीं उपाध्येपणाच्या वृत्तीवरच संतोषित न राहातां कांहीं गांवांतील ग्रामाधिकार व देशकाचे ही अधिकार संपादन केले. ते आज मित्तीपर्यंत कांहीं घराण्यांकडे चालू आहेत. त्या पद्ये ब्राह्मणांच्या मागाहून १।२ शतकांत आणखी कांहीं ब्राह्मण तिकडे येऊन राहिले. तत्संबंधीं माहिती विजयनगरच्या माधव मंत्र्यानें दिलेल्या १३१३ च्या ताम्रलेखांत व ग्रामाधिकारी यांच्या लेखांत मिळते. या ताम्रलेखांत सूर्यग्रहणकाळीं ६ गोत्रांच्या १२ ब्राह्मणांस

अग्रहार दिल्याचा उल्लेख आहे. ते पद्ये, कऱ्हाडे व किरवंत ब्राह्मण असलेले दिसतात. यांत 'प्रभु' या उपनांवाचा अत्रि गोत्री एक ब्राह्मण आहे तो कऱ्हाडा आहे असें श्री. आपटे यांचें मत आहे. "येथपर्यंत (शके १९०६ ते १३१३ पर्यंतच्या २१७ वर्षांत) पद्ये ब्राह्मणांत **पद्ये** आणि **प्रभु** असा भेद पडलेला नव्हता हें निर्विवाद आहे. पुढील २ शतकांत तो पडला असावा. कारण सुमारें शके १६०० च्या पूर्वी म्हणजे शिवाजी महाराजांच्या काळीं कागदोपत्रीं 'प्रभु' आणि 'पद्ये' असा भेद केलेला दृष्टीस पडतो. यावरून कोणतें तरी कारण होऊन पद्ये ब्राह्मणांत ही तुटातूट पडलेली आहे," असें श्री. आपटे यांचें मत असून कुडाळदेशकर इतिहास-संशोधक रा. ब. बांवडेकर यांचेंही खालील प्रमाणें मत आहे. "सतराव्या शतकाच्या मध्यांतील ग्रामसत्ता, देशसत्ता, व तदंगभूत मानापमान एतद्विषयक कागदपत्रांत **प्रभु** आणि **पद्ये** असा समान अधिकारदर्शक भेद केलेला दिसतो. त्यावरून असें दिसतें कीं, या काळापूर्वी कांहीं वर्षें पद्ये ब्राह्मणांतील कांहीं कुटुंबांत ग्रामसत्ता देशसत्ता, व तदंगभूत हक्क, मानापमान इ० कारणांवरून तेढ उत्पन्न झाल्यामुळें जी विभक्त झाली तीच ही भट्टप्रभूंची जात होय."

'भट्टप्रभूं'ची माहिती 'कोंकणाख्यान' या छापील पोथींतही आहे. त्या पोथींत 'ते महाराष्ट्र कराडे देशी । प्रभु ऐसे त्यांसी म्हणती ॥' हें मान्य केलें आहे. शके १७०० तील पाळीसंबंधींच्या स्मरणलेखामध्यें पुष्कळ ब्राह्मणांचें आपसांतील शरीरसंबंध दाखविले आहेत. त्यांत विशेषतः प्रामुख्यानें 'फट्ट प्रभू कुंकळवेकार' यांचा उल्लेख आहे. हें 'कुंकळवें' व कोंकणांतील 'कुंकळवें' एकच असल्यामुळें 'फट्ट प्रभू' हा हल्लींच्या 'भट्टप्रभू' चा पूर्वज हें निर्विवाद सिद्ध होतें. या फट्ट प्रभूचा संबंध पद्यांशीं होता असें त्या स्मरण-लेखांत निर्बाधपणें दाखविलें आहे. ह्यावरून वर काढलेला निष्कर्षच खरा ठरतो.

भट्टप्रभूंची भाषा व पद्यांची भाषा एक नाहीं, असा एक मुद्दा परिषदेंत विरोधकारांनीं उपस्थित केला होता. भाषेचा प्रश्न जातिनिर्णयाच्या उपयोगार्थ आणणें हाच मुळीं वेडेपणा होय. परंतु तो मुद्दा गृहीत धरला तरी विरोधकांचे प्रयत्न फुकट जातात. कारण भट्टप्रभूंच्या भाषाभेदाविषयीं खरा

प्रकार निराळा आहे. तो हा कीं, सबंध पद्ये समाजाची भाषाच कोंकणी होती. याचें प्रत्यंतर म्हटलें म्हणजे कर्नाटकांत मंगळूर वगैरे भागांत असलेल्या पद्यांचीं भाषा आज सुद्धां कोंकणी आहे हें होय. यावरून साऱ्या पद्यांचीं मूळ भाषा एक असून आज 'भट्टप्रभू' बोलतात तीच ही होय.

भट्टप्रभू विषयीं आजची पद्यांची मनोभावना—परिषदेपूर्वी कांहीं पद्ये निशंकपणें पण गुप्तपणें भट्टप्रभूशीं अन्नव्यवहार करीत असत. परंतु परिषदेंत प्रभूंच्या ब्राह्मण्याचा जाहीर पुरस्कार झाल्याबरोबर शेवटच्या दिवशीं कांहीं पद्यांनीं त्यांच्याशीं अन्नव्यवहार करण्यास तयार असल्याचें भरसभेमध्यें छातीठोकपणें प्रसिद्ध केलें. त्या दिवसापासून कांहीं पद्ये उघड अन्नव्यवहार करीत आहेत. आतां अन्नव्यवहारासंबंधीं पूर्वी सारखी आशंका बहुतेक पद्ये मुळींच बाळगीत नाहींत. येत्या मार्गशीर्षा पर्यंत आज्ञापत्राची वाट पाहून दीडदोन वर्षांचा विलंब अक्षम्य असल्यानें त्यांचा लग्नव्यवहार चालू करण्याचा निश्चय झाला आहे.

७. जवळ वा खोत बाम्हण

पूर्वेतिहास—ही जात दक्षिण हिंदुस्थानांतील असावी. कदाचित् रामेश्वराच्या आसपासही त्यांची वसती असावी. दुष्काळ, उत्पात, राजकर्तृक जुलूम इत्यादि कारणामुळें या जातीनें स्थलांतर केलें व तें गलबतांत बसून मुलांमाणसांसह केले. गलबत दापोली तालुक्यांत बुरोंडी नजीक आलें मात्र तों वादळाच्या प्रहारानें त्याचे तुकडे तुकडे झाले. सुदैवानें गलबतांतील कांहीं लोक मुलांमाणसांसह बचावले व बुरोंडी गांवीं तडीस लागले. गलबत जेथें तडीस लागलें त्या जागेस व तेथील आजूबाजूच्या खोऱ्यास जवळखोरा असें म्हणतात. तेथें अद्याप त्यांनीं स्थापन केलेली देवी आहे तिला जवळांची देवी असें म्हणतात. ही ब्राह्मणजात जवळांत म्हणजे वादळांत सांपडून बचावली म्हणून या ब्राह्मणजातीला जवळ ब्राह्मण असें म्हणतात गोकर्णाकडे हैगीर किंवा हैग अथवा हाविक ब्राह्मणांची एक जात आहे. तिच्या आचारविचारांशीं जवळ ब्राह्मणांचे पुष्कळ सादृश्य आहे. कोणी म्हणतात नंबुद्री ब्राह्मणांची जवळ

ब्राह्मण ही शाखा आहे. लेखी साधार माहिती कांहींच मिळत नाहीं. दंतकथा मात्र वरच्यासारख्याच आढळतात.

पेशवाईंतील प्रसिद्ध सरदार श्रीमंत हरिपंत तात्या फडके यांनीं जवळ ब्राह्मणांचें सद्‌ब्राह्मण्य मान्य करून त्यांचीं उपनयनें व श्रावण्याही केल्या होत्या, इतकेंच नव्हे तर आपल्या घरीं देवघरापासून देवडीपर्यंत सर्वत्र याच ब्राह्मणांच्या नेमणुका केल्या होत्या. स्वयंपाकपाण्यापासून तों त्यांच्या बरोबर स्वाऱ्या शिकाऱ्या करण्यापर्यंत जवळ ब्राह्मण त्यांना उपयोगी पडले अशी ऐकीव माहिती मिळते. अलिबागेस श्रीमंत बिवलकर सरदार यांच्याकडे व भोर येथें श्रीमंत पंत सचीव यांचे जवळ बरेंच जवळ ब्राह्मण लहान सहान नोकऱ्यांवर असत. त्यांच्या घरचे खरकटे पदार्थ पूर्वीं चालत नसत. यांना षट्‌कर्मांपैकीं फक्त अध्ययन यजन आणि दान या त्रिकर्मांचा अधिकार आहे अशी समजूत पूर्वीं होती.

वास्तव्यस्थानें—रत्नागिरी जिल्ह्यांत दापोली तालुका व चिपळूण तालुका; दापोली तालुक्यांत एकतीस गांवीं यांचें वास्तव्य असून लोकसंख्या सुमारें दीड हजार आहे. चिपळूण तालुक्यांत एका गांवीं यांची लोकसंख्या ५० आहे. नोकरी व धंदा याचेसाठीं कुलाबा जिल्ह्यांत कांहीं लोक गेले आहेत, त्यांनीं जमीनी घेऊन व घरें बांधून लहान लहान मिळकती केल्या आहेत, व ते तेथें स्थाईक रहिवाशी झाले आहेत. दोन्ही जिल्ह्यांत मिळून गांवें सदतीस व लोकसंख्या सुमारें १७०० आहे. सातारा, पुणें, नगर जिल्ह्यांत तुरळक वसती आहे.

शाखा—आश्वलायन सूत्र, शाकलशाखा.

गोत्रें—काश्यप, वत्स, भारद्वाज, अत्री, नित्युंदन, गार्ग्य.

उपनांवें—लह्याळ, लटके, मुंगसे, फडके, लवाटे, भागवत, गोळे. परंतु सर्व खोत हें उपनांव लावतात. खोत हें नांव धंदावाचक आहे.

धर्मकर्में—आश्वलायन गृह्यसूत्राप्रमाणें चालतात.

देवदैवतें व व्रतवैकल्यें—सामान्यतः चित्पावनांप्रमाणें होतात असें समजतें.

धर्मपंथ—स्मार्तसंप्रदाय, संकेश्वर पीठाचा निग्रहानुग्रह चालतो.

कर्ती माणसें--शिक्षण नाहीं त्यामुळें पुढें सरसावलेलीं माणसें नाहींत. फक्त शेती व थोडासा व्यापार यांमुळें तालुक्यांत नांवाजलेलीं माणसें चार पांच आहेत.

शिक्षण—समाज शिक्षणांत मागासलेला आहे. कांहीं कुटुंबांत स्त्रियांना थोडें शिक्षण आहे. सामान्य प्रवृत्ति जुन्याकडे आहे, परंतु शिकलेलीं माणसें प्रगतिप्रिय आहेत.

सांपत्तिक स्थिति--अत्यंत गरिबीची आहे. पांचसहा घरें खाऊन पिऊन सुखी अशीं आहेत.

राहाणी—शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य, अज्ञान, खेड्यांत राहाणें, यामुळें भाषा अशुद्ध आहे, खाण्यापिण्यांत शास्त्राविरुध्द जाणारा एकहि माणूस नाहीं. कुणब्याचे हातचें पाणी सुध्दां कोणी घेत नाहीं. एकंदरींत राहाणी स्वच्छ आहे.

आरोग्य व रोग--आरोग्य चांगलें, परंतु दारिद्र्यामुळें व अज्ञानामुळें लोकसंख्या घटत चालली आहे.

विधवा—पुनर्विवाहाला मान्यता नाहीं, एकही पुनर्विवाह झाला नाहीं. केशवपनाची चाल आहे व सक्ती केली जाते. कांहीं कुटुंबांत केशवपनाचा विकल्प दृष्टीस पडतो.

महत्त्वाकांक्षा—अलिकडे इतर ब्राह्मणज़ातींशीं अन्नव्यवहार होतो. परंतु कांहीं ठिकाणीं जुन्या मताचे लोक आडकाठी आणतात. ती नाहींशी व्हावी असें वाटतें. पुढें गेलेल्या ब्राह्मण जातींशीं दळणवळण जास्त होऊन सत्संगति लाभावी, व संगतीनें शिक्षणाचा प्रसार व्हावा, अशी महत्त्वाकांक्षा आहे.

स्वभाव—आयापेक्षां खर्च जास्त, रीण काढून सण करणें, त्यामुळें मोठमोठ्या मिळकती गेल्या. हट्टी व भांडखोर स्वभाव, त्यामुळें सरकारी न्यायालयांत पैसा जातो.

८. गोवर्धन ब्राम्हण

पूर्वेतिहास—गोवर्धनांचा इतिहास अलीकडे बराच उपलब्ध झाला आहे, त्यावरून माहिती मिळते ती अशी—गोवर्धन ब्राह्मण हे महाराष्ट्रांतील पहिले आर्य ब्राह्मण होत. यांचें मूळचें वास्तव्य उत्तरेकडे होतें. क्षत्रिय राजांबरोबर हे दक्षिणेंत आले. क्षत्रियांचीं राज्यें दक्षिणेंत जशजशीं वाढत गेलीं तशतशा यांच्या वसाहतीहि राजपुरोहित या नात्यानें प्रसार पावत्या झाल्या. महाराष्ट्रांत पहिल्यानें यांची वसाहत नाशिकच्या आसपास झाली. त्या भागाला पूर्वी गोवर्धन असें नांव होतें. गोवर्धन देशांतील ब्राह्मण ते गोवर्धन ब्राह्मण असें या ब्राह्मण समाजाला कोंकणस्थ-देशस्थांप्रमाणें प्रादेशिक नांव पडलें.

श्रीरामचंद्र दंडकारण्यांत आले त्या वेळीं त्यांना गोदाकाठीं तपस्वाध्यायनिरत, पुण्यवान्, शीलवान् ब्राह्मण आढळले असें वाल्मीकी रामायणाच्या अरण्यकांडांत (सर्ग १) वर्णन आहे. दंडकारण्यांतील या भागाची प्रख्याति ब्राह्मणांच्या वास्तव्यामुळेंच होती. या ब्रह्मभवनाला कालेंकरून गोवर्धन देश असें नांव मिळालें. हल्लीं दंडकारण्यांतील ज्या भागाला महाराष्ट्र म्हणतात त्याच भागाला पूर्वी गोवर्धन हें नांव असावें असें डॉ. भांडारकर 'दख्खनच्या इतिहासां'त म्हणतात. नाशिक शहराच्या आसपास गोवर्धन खेडें आहे तेंच पूर्वीचें गोवर्धन असावें. गोदाकांठच्या या भागाला गोवर्धन म्हटल्याचे उल्लेख मार्कंडेय पुराण अ. ५४ श्लो. ३४—३५, वायुपुराण पूर्वार्ध अ. ४५ श्लो. ११२ ते ११४ व मत्स्यपुराण अ. ११४ श्लो. ३७—३९ मध्यें आलेले आहेत. या भागांतील सह्याद्रीच्या फांट्याला गोवर्धन पर्वत म्हणत असेंहि मार्कंडेय पुराणांत वर्णन आहे. दंडकारण्यांतील या गोवर्धन देशांत उत्तरेकडील राष्ट्रीय ऊर्फ रट्ठे यांनीं राज्य स्थापिलें. त्या सात शाखांच्या संयुक्त राज्याला महाराष्ट्रिक असें नांव पडलें आणि त्या नांवावरून गोवर्धन देशाला महाराष्ट्र हें नांव मिळालें असें संशोधकांच्या म्हणण्याचें थोडक्यांत संकलन आहे.

इ. स. पूर्वी ५०० ते इ. स. ३०० पर्यंत उपलब्ध शिलालेखांत नाशीकच्या या भागाला गोवर्धन असें म्हटलें आहे. राष्ट्रिक, शातवाहन व क्षत्रप राजांनीं दिलेल्या उपलब्ध दानपत्रांत गोवर्धन ब्राह्मणांचा उल्लेख आहे.

त्यावरून त्या आठशें वर्षांच्या अवधींत त्या भागांत गोवर्धन ब्राह्मण पौरोहित्य करीत होते यांत संशय नाहीं. शके १३० च्या सुमारास वेदपठणपाठणार्थ गोवर्धनांना दान दिल्याचा ताम्रपट उपलब्ध आहे. सारांश, आर्यावर्तांतून दक्षिणेंत आलेले ब्राह्मण ज्योतिषी, पुरोहित व उपाध्याय या नात्यानें गोवर्धन देशांत राहिले. त्यांनाच पुढें गोवर्धन ब्राह्मण असें नांव पडलें. गोवर्धन देशांतील हे ब्राह्मण पुढें अपरांतांत म्हणजे उत्तर कोंकणांत उतरले. तेंव्हांपासून तों आजपर्यंत म्हणजे सुमारें २३०० वर्षें हे ब्राह्मण अपरांतांत अष्टाधिकारी ह्मणूनच आहेत. गोवर्धन ब्राह्मण हे देशावर व कोंकणांत वृत्त्यंशी असतांना राष्ट्रिक, शातवाहन, क्षत्रप, यादव, भोंसले व पेशवे इतक्या राजवटी होऊन गेल्या. हल्लींसुद्धां या भागांत हे ब्राह्मण वृत्त्यंशी पुरोहित आहेत. उत्तर कोंकणांत बिंबराजाचें राज्य झालें. त्याचे राजपुरोहित पुरुषोत्तमपंत कावळे होते. त्यांना बिंबराजानें गोवर्धन ब्राह्मणांवरील सर्वाधिकारी वृत्त्यंशी जी चांगुणाबाई तिला एक लक्ष रुपये देऊन उत्तर कोंकणांतील वृत्ति दान दिली. यजुर्वेदी व गोवर्धन यांचा अशा रीतीनें पहिल्यानें संबंध आला. देशावर व कोंकणांत चित्पावन, कऱ्हाडे, देशस्थ, ऋग्वेदी व यजुर्वेदी ब्राह्मण, जसजसे पसरले तसतसे त्यांचे गोवर्धनांशीं वृत्त्यंशमूलक तंटे उपस्थित झाले. गोवर्धनांची वृत्ति सर्वत्र होती. तिजवर डोळा ठेवून इतर ब्राह्मणांनीं यांची यजमानाकडे नालस्ती सुरू केली आणि ' याचको याचकं दृष्ट्वा ' या नात्यानें अनेक प्रकरणें व ग्रामण्यें उद्भवलीं. छत्रपति शिवाजी महाराजांपासून तों पेशवाईअखेर हे तंटे राजदरबारीं गेले व शंकराचार्यांपर्यंतही गेले. पुष्कळ प्रकरणीं गोवर्धनांच्या बाजूनें तेच वृत्त्यधिकारी ह्मणून जरी निर्णय मिळाला तथापि मनें स्वच्छ न होतां तीं अधिक कलुषित झालीं व पराभूत झालेल्या पक्षानें निंदाव्यंजक व तुच्छत्वदर्शक नांवानें संबोधिण्यास प्रारंभ केला ! गोवर्धन ब्राह्मणांस गोळक हें निंदास्पद नांव याप्रमाणें लावण्यांत आलें व तेंच पुढें रूढ होऊन बसलें.

वास्तव्य व लोकसंख्या:—गोवर्धन ब्राह्मणसमाज सर्व बृहन्महाराष्ट्रांत आहे. मोंगलाई व कारवार जिल्ह्यांतहि बरीच वस्ती आहे. एकंदर लोकसंख्या सुमारें ३०—३५ हजार असावी. महाराष्ट्राबाहेर बडोदें, धार,

देवास, इंदूर या भागांत गेलेलीं घराणीं उपाध्येपण व कुळकर्णीपण करितात. श्री. बाळाजी बाजीराव पेशव्यांच्या वेळीं गोवर्धन हें नांव प्ररूढ होतें. गोवर्धन ब्राह्मणांचे आचारविचार, संस्कार, उत्सव, सण इत्यादि सर्व इतर ब्राह्मणांप्रमाणें आहेत.

वेदशाखा व सूत्रें—उत्तर कोंकण व खानदेशांत ऋक्‌यजुः शाखेचे गोवर्धन ब्राह्मण असून इतर ठिकाणीं फक्त ऋक् शाखचेच आहेत. सामवेदी उत्तर कोकणांत क्वचित् आहेत. ऋग्वेद शाकलशाखा आश्वलायन सूत्र; कृष्ण-यजुर्वेद तैतिरीय शाखा, बौधायन सूत्र; शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखा, कात्यायन सूत्र; सामवेद छांदोग्य शाखा, गोभिल सूत्र अशीं प्रचलित आहेत.

गोत्रें—अत्रि, आंगिरस, उपमन्यु, औपमन्यव, कपि, कात्यायन, कामकायन, काश्यप, कौंडिण्य, कौशिक, गौतम, गार्ग्य, चंद्रात्रेय, जामदग्न्य, पाराशर, भार्गव, भारद्वाज, मुक, मुद्गल, मैत्र्य, मौन, वत्स, वामरथ्य, वासिष्ठ, विश्वामित्र, लोहित, शालंकायन, शालावत, शांडिल्य, श्रीवत्स, सांख्यायन, हारितस, कृष्णात्रेय, वैंग्य, वालखिल्य, रथीतर, शट, वाघूल इत्यादि.

गोवर्धन ब्राह्मणांत गोत्रांसंबंधीं विशेष हा आहे कीं, महाराष्ट्रांत हल्लीं विद्यमान् असणाऱ्या देशस्थ यजुर्वेदी, चित्पावन व कऱ्हाडे ब्राह्मणांत नसलेलीं सांख्यायन, कामकायन, कात्यायन, शालंकायन, वामरथ्य, रथीतर, शट, वालखिल्य, वाघूल व औपमन्यव हीं गोत्रें उत्तर कोंकण व महाराष्ट्रांतील गोवर्धन ब्राह्मणांत आढळतात. पूर्वीच्या ताम्रपटांत ब्राह्मणांचीं नांवें, गोत्रें व शाखा देण्याची वहिवाट होती. शके १२१२ मध्यें उत्तर कोकणांत ठाण्याजवळील अणजोर नांवाचा गांव ठाण्यास राहणाऱ्या दामोदर अग्निहोत्रीप्रमुख चाळीस ब्राह्मणांस रामदेवराव राजाच्या वेळीं दान देण्यांत आल्याबद्दल जो ताम्रपट उपलब्ध आहे, तसेंच देवगिरीच्या गादीवर कृष्णराजा असतांना बागेवाडी येथील निरानिराळ्या बत्तीस ब्राह्मणांस जमिनी दान दिल्याचीं जीं दानपत्रें उपलब्ध आहेत त्या ताम्रपटांत व दानपत्रांत वरील विशिष्ट गोत्रें आढळतात. यावरून त्याच ब्राह्मणांचे वंशज हल्लींचे गोवर्धन ब्राह्मण आहेत हें निश्चित होतें.

प्रवर—गोवर्धन ब्राह्मणांत त्रिप्रवरी व पंचप्रवरी लोक आहेत.

आडनांवें—प्रभाकर, रत्नाकर, धाते, विधाते, लोकेश, झाडे, वेखंडे, नायक, तिवाडी, अलाटे, मोटगे, राणे, अवारे, दुर्वास, तांबेकर, मंडावले, आवटे, व्यवहारे, रोडे, दिनकर, शूळ, कुवर, दास्ताने, पांचाले, पालये, गरगरे, देसाई, प्रयाग, दास, मटवी, घवी, पिंगळे, पिंपळे, कांकडे, भालेराव, भगाड, रोंधे, नाचणे, भालके, खताळ, भट, जोशी, कुळकर्णी, दिक्षीत, पंडित, पाठक, टकले, वैद्य, धर्माधिकारी, मुळे, क्षीरसागर, गोसावी, डांगे, रत्नपारखी, नारळे, महाजन, रेलकर, बिवलकर, इत्यादि.

धर्मकर्में—गोवर्धन ब्राह्मणांचीं धर्मकर्में स्वशाखीय ब्राह्मणांकडून होतात व तीं शाखाभेदाप्रमाणें आश्वलायन, बौधायन, कात्यायन व गोभिल सुत्राधारें होतात. नित्य देवपूजा, संध्या, वैश्वदेव होतात. गर्भदानादि अंत्येष्टी-पर्यंतचे सर्व संस्कार, श्राद्धपक्ष, वास्तुशांत, उदकशांत, श्रावणी, इत्यादि मुख्य धर्मकर्मे गोवर्धनांकडे होतात. स्वशाखीय पुरोहित असल्यानें अन्यशाखीयांची जरूरी भासत नाहीं. तथापि सर्वच गांवीं स्वशाखीय पुरोहित असतातच असा नियम नाहीं. तेव्हां इतरशाखीय पुरोहित धर्मकर्में चालवितो. तथापि विशेष कार्य स्वशाखीयांशिवाय होत नाहीं. त्यांत इतरशाखीय ब्राह्मण सहानुष्ठानास असतात, व त्यांची योग्य संभवनाही होते. मात्र पौरोहित्याची विशेष बाब स्वशाखीयांकडे जाते. कोठें कोठें श्रावणी स्वतंत्र करण्याची सोय नसल्यास इतर ब्राम्हणांकडे श्रावणीस जाण्याची वहिवाट आहे.

देवदेवता—जेजूरीचा खंडोबा, वांकडीचा खंडोबा, चिंचखेडचा खंडोबा (औरंगाबाद जिल्हा), तुळजापुरची देवी, जोगेश्वरी, वज्रेश्वरी, वीरेश्वरी, महालक्ष्मी (कोंकण), कोल्हापूरची देवी, सप्तश्रृंगी, माहूरची देवी, पाटण्याची देवी (चाळीसगांव तालुका), नांदगांवचा गणपती, वेजराज-माता (बडोदें) व बालाजी हीं मुख्य कुलदैवतें आहेत. उपास्यदेवतांमध्यें पंचा-यतन पूजा आहे. कांहीं ब्राह्मण शिव, विष्णु, गणपति, दत्त, राम या देवतांचे उपासक आहेत. खानदेशांतील बरेच गोवर्धन वारकरी पंथाचे आहेत. मोक्षगुरुचा उपदेश घेण्याची चाल आहे.

धर्मपंथ व मतें—शांकर अद्वैत मतानुयायी सर्व गोवर्धन आहेत. कांहीं अल्पसंख्याक मध्वमतानुयायीही आहेत. शिवगंगा, शृंगेरी व संकेश्वर येथील आचार्यांची प्रसंगानुसार पाद्यपूजा होते. शृंगेरी पीठाचें अनुशासन चालतें. चतुर्थाश्रम घेण्यास गोवर्धन मठास म्हणजे जगन्नाथपुरीस जाण्याची चाल आहे. त्या गोवर्धन मठाचा परमहंस सांप्रदाय आहे.

पौरोहित्य—पौरोहित्य व जोशीपणाच्या सनदा आणि आज्ञापत्रें मठाकडून मिळालेलीं असून त्यांत ज्या भागांत धर्माधिकार चालविण्याची आज्ञा असेल त्याचा उल्लेख असून पीठास देण्याचा भाग ठरलेला असतो. पूर्वींच्या राजवटींत तो दिला जात असे. आतां पीठाध्यक्ष किंवा त्यांचे प्रतिनिधी फिरतीवर आले म्हणजे कधींकधीं धर्माधिकाऱ्यांस त्यांची संभावना करावी लागते.

व्रतवैकल्यें व सण—चैत्रागौरी, रामनवमीचा उपवास व उत्सव, हनुमत्-जयंती, अक्षय्य तृतीयेचें कुंभदान, दशाहार, वटसावित्रीपूजा, आषाढी कार्तिकी एकादशी, पक्ष किंवा शनि-सोमप्रदोष, शिवरात्रीचे उपवास, महाशिवरात्रीचा उपवास, गाणपत्य—बारा महिन्यांच्या संकष्ट्या व माघ शुद्ध ४चा कडकडित उपवास—नागपंचमी, शिवामूठ, मंगळागौरी, नागनरसोबा, जिवत्या, बुधबृहस्पति, श्रावण सोमवार, शनिवारचे उपवास, गोकुळाष्टमी, पिठोरी अमावास्या, हरतालिका, ऋषी-पंचमी, गणेशचतुर्थी, अनंतव्रत, आश्विनांत देवीचें नवरात्र, शप्तशतीचे पाठ, उपवास, नंदादीप, आश्विनी आदित्यवाराचे उपवास, श्रावण व कार्तिक सोमवाराचे उपवास, तुलसीविवाह, वैकुंठचतुर्दशी, त्रिपुरी पूर्णिमा, मार्गशीर्षांत सटीचें व खंडोबाचें नवरात्र, चंपाषष्ठी, नाग दिवाळी द्विवशीं बऱ्याच देवता कोकणांतील असून देवदिवाळीची चाल नाहीं. संक्रांत, रथसप्तमी, दिवाळीचें लक्ष्मीपूजन व फाल्गुनी पूर्णिमेचें होलिकापूजन आहे. खानदेशांत राणूबाईचें व्रत आणि चक्रपूजेचीही रुढी आहे.

शिक्षण—एकंदरींत समाज मागसलेला आहे. संख्येच्या मानानें सुशिक्षित व विद्वान माणसें कमी आहेत. तरी निव्वळ निरक्षरता अगदीं कमी

आहे. नव्या शिक्षणांकडे प्रवृत्ति हळूहळू वाढत आहे. जोसपण, उपाध्येपण, कुळकरण व शेती ह्यावर आजपावेतों निर्वाह होत होता. ह्मणून नव्या शिक्षणाची तादृश जरूर भासत नव्हती, ती अलीकडे भासूं लागली आहे व नोकऱ्याकडे प्रवृत्ती वाढत आहे. भिक्षुकीवर चरितार्थ चालत नसल्यानें शहरांत येऊन नोकऱ्या करण्यांकडे ओढा अधीक आहे. मुलींना सामान्य लिहितां वाचतां येतें. इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया क्वचितच आहेत. विवाहाकरितां मुलींना शिक्षण द्यावेंच लागतें. नवीन शिक्षणानें कांहीं पदवीधर वकील, डॉक्टर, इंजीनीअर, प्रोफेसर, पोलिस व मुलकी खात्यांत वरिष्ठ अधिकारी आणि मास्तर झालेले आहेत. स्त्रियाही कोठें कोठें मास्तरणी व मिडवाईफ म्हणून आहेत.

पूर्वीं प्रत्येक धर्माधिकाऱ्यांकडे वेदशाळा असत. आतां तें मान कमी झालें आहे, तरी प्रत्येक धर्माधिकाऱ्यांकडे कांहीं मुलें शिक्षण घेत असतात. शिक्षण परंपरेनें मिळतें, इतर शाखीय ब्राह्मणांकडूनही कोठें कोठें याज्ञिक व ज्योतिष शिक्षण घेत असल्याचीं उदाहरणें आहेत. अमृतेश्वर, कुंभाळी आणि काजगांव ह्या ठिकाणीं वेदपाठशाळा आहेत. त्यांचेहि शिक्षण हेळसांड न होतां परंपरेनें चालतें. संगमनेर येथें मुलांच्या शिक्षणाकरितां वसतिगृह उघडण्यांत आलें आहे. एकंदरीत संस्कृत शिक्षण कमी आहे.

सांपत्तिक स्थिती—लोकसंख्येच्या मानानें समाधानकारक नाहीं. कोकणांत कांहीं बरी आहे पण देशावर ती हलाखीची आहे. भाऊबंदकी, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, दुष्काळ, जमिनींची नापिकी, (वृत्यावर आतापावेतों चरितार्थ ठीक चालत असल्यानें) इतर धंद्याविषयीं अनास्था व आळस आणि नवीन शिक्षणाचा अभाव अशा अनेक कारणानीं सांपत्तिक स्थिती निकृष्ट झाली आहे. प्रत्येक भागांत फारतर दहा पांचच कुटुंबें खाऊन पिऊन सुखी सांपडतील.

राहाणी—गरीबीची पण स्वच्छ असते. मुंबई, पुणें इत्यादि सारख्या शहरांतील व आसपासच्या गांवांतील लोकांची राहणी व्यवस्थित असते. पण सांपत्तिक स्थितीचा व परिस्थितीचा बरा वाईट परिणाम राहणीवर होतो. खेड्यांतील राहाणी जुन्या तऱ्हेची म्ह. सोंवळें ओवळें कडक अशा तऱ्हेची दिसते.

खेड्यांत नैसर्गिक आरोग्य असतें, पण शिक्षणाच्या अभावीं निसर्गाचा फायदा योग्य तऱ्हेनें घेतां येत नाहीं. शहरांतील राहाणीचा परिणाम इतर ब्राह्मणा-प्रमाणें गोवर्धन ब्राह्मणाच्या राहणीवर झालेला दिसतो. भाषेंत व उच्चारांतहि ह्याच प्रमाणें प्रांतपरत्वें फरक आहे.

आहार—हे ब्राह्मण शाकाहारी आहेत. मत्स्याहार किंवा मांसाहार करतात अशा प्रकारचा आरोप या सामाजावर केलेला ऐकण्यांत नाहीं. इतर ब्राह्मणाप्रमाणें कांहीं व्यक्ति मांसाहारी किंवा मत्स्याहारी आढळतील तर त्या अपवादात्मक समजल्या पाहिजेत. त्यामुळें एकंदर गोवर्धन ब्राह्मण समाजास तो दोष लागूं शकत नाहीं.

विधवाविवाह—मुळींच रुढ नाहीं. आज पावेतों एकहि झाला नाहीं व संमतही नाहीं. विधवांमध्यें केशवपनाचा विकल्प दृष्टीस पडतो. सकेशा विधवा धार्मिक कार्यांत भाग घेत नाहींत, याचें कारण त्यांना अशुभ मानण्याची कल्पना कोठें कोठें अजून नष्ट झालेली नाहीं.

रोग व आरोग्य—इतर ब्राह्मणांत न दिसणारे कोणतेही रोग या ब्राह्मणांत नाहींत. शहरांत स्त्रियांमध्यें बाळंतरोग, क्षयरोग, आणि बालमृत्यु यांचें प्रमाण इतरांप्रमाणें वाढत आहे. एकंदरींत आरोग्य वाईट नाहीं.

स्वभाव—गरीब, श्रद्धाळु व मनमिळाऊ असा आहे. त्या बरोबरच स्वाभिमान, ईश्वरनिष्ठा, पापभीरुत्व हे गुण या समाजांत आढळतात. औदार्य व कृपणत्व इतर ब्राह्मणांप्रमाणें या समाजांत आढळतात. पण शिक्षणाभाव व दारिद्र्य ह्यांमुळें कंजुष वृत्ति जास्त दिसते.

अग्निहोत्र व सद्नुष्ठान—वे. मू. त्र्यंबकशास्त्री आश्वीकर धर्माधिकारी यांचे घराण्यांत अग्निहोत्राची परंपरा आहे व त्याजबद्दल श्रीशंकराचार्य मठ शृंगेरी व श्रीशंकराचार्य मठ संकेश्वर यांचीं प्रशंसापत्रें आहेत. तसेंच, धर्माधिकारित्वाबद्दलही संमतिदर्शक आज्ञापत्रें सदर धर्माधिकारी यांजकडे आहेत. व उत्तर कोंकणांत पालये शास्त्री व दुसरे दीक्षित यांच्या घराण्यांत अग्निहोत्र

होतें. सहानुष्ठानाबद्दल वे. पालयेशास्त्री व वे. त्र्यंबकशास्त्री धर्माधिकारी यांना कधीं अडचण आली नाहीं. याबद्दल यांच्याजवळ आज्ञापत्रें आहेत. वऱ्हाड व मध्यप्रदेशांत कायमचे राहणारे स्वशाखीय भिक्षुकाचें एकाददुसरेंच घर असल्यानें गोवर्धन ब्राह्मणांकडील धर्मकर्में इतरशाखीय भिक्षुक चालवितात. मात्र लग्न-मौंजी इत्यादि नैमित्तिक कार्यें बहुशः स्वशाखीय पुरोहिताशिवाय केलीं जात नाहींत. तशा प्रसंगीं स्वशाखीय पुरोहित आणि परशाखीय पुरोहित तीं सहकार्यानें करतात. गोवर्धन ब्राह्मणांची श्रावणी स्वतंत्र होते. स्वशाखीय पुरोहित अथवा परशाखीय किंवा दोघे मिळून त्या प्रसंगीं काम चालवितात. जेथें स्वतंत्र श्रावणीची सोय नसेल तेथें इतरशाखीयाकडे श्रावणीस जाण्याची रीत आहे. बुलढाण्यास वे. मू. कर्वे भटर्जी (कोंकणस्थ) व वे. हरीभटर्जी (देशस्थ ग्रामजोशी) गोवर्धन पुरोहितांबरोबर लग्नकार्यप्रसंगीं सहकार्य करतात आणि इतर वेळींहि प्रसंगोपात धर्मकर्में चालवितात. आकोल्यास १९०६ सालापासून देशस्थ ऋग्वेदी दिक्षीत उपनांवाचे भिक्षुक गोवर्धनाकडे पौरोहित्य करीत. आतां या घराण्यांत कोणी भिक्षुकी करीत नाहीं. ह्यानंतर कांहीं वर्षें वे. रंगभटर्जी कानडे यांनीं काम चालविलें. पण अलीकडे ५।६ वर्षांपासून आगाशे उपनांवाचे कोंकणस्थ व दुसरे गोपाळभटजी कोंकणस्थ ब्राह्मण गोवर्धनांकडील धर्मकर्में चालवितात. ह्या सर्व भिक्षुकांनीं लग्न-मौंजी इत्यादि प्रसंगीं गोवर्धन पुरोहितांबरोबर कामें केलीं आहेत व करतात. वाशीमला कोरान्ने उपनांवाचे देशस्थ ऋग्वेदी भिक्षुक गोवर्धनांचें पुरोहितपणा करीत आकोट येथें एक तुळशी उपनावाचे देशस्थ ऋग्वेदी भिक्षुक गोवर्धनांचें पौरोहित्य करीत. सारांश, गोवर्धन ब्राह्मणांस सहानुष्ठानाची कधींच अडचण पडली नाहीं. जन्मापासून अंत्येष्टी पावेतों सर्व संस्कार व धर्मकर्में इतर शाखीय भिक्षुक चालवितात व विशेष प्रसंगीं गोवर्धन पुरोहितांबरोबरहि कामें करतात. इतरशाखीय भिक्षुकांनीं कधीं हरकत घेतली नाहीं. गोवर्धनांच्या वेदाधिकाराबद्दल वाद कधीं उत्पन्न झाला नाहीं. एकदोन प्रसंगीं दोन्ही शाखांच्या भिक्षुकांत फक्त दाक्षिणेच्या बाबीबद्दल झगडे झाल्याचें समजतें. गोवर्धन पुरोहित उपस्थित असल्यास पुरोहितपणाच्या बाबी यास मिळतात व सहकार्य करणाऱ्या इतरशाखीय भिक्षुकांचीही योग्यतेनुरूप संभावना केली जाते.

भोजनव्यवहारः—श्री० होनमोडे हे आश्वी येथील राहणारे म्हणजे धर्माधिकाऱ्यांच्या गांवचेच आहेत. धर्माधिकाऱ्यांचें घराणें हें परंपरागत वैदिक अग्निहोत्री व आज २।३ पिढ्या विशेष सुखी असल्यानें इतर मान्य ब्राह्मणांचा व त्यांचा भोजनप्रतिभोजनव्यवहार होण्यास अडचण आली नाहीं. त्याचप्रमाणें आजच्या बदलेल्या परिस्थितींत मुंबई, पुण्यासारख्या शहरांतून व त्यांच्या सहवासांतल्या व आजूबाजूच्या इतर खेड्यांतूनही नवमतवादी ब्राह्मण मंडळी भोजन प्रतिभोजनाच्या व्यवहाराला मुळींच महत्त्व देत नाहींत. साधारणतः खेड्यांतून सार्वजनिक रीत्या हा प्रश्न समाधानकारकपणें सुटलेला नाहीं. तथापि पुष्कळ ठिकाणीं गोवर्धनांच्या व इतर महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या आचार, विचार, आहार व धार्मिक संस्काराच्या साम्याबद्दल नित्य सान्निध्यानें जेथें पूर्ण खात्री झालेली आहे व ज्यांना गोवर्धनांच्या पूर्वेतिहासाचें आतां ज्ञान झालें आहे असें मान्य ब्राह्मणांतील पुष्कळ लोक गोवर्धन ब्राह्मणाशीं भोजनप्रतिभोजन व्यवहार कोठें कोठें निशंकपणें करीत आहेत.

महत्त्वाकांक्षाः—गोवर्धन ब्राम्हण समाजास स्वोन्नतीबद्दल तळमळ लागली आहे, त्या दिशेनें त्याचे प्रयत्नही चालू आहेत व त्यास पूर्ण आत्मविश्वास आहे कीं थोड्या मंदगतीनें कां होईना पण त्याची उन्नति झाल्याशिवाय राहणार नाहीं. कारण या एकीकरणापासून इतरांच्या सहवासानें स्वोन्नतीचें पाऊल झपाट्यानें पुढें पडेल असें त्यास वाटतें. गोवर्धन ब्राह्मण समाज सांपत्तिक दृष्टीनें व स्वभावानें फार गरीब आहे. त्यानें आज पावेतों इतकी दुःस्थिती असूनही कधींच चढाईचें धोरण स्वीकारलेलें नाहीं. तथापि अपमानाची अतिशय चीड असल्यानें अपमान व चढाईचा प्रतिकार करण्यासही त्यानें कधीं मागें घेतलें नाहीं. ह्या करितांच वांईच्या ब्राह्मण परिषदेंत त्यांनीं भाग घेण्यापूर्वीं चालू रूढी समजुतीला अनुसरून आपला कोणत्याहि प्रकारें अपमान होणार नाहीं अशी प्रथम चालकांकडून निश्चिती करून घेतली होती. तेथें भोजनादि सर्व व्यवहारांत ह्या समाजाच्या प्रतिनिधीस बरोबरीच्या नात्यानें वागविण्यांत आलें इतकेच नाहीं, तर त्यांपैकीं दोघांची ब्राह्मण परिषदेच्या कार्यकारी मंडळांतही निवड करण्यांत आली. ब्राह्मणसंघटण करून राष्ट्रोद्धार करण्याची या जातीची आकांक्षा आहे.

मुख्य सामाजिक दुःख——गोवर्धन ब्राह्मणांनीं सर्व हिंदू जातींचें पौरोहित्य पूर्वींपासून आजपर्यंत चालविलें आहे. म्हणून त्यांच्या सद्ब्राह्मण्याबद्दल आणि वेदाधिकाराबद्दल कांहींच शंका घेतां येणार नाहीं. तारळेकर या नांवाच्या एका विद्वान् शास्त्र्यानीं या ब्राह्मणांची नालस्ती एकदां केली होती, त्याबद्दल त्यांना सरकार दरबारांत क्षमा मागावी लागली. गोवर्धन ब्राह्मणांना गोळक असें ह्मणतात. गोळक हें नांव हीनत्वदर्शक व अपमानास्पद आहे. या नांवानें संबोधिल्यामुळें या समाजाचें सामाजिक दुःख परमावधीला पोंचलें आहे. कारण या हीनत्वदर्शक नांवाला बुजूनच यांच्याशीं उघडपणें अन्न-व्यवहार होत नाहीं. तो होण्यास हें नांव नष्ट केलें पाहिजे. कारण गोळक हें नांव संकर-जातिवाचक नाहीं. हें व्यक्तिवाचक आहे; म्हणून सर्व जातीला हें लावून हिचा अपमान करणें योग्य नव्हे. याबद्दल वे. शा. सं. पांडुरंगशास्त्री पालये यांनीं जो निबंध लिहिला आहे त्यांतील मुख्य भाग खालीं देतों:——

" मनुस्मृति अ. १० प्रमाणेंच याज्ञवल्क्यस्मृति अ. १, प्र. ४, गौ. स्मृ. बाधायन प्रश्न १ अ. ८ व ९ औशीनसी स्मृति, वसिष्ठ स्मृति अ. १८, बृहद्विष्णु स्मृति, अ. १६ व्यासस्मृति अ १, पराशर स्मृति अ. ११, बृहत्पाराशरी स्मृति अ. ६ यांमध्यें वर्णसंकर जाति सांगितल्या आहेत. त्यांत कोणत्याही स्मृतींत "गोळक हा शब्द आलेला नाहीं. गोळक हें जातीचें नांव आहे, असें जर स्मृतिकारांस अभिमत असतें, तर निःसंशय वर सांगितलेल्या ठिकाणीं वर्णसंकर जातींत, तें आलें असतें.....धर्मशास्त्र संग्रहाच्या कर्त्यानें, कुंड व गोळक व्यक्तिवाचक शब्द समजूनच हा खरा अर्थ दिला आहे. मनुस्मृति अ. ३ श्लोक १७४ पहा.

" परदारेषु जायेते द्वौ सुतौ कुंडगोलकौ। "

परस्त्रीच्या ठिकाणीं कुंड व गोळक असे दोन पुत्र होतात. परस्त्रीला होणारा कुंड व गोळक हा परक्षेत्रांतला प्राणी म्हणजे व्यक्ति होय. सारांश, गोळक ही जात नाहीं म्हणून कोणत्याही जातीला गोळक म्हणणें हें धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे. निर्णयसिंधु, धर्मसिंधु, प्रयोगपारिजात, स्मृत्यर्थसार, शुद्रकमलाकार हे

ग्रंथ पाहिले कीं असें दिसून येतें कीं "गोलक" हें कोणत्याही जातींचें नांव असूं शकणार नाहीं. धर्मशास्त्राच्या अनेक आधारावरून असें स्पष्ट होतें कीं, गोवर्धन ब्राह्मणांस गोळक म्हणणें धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे. पूर्वीच्या काळीं समाजशासन कडक होतें. एखादा मनुष्य विधवेच्या पोटीं जन्मला असेल तर त्याला समाजानें दूरच ठेविलें असलें पाहिजे. अशा दूर ठेवलेल्या एका मनुष्यापासून ४०|५० हजार ब्राह्मणांची संख्या कशी उत्पन्न होईल? शिवाय गांवोगावचे अष्टाधिकार, पौरोहित्य, जोसपण, धर्माधिकार हे ज्या ब्राह्मणाकडे चालले आहेत, त्यांना असें म्हणणें किती अयोग्य आहे याचा विचार सुज्ञ वाचकांनीं करावा. अपरादित्यराजा, हेमाद्रिसारखा धर्मशास्त्रज्ञ, अशांच्या कडून गोवर्धन ब्राह्मणांना पौरोहित्याच्या सनदा मिळालेल्या आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शृंगेरी मठाची शके १६५८–६२–६४ सालचीं आज्ञापत्रें, पेशवाईंतील आज्ञापत्रें, आणि आदिलशाहींतील सनदापत्रांवरून गोवर्धन ब्राह्मणांना गोळक म्हणणें सर्वथैव चुकीचें ठरणार आहे. ज्ञानकोशाच्या अकराव्या भागांत पान ७१६ वर पुढील मजकूर आहे. "ब्राह्मणांत सामवेदी व गोवर्धन हे प्राचीन रहिवासी होत. चिंचणी सोपाऱ्याकडील कांहीं इनाम जमिनी शातवानांनीं सामवेदी व गोवर्धन या ब्राह्मणांस दान केल्या होत्या." रा. रा. ना. गो. चापेकर यांच्या अभिप्रायावरून प्रतिग्रह घेणाऱ्या या ब्राह्मण समाजाचें ब्राह्मणत्व अमान्य करणें म्हणजे धर्मशास्त्राचें अज्ञान प्रगट करणें होय. तात्पर्य, दानाधिकार व जोशीपण, उपाध्येपण करणें हें ब्राह्मण्याचें द्योतक आहे, म्हणजे ज्यांअर्थीं गवोर्धन ब्राह्मणसमाजाला जोशी–उपाध्येपण करण्याचा म्हणजे पौरोहित्याचा व दानदक्षिणा घेण्याचा अधिकार आहे, त्याअर्थीं हा समाज ब्राह्मण आहे. आणि ज्याअर्थीं हे बाह्मण आहेत त्याअर्थीं ते गोळक नाहींत, म्हणजे अधर्मसंतति नाहींत हा सिद्धांत आहे."

वे. शा. सं. पालयेशास्त्री यांच्याप्रमाणेंच बळवंत तुकाराम पिंपळे (मु. बोदवड, पश्चिम खानदेश) यांनींही गोवर्धन ब्राह्मणांना गोळक ह्मणणें कसें चुकीचें आहे हें 'गोवर्धन ब्राह्मणांचा संक्षिप्त इतिहास' या निबंधांत सिद्ध केलें आहे. अनेक महत्त्वाच्या प्रमाणांनीं त्यांनीं आपलें हें ह्मणणें मांडलें आहे.

डॉ. भांडारकरांच्या मतें महाराष्ट्रांतील सर्वांत जुनी जात म्हटली म्हणजे गोवर्धन ब्राह्मणांची होय. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत गोवर्धन ब्राह्मणांविरुद्ध भिक्षुकांनीं एक तंटा उपस्थित केला होता. त्याचा निकाल गोवर्धन ब्राह्मणांना अनुकूल असाच झाला. त्यांतील महत्त्वाचा उतारा:—" ब्राह्मण, प्रभु, सोनार, कासार यांजकडील कार्यप्रयोजन वे. मू. रा. बाळजोशी गोवर्धन ब्राह्मण हे पूर्वीप्रमाणें चालवितील. या अन्वयें पूर्वी चालत आलेला दाखला पाहून ताकीद करून चालविणें. कल्याण, भिवंडी प्रांतांतही ऐसीच चाल आहे. ब्राह्मण, प्रभु, सोनार व कासार यांनीं या व्यतिरिक्त कार्य चालविलें, तर त्याची क्षमा होणार नाहीं. येविषयीं ताकीद करणें. " मुंबई सरकारच्या गॅझिटीअरच्या अठराव्या भागांत गोवर्धन ब्राह्मण (व्यभिचारोत्पन्न गोळक नसून) ते नाशिकाजवळचे सर्वांत जुने रहिवासी आहेत, असें म्हटलें आहे. गोवर्धन ब्राह्मण समाजाचें मुख्य सामाजिक दुःख कसें नाहींसें करतां येईल हा इतर ब्राह्मणांनीं अत्यंत सहानुभूतीनें विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

कर्तीं माणसें:—या समाजांत बरीच आहेत. विस्तारभयास्तव त्यांचीं नांवें देतां येत नाहींत. पुष्कळ ठिकाणीं शिव, विष्णु, देवी इत्यादि देवतांच्या प्राणप्रतिष्ठा ब्राह्मण व सर्व हिंदु यजमानांनीं गोवर्धन ब्राह्मण पुरोहिताकडून करून घेतल्या असून त्या देवतांची पूजाअर्चा सांप्रत सर्वांकडून सारख्याच भक्तीनें होते.

प्रकरण ६ वें

सामवेदी, अथर्ववेदी व सर्ववेदी ब्राम्हण

१. सामवेदी ब्राह्मण. (ठाणें जिल्हा)

पूर्वेतिहास व वास्तव्यस्थानें—या ब्राह्मणांचा मूळ पुरुष जैमुनी हा होय. ब्रह्मदेव, मरीची, महाऋषी–भूदेव व जैमुनी अशी यांची परंपरा आहे. जैमुनीनें नाशिक, पंचवटी येथें ब्रह्मा, विष्णु, महादेव व सूर्य या चार देवांच्या प्रसन्नतेसाठीं तेरा हजार वर्षे तपश्चर्या केली. तेव्हां देवांनीं प्रसन्न होऊन "तुला जटेंतून तेरा पुत्र होतील" असें वरदान दिलें. त्याप्रमाणें तेरा पुत्र निर्माण झाले. नंतर जैमुनीनें राक्षसांच्या भयामुळें पंचवटीचा त्याग केला व आपल्या तेरा पुत्रांसह पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर (वसई प्रांत–अरनाळें बेटांत) येऊन राहिला. पुढें कांहीं कालानंतर परशुराम मातु:श्रीच्या उत्तरक्रियेकरितां सामवेदी विद्वान् ब्राह्मणांचा शोध करीत असतां त्यास नारदांनीं आरनाळें बेटांत जैमुनीचे पुत्र फार विद्वान् आहेत असें सांगितलें. परशुरामानें त्यांचा शोध लावून त्यांचेकडून मातुश्रीची उत्तरक्रिया केली. त्यानें देवश्रवा नांवाच्या ऋषींच्या तेरा कन्यांबरोबर त्यांचीं लग्नें करून दिलीं व त्यांना ठाणें प्रांतांत राहण्यास सांगितलें. या प्रांतांत या ब्राह्मणांची वस्ती पूर्वीं बरीच होती. परंतु पोर्तुगीजांच्या अनन्वित छळामुळें या जातीचें भयंकर नुकसान झालें. त्यांचे जवळ असलेले कागदपत्र या काळांत नाहींसे झाले. हल्लीं यांचें वास्तव्य फक्त बारा गांवांत आहे.

वेदशाखा—सामवेदी नित्यांजनीं शाखेचे हे अनुयायी आहेत.

लोकसंख्या—हल्लीं एकहजार आहे. **जातींतून परधर्मांत गेले-ल्यांची संख्या चार हजारांहून जास्त आहे!**

अन्नलग्नव्यवहार—अन्नव्यवहार इतर ब्राह्मणांबरोबर क्वचित् होतो. लग्नव्यवहार जातींतल्या जातींत होतो.

गोत्रें—एकंदर बारा गोत्रांचे हे ब्राह्मण आहेत. पैकीं सांप्रत आठ गोत्रांचे ब्राह्मण विद्यमान असून चार गोत्रांचे **ब्राम्हण वाटून भ्रष्ट व नष्ट झाले आहेत.**

शिक्षण—शेतकीच्या धंद्यामुळें शिक्षणप्रगति साधारण आहे.

धर्मपंथ, मतें व देवता—ही ज्ञात स्मार्तशांकर अद्वैत मतानुयायी आहे. डहाणू तालुक्यांतील महालक्ष्मी ही यांची कुलदेवता आहे. व्रतें, वैकल्यें इत्यादि इतर ब्राह्मणांप्रमाणें थोडथोडीं आहेत. स्त्रिया लग्न झाल्यापासून सतरा वर्षें गौरी-व्रत करतात.

आहार—हे ब्राह्मण शाकाहारी आहेत.

सांपत्तिक स्थिति—हे सर्व ब्राह्मण शेतकी आणि बागाईत करतात. सांपत्तिक स्थिती साधारण आहे. पेशवाईंत एका इसमास देशमुखीची सनद मिळाली होती.

राहाणी—सर्व लोक शेतकरी असल्यानें राहणी ओंगळ आहे. हल्लीं थोडी सुधारणा होत आहे.

महत्त्वाकांक्षा—अन्नव्यवहार क्वचित् इतर ब्राह्मणांबरोबर होतो तो सर्व ब्राह्मणांबरोबर व्हावा असें या समाजाला वाटतें.

मोगलाईत बीड जिल्ह्यांत सामवेदी ब्राह्मण बरेच आहेत. त्यांचे लग्न-व्यवहार आश्वलायन शाखेंतील देशस्थांशीं होतात. अन्नव्यवहार सर्व ब्राह्मणांशीं होतो असें समजतें.

२. अथर्ववेदी ब्राम्हण.

पूर्वेतिहास-प्राचीन ताम्रलेखावरून असें दिसतें कीं, पूर्वीच्या काळीं हा अथर्ववेदी ब्राह्मणसमूह फार अल्प होता. सांप्रत अथर्ववेदाच्या नऊ शाखां-पैकीं फक्त शौनकी या एकाच शाखेचे अनुयायी आहेत. अथर्ववेदी ब्राह्मण

कौशिक, उपमन्यु, भारद्वाज, शावाश्व, भालंदन अशा पांच गोत्रांचे आहेत. त्यांतल्या त्यांत शेवटच्या गोत्राचे ब्राह्मण थोडे आहेत.

या ब्राह्मणांची मुख्य वस्ती सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागांत आहे. खटावकर देशपांडे यांचें घराणें इंदुरास आहे. जांबकर कुळकर्ण्यांचें घराणें ग्वाल्हेरीस आहे. त्या घराण्यांतील एक पुरुष ग्वाल्हेरीस हल्लीं सुभे आहेत. खटाव तालुक्यांत मोळ, डिक्सळ, बुध, निढळ इत्यादि गांवांतील जोशी, कुळकर्णी व देशपांडे अथर्ववेदी आहेत. तसेंच सातारा तालुक्यांतील महागांव व दोन्ही चिंचणेरचे कुळकर्णी अथर्ववेदी आहेत. चिंचणेर (तर्फ लिंब, पंडितराव यांचें) येथें भगवद्भक्त स्वयंज्योती महाराजांचे वंशज असून श्री मुकुंदबुवा महाभागवत हे त्याचपैकीं होत. चिंचणेरच्या कुलकर्णी वंशांतील बाणूअण्णा गोरे हे श्री सांगलीकरांचे आश्रित होते, ते नुकतेच वारले. यांना पुण्यास सरदार मेहेंदळे व डॉ. सरदेसाई इत्यादि मंडळींनीं कांहीं वर्षांपूर्वीं पुण्यास अथर्ववेदाची संहिता संपूर्ण ऐकविण्याकरितां बोलाविलें होतें. बाणूअण्णांचे एक नातलग अनंतभटजी गोरे सांप्रत ग्वाल्हेर संस्थानांत श्री. बायजाबाईचे पेरेंटीवर आहेत. हे चांगले विद्वान् आहेत. संस्थानांतून त्यांना मासिक पन्नास रुपये दाक्षिणा मिळते. अनंतभटजी गोरे यांचे चुलतबंधु भय्याशास्त्री अथर्ववेदी बुंदेलखंडांत सरकारी संस्थानांत आहेत. काशी, प्रयाग वगैरे ठिकाणीं कोणीही अथर्ववेदी नाहींत. सातारा जिल्हा व इतरत्र मिळून लोकसंख्या दोनशें अडीचशें आहे.

शिक्षण—एकंदरींत समाज विद्येनें मागासलेला आहे. या समाजाची सांपत्तिक स्थिती गरीबीची आहे.

कर्ते पुरुष—द. बा. डिक्सळकर क्यूरेटर, राजकोट; ह. भ. प. मुकुंदबुवा महाभागवत; वे. शा. सं. भय्याशास्त्री अथर्ववेदी, अनंतभट गोरे व बाबुराव कुलकर्णी डिक्सळकर इत्यादि कर्ते पुरुष आहेत.

अन्नलग्नव्यवहार—अथर्ववेदी ब्राह्मण स्वतःस देशस्थ ह्मणवितात. यांचे शरीरसंबंध ऋग्वेदी देशस्थांशीं होतात व झाले आहेत. यजुर्वेदी व सामवेदी यांचा संबंध या भागांत कमी असल्यामुळें या समाजाशीं अद्याप शरीरसंबंध झाले नाहींत.

पौरोहित्य—पूर्वी साताऱ्याजवळ चिंधवली व संगम-माहुली येथें बरेच वृत्तिवंत अथर्ववेदी ब्राह्मण होते. पण गेल्या १५।२० वर्षांत तेथील संख्या कमी झाली व दोन तीन विद्वानांचा नष्टांश झाला. त्यामुळें स्वशाखीय पुरोहितांचा अभाव झाला असून षोडश संस्कार, श्रावणी, श्राद्धसंकल्प इत्यादि सर्व ऋग्वेदी पुरोहिताकडूनच केलीं जातात. हे ब्राह्मण शाकाहारी आहेत. गुजराथी ब्राह्मणांत कांहीं अथर्ववेदी ब्राह्मण आढळतात. भावनगर संस्थानचे पूर्वीचे सुप्रसिद्ध दिवाण गौरिशंकर ओझा हे अथर्ववेदी होते. मद्रासकडे अथर्ववेदी नाहींत असें अलाहाबादेच्या प्राच्य परिषदेच्या अधिवेशनांत एका पंडितांनीं सांगितलें असें एक पत्र आमचेकडे आलें आहे. ज्ञानकोश—वेदविद्या यांत पृ. १९७ वर अथर्ववेदी यांजबद्दल खालीलप्रमाणें माहिती दिली आहे.

" महाराष्ट्रांत कांहीं कांहीं ठिकाणीं अथर्ववेदी लोकांची वस्ती असल्याचें सध्यांही आढळून येतें. मात्र इतर वेदानुयायांच्या तुलनेनें अथर्ववेदीयांचें प्रमाण फारच अल्प आहे. मराठी ग्रंथकार ज्योतिपंत दादा महाभागवत हे अथर्ववेदी होते. सातारा शहरापासून ४ मैलांवर कृष्णा व वेण्णा यांच्या संगमाजवळ ' माहुली ' या क्षेत्राच्या ठिकाणीं १५–२० वर्षांपूर्वी नागेशभट्ट या नांवाचा एक अथर्वण वैदिक ब्राह्मण राहत असे व तो स्वशाखीय लोकांचें पौरोहित्य करीत असे. सातारा व वांई यांच्या दरम्यान कृष्णाकाठीं ' चिंधवली ' या खेड्यांत असणारे जोशी कुळकर्णी अथर्ववेदी आहेत व त्यांचें गोत्र भालंदन आहे. यांच्या घरचीं धर्मकृत्यें त्यांच्या शाखेप्रमाणें पूर्वोक्त नागेशभट्ट हे करीत असत. हल्लीं त्यांचीं सर्व कृत्यें ऋग्वेदी लोकांकडूनच करवून घेतलीं जातात. त्यांच्यापैकीं हल्लीं हयात असलेल्या एका गृहस्थास आपल्या शाखेची संध्या वगैरे येत आहे असें म्हणतात, परंतु बाकीचे अथर्वण ऋग्वेदी लोकांचीच संध्या पाठ करून आपला नित्यविधि पार पाडतात. श्राद्धामध्यें कर्त्यानें आपल्या पितृत्रयीचा उच्चार करावा लागतो हा साधारण नियम आहे. परंतु अथर्ववेदीय लोक बाप अजा व पणजा अशा क्रमानें त्रयीचा उच्चार न करतां पणजा, आजा व बाप, अशा क्रमानें करितात. सातारा जिल्ह्यांत खटाव तालुक्यांतही अथर्ववेदी यांची वस्ती असल्याचें कळतें. पुणें प्रांतांत शिरवळचे आसपास कांहीं

गांवीं यांची वस्ती आहे. खटावकडील अथर्ववेदीयांना "आम्हीं अथर्ववेदी आहों" या पलीकडे जास्त माहिती नाहीं. हे लोक आतां जवळ जवळ ऋग्वेदी लोकांतच सामील झाले आहेत ह्मटलें तरी चालेल. सुमारें २५ वर्षांपूर्वी ऋग्वेदी (देशस्थ) व अथर्ववेदी यांच्यामध्यें परस्पर फक्त रोटीव्यवहार होई, परंतु बेटीव्यवहार बहुधा होत नसे. देशस्थ ऋग्वेदी अडचणीच्या प्रसंगीं गौणपक्ष ह्मणून अथर्ववेदीयांची मुलगी करीत, परंतु आपली मुलगी अथर्ववेदीयांच्या घरीं देण्यास मुळींच तयार नसत. परंतु हल्लीं हाही प्रतिबंध फारसा राहिला नाहीं. ऋग्वेदी देशस्थांनीं अथर्वणांच्या घरीं आपली मुलगी दिल्याचींही उदाहरणें हल्लीं थोडीं तरी दृष्टीस पडतात. अशा प्रकारें ऋग्वेदीयांनीं अथर्वणांच्या घरीं आपली मुलगी दिल्याचें एक उदाहरण चिंधवली गांवांतच आढळतें. अथर्ववेदीयांचा अथर्वणपणा कमी कमी होत जाऊन ते लोक ऋग्वेदी देशस्थ पुरोहितांकडून आपलीं गृहकृत्यें सररहा करून घेऊं लागले. यामुळें ऋग्वेदी व अथर्वण यांच्या मधील परस्पर वैषम्य कमी होऊन आतां बरोबरीनें रोटीबेटीव्यवहार करावयास त्यांना हरकत वाटेनाशी झाली असावी असें दिसतें. आज जातिदृष्ट्या अथर्ववेदी ही निराळी जात राहिलीच नाहीं. देशस्थ जातींतील कांहीं कुलें अथर्ववेदी आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं."

३. मध्यप्रांतांतील कलंकी ग्रामण्य.

सुमारें ९० वर्षांपूर्वी नागपूर प्रांतांत कोणी एक मुसलमान साधु आला होता. त्याचे पासून द्रव्यलालसेनें कांहीं ब्राह्मणांनीं मंत्रोपदेश घेऊन कांहीं निषिद्ध क्रिया आचरण केली अशी जनवार्ता होती. त्या वेळीं नागपूर प्रांतांत भोसल्यांचें राज्य असल्यामुळें राजेसाहेबांनीं या प्रकरणाची चौकशी करविली. पण कोणाही ब्राह्मणावर आरोप सिद्ध होऊं शकला नाहीं. तरी पण संशयावरून चार पांच ब्राह्मणांस बहिष्कृत करण्यांत आलें. त्या चार पांच ब्राह्मणांवर व्यर्थ आरोप करून बहिष्कृत करण्यांत आल्यावर सुमारें दोनतीनशें ब्राह्मण घराण्यांनीं त्यांच्याशीं अन्नलग्नव्यवहारानें संबंध ठेविला. तेव्हां हीं सर्व घराणीं (यांत आश्वलायन, माध्यंदिन व कण्व या तीन शाखेचे लोक होते. व ते

हिंगणघाट, वरोरा, चांदा व चिमूर या चार गांवांतच होते) "मूळ व सांसर्गिक" म्हणून ब्राह्मणसमाजाकडून बहिष्कारार्ह मानण्यांत येऊं लागलीं. या सर्व बहिष्कृतांना "कलंकी ब्राह्मण" असें संबोधण्यांत येऊं लागलें. परधर्मी साधूंचा मंत्रोपदेश ज्यांनीं घेतला त्यांनीं ब्राह्मण कुलास कलंक लाविला अशा समजुतीनें कलंकी ब्राह्मण हें नांव त्यांना व सांसर्गिक बहिष्कृतांना पडलें.

कलंकी नावानें संबोधिल्या जाणाऱ्या ब्राह्मण वर्गाकडून वर्णाश्रम धर्मविरुद्ध आचरण केव्हांही घडलें नाहीं. किंवा त्याचे वैदिक संस्कार केव्हांही बंद झाले नाहींत. शुद्ध म्हणविणाऱ्या ब्राह्मण समाजांतील वैदिक, भिक्षुक, कलंकीसंज्ञक ब्राह्मणांकडे लग्न, उपनयन, श्राद्ध-पक्ष वगैरे संस्कारविधि चालविण्याकरितां स्वतः बिनदिक्कत जात. तसेंच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें थोड्या प्रमाणावर शुद्ध व बहिष्कृत या दोन्ही समाजांतील ब्राह्मण वर्गांत अन्नलग्नव्यवहारहि होत असे. या स्थितींतच स्वत: राजेसाहेबांचे वेळीं व त्या नंतरही वेळोवेळीं बहिष्कृत घराण्यांपैकीं पुष्कळ घराणीं प्रायश्चित्तपूर्वक पावन करून घेण्यांत आलीं व तीं शुद्ध समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण वर्गांत पूर्णपणें मिसळून गेलीं. तरी पण बहिष्कृतांपैकीं १५।२० घराणीं गरीबीमुळें पावन होण्याचीं राहून गेलीं. राहिलेल्या थोड्याशा द्रव्यहीन घराण्यांनीं पावन होण्याविषयीं अनेक वेळां प्रयत्न केले. पण शुद्ध म्हटल्या जाणाऱ्या ब्राह्मण समाजांतील भिक्षुक वर्गाचा मत्सर, द्रव्यलालसा, आपसांतील भांडणें, धैर्याचा अभाव व बेपर्वाई इत्यादि कारणांमुळें राहिलेलीं बहिष्कृत घराणीं पावन होऊं शकलीं नाहींत.

सुमारें २५ वर्षांपूर्वी नागपूर मुक्कामीं श्री शिवगंगा शंकराचार्यांपुढें हा प्रश्न मांडण्यांत आला. त्यांनीं २।३ वेळां नागपुरांत सभा भरवून या प्रकरणाची चौकशी केली आणि सांप्रत अस्तित्वांत असलेलीं बहिष्कृत घराणीं सांसर्गिक असून पावनार्ह आहेत असा निर्णय दिला आणि तसें आज्ञापत्रसुद्धां दिलें. या गोष्टीस त्या वेळच्या नागपुरांतील विद्वान् पंडितांनीं लेखी संमतीहि दिली होती. शृंगेरीच्या शंकराचार्यांनींही शिवगंगा आचार्यांचा निर्णय मान्य केला. पण

भिक्षुकांतील द्रव्यलोभ व आपसांतील भांडणें यांमुळें बहिष्कृतांचा पावनविधि राहून गेला. पुढें शिवगंगा आचार्यांनीं पुणें व नाशिक मुक्कामीं बहिष्कृतांना प्रायश्चितपूर्वक पंक्तिपावन करून घेतलें. पुणें मुक्कामीं बहिष्कृतांना पंक्तिपावन करून घेण्यांत कै. लो. टिळक यांनीं भाग घेतला होता. या प्रांतांतील ब्राह्मण वर्गानें शुद्धिपत्र मान्य केलें, पण प्रायश्चित्तानें शुद्ध झालेल्या ब्राह्मणांशीं राजरोस अन्नलग्नव्यवहार करण्याचें टाळलें.

हें ग्रामण्य-प्रकरण वरचेवर डोकवण्याचीं कारणें अशीं आहेत कीं, प्रथम बहिष्कार जेव्हां पडला तेव्हांपासून वेळोवेळीं बहिष्कृतांनीं पंक्तिपावन होण्याविषयीं जेव्हां जेव्हां प्रयत्न केला तेव्हां तेव्हां ब्राह्मणसमाजांतून त्याविषयीं वाद उत्पन्न होणें साहाजिकच होतें. प्रथम बहिष्कार पडला तेव्हांपासून २।३ वर्षांतच कित्येक श्रीमंत घराणीं पैशाच्या जोरावर पावन होऊन शुद्धपक्षीय ब्राह्मण समाजांत मिसळून गेलीं. त्यानंतरही पंधरा वर्षांनीं, वीस वर्षांनीं, (चाळीश पन्नास) वर्षांनीं बरेच बहिष्कृत पैशाचे जोरावर व कांहीं भिक्षुक ब्राह्मणांचे मदतीवर पावन होऊन पूर्णपणें आपल्या पूर्वींच्या शुद्धपक्षीय ब्राह्मण समाजांत मिसळून गेले. या प्रत्येक वेळीं कित्येक वर्षें पावेतों ग्रामण्यें माजलेलीं होतीं. अलीकडेही राहिलेल्या बहिष्कृतांनीं श्रीशंकराचार्यांपुढें आपला प्रश्न मांडून पंक्तिपावन होण्याविषयीं जेव्हां जेव्हां प्रयत्न केला व आचार्यांच्या आज्ञेस अनुसरून बऱ्याच मोठ्या शुद्ध पक्षीय ब्राह्मणसमाजानें बहिष्कृतास आपणांत मिसळून घेतलें तेव्हां सुद्धां ग्रामण्य सुरू झालेंच. आचार्यांच्या पाठीशीं राजसत्ता नसणें, समाजशासनशक्ति नसणें, राहिलेल्या गरीब बहिष्कृतांजवळ भिक्षुक वर्गाची द्रव्यलालसा पुरविण्याचें सामर्थ्य नसणें, कर्मठ भिक्षुकांमध्यें विचारशक्तीचा अभाव, दुराग्रह, हट्ट, पावन करणाऱ्या पक्षाच्या पुढाऱ्यांशीं असलेलें कित्येकांचें वैर व मत्सर, कित्येकांची बहिष्कृतांविषयीं उदासीनता, पुष्कळ वर्षें पावेतों बहिष्कृतांचा संबंध न घडल्यामुळें कित्येकांचे मनास वाटणारा रूढिजन्य संकोच, कित्येकांचे आपले सोयरेधायरे, उपाध्याय, घरचें वैदिककर्म चालविणारे भटजी, इत्यादींच्या आग्रहास्तव विरोधकांत निरुपायानें सामील होणें, आचार्यांनीं व इतर शास्त्री लोकांनीं निर्णय दिला असला तरी बहिष्कृत पाव-

नच होऊं शकत नाहींत अशा कित्येकांनीं कंड्या उठविणें इत्यादि कारणांनीं या ग्रामण्याला मधून मधून जोर येत गेला आणि राहिलेली बहिष्कृत घराणीं आपल्या पूर्वींच्या समाजांत मिसळून जाईपर्यंत असाच हा वाद चालणार !

सन १९२२ सालीं पुनः हा प्रश्न श्री करवीरपीठाधिपती श्री शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) यांचे पुढें ठेवण्यांत आला. तेव्हां त्यांनीं एकंदर प्रकरणाची चौकशी करून असा निर्णय दिला कीं, बहिष्कृत घराण्यांतील लोक मूळ मंत्रोपादिष्टांचे सांसर्गिक आहेत. तेव्हां ते पावनार्ह आहेतच; पण तसे कदाचित् ते नसते व मूळ मंत्रोपादिष्टांचे संतति असते तरीही ते पावनार्हच ठरले असते. या निर्णयानंतर ठिकठिकाणच्या बहिष्कृत घराण्यांना तेथील शुद्ध म्हटल्या जाणाऱ्या बऱ्याच मोठ्या ब्राह्मण वर्गानें पंक्तिपावन करून घेतलें व अन्नलग्नव्यवहार सर्रास चालू केला. फक्त त्या त्या ठिकाणच्या अगदीं थोड्याशा भिक्षुकांनीं खाजगी मत्सर व भांडणें, इत्यादि क्षुल्लक कारणामुळें कांहींसा विरोध मात्र या प्रकरणांत चालू ठेविला आहे. पण तो फार दिवस टिकेलसें दिसत नाहीं.

वरील माहितीवरून हें लक्षांत येईल कीं, कलंकी नांवानें संबोधिला जाणारा ब्राह्मण वर्ग एखादी स्वतंत्र जाति नसून कांहीं वर्षांपूर्वी देशस्थ महाराष्ट्रिय चतुःशाखीय ब्राह्मणांत उत्पन्न झालेलें हें ग्रामण्य-प्रकरण होय. या ग्रामण्यांतून आज पावेतों पावन होत होत राहिलेलीं सुमारें १५ घराणीं जीं अलींकडे पंक्तिपावन करून घेऊन शुद्ध समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण वर्गांत मिसळून घेण्यांत आलीं आहेत, त्या घराण्यापैकीं सात आठ घराणीं कण्व शाखीय, चार पांच घराणीं माध्यंदिन शाखेचीं व दोन तीन घराणीं आश्वलायन शाखेचीं होतीं. त्या परस्पर भिन्न शाखेच्या थोड्या थोड्या घराण्यांची स्वतंत्र जात केवळ ग्रामण्यामुळें बनणें शक्यही नव्हतें व तशी जात केव्हांही बनली नाहीं. शुद्ध समजल्या जाणाऱ्या चतुःशाखीय बहुजन ब्राह्मण वर्गापासून ग्रामण्यामुळें विलग झालेलीं घराणीं आपल्या पूर्वींच्या समाजांत आतां मिसळून गेल्यामुळें आजपावेतों बहिष्कृत घराण्यांची "कलंकी ब्राह्मण" ही जी संज्ञा होती तीही जवळ जवळ नाहींशी झाली आहे.

४. गोसावी परिव्राजक ब्राह्मण.

पूर्वेतिहास—गिरी, पुरि, भारती, वन आदि दहा उपनांवें धारण करणारा समाज **सनातन दशनाम गोसावी** या नांवानें ओळखला जातो. हा समाज प्राचीन ब्राह्मण वर्गापैकीं असून सर्व हिंदुस्थानभर आढळतो. याची लोकसंख्या १० लाखांवर भरेल. **संन्यासी** व **गृहस्थ** असे यांत भेद असून ते **निस्पृही** व **घरभारी** या नांवानें ओळखले जातात. या समाजाचा प्राचीन इतिहास बराच अज्ञात होता. पण अलीकडे रा. पृथ्वीगीर हरिगीर, माजी संपादक हरिकिशोर, यवतमाळ, यांनीं "गोसावी व त्यांचा संप्रदाय" व "गोसावी व गोत्रप्रवर" हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध करून अज्ञात इतिहासावर पुष्कळ प्रकाश पाडला आहे. **"गोसावी हे ब्राह्मण आहेत,"** ही त्यांची विचारसरणी, अनेक प्रसिद्ध विद्वानांस पसंत पडली आहे. प्रस्तुत माहिती त्याच ग्रंथांतून घेतली आहे. वैदिक वाङ्मयांत दशनामधारक बरेच प्रसिद्ध आचार्य आढळतात. गणगारि, अंगिरि, मद्रगारि, बृहग्दिरि, आप्रवन, ऋजिश्वन, आसिधन्वन, गोपवन, वैष्टमुरेय आदि आचार्य त्या पैकींच होत. अनेक सूक्तद्रष्टे व राजेहि, या समाजांत होऊन गेले. अलेक्झांडरपासूनचा इतिहास संगतवार आढळतो. पंजाब, संयुक्तप्रांत, बुंदेलखंड, सिंध, मध्यप्रांत वगैरे देशांत यांनीं पूर्वीं लहानमोठीं राज्यें केलीं आहेत व राजकारणांत प्रमुख भाग घेतला आहे.

वेदशाखा व सूत्र—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या चारहि वेदांचे अनुयायी या समाजांत आहेत. वन्य, अरण्य हे ऋग्वेदी; भारती, पुरि, सरस्वति हे यजुर्वेदी; तीर्थ, आश्रम हे सामवेदी व गिरि, पर्वत, सागर हे अथर्ववेदी आहेत. एकंदरींत ऋग्वेदी कमी व अथर्ववेदी अधिक आहेत.

गोत्रें—१ जमदग्नि, २ वत्स, ३ गौतम, ४ अंगीरस, ५ कश्यप, ६ भरद्वाज, ७ वसिष्ठ, ८ अगस्ति, ९ अत्रि व विश्वामित्र हीं दहा प्रमुख गोत्रें असून शांडिल्य, विष्णुवृध्द, हरित, कुण्डिन, मुद्गल, उपमन्यु, पराशर, कण्व, शौनक इत्यादि आणखीं गोत्रें आढळतात. पहिल्या पांच गोत्रांची संख्या अधिक आहे. गोत्रांपेक्षां मठ व मढी यांची परंपरा अधीक माहित असते.

धर्मकर्म--श्राद्धपक्ष, हव्यकव्य, धर्मकर्म हीं सर्व त्या त्या देशांतील ब्राह्मणांप्रमाणें होतात.

संस्कार—वेदोक्त व पुराणोक्त होतात. मौंजीबंधन उत्तर हिंदुस्थानांत करतात. महाराष्ट्रांत प्रघात नाहीं. तो केव्हांपासून बंद झाला हें नक्की सांगता येत नाहीं. मात्र ' विरजा * होमाचे वेळी यज्ञोपवीत घालून नंतर तें जाळून त्याची रक्षा पाजतात. हा प्रघात संन्यासपद्धतीच्या प्राबल्यामुळें चालू झाला असावा.

पंथ व मत--गोसावी हे प्रामुख्यानें शंकराचार्यांच्या अद्वैत मताचे अनुयायी आहेत. बंगाल देशांत वैष्णवांचा भरणा अधिक आहे.

देवदेवता—नारायण, सिद्धेश्वर, आदिवराह, पुरुषोत्तम हीं कुलदैवतें असून शंकर, गणपति, दत्त, देवी, नारायण हीं उपास्य दैवतें आहेत. पूर्ण-गिरि, भद्रकाली, शारदा, विमला या शक्ति (देवी) आहेत.

उत्सव, सण, व्रतें, वैकल्यें—देशाचाराप्रमाणें आहेत. दसरा, शिमगा, रामनवमी, गोकुळअष्टमी, गणेशचतुर्थी दिवाळी इत्यादि सर्व आहेत.

राहाणी—स्वच्छ, साधी, नीटनेटकी. राजेमहाराजे आदि बड्या लोकांची राहणी त्यांच्या इतमामाप्रमाणें असते. निस्पृही लोकांत जटिल व मुंडित आढळतात.

आरोग्य—एकंदरीनें हा समाज बराच निरोगी व सशक्त आढळतो. लढवय्ये गोसावी इतिहासप्रसिध्द आहेत.

***विरजा होम**—गोसावी समजांत, गोसावी पंथाची दीक्षा देतांना, हा होम केला जातो. हा होम खरोखर शुद्धिकरणाचा असून संन्यासदीक्षेचें तो एक आवश्यक अंग होऊन बसला आहे. त्यामुळें धरभाऱ्यांनीं म्हणजे गृहस्थ गोसाव्यांनीं हा करूं नये असें पुष्कळांचें मत आहे. हा होम करतांना यज्ञोपवीत एका सुपारी भोंवतीं गुंडाळून त्याची रक्षा करून पाजतात. म्हणून गृहस्थ गोसाव्यांतहि शिखासूत्राचा त्याग करण्याचा प्रघात पडला.

शिक्षण—शिक्षणाचें प्रमाण पूर्वीपेक्षां वाढत आहे.

कर्तीं माणसें—या ज्ञातींत कर्तीं माणसें विशेष होऊन गेलीं. हैद्राबाद (दक्षिण) येथील राजा ग्यानगीर, राजा नरसिंगगिर, राजा लालगीर, राजा प्रभातगीर भावनगर येथील राजा सवाईगीर, मांडवी येथील कोट्याधीश महंत रिध्दगिर, (पुणें येथें तर अर्धें शहर एके काळीं श्रीमान व लढवय्या गोसाव्यांनीं व्यापलें होतें. आजहि त्यांची स्मृति कायम आहे.) नागपूरचे उदेपुरी, पदमपुरी; उमरावतीचे दलेलपुरी, मणीगिर इत्यादि अनेक धनवान् व कर्तबगार माणसें इकडे होऊन गेलीं. राजपुताना, पंजाब, संयुक्तप्रांत, बंगाल या भागांतहि अनेक कर्तीं माणसें होऊन गेलीं व आजहि हयात आहेत. हल्लीं महाराष्ट्रांत रा. ब. गोपाळगिरजी धारवाड, राजा प्रतापगिरजी मुंबई, राजा धनराजगिरजी पुणें, श्रीमान् गोस्वामी महेक्कापुरीजी नागपूर इत्यादि अनेक कर्तीं माणसें आहेत. डॉक्तर, वकील, गवई, चित्रकार, ग्रंथकार इत्यादिही बरेच लोक आहेत.

वैशिष्ट्य—या जातीचें वैशिष्ट्य म्हटलें म्हणजे धर्म व राजकारण यांचा मिलाफ या जातींत जितका आढळतो तितका इतरत्र क्वचित आढळतो हें होय. अध्यात्म, शस्त्रास्त्रें व संपत्ति यांची जोड या ज्ञातींत विशेष. दशनामी आखाडे याची साक्ष पाठवितात.

महत्त्वाकांक्षा—आपली जात सर्व दृष्टीनें समर्थ व अनुकरणीय करावी व मातृभूचें प्राचीन वैभव मिळवावें ही या समाजाची महत्त्वाकांक्षा आहे.

सामाजिक दर्जा—ब्राह्मणांच्या बरोबरीचा आहे. राजपुताना, काठवाडे, गुजराथ व महाराष्ट्र यांतील बऱ्याच राजेमहाराजांचे व सरदारांचे **गुरु गोसावी** होते व आजहि आहेत. राजगुरूंची यादी विस्तारभयास्तव दिली नाहीं. त्याच प्रमाणें संतमहंतांचाहि नामनिर्देश केलेला नाहीं.

प्रकरण ७ वें

पंचगौड ब्राम्हण

पंचगौड ब्राह्मण समुदाय महाराष्ट्रांत बराच आहे, परंतु कुडाळदेशकर आद्य गौड व जुझोतिया या दोन जातींशिवाय इतर जातींची विश्वासनीय माहिती आम्हांस मिळाली नाहीं. यास्तव तेवढी देऊन हा ग्रंथ येथें पूर्ण करितों.

कुडाळदेशकर आद्यगौड ब्राह्मण

पूर्वेतिहास–वास्तव्यस्थानें:—गजनीच्या महमुदानें सन १०१७ मध्यें उत्तर हिंदुस्थानावर स्वारी केली व उत्तरेकडील लहान मोठीं बरींच राज्यें धुळीस मिळविलीं. त्या वेळीं गंगाकिनाऱ्या लगत कित्येक शहरें होतीं, त्यांत 'मुंज' या नांवाच्या एका तटबंदी भागावर 'सामंत' नामक एका ब्राह्मण संस्थानिकाचें लहानशें राज्य होतें. हा संस्थानिक गौडेश्वर पाल राजाचा मांडलिक होता. महंमुदाच्या स्वारीमुळें त्याच्या संस्थानची वाताहात झाली, म्हणून हा मांडलिक आपल्या जातीच्या कित्येक घराण्यांसह दक्षिण कोंकणांतील कुडाळ प्रांतांत आला. त्या वेळीं हा प्रांत चालुक्यसम्राटांचा महामंडलेश्वर कदंब राजा याच्या राज्यांत मोडत होता. उत्तरेंतून आलेल्या या ब्राह्मण घराण्यांला कदंब राजानें साळशी नांवाच्या महालांत आश्रय दिला. साळशी महाल म्हणजे हल्लींचा देवगड तालुक्याचा भाग आणि कुडाळ प्रांत म्हणजे राजापूर पासून दक्षिणेकडे गोमांतकांतील फोंडे महालापर्यंत, तसाच त्यांशीं समांतर कोल्हापूर संस्थान आणि बेळगांव जिल्हा यांत मोडणारा घांटमाथ्यावरील कांहीं भाग होय. सामंत घराण्याचा मूळ पुरुष **देवशर्मा** याला कदंब राजानें थोडा अधिकार दिला. हळुहळु उत्तरेकडून आलेल्या देवशर्म्याच्या जातिबांधवांनीं राजाश्रयानें साळशी महालांत वसाहत केली. कालेकरून त्यांतील चौदा गोत्रांच्या

घराण्यांनीं कुडाळ प्रांतांतील सर्व दृष्टीनें उत्कृष्ट अशा चौदा गांवांत वसाहत केली. या चौदा गांवांना "**मूळभुंकेचे**" (भूमिका) **गांव** म्हणतात. हें गांव पुढें वाढत्या संसारास अपुरे पडूं लागल्यामुळें , यांतील कांहीं गोत्रांच्या कुटुंबांनीं आणखी चार गांवांत वस्ती करून ते ऊर्जितावस्थेस आणिलें. त्यांना "**जोडभुंकेचे** गांव म्हणतात. हल्लीं हीं १८ गांवें सावंतवाडी संस्थान, मालवण आणि वेंगुर्लें तालुक्यांत मोडतात. आजमितीसहि त्या १८ गांवांतील ग्रामाधिकारी प्राय: कुडाळदेशकर ब्राह्मण आहेत.

देवशर्मा हा शिवोपासक होता. त्याचे पुत्रपौत्र कुणकेश्वर श्रीशंकराच्या कृपेमुळें पराक्रमी निघाले. त्यांनीं स्वबाहुबलानें आपलीं सत्ता हळुहळु वाढविली, त्यामुळें या जातींतील सर्व घराण्यांना क्षात्रवृत्तीचा अंगिकार करावा लागला. कोंकणप्रांत पुढें यादवांच्या ताब्यांत गेल्यावर सामंत घराणें, यादवांचें मांडलिक बनलें. देवशर्म्याचा पुढील वंशज माईदेव (माइन्देव) हा सुप्रसिद्ध सिंघण यादवाच्या मोहिमांवर सेनापति म्हणून जाऊं लागला. त्यानें कदंब वंशाचें राज्य आक्रमणाऱ्या गुत्त (गुप्त) राजाचें उच्चाटण केलें. माइन्देवानें सिंघणाचा मांडलिक असतां महाप्रधान, सर्वाधिकारी, महापरमविश्वासी अशीं बिरुदें संपादिलीं. तो स्वतंत्र झाल्यावर मंगमहीपति, मल्लिनाथदेव, मांगलाख्य "सामंतकुल यशोभानु: मांगलाख्य महेश्वर:" अशा स्वातंत्र्य निदर्शक उपाधि त्याला मिळाल्या. सामंत घराण्याची स्वतंत्र स्थापन करणारा हाच "मंगमहिपति" होय. त्याची राजधानी 'कुडुवलपत्तन" कुडाळ ही होय. ह्याच राजधानिवरून कालांतरानें ह्या ज्ञातीला कुडाळदेशकर हें नांव मिळालें "चालुक्य आणि यादव यांच्या पश्चात, सध्यांचा वाडी प्रांत आणि भोंवतालचा बराच प्रदेश ह्या ब्राह्मण घराण्याच्या राज्यांत मोडत असे." या घराण्यानें कुडाळप्रांत, गोमांतक, वरघांट आणि कानडी मुलखाचा कांहीं भाग एवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर जवळ जवळ ४०० वर्षें मांडलिक आणि स्वतंत्र राजसत्ता उपभोगिल्याचें दिसून येतें. सामंत घराण्यांतील पुरुषांनीं कुडाळप्रांतांत, स्वलक्षण अशी एक देवस्थान पद्धति लावून दिली. तिचा विशेष हा कीं, तींत ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सर्वांचा समावेश होतो. सामंत घराण्यांतील जोगदेव,

माइन्देव, देमदेव, भैरवदेव, नागदेव यांनीं राज्य केल्यावर सन १४६१ त बहामनीशहानें कोंकणप्रांत हस्तगत केला, आणि सामंत घराण्याची सत्ता नष्ट झाली.

बहामनीशहांनीं सामंत घराण्याच्या नातलगांना पूर्वींपासून **देसाई-देशमुख**-असलेल्या ' **प्रभु** ' उपनांवाच्या जामदग्न्यवत्स गोत्री घराण्याला त्या प्रांतावर प्रतिनिधी नेमिलें. बहामनीशाहीचीं पुढें शकलें होऊन हा प्रदेश विजापूरच्या आदिलशहाकडे आला. त्या वेळीं त्या प्रभु घराण्याचे देशकाचे हक्क कायम ठेवून, त्यास **सरदेसाई** म्हणून मांडलिक केलें. त्या घराण्याला कुडाळ प्रांतांतील २९ गांव खासगत इनाम होते. प्रभु घराण्याची मांडलिक सत्ता १६४० पर्यंत अव्याहत चालली. पुढें त्या घराण्याच्या राजवटींतील एका तर्फेवर ' नाईक ' या हुद्यावर असलेल्या लखम सावंतानें, आदिलशाहीच्या पडत्या काळांत बंड करून कुडाळ प्रांताचा बराच मोठा भाग हस्तगत केला. हा लखम सावंत म्हणजे सावंतवाडी संस्थानाधिपतीचा एक पराक्रमी पूर्वज होय.

लखम सावंताच्या बंडांत चिटणीस, सबनीस प्रभृति शेणवी सामील झाले. फक्त स्वामिभक्त नाडकर्णी मात्र सामील झाला नाहीं. ही शेणवी मंडळी कुडाळ प्रांतांत १५६४ च्या सुमारास पोर्तुगीजांच्या अनन्वित जुलमाला कंटाळून आली. या वेळीं थोडे सार्ष्टीकरहि आले. असहाय व निराश्रित अशा या लोकांना कुडाळदेशकरांनीं मदत केली. त्यांनीं पुष्कळ शेणव्यांना आपल्या हाताखालच्या नोकऱ्या दिल्या व अनेक गांवांतून ग्रामलेखक कुळकर्ण्यांचीं कामें देऊन त्यांचे योगक्षेम चालविले. कांहीं घराण्यांकडे चिटणिसी, सबनिसी व नाडकर्णीपण अशीं जोखमीचीं कामें दिलीं, पण हे लोक उपरोक्त उपकार विसरून सावंतांच्या बंडांत सामील झाले. १६४० पासून १६८० पर्यंत प्रभु-घराण्यानें आपली सत्ता कायम ठेवण्यासाठीं बरेच प्रयत्न केले. प्रभुघराण्यांतील पुरुषांच्या आणि सखोजी व खेम सावंत यांच्या अनेक चकमकी झाल्या. उलट-सुलट हल्ल्यांवर हल्ले झाले. परंतु १६९६ सालीं श्रावण शु॥ १४ शनिवारीं शेवटचा पुरुष जोगण प्रभु कुडाळच्या कोटांत मारला जाऊन प्रभु घराण्याच्या सत्तेचा

शेवट झाला, आणि सबंध पंचमहाल—कुडाळ प्रांताची सत्ता लखम सावंताचा पुतण्या खेम सावंत याकडे आली. अशा रीतीनें सावंत सत्ताधारी झाल्यावर मदतगार शेणवी लोक त्यांचे कारभारी झाले हें सांगावयाला नकोच !

प्रभु घराण्याचें राज्य नष्ट होऊन तें मराठे सावंताकडे आलें, तरी मराठ्यांचे आणि कुडाळदेशकरांचे संबंध पूर्वींप्रमाणेंच कायम राहिले. सावंत हे देवब्राह्मणांचें राज्य म्हणून त्यांचाच शिक्का कागदोपत्रीं चालवीत. आज मितीसहि या ब्राह्मणांचे व मराठे सावंतांचे संबंध स्नेहाचे व प्रेमाचे आहेत. परंतु या वेळेपासून शेणवी व कुडाळदेशकर ब्राह्मण या दोन जातींतील वैर मात्र विकोपास जाऊं लागलें. सावंतांच्या राजवटींत चिटणीस, सबनीस, पोतनीस, तटनीस, पारसनीस, इत्यादि अधिकाऱ्यांच्या जागा एकजात शेणव्यांकडे होत्या. लेखणी शेणव्यांच्या हातांत आणि तरवार मराठ्यांच्या हातांत, अशा स्थितींत कुडाळदेशकरांचा अत्यंत छळ होऊं लागला. कुडाळदेशकरांवर बामण दंड या नांवाचा कर एकंदर पांच वेळां बसविला, याबद्दलचे दाखले आज उपलब्ध असून कांहीं आद्यगौड ब्राह्मण—मासिकांत इतर अनेक ऐतिहासिक कागदांबरोबर प्रसिद्धहि झाले आहेत. सधन कसे बसे पार पडत, पण गोरगरिबांना इतक्या यमयातना भोगाव्या लागल्या कीं, त्यांचें वर्णन करणें अशक्य आहे. कुडाळ प्रांताबाहेरील शेणव्यांना याबद्दल दोष देण्याचें कारण नाहीं.) ज्यांनीं छळ केला त्यांनीं छळांतच आनंद न मानतां उपकार कर्त्यांबद्दल भलभलत्या गोष्टी रचून, निंदा करून त्यांत समाधान करून घेतलें आणि कोंकणाख्यानासारखीं चोपडीं निर्माण केलीं. ह्या ग्रंथांत आपलीं जात उच्च आणि इतर आपल्या पोटजाती अर्थात् निकृष्ट असें भासविण्याचा प्रयत्न केला आहे. अलींकडे, कुडाळदेशकर लेखकांनीं त्यांतील लबाड्या उघडकीस आणल्या आहेत.

वर सांगितलेला काळ हा कुडाळदेशकर ब्राह्मणांचा अत्यंत अवनत काळ होय. राज्यक्रांती मागून झालेल्या या छळामुळें त्यांना जमिनी, घरेंदारें, गुरेंढोरें, नातलग यांना मुकावें लागलें. शेंकडों कुटुंबें परागंदा झालीं आणि तीं दक्षिणेस-बारकोर, मोगरनाड, गोकर्ण; पूर्वेस-आजरें, बेळगांव, धारवाड, विजापूर, कोल्हापूर; उत्तरेस वसई, अर्नाळा या भागांत निरनिराळ्या सत्ताधाऱ्यांच्या

आश्रयास येऊन राहिलीं. याप्रमाणें या जातीच्या कुडाळदेशापासून दूर दूर वसाहती झाल्या आहेत. मुंबईस कुडाळदेशकर ब्राम्हणांची वस्ती गेल्या पन्नास वर्षांतील आहे; पण कायमची अशी नाहीं. कुडाळ प्रांतांत कित्येक गांवांतून ग्रामसंस्थांचे परंपरेचे अधिकार यांच्याकडे शिल्लक आहेत, म्हणून त्या वृत्तीमुळें बरींच कुटुंबें टिकलीं आहेत.

लोकसंख्या—वर सांगितलेल्या सर्व वसाहतींत मिळून सुमारें ३३ ते ३५ हजार लोकसंख्या आहे. मुंबई शहरांत धंद्यानिमित्तानें राहिलेल्यांची वस्ती आज जवळ जवळ तीन हजार पर्यंत आहे. मुंबईतील गौड ब्राह्मण सभे-मार्फत ११ वर्षांपूर्वी मुंबईतील रहिवाशांची खानेसुमारी घेण्यांत आली होती, त्या वेळीं १५०० संख्या होती. नंतर १९२१ च्या सरकारी खानेसुमारींत २३०० नमूद झालेली आहे.

गोत्रें—वत्स, जामदग्न्यवत्स, भारद्वाज, गार्ग्य, अत्रि, कौशिक, धनंजय, काश्यप, वासिष्ठ, कौंडिण्य, सांख्यायन, कुत्स, गौतम, नैध्रुव अशीं हीं चौदा आहेत.

आडनांवें—सामंत, प्रभु, ठाकूर व पाटील हीं पहिलीं आडनांवें होत. यांच्या जोडीस मिळालेलीं, देसाई, मानकरी, नाईक, महाजन, देशमुख, देशपांडे, पंडित, सरदेसाई, सरनाईक, बोंद्रें, कोले, वजुळें (नाईक) वेरये, शकेट, जोशी, काशीकर, पोतकर, टिकल्ये, सोनगे, नगारे, गित्से, ग्रामभोजनें, साठकुंभे, पंत, नायक, वाघ, कलवारी, डिंगे, शेव्ये, पुराणीक, गोसावी, संत, रामदासी, मल्हार, हरिदास, भास्कर, खोत, धोंड, अवसरे, फडके, पोतदार इत्यादि. बहुतेक आडनांवें राजसत्ता, देशसत्ता व ग्रामसत्ता यांचीं वाचक आहेत. कारण कुडाळ प्रांतांतील तीनहि सत्ता बऱ्याच काळपर्यंत या जातीनें उपभोगिल्या होत्या.

कुलदेवता—कुडाळदेशकर ब्राह्मणांच्या कुलदेवता त्यांच्या मूळ भुंकेच्या चौदा गांवांतच आहेत. आणि इष्ट देवता अनेक गांवांतून आहेत.

त्या पंचवीसतीस देवतांचीं नांवें विस्तारभयास्तव देतां येत नाहींत. कुडाळदेशकर ब्राह्मण मूळचे शिवोपासक म्हणून त्यांनीं आपल्या मूळच्या १४ गांवांत शिवाचीं मंदिरें स्थापन केलेलीं आहेत. पुढील काळांत कांहीं विष्णु-मंदिरें स्थापन केलीं. यांतील वालावली येथील श्री लक्ष्मीनारायणाचें स्थान हें प्रमुख असून येथील श्री नारायण देवतेला ते आपलें राष्ट्रीय दैवत मानितात. प्रभु सरदेसायांच्या शिक्क्यांत श्रीनारायणाचें नांव प्रथम घातलेलें आहे.

विद्यमान कर्ती माणसें-(१) जमीनदार—लक्षाधीश घराण्यांपैकीं श्रीमंत वराडकर, आंजगांवकर ठाकूर, धोंडो जनार्दन सामंत, बांबर्डेकर, दप्तरदार, गव्हाणकर व टोपीवाले. (२) **व्यापारी**—श्रीमंत नारायणराव अनंत देसाई टोपीवाले मुंबई, रामचंद्र कृष्ण पाटील, पाटकर कंत्राटदार-वांद्रे, पांडुरंग भिकाजी वालवलकर आणि शिवाजी बाळकृष्ण सामंत, लक्षाधीश पेढीवाले. (३) **सरकारी अधिकारी**—या क्षेत्रांत न्यायाधीश, डेप्युटी आणि आसिस्टंट कलेक्टर, असिस्टंट रेव्हिन्यु कमिशनर, रेव्हिन्यु व न्यायखात्याचे अधिकारी, देशी संस्थानचे ॲडमिनिस्ट्रेटर, चीफ जज्ज आणि प्राइम-मिनिस्टर एवढ्या मोठमोठ्या हुद्यांवर बरेच लोक चढलेले आहेत. विस्तारभयास्तव नावें देतां येत नाहींत. (४) **विद्वान लेखक व ग्रंथकार**—या क्षेत्रांतही नांव घेण्यासारखें बरेच पुरुष या ज्ञातींत होऊन गेले व आहेत. संशोधक, संपादक, शिक्षक, प्रोफेसर, ग्रन्थकार, लेखक, कवि अशा विविध क्षेत्रांतील विद्यमान व्यक्तींपैकीं कांहीं नावेंः—दत्तात्रय महादेव अवसरे बी. ए. एम्. एस् सी. (लंडन); रामचंद्र विठ्ठल (सामंत) परुळेकर, एम्. ए. एस्. टी. सी. डी. (मुंबई), टी. डी (लंडन), महाराष्ट्रभाषाभूषण जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर (कवि-चरित्रकार), कवि विठ्ठल कृष्ण नेरूरकर, बी. ए. (सावंतवाडी), इतिहास-संशोधक रा. ब. वासुदेव अनंत बांबर्डेकर. वृत्तलेखनशास्त्रविशारद सदाशिव कान्होजी पाटील (मुंबई), सदानंद विश्वनाथ सामंत (औदुंबर). (५) **विदुषी स्त्रियाः**—सौ. सरलाबाई नाईक, पहिली दाक्षिणी एम्. ए; डॉ. कुमारी सीताबाई आजगांवकर, बी. ए. (मुंबई); बी. लिट्. डी. फिल. (ऑक्सन); बॅरिस्टर ॲट लॉ. पहिली हिंदु स्त्री बॅरिस्टर, श्रीमति

सावित्रीबाई तेंडोलकर, कवयित्री. (६) **वकील, डॉक्टर, इंजिनियर**– अनंत गणेश देसाई बी. ए. एल्एल्. बी.; बॅरिस्टर शामराव रघुनाथ तेंडोलकर बी.ए. एल्एल्. बी.; (मुंबई). गणपतराव रामचंद्र देसाई, बी. ए. एल्एल्. बी. (लंडन). इत्यादि (७) **सार्वजनिक कार्यकर्ते**–लोकलबोर्ड म्युनिसिपालिटी, शिक्षणसंस्था, राजकारण, ज्ञातिसंस्था अशा क्षेत्रांत कार्य करणारे बरेच कर्ते पुरुष या ज्ञातींत आहेत. डॉ. देवराव हरि गव्हाणकर, बी. ए. एल्. एम्. अॅन्ड एस्; राजाराम नारायण सामंत (वसई); रा. ब. लक्ष्मण विष्णु परुळेकर (रत्नागिरी); सखाराम सीताराम नाईक, बी. ए., एल. सी. ई. (मुंबई); बी. एस्. सी. (एडिन.)–वांद्रें; कृष्णराव सीताराम देसाई (मालवण); रामकृष्ण विठ्ठल मतकरी बी. ए. एलएल. बी. बाळकृष्ण अनंत पाटील, दिगंबर वासुदेव देसाई, सदाशिव कान्होजी पाटील, प्रो. पांडुरंग भिकाजी नाईक एम्. ए., श्रीधर शिवराम गोसावी (मुंबई). या शिवाय विविध क्षेत्रांतील बऱ्याच कार्यकर्त्यांचीं नांवें विस्तारभयास्तव देतां येत नाहींत.

वेदशाखा––उत्तरेकडील सर्वच गौड शुक्ल यजुर्वेदी आहेत. परंतु या ज्ञातीनें दक्षिणेंत आल्यावर राजसत्ता संपादन करून क्षात्रवृत्ति स्वीकारली ह्मणून त्यांच्या घरचें पौरोहित्य कऱ्हाडे ब्राह्मणांकडे सोंपविण्यांत आलें. त्यामुळें कऱ्हाडे ब्राह्मणांचा ऋग्वेद या ज्ञातींत आला. अर्थात् कुडाळदेशकर ब्राह्मण हे ऋग्वेदी शाकलशाखीय आश्वलायनसूत्री आहेत.

विवाह–फक्त स्वज्ञातींतच होतो. वधूचें वय बारा ते पंधरा, अलीकडे क्वचित् वीसबावीसपर्यंत; वराचें वय वीस ते पंचवीसपर्यंत अशी वयोमर्यादा आहे. मातुलकन्यापरिणयास हरकत नसते. रजोदर्शनापूर्वी विवाह होण्याविषयीं दक्षता बाळगिली जाते.

तीर्थें व पवित्र स्थानें––महाराष्ट्रांतील व आर्यावर्तांतील हिंदूंचीं सर्व तीर्थें व पवित्रस्थानें पूज्य आहेत. शिवाय कुडाळ–प्रांताच्या मूळ वसाहतींत या ज्ञातीचीं अशीं कांहीं पवित्रस्थानें आहेत.

राहाणी––सामान्यतः जुन्या पद्धतीची, साधी व काटकसरीची. श्रीमंत मानलेल्या कुटुंबांतहि नटवेपणा व छानछोकी नाहीं. स्नानसंध्या, देव-

पूजा, ग्रंथवाचन, स्तोत्रपठण, भजन, प्रातःस्मरण यांचा प्रघातहि आज मितीस बऱ्याच कुटुंबांत आढळून येईल. चालू पिढींत परिस्थिति प्रमाणें परंपरा सुटत आहे.

आरोग्य—ज्ञातिविशिष्ट असा कोणताही रोग नाहीं. खेडेगांवांतील आरोग्य चांगल्या प्रकारचें आहे. त्या मानानें शहरांतील आरोग्य अनेक कारणांमुळें कमी दर्जाचें आढळतें. शहरांत बालमृत्यूची संख्या जास्त आढळते. आयुर्मान गेल्या पिढीपर्यंत चांगलेंच होतें; पण हल्लीं इतर ब्राह्मण जातीप्रमाणें या जातीचें आरोग्य खालावत आहे.

विधवा—संख्या देणें शक्य नाहीं. इतर समाजांच्या मानानें विधवांची संख्या कमी असावी असा अंदाज आहे. विधवा-पुनर्विवाहाचें अद्याप एकहि उदाहरण घडलेलें नाहीं. वपनाचा विकल्प अलीकडे दृष्टीस पडूं लागला आहे.

व्रतें-वैकल्यें-सण-वर्षप्रतिपदा, रामनवमी, हनुमज्जयंति, अक्षय्यतृतीया, शंकराचार्य जयंति, ज्येष्ठी पूर्णिमा, हरितालिका, गणेश चतुर्थी, ऋषिपंचमी, वामनद्वादशी, अनंतचतुर्दशी, अविधवानवमी, ललितापंचमी, खंडेनवमी, कोजागरी, नरकचतुर्दशी, कार्तिकी एकादशी, त्रिपुरीपूर्णिमा, श्रीदत्तजयंति, मकरसंक्रांत, रथसप्तमी, महाशिवरात्री आणि हुताशनी इत्यादि व्रत-वैकल्यें, सण आणि उत्सव आहेत. थोरल्या दिवाळीस "**गोमजीची दिवाळी**" असें म्हणतात; कारण, गोमप्रभु नांवाचा या जातींतील एक पुरुष बेदरच्या बहामनी शहाकडून कुडाळप्रांताचें प्रतिनिधिपद मिळवून या दिवशीं कुडाळ प्रांतांत आला. चैत्र-वद्य चतुर्थी हा या ज्ञातीचा मोठा वार्षिकोत्सवाचा दिवस आहे. त्या दिवशीं दाभोलीमठ-संस्थापक श्री विद्यापूर्णानंद यांची पुण्यतिथी होते. लांबलांबचे पुष्कळ लोक या उत्सवाला येत असत. तीन दिवस अन्नसंतर्पण होत असतें.

आहार—या ज्ञातीच्या सर्व वसाहतींत सारखा आहार नाहीं. उत्तरेस दूरवरची कोंकणपट्टी, दक्षिणेस गोवाप्रांत, आणि पूर्वेस कानडीप्रांत, त्या मर्यादांनीं परिवेष्टित कुडाळ प्रांत असल्यानें तांदूळ, जोंधळा, भाजीपाला, नारळ, दूध-दुभतें यांवर फार भर असतो. या जातींत क्वचित् मत्स्याहाराची संवय

जडली आहे. हा आहार सार्वत्रिक नाहीं. पिढीजाद मत्स्याहार न करणारीं बरींच घराणीं निरनिराळ्या वसाहतींत आहेत. अशीं यांचीं तीस-तीस चाळीस-चाळीस घरें असलेले असे कांहीं गांव आहेत, त्यांत एकाहि घराण्यांत कधीं काळीं मत्स्याहार होता असेंहि म्हणतां येणार नाहीं. मत्स्याहार करणारे देवधर्म, श्राद्धपक्ष, उपास तापास, अशा दिवशीं तो करीत नाहींत, किंवा देवघराशीं त्याचा संबंध कधींच आणीत नाहींत. मत्स्याहार अनुचित हीच भावना प्रबल म्हणून इतरांस कळूं न देण्याची खबरदारी घेण्यांत येते. मत्स्याहार होतो तो उत्तर देशीय गौड म्हणून होतो, किंवा स्मृतिकालीं सर्वच ब्राह्मण मत्स्याहारी होते म्हणून होतो, अशांतला कांहीं भाग नाहीं. दिवसानुदिवस या समाजांत मत्स्याहार-प्रवृत्ति कमी कमी होत आहे.

धर्मपंथ व मतें—कुडाळदेशकर ब्राह्मण हे स्मार्त, अद्वैती, शांकर मतानुयायी आहेत. पण ते आपल्या दाभोली गुरुपीठास भजतात. हे आपणास विशेषत: "भागवत" समजतात. कुडाळप्रांतांत या समाजाचे निग्रहानुग्रह करणारे शंकराचार्यान्वयी एकामागून एक असे तीन व त्यांच्या चार शाखा मिळून सात मठ झाले. **सोनवडे** येथील स्थान **आद्यपीठ** होय. चिंदर, गोळवण, दाभोली (सध्यांचें गुरुपीठ), श्रीमठ बागलपूर, निपाणी, नृसिंहवाडी इत्यादि ठिकाणीं लहान मोठे मठ होते व कांहीं आज आहेत. ही मठ परंपरा अद्याप शुद्ध, उज्वल व साक्षात्कार पटणारी अशी आहे. कुडाळदेशकर ब्राह्मण ज्ञातींतील हीं शांकर परंपरा सोनवडें मठाचे संस्थापक **श्री विद्यापूर्णानंद** यांच्यापासून चालत आली असून, शृंगेरी पीठाचे सुप्रसिद्ध आचार्य **श्री विद्याशंकरतीर्थ** यांच्या अनुग्रहानें चालू झालेली आहे.

सांपत्तिक स्थिति—सबंध ज्ञातच सात आठ शतकांची आणि ठाणे जिल्हा, वरघांटचे जिल्हे, दक्षिण कानडा या प्रांतांत दोन तीन शतकांची आहे. लहान मोठीं जमीनदार घराणीं आज या ज्ञातींत आहेत. शेतीवर निर्वाह करण्यांत या ज्ञातीस बिलकुल कमीपणा वाटत नाहीं. राज्य गेल्यानंतर ग्रामसत्तेस आणि स्वाभिमानास कमीपणा न आणणारें असें हें एकच उदरनिर्वाहाचें

साधन कुडाळ प्रांतांतल्या या ज्ञातीच्या कुटुंबांना होतें. दक्षिण कानड्यांतहि व्यापार व शेती यांवर निर्वाह होतो. ठाणें जिल्ह्यांतील लोक, मुंबई जवळ पडल्यामुळें अलीकडे शेतीकडे फारसें लक्ष देत नाहींत; पण मुंबई, ठाणें या भागांतील लोक कारकून, वकील, डॉक्टर, इंजिनियर, कॉन्टॅक्टर असे अनेक प्रकारचे व्यवसाय करीत आहेत. कांहीं लोक व्यापारांत इतके कुशल आहेत कीं, मुंबईतील टोप्या, जर्मनसिल्व्हर, ॲल्युमिनिअम ह्यांचा व्यापार बहुतेक या लोकांच्या हातांत आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. या ज्ञातींत उपाध्येपणा करून उदरनिर्वाह करणारे थोडे आहेत. हरिदास, पुराणीक, गवई, शिक्षक यांहि धंद्यावर उदरनिर्वाह करणारे कांहीं आहेत. उपरोक्त पांच सात धंद्यापैकीं एकहि धंदा नसलेले असे दुर्दैवी १०१५ लोक क्वचित या समाजांत आहेत ते स्वयंपाकाचें काम करतात. गेल्या तीस वर्षांत इंग्रजी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या झपाट्यानें वाढली आहे आणि नोकरपेशामुळें लोकांपुढें येऊन पडलेला पोटापाण्याचा बिकट प्रश्न याहि ज्ञातीपुढें येऊन पडला आहे. एकंदरींत ही ज्ञात सांपत्तिक दृष्ट्या मध्यम स्थितींत आहे.

साधुसंत—वारकरी, रामदासी, गिरिसंप्रदायी, नवनाथसंप्रदायी, आणि संन्यासी अशा परंपरेंतले बरेच सत्पुरुष या समाजांत उत्पन्न झाले. गेल्या पन्नास साठ वर्षांत होऊन गेलेले सुप्रसिद्ध वारकरी संत बाबा महाराज आणि दादा महाराज आजरेकर हे होत.

शिक्षण—वैदिक व लौकिक या दोनहि प्रकारचे शिक्षण या समाजांत आहे. प्रभु घराण्याच्या राजवटींत पांच दहा वेदपाठशाळा होत्या. हल्लीं मठ-संस्थानांतील जुनी वेदपाठशाळा श्री. टोपीवाल्यांच्या देणगीनें व्यवस्थित चालली आहे. अर्नाळ्यास एक लहानशी वेदपाठशाळा आहे. उच्च वैदिक शिक्षणासाठीं विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं तसेंच काशींतहि पाठविण्यांत येतें. पाश्चात्य देशांत निरनिराळ्या क्षेत्रांत शिक्षण घेण्याकरितां जाणाऱ्या शिष्यवृत्त्या देण्याची सोय झाली आहे. कित्येक स्त्रियांनीं उच्च शिक्षणांतहि आघाडी मारली आहे.

ज्ञातिसंस्था-(१) **विद्यावृद्धिसमाज**—स्थापन होऊन ३६ वर्षें झालीं. कायमनिधि १॥ लाखावर आहे. कै. लक्ष्मण कृष्ण सामंत या उदार गृहस्थानें या संस्थेला ५२ हजारांचा निधि दिला आहे. दरसाल साडे सात हजार रुपये हिंदुस्थानांतील व परदेशांतील शिक्षणाकरितां खर्च होतात. (२) **श्रीमंत टोपीवाले यांचा दाननिधि**-स्थापना होऊन ५ वर्षें झालीं. सन १९२४ सालीं मुंबई-गिरगावांत **पेंडसेवाडी** नांवांची मिळकत विकत घेऊन, १९२५ सालीं तिचा कायदेशीर ट्रस्ट बनवून घेऊन ज्ञातींतील सात गृहस्थांच्या ट्रस्टी मंडळाच्या स्वाधीन केला. या वाडीची आजची किंमत ५ लाख रुपयांची आहे. या वाडींतून होणारें वार्षिक उत्पन्न, हिंदुस्थानांत व परदेशांत शिक्षण, विद्यार्थिवसतिगृह, वाचनालय, सभागृह, गरिबास उपजीविका गरिबांचें उपनयन व और्ध्वदेहिक विधि, इत्यादिकडे खर्च केलें जातें. प्रतिवर्षीं केवळ शिक्षणासाठीं बारा हजार रुपयांच्या शिष्यवृत्त्या आणि इतर बाबींसाठीं बारा हजार आठशें रुपये मिळून एकंदर चोवीस हजार आठशें या निधींतून ज्ञातिहितार्थ खर्चीं पडतात. (३) **निराश्रित सहाय्यकारी फंड**-स्थापना १९१२ कायमनिधि अठरा हजार रुपयांचा आहे. ज्ञातींतील निराश्रितांना प्रतिवर्षीं ११०० रुपयांची मदत केली जाते. (४) **कै. बाबासाहेब वाघ "स्कॉलर्शिपट्रस्ट**-ज्ञातींतील गरीब विद्यार्थ्यांना दर वर्षीं सहाशे रुपयांच्या शिष्यवृत्त्या दिल्या जातात. (५) कै. बाळकृष्ण वामनाजी ऊर्फ बापूसाहेब **गव्हाणकर** (वसई) **स्कॉलर्शिप ट्रस्ट**--ज्ञातींतील गरीब विद्यार्थ्यांस दरवर्षीं ६०० रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यासाठीं स्थावर मिळकत ट्रस्टींच्या स्वाधीन केली आहे. (६) **श्रीमंत दाभोली-वेदपाठशाळा**—फक्त वैदिक शिक्षणासाठीं प्रति वर्षीं सुमारें एक हजार रुपये खर्च होतात. या शिवाय (७) **गौड ब्राह्मण सभा** मुंबई (८) **आद्यगौडब्रह्ममंडळ**, (मुंबई) (९) **आद्यगौडब्राम्हण समाज** (वसई) (१०) **गौडब्राम्हण-स्त्री-संघ** आणि (११) अखिल ज्ञातिसमूहाचें दाभोली मठ संस्थांतील **आद्यगौड ब्राह्मण महामंडळ**" अशा मुंबई, वसई आणि दक्षिण कोंकण या भागांत ज्ञातिहितवर्धक उपयुक्त संस्था आहेत. मालवण, वालावली, मड्डरें, परुळें, वसई,

गोरेगांव, कुडाळ इत्यादि ठिकाणीं शिक्षणसंस्था, दवाखानें, सार्वजनिक वाचनालयें व अन्नसत्रें इत्यादि या ज्ञातीनें स्थापन केलेल्या सर्व संस्था अनुकरणीय अशी कामगिरी करीत आहेत. ह्याशिवाय श्रीमंत नारायणराव टोपीवाले यांनीं आपल्या वडिलांच्या इच्छेनुसार सन १९२२ सालीं मुंबईंत फक्त आपल्या ज्ञातीतील मृतांच्या संस्कारांसाठीं सुमारें ३०।३५ हजार रुपये खर्चून एक ल्हानशी वाडी विकत घेतली आहे. तसेंच मुंबई–वांद्रे येथील या ज्ञातीच्या ठराविक अशा कांहीं सद्‌गृहस्थांनीं काशी क्षेत्रांत उच्च वैदिक शिक्षण घेत असलेल्या ज्ञातीच्या विद्यार्थ्यांसाठीं दर वर्षी ८०० रु. खर्च करण्याची व्यवस्था केली आहे. या माहिती वरून असें म्हणतां येतें कीं, पहिल्या फक्त सहा संस्थांकडून दर वर्षी या ज्ञातीकरितां विद्याजर्नासाठीं व निराश्रितांसाठीं ३६००० रु. म्हणजे दरमहा ३००० रु. खर्च केले जातात.

पौरोहित्य व अग्निहोत्र—गर्भादानादि अंत्येष्टीपर्यंत षोडश संस्कार वैदिक पद्धतीनें होतात. स्वज्ञातींत–विशेषत: कुडाळ प्रांतांत–पौरोहित्य करणारे पुरेसे आहेत. कऱ्हाडे ब्राह्मण व क्वचित् चित्पावन ब्राह्मण कुठें कुठें पौरोहित्य करतात. देशावरील वसाहतींत विशेषत: देशस्थ ब्राह्मण पुरोहित असतात. वसईकडील स्वज्ञातीय पुरोहितांना तेथील धनिकांनीं जमिनी दिल्या आहेत. ज्ञातीच्या राजवटींत कऱ्हाडे ब्राह्मणांना इनामें देऊन त्यांच्याकडे पौरोहित्य दिलें होतें, तेव्हां कऱ्हाडे ब्राह्मण ह्या जातीचा जुना पुरोहित वर्ग होय. गेल्या ६०–७० वर्षांत सहानुष्ठान–विषयक वादावरून कऱ्हाडे ब्राह्मणांचें पौरोहित्य नामशेष होत आलें. गेल्या शंभर वर्षांत कुडाळदेशकरांत एकच अग्निहोत्र होतें. श्रीधर अण्णा अग्निहोत्री (यांचें नांव श्रीधर लक्ष्मण बोंद्रे असें होतें) हे पेशवाईच्या अखेरीस नाशिक येथें अग्निहोत्र घेऊन होते. गेल्या ५०–६० वर्षांत केळूस येथील धनंजय गोत्री गृहस्थ काशींतून अग्निहोत्र घेऊन आले होते.

विशिष्ट चालीरीती—अनार्यत्वसूचक एकहि चाल नाहीं. पैशाचिक देवतेवर विश्वास आहे. नवशिक्षित अनुभवाअंतीं सुद्धां या गोष्टीवर विश्वास ठेवतो. घराण्याचा रक्षक कोणी एक “ समंध ” अशी समजूत असून त्याच्या नांवानें अर्चा केलेल्या नारळाची घरांतील देवतार्चनाबरोबर नित्य पूजा होते.

स्वज्ञातींत आणि द्रविड ब्राह्मण ज्ञातींत वार्षिक समाराधना व अन्नसंतर्पणें करण्याची चाल आहे. मृत जीवाच्या नांवानें नेहमीं गोग्रास देण्याची चाल कित्येक घराण्यांतून आहे. ज्ञातींतील ५१६ घराण्यांत अनंतव्रत असल्याचें आढळतें. हें व्रत कऱ्हाडे ब्राह्मणांकडून आलें असावें.

भाषा व लेखनकला—मूळ " कुडाळी भाषा, " ही गोव्यांतील कोंकणी भाषेहून निराळी असून मराठीचें जवळचें विकृत स्वरूप आहे. कुडाळी भाषा बोलणारे लोक कुडाळ प्रांताबाहेर फार थोडे आहेत. या ज्ञातींत लेखनकला पूर्वापार आहे. व्यवहारनिर्णय, ग्रामपंचायती, ज्ञातिपंचायती, देवस्थानपद्धति, देशपत्र्याचे निवाडे व महजर, सनदा, इनामपत्रें, बखरी, बोटखतें इत्यादि पद्धतशीर लिहून ठेवलेले इतिहासोपयोगी कागद पुष्कळ घराण्यांत आहेत. या ज्ञातींतील इतिहाससंशोधक रा. ब. वासुदेवराव बांबर्डेकर यांनीं अशा शेंकडो कागदांचा संग्रह केलेला आमच्या पाहाण्यांत आहे.

स्वभाव व महत्त्वाकांक्षा—स्वार्थत्याग, राष्ट्रीय भावना, याचना न करणें, स्नेहसंवर्धन, स्वाभिमान, सरळपणा, दिखाऊपणाची व खोट्याची चीड, इत्यादि गुणांकडे या समाजाची वृत्ति पूर्णांशानें वळलेली दिसते. कैक शतकांची क्षात्रवृत्ति व पूर्वीची ब्राह्मणवृत्ति सारांश, ब्रह्मक्षत्रगुणमिश्रित असा या ज्ञातीचा स्वभाव आहे. स्वतःच्या घराण्याचा अभिमान आणि सामाजिक दर्जा कायम ठेवण्याबद्दल उत्कट इच्छा या समाजांत आढळते. " महाराष्ट्र ब्राह्मण " या नांवाखालीं महाराष्ट्रांतील सर्व ब्राह्मण जातींचें ऐक्य होणें या समाजाला इष्ट वाटतें. म्हणून दशविध ब्राह्मणांपैकीं आपल्याहून निराळ्या नऊ ब्राह्मण जातींशीं अर्थात् महाराष्ट्रांत असतील त्यांच्याशीं सलोखा, ऐक्य व संघटण करून धर्म, देश व समाज यांचा उद्धार करावा अशी या समाजाची महत्त्वाकांक्षा आहे.

जुझोतिया वा बुंदेलखंडी ब्राह्मण.

पूर्वेतिहास—बुंदेलखंडचा राजा छत्रसाल ऊर्फ जुझावरसिंह याला यज्ञ करावयाचा होता. त्याकरतां त्यानें कनोज शहरांतील (संयुक्त प्रांतांतील) विद्वान ब्राह्मणांना पाचारिलें. यज्ञा निमित्त आलेले ब्राह्मण छत्रसालच्या आश्र-

यानें बुंदेलखंडीं कायमचे झाले व राहिले. जुझावरसिंह या नांवावरून यास जुझोतिया ह्मणजे लढाऊ ब्राह्मण असें नांव पडलें. उत्तरेकडील बहुतेक लोकांचा त्या काळीं शिपाईबाणा असे. त्या बाण्याला हे ब्राह्मण सामील होते. पहिल्या बाजीरावानें बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याजवर स्वारी केली होती ती मदतीसाठीं होती. महंमदखान बंगषचा पराभव केल्यावर छत्रसालनें बाजीरावावर प्रसन्न होऊन बराच मुलूख व फौज दिली. त्या फौजेंत हे जुझोतिया ब्राह्मण नोकर होते. ते पुढें महाराष्ट्रांत आले. तेव्हांपासून दक्षिणेंत यांची वसाहत असून त्यांना परदेशी किंवा गौड या नांवानें दाक्षिणेंतील ब्राह्मण जाणतात.

वास्तव्यस्थानें—खानदेशांत-एरंडोल, चाळीसगांव; वऱ्हाडांत अकोट, मंगळूपीर; नाशिक जिल्ह्यांत सठाणें, अमोदा, बाकला, त्र्यंबकेश्वर, मालेगांव, संगमनेर व नगर, पुणें ओतूर, औरंगाबाद, हैद्राबाद, बडोदें इत्यादि ठिकाणीं हे ब्राह्मण विरळ विरळ असे वसलेले आहेत. एकंदर लोकसंख्या हजार दीड हजार असावी.

वेद व शाखा—शुक्ल यजुर्वेद, माध्यंदिन शाखा.

गोत्रें व उपनावें—उपमन्यु, वशिष्ठ, शांडिल्य, काश्यप, भारद्वाज, वगैरे गोत्रें आणि दिक्षीत, पाठक, दुबे, तिवारी, पिसट, पांडे, रावत, चोबे, पुरोहित, इत्यादि उपनांवें आहेत.

धर्मकर्म व पौरोहित्य—उपनयनादि षोडश संस्कार, श्राद्धपक्ष, वास्तुशांत, श्रावणी, हव्यकव्य इत्यादि कृत्यें वैदिक पद्धतीनें होतात. पुरोहित ऋग्वेदी किंवा यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण असतात. कांहीं प्रसंगीं स्वजातीचे पुरोहित असतात.

व्रतें, वैकल्यें, सण व उत्सव—चैत्री प्रतिपदेपासून फाल्गुनी पौर्णिमेपर्यंत सर्व सण पाळतात. राम, कृष्ण, दत्त, हनुमान यांच्या जयंत्या करतात. महाएकादशी, शिवरात्र, संकष्टी, श्रावणी सोमवाराचे उपवास करतात. अक्षय्यतृतीयेला कुंभ दान देतात. वटसावित्री, हरतालका, ऋषिपंचमी, त्रिपुरीपूर्णिमा, संक्रांत, रथसप्तमी इत्यादि व्रतें होतात.

कुलदैवतें—वणीची सप्तशृंगी, तुळजापुरची भवानी, गाणगापुरचा दत्त हीं कुलदैवतें आहेत.

शिक्षण—चारदोन याज्ञिक, चारसहा पदवीधर, चारदोन 'मास्तरिणी' येवढींच शिकलेलीं माणसें आहेत. समाज शिक्षणांत मागसलेला आहे. स्त्रियांना थोडेंबहुत लिहितां वाचतां येतें. समाज जुन्याला चिकटून रहाणारा, परंतु शिकलेलीं माणसें प्रगतिप्रिय आहेत.

सांपत्तिक स्थिती—संगमनेरकडील ब्राह्मण उपाध्येपण करतात. आमोदा भागाकडील ब्राह्मण स्वतः शेतकी करतात. जमीनदार व सावकार असे कांहीं लोक आहेत. कित्येक नोकरही आहेत. सांपत्तिक स्थिति मध्यम प्रकारची आहे.

आरोग्य—पूर्वीचा लढाऊ बाणा असल्यामुळें अद्यापपर्यंत समाजांत सशक्तपणा आहे. कसरतीचा नाद कित्येकांना चांगला आहे.

विधवा—संख्या मिळत नाहीं. वपनाचा प्रघात नाहीं. विधवा झाल्यावर स्त्रिया फक्त कांचेच्या बांगड्या फोडतात व चांदी सोन्याच्या घालतात. कुंकू लावीत नाहींत.

स्वभाव—भोळसर, विश्वासू, श्रद्धाळू, व आदरातिथ्यशील आहे.

राहाणी—स्वच्छ व बरीचशी व्यवस्थित आहे.

अन्नव्यवहार—ओतूर, संगमनेर, नगर या भागांत क्वचित् देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे यांच्यांशीं रोटीव्यवहार होतो. तथापि सर्व साधारण सर्व महाराष्ट्रांत तो राजरोस होत नाहीं.

वैवाहिक स्थिति—बालविवाह होतो, तो प्रायः स्वजातींतच होतो. समाज लहान असल्यामुळें कित्येकांना मुली मिळत नाहींत म्हणून हट्टानें अविवाहित रहावें लागतें. श्रीमंत लोक उत्तरेकडे जातात व तिकडील जुझोतिया ब्राह्मणांस १०००।८०० रुपये देऊन मुली मिळवितात. महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याहि ब्राह्मणांशीं शरीरसंबंध होत नाहीं म्हणून गरीबांचीं लग्नें होत नाहींत.

महत्त्वाकांक्षा--जुझोतिया जात ही षट्कर्माधिकारी व सत्ब्राह्मण्यवान असल्यामुळें अन्नलग्नव्यवहारानें महाराष्ट्रिय ब्राह्मणांशीं एकरूप होऊन जावें अशी या ज्ञातीची महत्त्वाकांक्षा आहे.

आहार--सर्व ब्राह्मण मूळचे कनोजी असून निखालस शाकाहारी आहेत.

कर्तीं माणसें—दामोदर लक्ष्मण, भगवंत लक्ष्मण, विष्णु सिताराम, नथु रामचंद्र हे ओतूरच्या रावत घराण्यांतील पुरुष, रा. विष्णुपंत पांडे, श्रीरामभाऊपांडे, नगर; बाळकृष्ण दिक्षीत, सटाणे; श्री. शंकरराव पाठक, नाशिक; श्रीकृष्ण पांडे, मालेगांव; मुकुंदराज पाठक, बाळाजी विठ्ठल पाठक, बिहारीलाल पाठक, शंकर बळवंत तिवारी, नरहरपंत तिवारी, गोपाळराव पटवारी, एरंडोल; बाळकृष्ण विठ्ठल पाठक, हुशंगाबाद; श्री. लक्ष्मणराव दुबे, गुलाबराव दुबे मंगळूर पीर, गोपाळराव मिसर, शंकरराव रावत, बडोदें; अशीं विविध क्षेत्रांत कर्तीं माणसें आहेत.

धर्मपंथ व मतें--शांकर अद्वैतमतानुयायी स्मार्त व भागवत असे दोन्ही प्रकारचे ब्राह्मण आहेत. संकेश्वर पीठाचे निग्रहानुग्रह चालतात. इतर पठिाच्या आचार्यांना पूज्य समजतात.

तीर्थें व पवित्र स्थानें--सर्व हिंदूंचीं तीर्थें पूज्य आहेत व यात्रा करण्यांत येतात.

सूचि

शुद्धिपत्र व कांहीं सुधारणा

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	५	बृहन्महाष्ट्रांतील	बृहन्महाराष्ट्रांतील
२	२	अनुयाया	अनुयायी
२	६	याज्ञवल्क्यानें	याज्ञवल्क्यांनीं
३	११	शाखांची	ब्राह्मणांची
५	१४	धर्मशास्त्र, वैद्यक	धर्मशास्त्र व वैद्यक
५	२१	सं. गगनबावडा	सं. मलकापूर
६	४	बांबवाले	बंबवाले
६	२७	इत्यादि	वे. शा. सं. गोविंदशास्त्री पाठक मिरज इत्यादि
७	३	आठदह	आठदहा
७	९	जमखिंडी व बावडा या संस्थानिकांमध्यें आंतर-ज्ञाति-विवाह झाला आहे हा मजकूर ऋग्वेदी ब्राह्मण या प्रकरणांत न पडतां येथें चुकून पडला आहे. त्याऐवजीं श्रीमंत पंत प्रतिनिधी यांचे भाचे श्री. इनामदार यांना कोंकणस्थाची मुलगी केली असून सातारच्या पालकरांनीं नाशीकच्या समुद्र या माध्यंदिनाची मुलगी केली आहे असें वाचावें.	
९	१३	गोवर्धन चांगुणाबाई,	गोवर्धन ब्राह्मण चांगुणाबाई
९	१३	कोंकणची वृत्ति,	कोंकणची पौरोहित्यादि धार्मिक वृत्ति
९	१४	अंताजिपंत	पुरुषोत्तमपंत
१०	१	रघुनाथ, त्यांचे	रघुनाथ आणि त्यांचे
१०	१५	नाईक, राव	नाईकराव
१०	१६	सावरखेडकर	सावखेडकर

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१०	१९	देवघर	देवधर
१२	२३	हरिपाठक	हीरपाठक
१३	४	आचर्य	आचार्य
१३	११	केळलें	केळवें
१४	३	वर्चस्व, पौरोहित्य	वर्चस्व व पौरोहित्य
१४	१४	अनाचर	अनाचार
१५	१५	प्रोत्साहने	प्रोत्साहन
१५	२४	श्रींनीं जाहीरपणें	श्रींनीं कमिटीच्या अभिप्राया-नंतर स्वतंत्र दोन वर्षे
		,,	
१९	१०	सोनार, जनी	सोनार व जनी
१९	२५	वनाद्	वनात्
२१	१६	प्रेय:	ज्ञेय:
२१	२२	ब्रहज्योतिषार्णवांत	बृहज्ज्योतिषार्णवांत
२३	४	माध्यंदीन	माध्यंदिन
२५	२१	पैंगिष	पैंगिष
२६	१८	षटकर्माधिकारा	षट्कर्माधिकारी
२८	२०	द्रविडांतर्गत	द्राविडांतर्गत
२८	२६	बटी व्यवहारहि	बेटिव्यवहारहि
२९	१०	वुध वृहस्ती	बुधबृहस्पति
३१	१७	काळ्राम	काळूरांम
३३	२३	पुष्कळ वेळा होत	मुलींच होत नाहींत.
३५	१९	हिंदुकडून	समाजाकडून
३९	८	पूर्वेतिहास या माहितीचें खंडण केलेलीं दोन पत्रें अक्कलकोटच्या खताळ वकीलाकडून आलीं. परंतु चिकित्सेस अवसर मिळाला नाहीं.	
४०	१९	भडंग, इत्यादि	भडंग, पंढरपूरकर इ.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४२	२१	राजगुरु,	राजगुरु; पंढरपूरकर वकील
४६	१२	सावजी	चावजी
४६	१२	छपनी	जानी
४६	१३	उवटी	उवरी
४७	६	,,	,,
४७	७	देवराव	यादवराव
५०	२६	कान्हरकर	कान्हूरकर
५२	१२	हातातें	हातानें
५४	१५	नारमदेय	नारमदेव
५४	२१	विध्ययो	विंध्ययो
५९	१८	आढतात	आढळतात
६०	५	वरालाटाञ्च	वरालाटान्श्च
६०	२२	म्हणतास	म्हणतात
६३	१२	अंबाईच्या	अंब्याच्या
६५	२०	वैशंपावन	वैशंपायन
६७	९	११३६०५	११३५९५
७१	२	वोंगळ	ओंगळ
७१	१८	चित्पवानापेक्षां	चित्पावनापेक्षां
७३	पानाचा मथळा	शुक्लयजुर्वेदी	कृष्णयजुर्वेदी
७३	२४	देवर्षि उर्फ	२ देवर्षि वा
७४	१	देवर्षी	देवर्षि
७५	२२	शौनिक	शौनक
७५	२२	नितुंदन	नित्युंदन

देवरुख्यांमध्यें कपि व कौंडिण्य हीं गोत्रें सोडून इतर बाराच आहेत असें एक गृहस्थ सुचवितात.

७६	४	आयझरवाले उपाध्ये	आमझरवाले

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
७६	५	कार्लेकर	कार्येकर
७६	५	गोवधेकर	गोळधेकर
७६	१२	समाजांस	समाजांत
७८		शेवटच्या जाड्या टाइपांतील मजकुराचे जागीं पुढील मजकूर घातला तर देवरुखे समाजांतील दहिवली व मुंबईपक्ष एक होतील असें एक तटस्थ गृहस्थ कळकळीनें लिहितात. तशी पक्की निश्चिती असेल तर मग पुढील मजकूर शुद्ध समजावा. तो असा— पंचद्राविड ब्राह्मण जातींतील तुल्यबल जातींशीं बरोबरीच्या नात्यानें अंतर्ज्ञातीविवाह करण्याविषयीं या समाजाचें बहुमत अनुकूल आहे. या ज्ञातींतील एक पक्ष विवाहसंबंधांत समतेचें धोरण ठेवावें असें म्हणतो. तथापि हे दोन्ही पक्ष पोटजातींच्या एकीकरणाला कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांच्या प्रमाणेंच सर्वस्वीं अनुकूल आहेत.	
८१	१८	त्रिगुळराष्ट्राचा	त्रिगुळशब्दाचा
८२	१	थळगाटा शेजारीं	थटघाटाशेजारीं
८२	१४	इत्यादि वगैरे	इत्यादि
८३	४	(प्रांत)	(प्रांतांतून)
८३	१४	समजालाही	समाजालाही
८४	३	धंद	धंदा
८५	१९	विद्वद्वेदिक	विद्वद्वैदिक
८६	१२	शूद्रप्रमाणें	शूद्रांप्रमाणें
८६	१६	पुराकव्यानें	पुराव्यानें
८७	२	सव्यवहारास	व्यवहारास
८८	३	अन्नलग्नव्यवहार	अन्नलग्नव्यवहार

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८८	६	श्री. सुब्राह्मण्यतीर्थ	श्रीसुब्रह्मण्यतीर्थ
९२	८	बॅकर	बँकर
९३	९	ब्राह्मणांनीं	ब्राह्मणांना
९५	५	वुड्क	वुड्ख
९६	१७	विष्णु	विष्णुपंत
९९	२	चरकवाराहसूत्रीं	चरक, वाराहसूत्री
९९	२२	सकेश्वर	संकेश्वर
१००	१३	सस्थान	संस्थान
१०१	२३	भेद व्यातिरिक्त	भेदाव्यतिरिक्त
१०२	१०	स्वशाखयि	स्वशाखीय
१०२	२२	भारव्दाज	भारद्वाज
१०३	२५	कै. वा. श्रीमंत रावबहादूर आप्पासाहेब बुटी व श्रीमंत कै. वा. थोरले दाजीसाहेब बुटी हीं दोन मोठीं कर्तीं माणसें या समाजांत होऊन गेलीं. पैकीं पहिल्यांचे उपकार नागपूर भागांतील लोकांवर फार आहेत. गरीबांचे ते मायबाप होते. गोरक्षण, स्वदेशी मिल व गोकुळ अष्टमींतील अन्नसंतर्पण या द्वारांनीं त्यांनीं समाजसेवा केली आहे. दुसऱ्यांनीं येवढी श्रीमंती असतां अग्निहोत्र घेऊन अग्निनारायणाची आजन्म सेवा केली !	
११२	८	गर्भादानदि	गर्भाधानादि
११२	८	अंत्यैष्टीपर्यंत	अंत्येष्टिपर्यंत
११७	६	अशीं	पाटील अशीं
११७	२३	गोत्रपुरुषं	गोत्रपुरुष
११८	१	संमतीपत्रा	संमतिपत्र
११८	३	पंडीतराय	पंडितराय
११९	९	अल्लीबाग	अलीबाग

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
११९	१५	विवावसंबंध	विवाहसंबंध
१२१	१८	टेगशे	टेंगशे
१२२	२४	मांगरीशाचे	मांगिरीशाचे
१२४	९	व्यवास्थत	व्यवस्थित
१२७	१४	हुडणें	हुडेण
१२८	१०	६ मुलें	८।१० मुलें
१२८	२६	धर्मांचें	साधर्म्यानें
१३०	१४	आभिप्रयात	आभिप्रायांत
१३०	२५	यांच्या	यांच्या आज्ञेनें
१३०	२६	अध्यक्षत्वाखालीं	दे. भ. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षत्वाखालीं
१३२	२०	कोकणांतील	कोकणाख्यानांतील
१३३	६	भट्टभूशीं	भट्टप्रभूशीं
१३५	१४	घटत	घटत
१३५	१८	अलिकडे	अलीकडे
१३७	१४	यजुर्वेदी	म्हणून यजुर्वेदी
१३८	६	शाखचेच	शाखेचेच
१३८	९	गोमिल	गोभिल
१३९	५	मटवा	मखी
१३९	११	सुत्राधारें	सूत्राधारें
१४०	२२	दिवशीं	परंतु
१४३	१३	सालापासून	वर्षापर्यंत
१४३	१९	पुरोहितपणा	पुरोहितपण
१४४	२	'आहेत' यापुढें "त्यांचा गोवर्धनांशीं भोजनप्रतिभोजनादि व्यवहार होतो," हें वाक्य वाचावें.	
१४४	१७	कारण	तथापि

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१४७	१	जुनी जात	जुनी ब्राह्मण जात
१४८	२०	नित्यांजनीं	नित्याजनी
१५४	२७	नर्णय	निर्णय
१५८	२०	काठवाडे	काठेवाड
१५९	४	विश्वासनीय	विश्वसनीय
१५९	११	लहानशें	लहानसें
१६०	२	(भुमिका)	(भूमिकेचे)
१६०	१९	महिपती	महीपती
१६१	४	नातलगांला	नातलगाला
१६१	१८	आला	आली होती
१६२	८	वैर	वैर वरील राजकीय संबंधामुळें
१६२	१०	पारसनीस	पागनीस
१६३	५	कुटुंबें	कुटुंबें तेथें
१६३	१६	मानकरी	मतकरी
१६३	१७	वजुळे	जुवळे
१६३	१८	गित्से	गित्ये
१६४	८	वराहकर	वराडकर
१६४	९	दप्तरदार	दप्तरदार, गालवणकर
१६४	२३	वृत्तलेखनशास्त्रविशारद	वृत्तलेखनविशारद
१६६	२	परिस्थिति प्रमाणें	परिस्थितीप्रमाणें
१६६	२२	असत	असतात
१६७	२३	शतकांची	शतकांची जमीनदार
१६९	१०	गरिबास	गरिबांची
१६९	२२	श्रीमत्	श्रीमठ
१६९	२६	संस्थांतील	संस्थानांतील
१७२	३	सामील होते	अपवाद नव्हते.

हिंदुसमाजोद्धारक वाङ्मयमालेच्या चालकांची

विनंति

हिंदुसमाजाच्या भावी [illegible] उद्धाराला पोषक असें वाङ्मय प्रसिद्ध करून तें मुद्रण मूल्यात [illegible] किंवा लोकाश्रय भरपूर मिळाल्यास विनामूल्य देणें हा माले[illegible] उद्देश आहे. या कार्यास सर्व हिंदूंनीं खालीलप्रमाणें साह्य करावें अशीं विनंति आहे.

१. एकदम २५ रुपये देणारे		शाश्वतग्राहक
२. ,, १०० ,, ,,		हितचिंतक
३. ,, ३०० ,, ,,		आश्रयदाते

शाश्वत ग्राहकादि त्रिवर्गांना सर्व पुस्तकें फुकट मिळतील.

मालेचें कार्य.

वरील उद्देशाप्रमाणें श. १८४९ चैत्र शु. १५ ते त्रिपुरी पूर्णिमे-पर्यंत म्हणजे अवघ्या सात महिन्यांत १. हिंदुसमाज समर्थ कसा होईल, २. ब्राह्मणांतील पोटजातींचें एकीकरण, पूर्वार्ध व उत्तरार्ध. असे दोन ग्रंथ मालेच्या द्वारें प्रसिद्ध झाले असून त्यांनीं धर्म, समाज व भाषा यांची बऱ्याच उच्च दर्जाची सेवा केली आहे हें वाचकांनीं अवश्य लक्षांत ठेवावें. वरील दोन ग्रंथ म्हणजे पांचशें पानांचें भारदस्त वाङ्मय अवघ्या २। रुपयांत देऊन मालेनें आपलें कर्तव्य केलें आहे. हें कार्य असेंच धडा[illegible]नें व उत्साहानें व्हावें असें ज्यांना वाटतें त्यांनीं वरील विनंतीचा अवश्य वि[illegible]र करावा. “ आर्यसंस्कृतीचा उत्कर्षा-पकर्ष ” हें मालेचें तिसरें पुस्तक यापुढें प्रसिद्ध होईल.

पो. वांई, }
जि. सातारा. }

हिंदुधर्मप्रचारक,
महादेवशास्त्री दिवेकर.

किंमत) आर्य संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष (पृ. सं.
१ रुपया. २००

हें मालेचें तिसरें पुस्तक यापुढें प्रसिद्ध होईल. आर्य-संस्कृतीचें वैदिक स्वरूप कसें होतें, बौध्द संस्कृतीनें कोणते आघात केले, त्यांचा प्रतिकार कसा केला, इस्लामच्या जबरदस्त लोंढयाला आर्यसंस्कृतीनें मागें कसें रेटलें, अवशिष्ट इस्लामच्या स्वरूपास कसें आत्मसात करावें, पाश्चात्य संस्कृति कशी पचवावी व आर्यसंस्कृतीचा उत्कर्ष कसा करावा इत्यादि विषयांचें धर्मशास्त्र, समाजशास्त्र, कुराण व इतिहास यांच्या आधारानें केलेलें तर्कशुद्ध व सप्रमाण विवेचन या पुस्तकांत वाचावयास मिळेल. हें उद्बोधक, स्फूर्तिदायक व मार्गदर्शक पुस्तक त्वरित प्रसिद्ध व्हावें म्हणून फक्त एकदां पंचवीस रुपये देऊन मालेचें शाश्वतग्राहक व्हावें. शाश्वतग्राहकांची संख्या निदान १०० झाली म्हणजे मालेच्या मुद्रणाचें कार्य झपाझप होईल. शाश्वत-ग्राहकांना मालेचीं सर्व पुस्तकें टपालखर्चासह फुकट मिळतील.

पत्ताः- हिंदुसमाजोद्धारक कार्यालय,
पो. वांई, जि. सातारा.